म. ग्रं. सं. ठाणें.

विषय इतिहास

सं. क्र. 3508

पुस्तकाचें नांव दुसरे ...

लेखक ...

सूचना—पुस्तक आठ दिवसांवर ठेवूं नका ...

REFBK-0006770

# दुसरें क्रान्तियुद्ध

(आझाद हिंद सरकारचा इतिहास)

लेखक

शां. तु. भालेकर, ॲडव्होकेट
हायकोर्ट, मुंबई.

REFBK-0006770

महाराष्ट्र ग्रंथ भांडार मुंबई ४

मे १९४६

किंमत साडेतीन रुपये

मुखपृष्ठ, चित्रें आणि रेखाचित्रें
**दीनानाथ दलाल,** जी. डी. आर्ट

प्रकाशक–शंकर वामन कुलकर्णी, महाराष्ट्र ग्रंथ भांडार मुंबई ४
मुद्रक–कृष्णविहारी वाजपेयी, न्यू टाईम्स प्रिंटरी लिमिटेड मुंबई ४

# अनुक्रम

## भाग पहिला


१ सुभाषबाबूंचें जर्मनींत प्रयाण १०
२ हिंदी स्वातंत्र्य-संघ १६
३ सुभाषबाबूंचें पूर्व आशियांत आगमन २५
४ आझाद हिंद सरकारची पुनर्घटना ३५
५ राणी लक्ष्मी पथक ४३
६ आघाडीवर ५०
७ हुकमत्-ए-आझाद-हिंद ६०
८ आझाद फौजेंतील मराठ्यांची कामगिरी ६८


## भाग दुसरा


१ लाल किल्ल्यांत ७७
२ फिर्यादीचा पुरावा ८८
३ आरोपींचे जबाब १२५
४ आरोपींचा पुरावा १३६
५ गुलामांचें गाऱ्हाणें १६५

मे १९४६

किंमत साडेतीन रुपये

मुखपृष्ठ, चित्रें आणि रेखाचित्रें
**दीनानाथ दलाल,** जी. डी. आर्ट

प्रकाशक–शंकर वामन कुलकर्णी, महाराष्ट्र ग्रंथ भांडार मुंबई ४
मुद्रक–कृष्णविहारी वाजपेयी, न्यू टाईम्स प्रिंटरी लिमिटेड मुंबई ४

जि. ना. वाचनालय ... नं. २२२५

# अनुक्रम

## भाग पहिला


१ सुभाषबाबूंचें जर्मनींत प्रयाण १०
२ हिंदी स्वातंत्र्य–संघ १६
३ सुभाषबाबूंचें पूर्व आशियांत आगमन २५
४ आझाद हिंद सरकारची पुनर्घटना ३५
५ राणी लक्ष्मी पथक ४३
६ आघाडीवर ५०
७ हुकमत्–ए–आझाद–हिंद ६०
८ आझाद फौजेंतील मराठ्यांची कामगिरी ६८


## भाग दुसरा


१ लाल किल्ल्यांत ७७
२ फिर्यादीचा पुरावा ८८
३ आरोपींचे जबाब १२५
४ आरोपींचा पुरावा १३६
५ गुलामांचें गाऱ्हाणें १६५

# संदेश—

**स्वातंत्र्याच्या शिलेदारांनो,**

हिंदभूमीच्या स्वातंत्र्याचें माझें एका काळचें स्वप्न आज खरें होत आहे. हिंदभूमीचा तिरंगी झेंडा, तिचा राष्ट्रीय सन्मान आणि तिच्या पराक्रमी योध्यांची परंपरा आज आपल्या हातीं देऊन माझ्या पुढील कार्यासाठीं मी अज्ञात स्थळीं जात आहें. अखंड हिंदी राष्ट्राच्या स्वातंत्र्याचा सन्मान सांभाळण्यासाठीं, त्या स्वातंत्र्याच्या जरिपटक्याचे तुम्हीं मानकरी, तुमच्या पराक्रमी रक्तांतील शेवटच्या थेंबापर्यंत आणि तुमच्या प्राणांतील शेवटच्या श्वासापर्यंत स्वार्थत्याग कराल याची मला खात्री आहे. हिंदुस्थानची नवी पिढी तुमचें अनुकरण करील अशी तेजस्वी परंपरा तुम्हीं निर्माण केली आहे.

जय हिंद

आझाद हिंद सरकार
मुख्य कार्यालय, रंगून
२४ एप्रिल १९४५.

**सुभाषचंद्र बोस**
सेनाध्यक्ष
आझाद हिंद सेना.

## समर्पण—

आपल्या गुलाम राष्ट्राच्या स्वातंत्र्यासाठीं आपल्या परकी मालकांविरुद्ध लढण्याचा आपला नैसर्गिक हक्क प्रस्थापित करून ब्रिटिश साम्राज्यशाहीविरुद्ध इंफालच्या समरांगणावर ज्यांनीं शेवटचा भीषण रण-संग्राम दिला आणि आपल्या ध्येयाच्या आत्यंतिक पूर्तीसाठीं ज्या चार हजार क्रान्तिवीरांनीं त्या समरांगणावर आपले देह ठेविले त्या शूर आझाद सैनिकांच्या पराक्रमी पुण्याईस त्यांच्या कर्तबगारीचा हा इतिहास अर्पण असो.

—लेखक

## चार शब्द

हिंदभूमीच्या स्वातंत्र्यासाठीं फेब्रुवारी १९४४ पासून ऑगस्ट १९४५ पर्यंत आराकानच्या डोंगरांत, ब्रह्मदेशाच्या हद्दीवर आणि शेवटीं इंफा-ळच्या आघाडीवर आझाद हिंद सेनेच्या तुफानी सैनिकांनीं ब्रिटिशांविरुद्ध ज्या घनघोर लढाया दिल्या त्यांना क्रान्तिवीर श्री सुभाषचंद्र बोस यांनीं हिंदी स्वातंत्र्याचें दुसरें आणि शेवटचें क्रान्तियुद्ध असें नांव दिलें आहे. स्वातंत्र्याच्या यशस्वी लढ्याला क्रान्ति असें म्हणतात. इंफाळच्या दुसऱ्या लढाईत आझाद हिंद सेनेला माघार घ्यावी लागली, तरी तिच्या पाडावा-नंतर हिंदी जनतेंत, हिंदी शाही लष्करांत आणि वैमानिक दलांत जीं निदर्शनें झालीं आणि हिंदी शाही आरमारांत जो सशस्त्र प्रक्षोभ झाला त्यांचा प्रात्यक्षिक परिणाम लक्षांत घेतल्यास हें क्रान्तियुद्ध अयशस्वी झालें असें म्हणतां येत नाहीं.

आझाद सैन्याधिकाऱ्यांवरील पहिल्या खटल्याच्या सुरवातीपासून आतांपर्यंत हिंदी लष्करांत आणि आरमारांत जी आत्यंतिक स्वातंत्र्य-लालसा निर्माण झाली तिचें श्रेय आझाद सेनेच्या कर्तबगारीस असलें तरी ती कर्तबगारी न्यायासनासमोर आणण्याचें श्रेय (?) ब्रिटिश राजसत्तेच्या मूर्खपणाला आहे. त्यानंतर पहिल्या आझाद सेनेचा पराक्रमी प्रणेता जनरल मोहनसिंग आणि मोहनसिंगाच्या अटकेनंतर चाळीस हजार आझाद सैनिकांचें नीतिधैर्य टिकवून धरणारे पुनर्घटित आझाद सैन्याचे मुख्य सेनापती आणि आझाद सेनाध्यक्ष सुभाषचंद्र बोस यांचे मुख्य लष्करी मंत्री जनरल जगन्नाथराव भोसले यांना बंधमुक्त केल्यामुळें त्यांच्यावर लष्करी खटले भरण्याची सरकारला छाती झाली नाहीं हें स्पष्टच झालें.

आझाद सरकारच्या स्थापनेचा, घटनेचा आणि कामगिरीचा हा स्फूर्तिदायक इतिहास दोन भागांत विभागण्यांत आला असून आझाद हिंद सेनानींवरील खटल्यांच्या कागदपत्रांवरून व इतर संशोधित माहितीवरून तो जुळविण्यांत आला आहे. आझाद हिंद-बचाव-समिती आणि श्रेष्ठ कायदेपंडित स्व. भुलाभाई देसाई यांच्या अपूर्व कामगिरीमुळेच हा प्रयत्न शक्य झाला असून तो कितपत साध्य झाला आहे हें ठरविण्याचें काम वाचकांचें आणि वृत्तपत्रांचें आहे.

१५ मे १९४६
३६ लॉयर्स चेंबर्स,
पिकेट रोड, मुंबई २

शां. तु. मालेकर

# भाग पहिला

अं. १०५



सुभाषचंद्र बोस आणि हिटलर
यांची जर्मनींत भेट

पृष्ठ ९

[ इलस्ट्रेटेड विकलीच्या कृपेनें ]

दा. ६७८०

# सुभाषबाबूंचें जर्मनींत प्रयाण

२३ जानेवारी १९४१ ची गोष्ट. त्या दिवशीं सुभाषबाबूंनीं आपल्या मौनाला सुरवात केली आणि आपल्या अभ्यासिकेंत स्वतःला बंदिस्त करून घेतलें. आपल्या मौनाचा कोणीही कोणत्याही प्रकारें भंग करूं नये अशी त्यांची सर्वांना सूचना होती. ठरल्यावेळीं ठरल्याजागीं अन्नपाणी नेऊन ठेवण्याखेरीज कोणीही त्यांना कसलाच त्रास दिला नाहीं. आपल्या अभ्यासिकेंतील एकांतांत ते ध्यानमग्न झाले.

पहिला दिवस असाच गेला. दुसरा गेला, तिसरा गेला. चवथ्या दिवशीं नेहमीच्या वेळीं सुभाषबाबू आपल्या अभ्यासिकेंत दिसले नाहींत. हां हां म्हणतां सगळीकडे बातमी पसरली. लोक आश्चर्यचकित झाले. शोधाशोध सुरू झाली. गुप्त पोलीसखातें कसून आपल्या कामाला लागलें. सगळें शहर आणि आसमंत त्यांनीं चाळला. किनारा शोधला. टेहळणी ठेवली आणि समुद्रावर बोटीसुद्धां सोडल्या. परंतु सुभाषबाबू कोठेंच सांपडले नाहींत.

या एकांताच्या दुसऱ्याच दिवशीं संध्याकाळीं नेहमींप्रमाणें त्यांच्या बंगल्याच्या फाटकांत एक मोटार शिरली. त्यांतील इसमांचे चेहरे पोलिसांच्या ओळखीचे होते. मोटारींतील दोघे इसम बंगल्यावर गेले आणि कांहीं वेळानें बंगल्यावरून उतरून सरळ मोटारींत येऊन बसले. गुप्त गस्तीदारांनीं आलेल्या दोघांस जाणारे दोघे पाहून घेतले. मोटार मार्गाला लागली. बंगालच्या एका प्रसिद्ध मंत्र्याच्या घराकडून निघालेली ती मोटार संध्याकाळच्या वेळीं स्टेशनच्या बाजूनें जातांना कांहीं लोकांनीं पाहिली होती. आणि त्याच्या तिसऱ्या दिवशीं सुभाषबाबू आपल्या अभ्यासिकेंतून "गुप्त" झाल्याचें उघड झालें.

× × ×

त्रिपुरी अधिवेशनाच्या वेळीं सरदार वल्लभभाई पटेल विरुद्ध सुभाषचंद्र बोस या वादांत सुभाषबाबूंची भूमिका काय होती हें प्रसिद्ध आहे. सुभाषबाबूंची

तत्वप्रणाली आणि त्यांचा कार्यक्रम हिंदी राजकारणाच्या अभ्यासूंन माहित आहे. आयर्लंडचे सर्वाधिकारी इमान डी. व्हॅलेरा यांच्या आणि सुभाषबाबूंच्या भेटी पुष्कळदां झाल्या होत्या. आणि त्यांच्या पासूनच त्यांना अंत:स्फूर्ति झाली होती. जागतिक महायुद्ध होणार आणि त्या युद्धाची संधी साधून दोस्तराष्ट्रांच्या शत्रूंच्या मदतीवर हिंदीस्वातंत्र्यासाठीं सशस्त्र युद्ध आपण पुकारणार असा त्यांचा गुप्त कार्यक्रम होता. अहिंसावादानें राष्ट्राचें सामर्थ्य वाढत असलें तरी दहशतवादानें आपल्याला लवकर स्वातंत्र्य मिळत असेल तर तें घेणं जरूर आहे असें त्यांचें मत होतें. आणि म्हणूनच आलेल्य संधीचा फायदा घेण्यासाठीं ते नुसते टपून बसले होते. युद्ध सुरू झाल्यानंतरा तर त्यांना हिंदीस्वातंत्र्याचीं स्वप्नेंच पडूं लागलीं आणि प्रत्यक्ष कृतीसाठीं ते आतूर झाले.

१९४० मध्यें फ्रान्सनें जर्मनीला शरणागती दिली आणि ब्रिटिशांचें धाबें दणाणलें. त्यांचें आशियांतील साम्राज्य कोसळण्याची भीति निर्माण झाली. त्यावेळीं रशियानें हिंदी—राष्ट्रसभेच्या कांहीं पुढाऱ्यांना असें सुचविलें कीं राष्ट्रसभेचे प्रतिनिधी जर रशियन सरकारशीं वाटाघाटीस येतील आणि त्यांचें सहमत होईल तर सोव्हियट सरकार हिंदुस्थानांत सशस्त्र बंड उभारण्यास जरूर लागेल ती शस्त्रसामुग्री देण्यास तयार आहे. परंतु राष्ट्रसभेच्या पुढाऱ्यांनीं रशियन सरकारनें देऊं केलेली मदत एकदम फेटाळून लावली आणि नंतर हिंदीस्वातंत्र्य मिळविण्यासाठीं ही मदत जरूर स्वीकारण्याचें सुभाषबाबूंनीं कबूल केलें. परंतु त्यासाठीं त्यांनीं रशियांत जावें कसें हा एक अत्यंत अडचणीचा प्रश्न होता.

१९३९ मध्यें याच कामासाठीं हिंदुस्थानांतून निसटण्याची सुभाषबाबूंनीं केलेली खटपट ऐनवेळीं फुकट गेली होती. नंतर १९४० च्या नोव्हेंबर-मध्यें आजारामुळें त्यांची तुरुंगांतून सुटका झाली आणि कलकत्त्यांतील एल्जिन रस्त्यावरील त्यांच्या निवासस्थानीं त्यांना स्थानबद्ध करण्यांत आलें. त्यांच्या हालचालींचा सुगावा सरकारला लागल्यामुळें त्यांच्यावर गुप्त पोलिसांची कसून नजर होती. त्यांची प्रकृति सुधारतांच पुन्हा त्यांना अटकेंत टाकण्याचा सरकारचा इरादा होता.

त्यावेळीं कलकत्त्यांतील अकाली पुढारी, देशदर्पण पत्राचे संपादक, सरदार नरिंजनसिंग यांचीं व सुभाषबाबूंचीं अंतस्थ बोलणीं चालू होतीं. नरिंजनसिंगांच्या कलकत्त्यांतील घरांत फतेदवार खून खटल्यांतील एक प्रमुख कम्युनिस्ट आरोपी ईश्वरसिंग हे लपून दिवस काढीत होते. त्यांची आणि सुभाषबाबूंची भेट घडविण्यांत आली. सुभाषबाबूंना पंजाबांत नेऊन तेथून पुढें पेशावरांत नेण्याची आणि जंगली टोळ्यांच्या टापूंतून काबूलपर्यंत त्यांच्याबरोबर प्रवास करण्याची जबाबदारी आपल्या अंगावर घेण्याचें ईश्वरसिंगांनीं कबूल केलें. मध्यंतरीच्या काळांत पंजाबांतील कम्युनिस्ट पक्षानें गुप्त बैठक भरवून या योजनेबद्दल चर्चा केली आणि त्या बैठकींत ठरल्याप्रमाणें त्यांनीं सुभाषबाबूंची भेट घेतली. नंतर योग्य वेळीं एका मंत्र्याच्या मदतीनें सुभाषबाबू कलकत्त्यांतून निसटले आणि मोटारीनें बरद्वानला जाऊन पोंचले. तेथून पठाणी वेषांत त्यांना पंजाब मेलच्या दुसऱ्या वर्गाच्या डब्यांतून पेशावरला नेण्यांत आलें. पेशावरला खान अब्बासखान यांच्या घरीं ते सहा दिवस राहिले आणि तेथून एका शरीररक्षकासोबत काबूलला जाऊन पोंचले. पेशावरपुढें पांच मैल ते टांग्यांतून गेले व पुढील काबूलपर्यंतचा सर्व प्रवास त्यांनीं पायींच केला. काबूलला पोंचल्यानंतर प्रवासाच्या त्रासानें ते आजारी पडले. या ठिकाणीं एका गुप्त पोलीस अधिकाऱ्यास त्यांच्या हालचालींवरून संशय आला. त्या अधिकाऱ्याला त्यांनीं दहा रुपये आणि एक फाउंटन पेन बक्षिस दिलें. आपल्याला आलेला संशय पडताळून पाहाण्याची त्याला संधी मिळण्यापूर्वींच सुभाषबाबू तेथून निसटले आणि कांहीं दिवसांनीं रशियांत जाऊन पोंचले.

ठरल्याप्रमाणें रशियांत त्यांनीं सोव्हिएट सरकारची भेट घेतली परंतु रशियांत या वेळेस निराळेंच राजकारण शिजत होतें. जर्मनीचे आणि रशियाचे परस्पर संबंध तुटूं पाहात होते आणि ब्रिटन-रशियाची दोस्ती घडून येत होती. अशावेळीं ब्रिटनच्या आणि आपल्या राजकीय संबंधास बाध येईल अशा प्रकारच्या कोणत्याही गोष्टी करण्यास रशियन सरकार कबूल नव्हते. अशा परिस्थितींत रशियांत राहाणेंच मुळीं फार धोक्याचें होतें. म्हणून आपल्या मूळ योजनेप्रमाणें जर्मनींत जाऊन खटपट करण्याचें सुभाषबाबूंनीं ठरविलें. रशियांतील कांहीं जर्मनांनीं त्यांची भेट घेऊन त्यांना

जर्मनींत सुखरूपपणें नेऊन पोंचविण्याचें कबूल केलें आणि त्याप्रमाणें व्यवस्था होतांच सुभाषबाबू विमानानें जर्मनींत जाऊन पोंचले.

सुभाषबाबूंचें अंगीकृत कार्य यशस्वी झाल्यास किंवा फ्रान्सच्या शरणागती-नंतर ब्रिटिशांना हिंदुस्थानांतून पाय काढावा लागल्यास पंजाब प्रांत आपल्या ताब्यांत ठेऊन त्यांत कायदा आणि सुव्यवस्था प्रस्थापित करण्या-साठीं मास्टर तारासिंग आणि इतर प्रमुख शीख पुढारी यांनीं लाहोर आणि अमृतसर हीं आपलीं मुख्य केंद्रें काबिज करावयाचीं असा थाट घातला होता. परंतु ही बातमी सर शिकंदर हयातखान यांस लागतांच त्यांनीं इंग्रज सरकारकडे ह्या सर्व प्रकरणाची हकिगत सादर केली. याच सुमारास पतिया-ळाचे महाराज यांनीं ५०० तोफा या कामासाठीं मास्टर तारासिंग यांच्या उपयोगासाठीं देऊं केल्याची बातमी पसरली आणि वायव्य सरहद्द प्रांता-तील कोणी उपद्यापी गृहस्थांनीं तशा मजकुराचें पतियाळाच्या महाराजांना पाठविलेलें एक पत्र सेन्सॉर खात्यानें सरकारच्या हवालीं केलें.

## डॉ. बा मॉ

याच सुमारास ब्रह्मदेशाचे माजी पंतप्रधान डॉ० बा मॉ इंग्लंडला गेले होते. ब्रह्मदेशाच्या स्वातंत्र्याच्या अटी मान्य केल्यास ब्रिटिशांना आपण जपानी आक्रमणाविरुद्ध शक्य असेल ती खटपट करण्यास तयार आहोंत असा त्यांनीं सरळ प्रश्न टाकला. परंतु त्यांच्या मागणीस ब्रिटिश राजसभेनें भीक घातली नाहीं. नंतर ते अमेरिकेंत गेले. अमेरिकन राष्ट्र त्यावेळीं युद्धा-पासून तटस्थ होतें. तेथें त्यांनीं आपल्या स्वातंत्र्याच्या मागणीचें प्रचारकार्य वर्तमानपत्रांतून अमेरिकन लोकांसमोर मांडून बरीच जागृति केली. त्यामुळें ब्रिटिश सरकारचें पित्त खवळलें. डॉ. बा मॉ अमेरिकेंतून परत येत अस-तांना त्यांना वाटेंतच अटक झाली आणि "ब्रह्मी संरक्षण" कायद्याखालीं जपानशीं संधान साधीत असल्याच्या आरोपावरून त्यांना एक वर्षाची शिक्षा ठोठाऊन मंडालेच्या तुरुंगांत डांबून टाकण्यांत आलें.

१९४३ सालच्या सुरवातीस ब्रह्मदेशाच्या गव्हर्नराच्या मियामो येथील निवासस्थानावरून एक मोठा अधिकारी निरोप घेऊन निघाला तो थेट मंडालेच्या तुरुंगांत आला. तेथें दिवसभर त्याचें आणि डॉ. बा मॉचें बोलणें

झालें. ब्रह्मदेशांतील चळवळी बंद करून ब्रह्मदेशांत राजनिष्ठ वातावरण निर्माण करण्याच्या अटींवर त्यांची तुरुंगांतून मुक्तता करावयास सरकार तयार होतें.

परंतु डॉ. बा. मॉ सारख्या जहाल देशभक्ताच्या मनाचा ठाव गव्हर्न-रांच्या दूताला मिळणें शक्य झालें नाहीं. सरकारच्या अटींबद्दल त्यांनीं तीव्र नापसंती दाखविली. त्यांनीं आपली भूमिका त्या सरकारी अधिकाऱ्याला समजाऊन सांगण्याचा प्रयत्न केला. सरकारी अधिकारी डॉ. बा मॉंचा निरोप घेऊन परत गेला. डॉ. बा मॉंच्या उलट अटी मियामोला नाकार-ण्यांत आल्या आणि त्यांच्यावरील बंधनें अधिक कडक करण्यांत येऊन हिंदु-स्थानांतील एका संरक्षित तुरुंगांत त्यांना पाठविण्याचें ठरलें. पुन्हां तोच अधिकारी डॉ. बा मॉंना मंडालेहून हालविण्यासाठीं सशस्त्र पहारेकऱ्यांनिशीं मंडालेच्या तुरुंगांत आला. या खेपेस त्यांना निरोप नव्हता. आज्ञा होती.

परंतु ती आज्ञा अम्लांत येऊं शकली नाहीं. डॉ. बा मॉ तुरुंगांत होते कुठें ? ते "गुप्त" झाले होते. ते कसे निसटले आणि कोठें गेले हें कोणा-लाच सांगतां येइना. तुरुंगाचे दरवाजे आणि खिडक्या जशाच्या तशा होत्या. मोक्यावरचे पहारेकरी पहाऱ्यावर होते. जणूं रात्रीच्या बारा तासांत कांहींच झालें नव्हतें. परंतु तुरुंगांतला राजबंदी मात्र नाहींसा झाला होता.

× × ×

त्या दिवशीं पहांटेलाच कांहीं ब्रिटिश समुद्रयानें इरावतीच्या पाण्यावर उतरलेलीं लष्कराच्या टेहळक्यांनीं मात्र पाहिलीं होतीं. परंतु तिकडे कोणी विशेष लक्ष दिलें नाहीं. भगवा पोषाख केलेले कांहीं ब्रम्ही साधू त्या विमानां-कडे जात असलेले सुद्धां कांहीं शिपायांनीं पाहिले होते. लगेच ते विमानांत चढले. विमानांचीं इंजिनें चालू झालीं आणि तीं भुर्रदिशीं आकाशांत उंच उडून गेलीं.

त्या दिवशीं सकाळींच नेहमींप्रमाणें तुरुंगांत राजबंद्यांची हजेरी घेण्यांत आली. त्यांत एक प्रमुख राजबंदी कमी निघाला.

जर्मनींत सुखरूपपणें नेऊन पोंचविण्याचें कबूल केलें आणि त्याप्रमाणें व्यवस्था होतांच सुभाषबाबू विमानानें जर्मनींत जाऊन पोंचले.

सुभाषबाबूंचें अंगीकृत कार्य यशस्वी झाल्यास किंवा फ्रान्सच्या शरणागती-नंतर ब्रिटिशांना हिंदुस्थानांतून पाय काढावा लागल्यास पंजाब प्रांत आपल्या ताब्यांत ठेऊन त्यांत कायदा आणि सुव्यवस्था प्रस्थापित करण्या-साठीं मास्टर तारासिंग आणि इतर प्रमुख शीख पुढारी यांनीं लाहोर आणि अमृतसर हीं आपलीं मुख्य केंद्रें काबिज करावयाचीं असा घाट घातला होता. परंतु ही बातमी सर शिकंदर हयातखान यांस लागतांच त्यांनीं इंग्रज सरकारकडे ह्या सर्व प्रकरणाची हकिगत सादर केली. याच सुमारास पतिया-ळाचे महाराज यांनीं ५०० तोफा या कामासाठीं मास्टर तारासिंग यांच्या उपयोगासाठीं देऊं केल्याची बातमी पसरली आणि वायव्य सरहद्द प्रांता-तील कोणी उपद्यापी गृहस्थांनीं तशा मजकुराचें पतियाळाच्या महाराजांना पाठविलेलें एक पत्र सेन्सॉर खात्यानें सरकारच्या हवालीं केलें.

## डॉ. बा मॉ

याच सुमारास ब्रह्मदेशाचे माजी पंतप्रधान डॉ० बा मॉ इंग्लंडला गेले होते. ब्रह्मदेशाच्या स्वातंत्र्याच्या अटी मान्य केल्यास ब्रिटिशांना आपण जपानी आक्रमणाविरुद्ध शक्य असेल ती खटपट करण्यास तयार आहोंत असा त्यांनीं सरळ प्रश्न टाकला. परंतु त्यांच्या मागणीस ब्रिटिश राजसभेनें भीक घातली नाहीं. नंतर ते अमेरिकेंत गेले. अमेरिकन राष्ट्र त्यावेळीं युद्धा-पासून तटस्थ होतें. तेथें त्यांनीं आपल्या स्वातंत्र्याच्या मागणीचें प्रचारकार्य वर्तमानपत्रांतून अमेरिकन लोकांसमोर मांडून बरीच जागृति केली. त्यामुळें ब्रिटिश सरकारचें पित्त खवळलें. डॉ. बा मॉ अमेरिकेंतून परत येत अस-तांना त्यांना वाटेंतच अटक झाली आणि "ब्रह्मी संरक्षण" कायद्याखालीं जपानशीं संधान साधीत असल्याच्या आरोपावरून त्यांना एक वर्षाची शिक्षा ठोठाऊन मंडालेच्या तुरुंगांत डांबून टाकण्यांत आलें.

१९४३ सालच्या सुरवातीस ब्रह्मदेशच्या गव्हर्नराच्या मियामो येथील निवासस्थानावरून एक मोठा अधिकारी निरोप घेऊन निघाला तो थेट मंडालेच्या तुरुंगांत आला. तेथें दिवसभर त्याचें आणि डॉ. बा मॉचें बोलणें

झालें. ब्रह्मदेशांतील चळवळी बंद करून ब्रह्मदेशांत राजनिष्ठ वातावरण निर्माण करण्याच्या अटींवर त्यांची तुरुंगांतून मुक्तता करावयास सरकार तयार होतें.

परंतु डॉ. बा. मॉ सारख्या जहाल देशभक्ताच्या मनाचा ठाव गव्हर्नरांच्या दूताला मिळणें शक्य झालें नाहीं. सरकारच्या अटींबद्दल त्यांनीं तीव्र नापसंती दाखविली. त्यांनीं आपली भूमिका त्या सरकारी अधिकाऱ्याला समजाऊन सांगण्याचा प्रयत्न केला. सरकारी अधिकारी डॉ. बा मॉंचा निरोप घेऊन परत गेला. डॉ. बा मॉंच्या उलट अटी मियामोला नाकारण्यांत आल्या आणि त्यांच्यावरील बंधनें अधिक कडक करण्यांत येऊन हिंदुस्थानांतील एका संरक्षित तुरुंगांत त्यांना पाठविण्याचें ठरलें. पुन्हां तोच अधिकारी डॉ. बा मॉना मंडालेहून हालविण्यासाठीं सशस्त्र पहारेकऱ्यांनिशीं मंडालेच्या तुरुंगांत आला. या खेपेस त्यांना निरोप नव्हता. आज्ञा होती.

परंतु ती आज्ञा अमलांत येऊं शकली नाहीं. डॉ. बा मॉ तुरुंगांत होते कुठें ? ते "गुप्त" झाले होते. ते कसे निसटले आणि कोठें गेले हें कोणालाच सांगतां येइना. तुरुंगाचे दरवाजे आणि खिडक्या जशाच्या तशा होत्या. मोक्यावरचे पहारेकरी पहाऱ्यावर होते. जणूं रात्रींच्या बारा तासांत कांहींच झालें नव्हतें. परंतु तुरुंगांतला राजबंदी मात्र नाहींसा झाला होता.

× × ×

त्या दिवशीं पहांटेलाच कांहीं ब्रिटिश समुद्रयानें इरावतीच्या पाण्यावर उतरलेलीं लष्कराच्या टेहळक्यांनीं मात्र पाहिलीं होतीं. परंतु तिकडे कोणी विशेष लक्ष दिलें नाहीं. भगवा पोषाख केलेले कांहीं ब्रम्ही साधू त्या विमानांकडे जात असलेले सुद्धां काहीं शिपायांनीं पाहिले होते. लगेच ते विमानांत चढले. विमानांचीं इंजिनें चालू झालीं आणि तीं भुर्रदिशीं आकाशांत उंच उडून गेलीं.

त्या दिवशीं सकाळींच नेहमींप्रमाणें तुरुंगांत राजबंद्यांची हजेरी घेण्यांत आली. त्यांत एक प्रमुख राजबंदी कमी निघाला.

त्यावेळीं पूर्व आशियांत ब्रिटिशांचीं समुद्रयानें नव्हतीं. तीं फक्त जपानकडे होतीं. ब्रिटिशांच्या लष्करी छावणीच्या नाकासमोरून डॉ. बा मॉंना उचलून नेऊन जपान्यांनीं त्यांना सुरक्षित ठिकाणीं नेऊन ठेविलें. १९४३ सालीं डॉ. बा मॉंनीं ब्रह्मी स्वातंत्र्यप्रयत्नांत लष्करी मदत मिळण्याच्या अटीवर जपान्यांशीं गुप्त करार केल्याची बातमी नंतर बाहेर आली.

नंतर डॉ. बा मॉं विरुद्ध इंग्रजी प्रचाराची मोहिम सुरू झाली. त्यांच्या मतें डॉ. बा मॉं जपानचे हस्तक झाले होते.

श्री सुभाषचंद्र बोस १९४१ च्या जानेवारींत कलकत्त्यांतून नाहींसे झाल्यापासून आजतागायत त्यांच्याबद्दल इंग्रजी प्रचाराची हीच मोहीम चालू आहे. परंतु त्या मोहिमेचा खोटेपणा अझाद हिंद खटल्याच्या कायदेशीर इतिहासानें आतां साफ खोटा ठरला आहे.

× × ×

१९४२ च्या एप्रिल महिन्याच्या अखेरीस सुभाषबाबूंनीं बर्लिन नभोवाणी केंद्रावरून भाषण केलें. ते म्हणाले:—

" हिन्दुस्थानांतील ब्रिटिशांच्या आजपर्यंतच्या राजवटींत त्यांनीं हिंदुस्थानचें रक्तशोषण केलें आहे. ब्रिटिशांनीं कितीही प्रचार चालू ठेविला तरी प्रत्येक सुविचारी हिंदी माणसाला त्या मोहिमेच्या मुळांतल्या सत्यासत्यतेची चांगली जाणीव आहे......

त्रिराष्ट्र–कराराची मला तरफदारी करावयाची नाहीं. माझा संबंध फक्त हिंदुस्थानापुरता आहे. ब्रिटिश राजसत्तेचा धुव्वा उडाल्याशिवाय हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळणें शक्य नाहीं. उलट, ब्रिटिश राज्यसत्तेच्या कायमपणांत हिंदुस्थानच्या गुलामगिरीचा वारसा कायम राहाणार आहे. हिंदुस्थानला आतां स्वातंत्र्य आणि गुलामगिरी यांतून निवड करण्याची संधी चालून आली आहे......

ब्रिटिशांचे पगारी प्रचारक मला शत्रूचा हस्तक म्हणत आहेत. माझ्या देशबांधवांशीं बोलतांना कोणाचाच प्रचार माझ्याआड येणार नाहीं. ब्रिटिश राज्यसत्तेविरुद्ध एक सारखा अखंड लढा चालू ठेवण्यांत जी माझी हयात मी घालवीत आहें तीच माझ्या सत्याची कसोटी आहे...

हिंदी स्वातंत्र्यासाठीं मी माझें जीवन अर्पण केलें आहे आणि शेवटपर्यंत मी माझ्या तत्वापासून ढळणार नाहीं. जगाच्या पाठीवर कुठेंही मी असलों तरी हिंदी स्वातंत्र्याशीं मी कधींही प्रतारणा करणार नाहीं......

आतां ब्रिटिश राज्यसत्ता वितळत आहे आणि हिंदुस्थानच्या मुक्ततेचा दिवस जवळ आला आहे. हिंदी स्वातंत्र्याची पहिली लढाई १८५७ त सुरू झाली आणि १९४२ पासून हिंदी स्वातंत्र्याच्या दुसऱ्या आणि शेवटच्या लढाईस सुरवात होत आहे. आतां तयारींत रहा. तुमच्या मुक्ततेचा प्रहर तुमच्या हाताशीं येत आहे.

# हिंदी-स्वातंत्र्यसंघ : २

७ डिसेंबर १९४१ ला जपाननें पर्ल हारबरवर तडाखा मारला. १३ ला गुआम बेटें पडलीं, पेनांग २० ला, वेक बेटें २२ ला, हाँगकाँग २५ ला, इपोह २९ ला आणि मनिला २ जानेवारी १९४२ ला पडलीं. सिंगापूर अबाधित राहील म्हणून सांगण्यांत येत होतें. पंचेचाळीस कोटी रुपये खर्च करून बांधलेल्या सिंगापूरच्या बंदरांत १५००० इंग्रज, १३००० ऑस्ट्रेलियन व ४२००० हिंदी सैन्य जपाननें गिरफदार केलें. प्रिन्स-ऑफ-वेल्स आणि रिपल्स हीं ब्रिटिशांचीं दोन मोठीं आजिंक्य जहाजें कागदांच्या होड्यांवर दगड टाकावे त्याप्रमाणें बुडवून टाकण्यांत आलीं. समुद्रांतून लढाई दिल्यास सिंगापूर पडले नसतें हें जपान्यांना ठाऊक होतें. जपान्यांनीं जमिनीवरून मोर्चे मारले. जोहोरला ऑस्ट्रेलियन फौजेनें त्यांना तोंड दिलें पण नाइलाज होऊन ती सिंगापूरला मागें आली. सिंगापूरला मिळणारा पाण्याचा सांठा जोहोरलाच जपान्यांनीं तोडला. कोटा-बहरूला आक्रमण झालें तेव्हां ब्रिटिशांकडे एकसुद्धां रणगाडा नव्हता. त्यांच्याकडे चक्रव्यूह मारणारें सैन्य नव्हतें. पॅलेस्टाईनच्या लढाईत मोडतोड होऊन प्रदर्शनांत ठेवण्याच्या लायकीच्या झालेल्या तोफगाड्याच काय त्या त्यांच्याकडे होत्या. त्यांतून जपानी सैन्य जसें काय चालतच पुढें गेलें व फेब्रुवारी १९४२ च्या आंत मलाया आणि सिंगापूर जपान्यांनीं हस्तगत केलीं. ऑस्ट्रेलियन सैन्यानें आपली फळी सोडली आणि हिंदी सैन्याची फळी उघडी करून टाकली.

याच सुमारास बरींच वर्षें टोकियोमध्यें जाऊन राहिलेले राशबिहारी बोस यांनीं आपली स्वराज्य संस्था नवीन जोमानें चालू करून पूर्व आशियांतील हिंदी लोकांचा हिंदी स्वातंत्र्य-संघ स्थापन केला आणि हिंदी स्वातंत्र्याची चळवळ सुरू केली. स्वयंसेवकांची भरती करणें, संघाला सदस्य मिळविणें आणि आपल्या कामाच्या ठिकठिकाणीं सभा भरवून चळवळ चालू करणें या गोष्टी फार मोठ्या प्रमाणावर सुरू झाल्या.

ता. २८–२९–३० मार्च १९४२ रोजीं टोकियोला श्री राशबिहारी बोस यांच्या अध्यक्षतेखालीं पूर्व आशियांतील हिंदी लोकांच्या प्रतिनिधींची एक परिषद झाली. थायलंडमधील हिंदी पुढारी स्वामी सत्यानंद पुरी व इतर प्रतिनिधी या परिषदेसाठीं विमानानें जात असतां त्यांच्या विमानाला अपघात झाला व त्यांत स्वामीजी व कांहीं मंडळी प्राणास मुकली.

या परिषदेंत हिंदी स्वातंत्र्य-संघाची रीतसर उभारणी झाल्याचा ठराव पास करण्यांत आला. या संघाचा मुख्य उद्देश परकी राज्यसत्ता झुगारून देऊन कोणत्याही राष्ट्राच्या नियंत्रणाखालीं किंवा दडपणाखालीं न राहतां हिंदुस्थानला संपूर्ण स्वातंत्र्य मिळवून देणें हा होता. हा उद्देश साध्य करून घेण्यासाठीं आणि स्वातंत्र्य–संघाला पूर्व आशियांतील सर्व हिंदी लोकांच्या प्रतिनिधींची मान्यता मिळविण्यासाठीं बँकॉक शहरीं एक मोठी परिषद घ्यावी, असाही एक ठराव पास करून घेण्यांत आला.

दरम्यान म्हणजे मार्च-एप्रिल १९४२ च्या सुमारास ब्रम्हदेश, अंदमान व निकोबार बेटें, येनांग युआंग बेटें आणि आजूबाजूचा समुद्रान्तर्गत प्रदेश जपान्यांनीं हस्तगत केला. त्यानतर हिंदी स्वातंत्र्य-संघाच्या खुद्द मलाया मध्यें बावीस कचेऱ्या स्थापन करण्यांत येऊन ९५००० हिंदी लोकांना या संघाचे सभासद करण्यांत आलें. त्याशिवाय रंगून, मंडाले, अंदमान, निकोबार जावा, सुमात्रा, इंडोचायना, बोर्निओ, मांचुको, हॉंगकॉंग, जपान व जपानी साम्राज्यांतर्गत बेटें याठिकाणीं संघाच्या कचेऱ्या उघडण्यांत आल्या.

ता. १५ जून १९४२ रोजीं बँकॉक येथें भरलेल्या अखिल पूर्वआशिया परिषदेस वरील सर्व शाखांतील प्रतिनिधी आणि हिंदीयुद्धकैद्यांचे प्रतिनिधी हजर होते. परिषदेचें काम सतत आठ दिवस चाललें. परिषदेंत बरेच ऐतिहासिक महत्वाचे ठराव पास झाले. हिंदी स्वातंत्र्य-संघाला रीतसर आणि कायदेशीर मान्यता देण्यांत आली. संघाच्या घटनेचे नियम पास करून घेण्यांत आले. "ऐक्य-निष्ठा-त्याग" हें ध्येय ठरविण्यांत आलें. एकाच संस्थेच्या पुरस्काराखालीं सर्व हिंदी बांधवांचें "ऐक्य" घडवून आणणें, हिंदी-स्वातंत्र्य सत्वर संपादन करून घेण्यासाठीं "निष्ठेनें" काम करणें आणि स्वातंत्र्याच्या ध्येयासाठीं प्रत्यक्ष प्राण देण्यापर्यंत "त्याग" करणें असें त्याचें स्पष्टीकरण ठरविण्यांत आलें.

दुसरा ठराव पास झाला तो असा कीं, हिंदुस्थान हें एक व अविभक्त राष्ट्र राहील, सर्व कार्य राष्ट्रीय स्वरुपाचें असावें, निरनिराळे पंथ, धर्म आणि जाती यांचें उच्चाटन करण्यांत यावें, हिंदी राष्ट्र-सभेच्या धोरणानुरूप व विचारा-प्रमाणें कार्यक्रम आखण्यांत यावेत आणि हिंदी लोकनियुक्त प्रतिनिधींनींच फक्त हिंदुस्थानची भावी राज्यघटना हातीं घ्यावी.

आणखी एक ऐतिहासिक महत्वाचा जो ठराव या परिषदेंत पास करून घेण्यांत आला तो अझाद हिंद फौजेच्या निर्मितीबद्दलचा होता. या ठरावाप्रमाणें असें ठरलें कीं, हिंदी स्वातंत्र्य-संघाच्या कार्यकारिणीच्या प्रत्यक्ष नेतृत्वाखालीं अझाद हिंद फौज स्थापन करण्यांत यावी. हिंदीस्वातंत्र्याची ही स्वतंत्र राष्ट्रीय फौज जपानी फौजेशीं समतेच्या तत्वानें आणि स्वातंत्र्याच्या दर्जानें शत्रूशीं लढेल अशी तिला मान्यता मिळवून घेणें हा तिचा अधिकार राहील. तिचा उपयोग हिंदी स्वातंत्र्यासाठीं शत्रूशीं लढण्याकडे करण्यांत येईल हें अत्यंत स्पष्ट शब्दांत नमूद करण्यांत आलें.

हिंदी स्वातंत्र्य-संघाच्या कार्यकारिणीची निवडणूक खालील प्रमाणें कर यांत आली.

पहिले अध्यक्षः **श्री राशबिहारी बोस.**

सदस्य : **जनरल मोहनसिंग, कर्नल जी. क्यू. गिलानी, श्री राघवन् व श्री मेनन.**

ब्रिटिश सत्तेमधून हिंदुस्थान स्वतंत्र होतांच हिंदुस्थानचें प्रादेशिक स्वातंत्र्य आणि हिंदी स्वतंत्र राष्ट्र या दोन गोष्टींना मान्यता दिल्याचा जाहिर-नामा जपानकडून मागून घेण्यांत यावा, कोणत्याही परकी सत्तेचा शिरकाव, हुकमत, दाब, अगर ढवळाढवळ या गोष्टींचा हिंदी राजकीय, लष्करी, आर्थिक अगर सामाजिक स्वातंत्र्याला स्पर्शसुद्धां टाळण्यांत यावा. जपानने कोणाही हिंदी माणसाला अगर त्याच्या मालमत्तेला हात न लावण्याचें आश्वा-सन द्यावें, वगैरे ठराव पास झाले.

हिंदी राष्ट्रसभेचा तिरंगी झेंडा हें संघाचें राष्ट्रीय निशाण राहील असा ठराव पास करून घेण्यांत आला.



जनरल मोहनसिंग
आझाद हिंद सेनेचा प्रणेता

पृष्ठ १८

हिंदी स्वातंत्र्य-संघाचें व चळवळीचें नेतृत्व आपल्या हातांत घेण्यासाठीं श्री सुभाषचंद्र बोस यांना जर्मनीमधून पूर्व आशियांत पाठवून देण्याची विनंति करण्यासाठीं जपानला विचारणा करण्यांत आली.

× × ×

## जर्मनींत अझाद फौजेची स्थापना.

परंतु याच्या अगोदरच श्री सुभाषबाबूंनीं आपल्या कामाला जर्मनींत सुरवात केली होती. लिबियाच्या लढाईंतील व इतर हिंदी युद्धकैदी आणि यूरोपांतील कांहीं हिंदी लोक यांच्या मदतीनें त्यांनीं आपली स्वतंत्र अझाद हिंद फौज स्थापन केली होती. या फौजेंतील एका योद्धयानें दिलेल्या माहिती वरून असें समजतें कीं, या फौजेच्या एकंदर आठ पलटणी उभारून तिचें सैन्य १२००० पर्यंत वाढविण्यांत आलें होतें. हर हिटलर यांनीं या फौजेच्या ड्रेसडेन ( जर्मनी ) येथील मुख्य छावणीला एकदां भेट दिली होती.

आझाद हिंद फौज आणि जर्मन पायदळ यांची एक संयुक्त कवाईत झाली त्यावेळीं आपल्या खासगी पोषाखांत डोकीवर काळी टोपी चढवून सुभाषबाबू हर हिटलर यांच्यासह हजर होते. त्यांना या संयुक्त फौजांनीं लष्करी थाटांत सलामी दिली. फौजेची पहाणी झाल्यानंतर हर हिटलर यांनीं दहाबारा मिनिटेंपर्यंत या फौजेपुढें भाषण केलें. त्या भाषणाचा सारांश खालीलप्रमाणें होता :—

जर्मन शिपाई आणि स्वतंत्र हिंदीजनहो, अझाद हिंद सरकारचे प्रमुख हर सुभाषचंद्र बोस यांचें मी स्वागत करतों...आपल्या देशावर प्रेम करणाऱ्या आणि स्वातंत्र्याची भाक घेतलेल्या अझाद हिंदी लोकांना मार्गदर्शन करण्यासाठीं ते जर्मनींत आले आहेत.

तुम्हांला हुकमत देण्याचें काम माझें नाहीं. कारण आतां तुम्ही स्वतंत्र आहांत आणि आपल्या मुख्याचा हुकूम तुम्ही पाळाल याची मला खात्री आहे।

आपण जर्मन शिपाई आणि नागरीक ह्यांनीं मात्र एक गोष्ट ध्यानांत ठेवली पाहिजे. ती ही कीं, आपल्या देशांतील आठ कोटी बांधवांचें कल्याण

हिंदी स्वातंत्र्य-संघाचें व चळवळीचें नेतृत्व आपल्या हातांत घेण्यासाठीं श्री सुभाषचंद्र बोस यांना जर्मनीमधून पूर्व आशियांत पाठवून देण्याची विनंति करण्यासाठीं जपानला विचारणा करण्यांत आली.

× × ×

## जर्मनींत अझाद फौजेची स्थापना.

परंतु याच्या अगोदरच श्री सुभाषबाबूंनीं आपल्या कामाला जर्मनींत सुरवात केली होती. लिबियाच्या लढाईतील व इतर हिंदी युद्धकैदी आणि यूरोपांतील कांहीं हिंदी लोक यांच्या मदतीनें त्यांनीं आपली स्वतंत्र अझाद हिंद फौज स्थापन केली होती. या फौजेंतील एका योद्धयानें दिलेल्या माहिती वरून असें समजतें कीं, या फौजेच्या एकंदर आठ पलटणी उभारून तिचें सैन्य १२००० पर्यंत वाढविण्यांत आलें होतें. हर हिटलर यांनीं या फौजेच्या ड्रेसडेन ( जर्मनी ) येथील मुख्य छावणीला एकदां भेट दिली होती.

आझाद हिंद फौज आणि जर्मन पायदळ यांची एक संयुक्त कवाईत झाली त्यावेळीं आपल्या खासगी पोषाखांत डोकीवर काळी टोपी चढवून सुभाषबाबू हर हिटलर यांच्यासह हजर होते. त्यांना या संयुक्त फौजांनीं लष्करी थाटांत सलामी दिली. फौजेची पहाणी झाल्यानंतर हर हिटलर यांनीं दहाबारा मिनिटेंपर्यंत या फौजेपुढें भाषण केलें. त्या भाषणाचा सारांश खालीलप्रमाणें होता :—

जर्मन शिपाई आणि स्वतंत्र हिंदीजनहो, अझाद हिंद सरकारचे प्रमुख हर सुभाषचंद्र बोस यांचें मी स्वागत करतों...आपल्या देशावर प्रेम करणाऱ्या आणि स्वातंत्र्याची भाक घेतलेल्या अझाद हिंदी लोकांना मार्ग-दर्शन करण्यासाठीं ते जर्मनींत आले आहेत.

तुम्हांला हुकमत देण्याचें काम माझें नाहीं. कारण आतां तुम्ही स्वतंत्र आहांत आणि आपल्या मुख्याचा हुकूम तुम्ही पाळाल याची मला खात्री आहे।

आपण जर्मन शिपाई आणि नागरीक ह्यांनीं मात्र एक गोष्ट ध्यानांत ठेवली पाहिजे. ती ही कीं, आपल्या देशांतील आठ कोटी बांधवांचें कल्याण

करण्याची कामगिरी आपल्या मुख्यावर तुम्ही टाकली आहे तर हर बोस यांनीं ४० कोटी बांधवांचे हक्क प्रस्थापित करण्याची शपथ वाहिली आहे. यासाठीं आपल्या मुख्याला देत आहांत तोच मान आणि तेंच सहकार्य हर बोस आणि त्यांचें सरकार यांना तुम्ही द्या.

फील्ड मार्शल रोमेल यांनीं सुद्धां अझाद फौजेला जर्मनींत एकदां भेट दिली. फौजेची तपासणी करतांना त्यांनीं असे उद्गार काढल कीं, फौजेंतील सैनिकांचें अन्न, भाषा, कपडे आणि चेहरे यांत इतका एकत्रितपणा आहे कीं, त्यांत हिंदु आणि मुसलमान निरनिराळे ओळखतांच यावयाचें नाहींत.

१९४० मध्यें इंग्रजांच्या हिंदी पलटणी फ्रान्सच्या रणांगणांत पाठविण्यांत आल्या-त्यांत त्यांचा पाडाव होऊन युद्धकैदी म्हणून जर्मनांनीं त्यांना आपल्या देशांत नेऊन ठेविलें. त्यांपैकीं ३६०० लोकांना अझाद सैन्यांत घेण्यांत आलें. हे लोक ८ मे १९४५ पर्यंत जर्मनींत होते. या पलटणीच्या एका दलांतील अधिकारी कॅ. खवाजअल्ली व त्यांच्या बरोबरचे शिपाई यांना त्यांच्या जर्मन मुख्याधिकाऱ्यानें जर्मन दोस्त राष्ट्रांना शरण जाणार असल्याची बातमी दिली. कॅ. खवाजअल्ली आपल्या बरोबर ३३६ अझाद सैनिकांना घेऊन जर्मनींतील ह्यूबर्ग येथील छावणींतून निसटले आणि लपत छपत, रात्रींचा प्रवास करीत, बर्फाच्छादित नदीनाले ओलांडून मार्ग काढित काढित कांहीं दिवसांनीं ऑस्ट्रियांतील फिल्डकर्श या ठिकाणीं येऊन पोंचले. येथून पुढें जाण्यास निघाल्यानंतर जनरल डी गॉलच्या हस्तक सैन्यानें मे महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यांत त्यांना त्याच देशांतील इन्सब्रूक या शहरीं पकडून अटकेंत टाकलें.

अझाद सैन्यांतील मिळतील त्या लोकांना ठार मारण्याचा डी गॉलच्या हस्तकांनी जणूं विडाच उचलला होता. एंगोलेम या ठिकाणीं सांपडलेल्या ३४ अझाद सैनिकांना त्यांनीं जर्मनी पडण्यापूर्वी कांहीं दिवस अगोदर ठार केलें होतें. या ठार केलेल्या सैनिकांत नाईक चिराध दिन, नाईक हसन बेग, हवालदार अस्मात उल्ला, हवालदार मझरअल्ली आणि सरदार साधूसिंग हे जबलपूरमधून इंडियन सिग्नल कंपनींतून फ्रान्समध्यें गेलेले लोक होते.

कॅप्टन खवाजअल्ली व त्यांचे सैनिक यांना ठार करण्याचा हुकूम होऊन तो अमलांत आणण्यासाठीं लायन येथील ठाण्यांवर त्यांना

नेण्यांत आलें. या ठिकाणीं कॅ. खवाजअलीनें सर्वांचे जीव बचाविण्यासाठीं मोठ्या चतुराईचें वर्तन केलें. त्यांनीं डी गॉलच्या लोकांना त्यांच्या जर्मन लढाईतील "यशा" बद्दल व त्यांच्या "शौर्या" बद्दल एक भाषण केलें. आपण बादशहाशीं राजनिष्ठ असून नाझी लोकांच्या दडपणाखालीं वागत होतों. आणि त्या दडपणांतून सुटून आतां आम्हीं तुमच्या आश्रयाला आलों आहों असें सांगून त्यांची खात्री करण्याची त्यांनीं शिकस्त केली. त्यानंतर त्यांना इंग्लडमध्यें पाठविण्यांत आलें आणि नंतर त्यांच्या मूळ ठिकाणीं म्हणजे जबलपूरला आणून बंदिस्त केल्यानंतर त्यांची अलीकडेच सुटका करण्यांत आली. जर्मनींतील अझाद सैन्य तात्पुरतें जर्मन सैन्यान्तर्गत राहून लढत होतें.

जर्मनींत अझाद सैन्यांतील शिपायांना एकोप्याच्या दर्जानें वागविण्यांत आलें. आणि लढाईत त्यांना सर्व प्रकारची आधुनिक शस्त्र-सामुग्री पुरविण्यात आली. जर्मन लोक त्यांना आर्यबंधू म्हणून संबोधित आणि नाझी पद्धतीची सलामी देऊन त्यांचा सत्कार करीत. जर्मनीच्या पाडावाच्यावेळीं अझाद सैन्यानें जर्मनीच्या सरहद्दीवर दोस्तसैन्याशीं सामना दिला होता.

× × ×

बँकॉक परिषदेंतील ठरावांनुसार अझाद हिंद फौज स्थापन करण्याचें काम हातीं घेण्यांत आलें. ता० ८ ऑगस्ट १९४२ ला हिंदी राष्ट्रसभेच्या मुंबईच्या अधिवेशनांत "चले जाव" चा ठराव पास झाला आणि योगा-योगाची गोष्ट म्हणजे हिंदी स्वातंत्र्यसंघाच्या कार्यकारिणीचे सदस्य जनरल मोहनसिंग यांनीं याच आठवड्यांत अझाद हिंद फौजेची उभारणी केली. मलायांतील एकंदर ४२,००० हिंदी युद्धकैद्यांपैकीं जवळजवळ ३५,००० कैद्यांनीं अझाद फौजेंत दाखल होण्याची संमति दिली आणि मलायांतील हिंदी लोकांकडूनही फौजेंत दाखल होण्याबद्दल अर्ज आले.

बँकॉक परिषदेंतील ठरावानुसार अझाद फौजेच्या स्वातंत्र्याची मान्यता व अझाद सरकारच्या कार्यांत कोणत्याही रीतीनें ढवळाढवळ न करण्याची जी हमी जपानकडून मागण्यांत आली होती ती हा वेळ पावेतों आली नव्हती

म्हणून त्याबद्दल खास व्यवस्था करून योग्य ती दाद मागण्यासाठीं श्री राश-बिहारी बोस व आणखी कांहि अधिकारी जपानच्या लष्करी वरिष्ठांना भेटण्यासाठीं टोकियोला गेले.

श्री राशबिहारी बोस यांचा हेतु अत्यंत प्रामाणिक होता. जपानी लोकांच्या पुष्कळ वर्षांच्या सान्निध्यानें त्यांची मनोभूमिका जपानी वळणावर गेली होती असें हिंदुस्थानांतील राजकारणी लोकांचें मत आहे. राशबिहारी बंगाल सोडून जपानमध्यें गेल्यास बरींच वर्षें होत आलीं. तेथें त्यांनीं जपानी बाईशीं लग्न केलें आणि जपानी लोक त्यांना तिकडे आपलेपणानें वागवूं लागले. त्यांची मनोवृत्ति नैसर्गिक दृष्टीनें हिंदुस्थानकडे आणि सहवासानें जपानकडे अशी विभागली जाऊन आपल्या हिंदी पुढाऱ्यांइतकी उज्ज्वल कर्तबगारी त्यांच्या आंगीं न राहिल्यामुळें ते शेवटीं पेंचांत पडल्यासारखे झाले. परंतु मोहनसिंगावर जपानी संस्कार झाले नव्हते. अखेरीस या दोघांचे खटके उडूं लागले. मलायांतील हिकारी किकानचे (संलग्न फौज) अधिकारी त्यांच्याशीं तुसडेपणानें वागूं लागले. परंतु या अटींतटींतून हिंदुस्थानच्या संरक्षणाच्या दृष्टीनें फार चांगल्या गोष्टी बाहेर आल्या. यापूर्वी जपान्यांनीं विझगापट्टण व कोकानाडा या शहरांवर वैमानिक हल्ले केले होते. हिंदुस्थानांतील कोणत्याही शहरांवर हल्ले करून हिंदी लोक अगर त्यांची मालमत्ता यांचा नाश करण्याचा जपानचा उद्देश असेल तर आपण कोणत्याहि प्रकारें जपानशीं सहकार्य करण्यास तयार नाहीं असें टोकियोंत गेलेल्या प्रतिनिधींनीं जपानी सरकारला स्पष्ट सांगितलें. हिंदी लोकांच्या या मागणीनें जपानी सरकारला आश्चर्याचा धक्काच जणूं बसला. कारण हिंदुस्थानच्या मोठमोठ्या बंदरांवर अग्निवर्षाव करून ब्रिटिशांना जर्जर करण्याचा त्याचा लष्करी डाव होता. परंतु आपलें वचन सहसा न पाळणारे जपानी या खेपेस नरमले आणि जरूर तें वचन व हमी त्यांनीं हिंदी स्वातंत्र्य-संघाला दिली व ती शेवटपर्यंत पाळलीसुद्धां. १९४२ च्या त्या भयंकर जपानी आक्रमणाच्या दिवसांत आणि दोस्तराष्ट्रांच्या पूर्व आशियांतील अगतिकावस्थेंत हिंदुस्थानावर विमानहल्ले करणें म्हणजे जपान्यांचा एक खेळ होता आणि तो राक्षसी खेळ टोकियो आणि बँकॉकच्या परिषदेंतील हिंदी प्रतिनिधींनीं बंद करून टाकला याबद्दल

हिंदी स्वातंत्र्य संघाला धन्यवाद दिले पाहिजेत. जपानचे हे वैमानिक हल्ले अकस्मात् कां बंद झाले याचें हिंदी लोकांना आज दिवसपर्यंत एक कोडेंच होतें तें ह्या इतिहासानें उलगडलें आहे. १९४२ त मुंबई सोडून गेलेल्या व कलकत्ता सोडून मुंबईत आलेल्या लोकांची दैनावस्था विसरतां येणें अशक्य आहे.

राशबिहारी बोस आणि जनरल मोहनसिंग यांच्यामधील मतांतर जसजसें वाढत गेलें तसतशी हिंदी युद्धकैद्यांत 'स्वातंत्र्य-लालसा वाढूं लागली आणि फौजेचा व्यापही वाढूं लागला. कॅ. हंट या सिंगापूरमधील ब्रिटिश लष्करी अधिकाऱ्यानें हिंदी युद्धकैद्यांना "एकाद्या मेंढरांच्या कळपाप्रमाणें" जपानी अधिकाऱ्यांच्या हातीं दिलें होतें. त्यांच्या पोषणाची जबाबदारी घेण्यास जपानी सरकार तयार नव्हतें. अर्धपोटीं राहून श्रमाचीं अगर कारावासांतील कामें करतां करतां मरण ओढवून घेण्यापेक्षां हिंदी स्वातंत्र्य-संग्रामांत मानानें मरून जाणें अगर यशस्वी झाल्यास स्वातंत्र्याचा उपभोग घेणें त्यांना पसंत पडलें. शत्रुराष्ट्रानें लढाईंत कैद केलेल्या योद्धयांच्या राजनिष्ठेची अपेक्षा त्यांच्या परकी सरकारनें करावी कीं त्यांच्या अगतिक देशबांधवांनीं करावी या प्रश्नाचें साधें सरळ उत्तर शोधून काढण्यास त्यांना वेळ लागला नाहीं. त्यांच्या मनावरचें दडपण बाजूला सरतांच तें उत्तर त्यांना चटकन् मिळालें. आणि त्यानंतर जपानचें दडपण कबूल करण्याचें त्यांनीं साफ नाकारलें. जपानी लष्कराच्या सिंगापूरमधील इवाकारो किकान या संयुक्त खात्याला आपल्या अंतस्थ रचनेंत लुडबूड करावयाची मोहनसिंगांनीं बंदी केली. मोहनसिंगांकडे शस्त्रें नव्हतीं, आधुनिक साधनें नव्हतीं, वाहतूक नव्हती; फक्त हिंदी स्वातंत्र्य संघानें जमविलेला वर्गणीचा आणि देणगीचा पैसा होता पण तोही मुबलक नव्हता. तरीही संघाच्या कार्यकारिणीनें जपान-पुढें मान वाकवावयाची नाहीं, फक्त परस्पर-सहकार्य करावयाचें असें ठाम ठरवून टाकलें होतें. याच सुमारास संघामार्फत पेनांगला चाललेल्या स्वराज्य-संस्थेंतील, कांहीं हुषार विद्यार्थी भर दिवसा जपान्यांनीं उठवून त्यांना शिक्षण देण्याच्या सबबीवर जपानला पाठविले. आपल्या संमतीशिवाय ही गोष्ट केल्याबद्दल हिंदी स्वातंत्र्य-संघानें जपानला जाब विचारिला. परंतु पुढें कांहीं महिनेपर्यंत जपाननें त्यांना दाद दिली नाहीं.

डिसेंबर १९४२ च्या सुरवातीस आपल्या सैन्याबरोबर ब्रम्हदेशाच्या आघाडीवर जाण्यासाठीं तयारी करण्याचा जपानी अधिकाऱ्यांनीं मोहनसिंगास हुकूम दिला. सिंगापूरच्या बंदरांत बोटी तयार होत्या. कार्यकारिणीच्या ठरावावरून ज. मोहनसिंग आणि त्यांचे मुख्य सहकारी क. गिलानी यांनीं अशा परिस्थितींत रंगूनला आघाडीवर जाण्यास नकार दिला. आपल्या बँकॉक अधिवेशनांतील ठरावांस संपूर्ण मान्यता दिल्याशिवाय आणि हिंदुस्थानांतील काबीज केल्या जाणाऱ्या मुलखांचें संपूर्ण स्वातंत्र्य मान्य करण्याची लेखी कबुली दिल्याशिवाय जपानच्या ब्रम्ही आक्रमणांत आम्ही भाग घेऊं शकत नाहीं असा रोखठोक जबाब कार्यकारिणीनें दिला. त्यानंतर जनरल मोहनसिंग आणि क० गिलानी यांना पकडून जपान्यांनीं मलायाच्या बाहेर स्थानबद्ध करून टाकलें.

हिंदी स्वातंत्र्यसंघाच्या मागणीला जपान्यांनीं दोनतीन महिन्यांनंतर नकार दिला. परंतु राशबिहारींबरोबर त्यांनीं तात्पुरता सहकार करावयाचें कबूल केलें. संघाच्या मागणीप्रमाणें श्रीसुभाषबाबू जपानला येईपर्यंत जपाननें संघाच्या कामांत अगर अझाद हिंद सैन्याच्या व्यवस्थेंत ढवळाढवळ करूं नये, कामें आहेत तशींच चालू ठेवावीं आणि जपानी लष्करानें हिंदुस्थानवर हवाई हल्ला करूं नये असें ठरलें.

डिसेंबर १९४२ च्या अखेरीस जपानी विमानांनीं ब्रम्हदेशांत येऊन रंगूनवरील लष्करी तळावर अग्निवर्षाव केला आणि अतोनात नुकसान करून टाकलें. १९४३ साल उजाडलें. जानेवारीच्या पहिल्याच दिवशीं ख्रिस्तमस सणाच्या सकाळच्या प्रहरीं रंगूनवर हवाई पत्रकें टाकण्यांत येऊन सर्व एशियाटिक लोकांना शहर सोडून जाण्याची सूचना देण्यांत आली आणि थोडक्याच अवधींत रंगून बहुतेक खालीं झालें. त्यानंतर रंगूनवर भयंकर अग्निवर्षाव करून सगळें शहर जाळून टाकण्यांत आलें आणि सगळीकडे हाहा:कार उडाला आणि लगेच जपान्यांनीं रंगून शहर काबीज करून टाकलें.

× × ×

सुभाषबाबू जर्मनीहून टोकियोला येण्याच्या तयारींत आहेत अशी बातमी जूनच्या सुरवातीस मलायांत पसरली आणि सगळीकडे आनंदाचें आणि उत्साहाचें वातावरण दिसूं लागलें.

# सुभाषबाबूंचें पूर्व आशियांत आगमन : ३

श्री सुभाषबाबू टोकियोला येतांच त्यांना पूर्व आशियांतील राजकीय आणि सामाजिक परिस्थितीची सविस्तर माहिती करून देण्यासाठीं हिंदी स्वातंत्र्य संघांतील पुढारी मंडळी टोकियोला येऊन हजर झाली. त्यांच्या आगमनाची भव्य तयारी करण्यांत आली. बर्लिन सोडल्यापासून सहा आठवड्यांनंतर जून १९४३ च्या वीस तारखेस सुभाषबाबू आपले मदतनीस क. महमद हुसेन व क. गुलाम हैदर यांना बरोबर घेऊन पाणबुडीनें जपानच्या किनाऱ्यावर येऊन दाखल झाले.

टोकियोंत त्यांचा सत्कार समारंभ करण्यांत आला त्यावेळीं लहानमोठे वृत्तप्रतिनिधी हजर होते. त्यांना मुलाखत देतांना सुभाषबाबूंनीं खालील उद्गार काढले.

"गेल्या महायुद्धाच्या वेळीं ब्रिटिश मुत्सद्यांनीं आम्हांला खोटीं वचनें देऊन फसविलें. आणि म्हणूनच वीस वर्षांपूर्वींच आम्ही ठरवून टाकलें कीं, आम्ही पुन्हा कोणाकडून फसवून नाहीं घेणार......

माझ्या बरोबरची हिंदी पिढी गेलीं २० वर्षें स्वातंत्र्याचा लढा देत आहे आणि शेवटच्या संधीची वाट पाहात आहे. ती संधी आतां आली आहे-आणि ती स्वातंत्र्याची सुप्रभात आहे......

अशी संधी पुन्हां आणखी शंभर वर्षांत येणार नाहीं म्हणून आलेल्या संधीचा जास्तींत जास्त फायदा करून घ्यावयाचा आमचा निर्धार आहे.

ब्रिटिश राजसत्तेनें आमचा नैतिक अधःपात, आमच्या संस्कृतीचा नाश, आमचें आर्थिक दारिद्र्य आणि आमची राजकीय गुलामगिरी केली आहे.......

आमच्या स्वतःच्या रक्तानें आमच्या स्वातंत्र्याची किंमत देणें आमचें

डिसेंबर १९४२ च्या सुरवातीस आपल्या सैन्याबरोबर ब्रम्हदेशच्या आघाडीवर जाण्यासाठीं तयारी करण्याचा जपानी अधिकाऱ्यांनीं मोहनसिंगास हुकूम दिला. सिंगापूरच्या बंदरांत बोटी तयार होत्या. कार्यकारिणीच्या ठरावावरून ज. मोहनसिंग आणि त्यांचे मुख्य सहकारी क. गिलानी यांनीं अशा परिस्थितींत रंगूनला आघाडीवर जाण्यास नकार दिला. आपल्या बँकॉक अधिवेशनांतील ठरावांस संपूर्ण मान्यता दिल्याशिवाय आणि हिंदुस्थानांतील काबीज केल्या जाणाऱ्या मुलखांचें संपूर्ण स्वातंत्र्य मान्य करण्याची लेखी कबुली दिल्याशिवाय जपानच्या ब्रम्ही आक्रमणांत आम्ही भाग घेऊं शकत नाहीं असा रोखठोक जबाब कार्यकारिणीनें दिला. त्यानंतर जनरल मोहनसिंग आणि क० गिलानी यांना पकडून जपान्यांनीं मलायाच्या बाहेर स्थानबद्ध करून टाकलें.

हिंदी स्वातंत्र्यसंघाच्या मागणीला जपान्यांनीं दोनतीन महिन्यांनंतर नकार दिला. परंतु राशबिहारींबरोबर त्यांनीं तात्पुरता सहकार करावयाचें कबूल केलें. संघाच्या मागणीप्रमाणें श्रीसुभाषबाबू जपानला येईपर्यंत जपाननें संघाच्या कामांत अगर अझाद हिंद सैन्याच्या व्यवस्थेंत ढवळाढवळ करूं नये, कामें आहेत तशींच चालू ठेवावीं आणि जपानी लष्करानें हिंदुस्थानवर हवाई हल्ला करूं नये असें ठरलें.

डिसेंबर १९४२ च्या अखेरीस जपानी विमानांनीं ब्रम्हदेशांत येऊन रंगूनवरील लष्करी तळावर अग्निवर्षाव केला आणि अतोनात नुकसान करून टाकलें. १९४३ साल उजाडलें. जानेवारीच्या पहिल्याच दिवशीं ख्रिस्तमस सणाच्या सकाळच्या प्रहरीं रंगूनवर हवाई पत्रकें टाकण्यांत येऊन सर्व एशियाटिक लोकांना शहर सोडून जाण्याची सूचना देण्यांत आली आणि थोडक्याच अवधींत रंगून बहुतेक खालीं झालें. त्यानंतर रंगूनवर भयंकर अग्निवर्षाव करून सगळें शहर जाळून टाकण्यांत आलें आणि सगळीकडे हाहाःकार उडाला आणि लगेच जपान्यांनीं रंगून शहर काबीज करून टाकलें.

× × ×

सुभाषबाबू जर्मनीहून टोकियोला येण्याच्या तयारींत आहेत अशी बातमी जूनच्या सुरवातीस मलायांत पसरली आणि सगळीकडे आनंदाचें आणि उत्साहाचें वातावरण दिसूं लागलें.

# सुभाषबाबूंचें पूर्व आशियांत आगमन : ३

श्री सुभाषबाबू टोकियोला येतांच त्यांना पूर्व आशियांतील राजकीय आणि सामाजिक परिस्थितीची सविस्तर माहिती करून देण्यासाठीं हिंदी स्वातंत्र्य संघांतील पुढारी मंडळी टोकियोला येऊन हजर झाली. त्यांच्या आगमनाची भव्य तयारी करण्यांत आली. बर्लिन सोडल्यापासून सहा आठवड्यांनंतर जून १९४३ च्या वीस तारखेस सुभाषबाबू आपले मदतनीस क. महमद हुसेन व क. गुलाम हैदर यांना बरोबर घेऊन पाणबुडीनें जपानच्या किनाऱ्यावर येऊन दाखल झाले.

टोकियोंत त्यांचा सत्कार समारंभ करण्यांत आला त्यावेळीं लहानमोठे वृत्तप्रतिनिधी हजर होते. त्यांना मुलाखत देतांना सुभाषबाबूंनीं खालील उद्गार काढले.

"गेल्या महायुद्धाच्या वेळीं ब्रिटिश मुत्सद्यांनीं आम्हांला खोटीं वचनें देऊन फसविलें. आणि म्हणूनच वीस वर्षांपूर्वीच आम्ही ठरवून टाकलें कीं, आम्ही पुन्हा कोणाकडून फसवून नाहीं घेणार......

माझ्या बरोबरची हिंदी पिढी गेलीं २० वर्षें स्वातंत्र्याचा लढा देत आहे आणि शेवटच्या संधीची वाट पाहात आहे. ती संधी आतां आली आहे-आणि ती स्वातंत्र्याची सुप्रभात आहे......

अशी संधी पुन्हां आणखी शंभर वर्षांत येणार नाहीं म्हणून आलेल्या संधीचा जास्तींत जास्त फायदा करून घ्यावयाचा आमचा निर्धार आहे.

ब्रिटिश राजसत्तेनें आमचा नैतिक अधःपात, आमच्या संस्कृतीचा नाश, आमचें आर्थिक दारिद्र्य आणि आमची राजकीय गुलामगिरी केली आहे......

आमच्या स्वतःच्या रक्तानें आमच्या स्वातंत्र्याची किंमत देणें आमचें

कर्तव्य आहे. आमच्या त्यागानें आणि मेहनतीनें आम्ही आमचें स्वातंत्र्य मिळवूं आणि आमच्या बलानें तें कायम ठेऊं......

शत्रूच्या तरवारीला तरवारीचाच घाव दिला पाहिजे. असहकाराची वाढ शस्त्रास्त्रांच्या लढ्यांत झाली पाहिजे. हिंदीजनतेनें आगींत उडी टाकल्याशिवाय त्याना स्वातंत्र्याच्या सीमेंत शिरतां येणार नाहीं......"

ता. २१ जून १९४३ ला सुभाषबाबूंनीं टोकियोवरून नभोवाणी दिली: "हिंदुस्थानच्या शेजारच्या परिस्थितीची हिंदी लोकांना जाणीव झाली पाहिजे. ब्रिटिशांच्या हिंदुस्थानांतील कारकीर्दींत त्यांचा शत्रू हिंदुस्थानच्या पूर्व सरहद्दीवर उभा राहील हें त्यांच्या कोणाही लष्करी अधिकाऱ्याच्या कधीं ध्यानीं मनीं आलें नाहीं म्हणून त्यांनीं आपलें सगळें लष्करी सामर्थ्य हिंदुस्थानच्या वायव्य सरहद्दीवर केंद्रीत करून टाकलें.......सिंगापूरचें आरमारी ठाणें हातांत ठेऊन हिंदुस्थानहि आपल्या हातांत कायमचेंच ठेवतां येईल असें त्यांना वाटलें. जनरल यामाशिटा आणि जनरल इडा यांच्या विद्युद्वेगामुळें ब्रिटिशांच्या लष्करी डावपेंचांची निष्फलता जगाच्या नजरेस आली.......त्यानंतर जनरल वॅव्हेल पूर्व हद्दीवर बळकटी आणण्याचा आटोकाट प्रयत्न करित आहेत. परंतु हिंदी लोकांचा सवाल असा आहे कीं, वीस वर्षें खपून बळकटीनें बांधलेलें सिंगापूर हातचें घालविण्यास एक आठवडासुद्धां ज्यांना लागला नाहीं त्यांना पूर्व हद्द सोडून देण्यास कितीसा वेळ लागेल ?

आम्हां हिंदी लोकांना टिंबक्टूला, ट्यूनिसला, लापेंडूसाला अगर अलास्काला काय चाललें आहे इकडे लक्ष देण्याचें आज कारण नाहीं. हिंदुस्थानच्या आंत आणि हिंदुस्थानच्या सरहद्दीवर चाललेल्या घटनांशीं आमचा संबंध आहे. दुसऱ्या खेपेस फसलेल्या ब्रह्मदेशाच्या अपयशी लढाईचें महत्व आम्हीं ध्यानीं घ्यावयाचें आहे......सिंगापूरचें पतन आणि ब्रह्मदेशाचा पाडाव ह्या ब्रिटिशांच्या लष्करी इतिहासांतील अधःपातावरून ते धडा घेतील अशी आशा करणें व्यर्थ आहे. माणसें जन्मतात आणि मरतात, राज्यें निर्माण होतात आणि धुळीला मिळतात परंतु ब्रिटिशांचें राज्य कायमचें आहे अशी त्यांची विचारपरंपरा आहे......

तुम्ही त्याला मुत्सद्देगिरीचा अभाव म्हणा, राजकीय नादारी म्हणा किंवा साम्राज्याचें वेड म्हणा. परंतु या वेडाला त्याचें स्वतःचेंच स्पष्टीकरण आहे.

ब्रिटिशराज्यविस्तार हिंदुस्थानावर वाढला आहे. कोणत्याहि राजकीय पक्षाचे असले तरी ब्रिटिशांना पक्कें ठाऊक आहे कीं, हिंदुस्थानच्या कुरणावरच त्यांना चरावयाचें आहे. त्यांचें साम्राज्य म्हणजेच हिंदुस्थान. हें साम्राज्य टिकविण्यासाठींच त्यांची लढाई चालू आहे. ह्या महायुद्धांत ब्रिटनचें कांहींही होवो, हें साम्राज्य शेवटपर्यंत न सोडण्याचा त्यांचा निर्धार आहे...आणि म्हणून आमचें स्वातंत्र्य ते आम्हांला देतील अशी आशा करणें मूर्खपणाचें आहे...परंतु यावरून ब्रिटिश मुत्सद्दी आमच्याशीं संगनमत करणार नाहींत असें मात्र नव्हे. हें संगनमत याच वर्षी ते केव्हांतरी आमच्याशीं करतील असा माझा समज आहे. परंतु तें संगनमत आम्हांला खरोखरीचें स्वातंत्र्य देण्यासाठीं होणार नाहीं. तें पुन्हां आम्हांला एकदां बनविण्यासाठीं होणार आहे.

१९४१ च्या डिसेंबरमध्यें आणि १९४२ च्या एप्रिलमध्यें झाल्या तशा वाटाघाटी पुन्हा चालू करून हिंदी स्वातंत्र्याचा प्रश्न पुढें ढकलण्यासाठीं फार मोठ्या प्रमाणावर त्यांचे प्रयत्न चालू आहेत...

यासाठीं ब्रिटिशांशीं कोणत्याही प्रकारचें संगनमत करण्याची आमची इच्छा आम्ही टाकून दिली पाहिजे. आमच्या स्वातंत्र्याला कोणाच्या संगनमताची जरुरी नाहीं आणि तें स्वातंत्र्य ब्रिटिश आणि त्यांचे दोस्त ह्यांनीं हिंदुस्थान सोडून दिल्याशिवाय आम्हांस मिळवितां येणें अशक्य आहे...ज्यांना खरोखरीचें स्वातंत्र्य उपभोगावयाचें आहे त्यांनीं त्याला पडणारी किंमत रक्तानें दिली पाहिजे...

माझ्या देशबंधूंनो आणि मित्रांनो, आमच्या हुरूपानें आणि बळानें हिंदुस्थानांत आणि हिंदुस्थानाबाहेर हें स्वातंत्र्याचें युद्ध आम्ही खेळूं या. या स्वातंत्र्यलढ्यांतून मात्र मागें हटतां येणार नाहीं अगर त्यांतून हालतां येणार नाहीं. स्वातंत्र्य मिळेपर्यंत आम्हांला पुढें पुढेंच जावें लागणार आहे."

सुभाषबाबूंनीं आणखी एक संदेश २४ जूनला नभोवाणीवरून दिला :—

"ब्रिटनसारखीं साम्राज्यें आंतरराष्ट्रीय आघाताच्या दाबानें हिंदुस्थानसारख्या गुलाम राष्ट्रांचें स्वातंत्र्य मान्य करतील अशी माझ्या कांहीं देशबांधवांची

अपेक्षा आहे. परंतु ही अपेक्षा अनाठायीं आहे...आपण जाणतांच कीं, १९४०च्या अखेरीस महात्मा गांधी यांनीं असहकाराची चळवळ पुन्हा चालू केली. त्यावेळीं मला वाटलें होतें कीं, हिंदी लोकांचा मान आणि दर्जा राखला जात आहे आणि त्यासाठीं हिंदी क्रांतीचा डाव मोठ्या प्रमाणावर खेळून तो यशस्वीपणें जिंकला पाहिजे. हे माझे हेतू पूर्णपणें यशस्वी झाले आहेत हें आज मी आपल्याला जाहीर करित आहें. आंतरराष्ट्रीय परिस्थितीची जाणीव आम्हांला झाली आहे आणि आमच्या अखेरच्या विजयाची आम्हांला खात्री पटली आहे...

शत्रूच्या मुलुखाबाहेर राहाणाऱ्या बहुतेक सर्व हिंदी लोकांनीं एका प्रचंड संस्थेच्या नेतृत्वाखालीं युद्धाचें रणशिंग फुंकलें आहे. तुरुंगवास, अटक, हालअपेष्टा आणि छळ यांना न जुमानतां आपला लढा धिमेपणानें चालू ठेवणाऱ्या हिंदुस्थानांतील जनतेला अगदीं मोक्याच्या वेळीं जरूर पडणारी जास्तींत जास्त मदत देण्याची कडेकोट तयारी त्यांनीं चालू ठेविली आहे.

मित्रांनो ! हिंदुस्थान स्वतंत्र होणार आहे आणि तेंही अगदीं लवकर. स्वातंत्र्य प्राप्त होतांच तुरुंगांचे दरवाजे उघडले जाऊन त्यांतील अंधारांत खितपत पडलेल्या राष्ट्र–पुरुषांना स्वातंत्र्याचा प्रकाश दाखवा..."

हिंदी-स्वातंत्र्य संपादन करण्यासाठीं स्वातंत्र्य सेना उभारण्याच्या कामीं आपल्याला मदत करण्यासाठीं पूर्व आशियांतील हिंदी जनतेला उद्देशून सुभाषबाबूंनीं ता. २९ जून रोजीं नभोवाणीवरून विनंति केली:—

" स्वातंत्र्य–संपादनाची जबाबदारी आज आमच्यावर पडली आहे. ती जबाबदारी आम्हांला परकीयांच्या अंगावर टाकतां येणार नाहीं. तसें करणें हा आमच्या राष्ट्राचा उपमर्द आहे......

आमचा शत्रू जबर आहे, बेदरकार आहे आणि शस्त्रसंभारांनीं सज्ज आहे. अशा शत्रूविरुद्ध असहकार, भेद किंवा दहशत या गोष्टींचा आज उपयोग होणार नाहीं. परकी सत्तेचें हिंदुस्थानांतून उच्चाटण करावयाचें असेल तर शत्रूच्या स्वतःच्या शस्त्रांनींच त्याच्याशीं लढलें पाहिजे. शत्रूनें तरवार उपसली आहे तीवर तरवारच आपटली पाहिजे. मला खात्री आहे कीं, तुमच्या मदतीवर फार मोठी फौज निर्माण करून परकी सत्तेचें

आमच्या देशांतून आम्ही उच्चाटण करूं...समय जवळ आला आहे आणि प्रत्येक हिंदी गृहस्थानें रणक्षेत्रावर गेलेंच पाहिजे. स्वातंत्र्यप्रिय हिंदीगृहस्थाचें रक्त या रणक्षेत्रावर पडल्यानंतरच आम्हांला स्वातंत्र्य मिळणार आहे."

याच सुमारास हिंदी स्वातंत्र्यसंघाची मुख्य कचेरी बँकाकहून सिंगापूरला आणण्यांत आली आणि ता. २ जुलैला सुभाषबाबू सिंगापूरला आले. त्यावेळी संघामार्फत त्यांचें फार मोठ्या प्रमाणावर स्वागत करण्यांत आलें. त्यांच्या मिरवणुकींत लाखांनीं लोक जमले. त्यांत मलाई, चिनी व जपानी या सर्वांनीं उत्साहानें भाग घेतला. मिरवणूक संपल्यानंतर पहिल्या अझाद फौजेंतील कांहीं पुढाऱ्यांशीं आणि हिंदी स्वातंत्र्यसंघाच्या प्रतिनिधींशीं त्यांचें खलबत झालें.

ता. ४ जुलै रोजीं सिंगापूरच्या भव्य क्रीडांगणावर हिंदी स्वातंत्र्यसंघाची जाहीर सभा भरविण्यांत आली आणि संघाचें नेतृत्व रीतसर सुभाषबाबूंना बहाल करण्यांत आलें. लक्षावधी जनसमुदाय सभेला लोटला होता. सगळीकडे शांतता आणि सुव्यवस्था ठेवण्याची स्वयंसेवकांनीं कमाल केली होती. सुभाषबाबू उभे राहिले आणि त्यांनीं आपल्या भाषणास सुरवात केली.

"मित्रहो, तुमची स्वातंत्र्य लालसा पूर्ण करून घेण्याची वेळ आली आहे. युद्धाचा प्रक्षोभ होतो तेव्हां सर्व गोष्टींहून अढळ कार्यनिष्ठा आणि लष्करी शिस्त या गोष्टींना फार मोठें महत्व असतें. यासाठीं आजच्या प्रसंगीं या दोन्ही गोष्टींना लागणाऱ्या भरींव ऐक्याची मी आपल्याकडून अपेक्षा करित आहे······मी प्रसंगोपात जाहीर केलेंच आहे कीं, माझ्या स्वीकृत कार्यासाठीं माझ्या मायभूमींतून १९४१ सालीं मी बाहेर पडलों. त्याच्या मुळाशीं असंख्य देशबांधवांची आकांक्षा सहमत होती. त्यावेळेपासून गुप्त पोलिसखात्याच्या कारवाईस न जुमानतां मी त्यांच्याशीं संबंध ठेवला आहे.......मी आणि हिंदुस्थानाबाहेरील माझे हिंदीराष्ट्रबंधू यांनीं ज्या ज्या गोष्टी केल्या अगर करीत आहोत त्या हिंदीस्वातंत्र्यासाठींच होत्या व आहेत आणि यापुढें सुद्धां हिंदी बांधवांच्या गैरहिताची अशी कोणतीही गोष्ट आमच्या हातून होणार नाहीं.......

आमचें बळ मूर्तस्वरूपांत आणण्यासाठीं हिंदुस्थानचें अझाद हिंदसरकार निर्माण करण्याचा माझा विचार आहे......आमच्या स्वपराक्रमानें आणि त्यागानें स्वातंत्र्य मिळवून तें कायम टिकविण्यासाठीं लागणारी शक्ति आम्ही निर्माण करूं...आमच्या अंतिम विजयाची ग्वाही देऊनहि मी आपणाला सांगूं इच्छितों कीं, शत्रूचें बळ न अजमावण्याची चूक आपण करतां कामा नये आणि तात्पुरत्या अपयशाला घाबरून अगर यशाला चेकाळून आपण जातां नये. आम्हांला फार मोठे लढे लढावे लागतील. कारण शत्रू सामर्थ्यवान् आहे, दगाबाज आहे आणि बेदरकार आहे. आणि या आमच्या शेवटच्या लढ्यांत आम्हांला उपासमार, तहान, हालअपेष्टा आणि प्रत्यक्ष मरण यांना तोंड द्यावयाचें आहे. ह्या परीक्षेंतून आम्ही सुटलों कीं स्वातंत्र्य मग आमचेंच आहे. या सगळ्या संकटांना आपण न जुमानतां आगेकुच कराल याची मला पूर्ण खात्री आहे."

सुभाषबाबू सिंगापूरला येण्याच्या पूर्वींच हिंदी युद्धकैद्यांत आनंदाचें आणि स्फूर्तीचें वातावरण निर्माण झालें होतें. चाळीस हजार सैनिकांनीं सुभाषबाबूंच्या हांकेस ओ दिली. या प्रचंड सभेस बहुतेक सगळे सैनिक हजर होते आणि पुनर्घटित अझाद हिंदी सैन्याच्या स्थापनेस त्यांनीं बिनशर्त अनुमती दिली. सभेंत अझाद हिंदीसैन्याच्या स्थापनेचा ठराव एकमतानें पास झाला.

ता. ५ जुलै १९४३ रोजीं सिंगापूरच्या टाऊन हॉलच्या पटांगणावर सुभाषबाबूंनीं सर्व अझाद हिंदीसैनिकांची पाहाणी केली. हिंदी राष्ट्रगीताच्या निनादांत सैनिकांनीं त्यांना थाटाची लष्करी सलामी दिली. कवाइतीच्या अग्रभागीं हिंदमाता आणि महात्मा गांधी यांचीं भव्य तैलचित्रें उभीं करण्यांत आलीं होतीं. लष्करी सभा झाल्यानंतर उच्चासनावर उभें राहून सुभाषबाबूंनीं सैनिकांसमोर ओजस्वी भाषण केलें:—

"हिंदी स्वातंत्र्याच्या लष्करी शिपायांनों, तुमच्या व माझ्या आयुष्यांतील मानाचा दिवस आज आला आहे. स्वातंत्र्याचें लष्करी सैन्य आज अस्तित्वांत आल्याची साऱ्या जगाला ग्वाही देण्याची संधी आज मला परमेश्वरानें दिली आहे. ब्रिटिशांचा बालेकिल्ला असलेल्या सिंगापूरच्या रणभूमीवर हें स्वातंत्र्याचें सैन्य लष्करी थाटांत आज उभें आहे.

ब्रिटिशांच्या हातांतला हिंदुस्थान स्वतंत्र करणारें हें सैन्य आहे...... हिंदी नेतृत्वाखालीं निर्माण होऊन हिंदी नेतृत्वाखालींच लढाई देणारें हें सैन्य निर्माण झाल्याबद्दल प्रत्येक हिंदीबंधूला अभिमान वाटला आहे...... ब्रिटिश साम्राज्याच्या थडग्यावर उभें असलेलें हें सैन्य पाहून त्या साम्राज्याचें अस्तित्व भूतकाळांत गारद झाल्याचें कोण कबूल करणार नाहीं?...

बंधूनों "दिल्लीस चला, दिल्लीस चला" ही तुमची रणकिंकाळी आहे. या स्वातंत्र्ययुद्धांत आम्ही किती योद्धे जिवंत राहूं हें मी आज सांगत नाहीं. परंतु तें युद्ध मात्र आम्ही शेवटीं जिंकू हें मी निश्चून सांगतों. आणि तें युद्ध जिंकल्यानंतर जुन्या दिल्लींतल्या जुन्या लालकिल्यांतल्या ब्रिटिश साम्राज्याच्या थडग्यावर आमच्या विजयाची लष्करी कवाईत भरविल्याशिवाय आमचें कार्य पूर्ण होणार नाहीं......

माझ्या राजकीय जीवनांत हिंदीस्वातंत्र्य जवळ येत चालल्याची जरी माझी खात्रा झाली होती तरी हिंदुस्थानला स्वातंत्र्यसैन्याची उणीव आहे असें माझें मत झालें होतें. जॉर्ज वॉशिंटग्नकडे स्वातंत्र्याची फौज होती म्हणून तो अमेरिकेच्या स्वातंत्र्यासाठीं शेवटपर्यंत लढूं शकला. पाठीमागच्या अफाट सैन्याच्या धीरावर ग्यारिबॉल्डी इटाली देश स्वतंत्र करूं शकला. अझाद हिंद सेनेचे पहिले शिपाई म्हणून पुढें येण्याचा तुम्हांला हक्क आणि मान मिळाला आहे. देशाशीं ध्येयनिष्ठ रहाणारे, वाटेल त्या परिस्थितींत आपलें कर्तव्य बजावणारे आणि वाटेल त्या प्रसंगीं आपली आहुती देण्यास तयार असणारे शिपाईगडीच राष्ट्राला ललामभूत असतात. हें ध्येय-वाक्य तुम्ही आपल्या अंतःकरणांत कोरून ठेवा.

माझ्या लष्करीबंधूंनो, हिंदुस्थानच्या राष्ट्राभिमानाचे तुम्ही रक्षक आहांत आणि त्याच्या आशाआकांक्षाचे आदर्श आहांत म्हणून तुमचे देशबांधव तुमचे गोडवे गातील आणि भावी पिढी तुमचा अभिमान धारण करील अशी तुम्ही वागणूक ठेवा. तुम्हांला मी वचन देतों कीं, तुमच्या अंधःकारांत आणि उजेडांत, दुःखांत आणि सुखांत, अपयशांत आणि विजयांत मी तुमचा सहकारी राहीन. आज मी तुम्हांला भूक,

तहान, हाल अपेष्टा, आक्रमण आणि मरण याच गोष्टींची देणगी देऊं शकत आहें. यांतून हिंदुस्थानचें स्वातंत्र्य आपल्या डोळयांनीं पहाण्यास कितीजण आम्ही जिवंत राहू हें मीं सागत नाहीं. तें स्वातंत्र्य आम्हांला मिळालें कीं पुरे. परमेश्वर आम्हांला या लढ्यांत यश देवो !"

ता. ६ जुलै १९४३ ला अझाद हिंद सरकारचे सार्वभौम व अझाद हिंद-फौजेचे सर्वाधिकारी ( कमांडर-इन-चीफ ) जनरल सुभाषचंद्र बोस आणि जपानी साम्राज्याचे पंतप्रधान जनरल तोजो यांना अझाद हिंद फौजेनें लष्करी सलामी दिली. उच्चासनावर राष्ट्रीय तिरंगी झेंडा उभारला होता. दीडतास-पर्यंत सलामी झडली आणि दोघे अधिकारी लष्करी शिस्तींत उभे राहून सलामी घेत आणि देत होते.

ता. ९ जुलै १९४३ ला सिंगापूरच्या म्युनिसिपल कचेरीच्या समोर असलेल्या अझाद मैदानावर शहरवासियांची जाहीर सभा झाली. एक लाखाच्यावर समुदाय हजर होता. त्या सभेंत सुभाषबाबूंनीं तब्बल दोन तास व्यासपीठावर उभें राहून खड्या आवाजांत आवेशयुक्त भाषण केलें. ते म्हणाले :—

"माझें घरदार सोडून अत्यंत संकटाचा प्रवास हातीं घेण्यास जीं कारणें झालीं तीं मी आपणास सांगतों. १९४१ च्या पूर्वी इंग्रजाच्या कैदखान्यांत असतांना त्यांच्या कचाट्यांतून सुटून जाण्याची कल्पना मनांत घोळवून त्याबद्दल मी विचार करूं लागलों. ह्या कैदेपूर्वी अकरा वेळां मी कैदेंत गेलों असल्यामुळें कैदेचें जीवन माझ्या आंगवळणीच पडलें होतें. परंतु स्वातंत्र्य-लालसेनें तुरुंगांत असेंच खितपत पडावें हें मला सहन होईना. संकटाची आणि जोखमांची पूर्ण जाणीव असूनहि परदेशांत निघून जाऊन कार्य करून पहावें असें मी ठरविलें. माझ्या कार्यासाठीं प्रत्यक्ष मृत्यूला कवटाळण्याचें सामर्थ्य माझ्या आंगीं निर्माण करून घेण्यासाठीं तीन महिनेपर्यंत मी ईश्वरप्रार्थना आणि मनोचिंतन करण्यांत घालविले. हिंदुस्थानांतून निसटण्या-पूर्वी तुरुंगाच्या दाराबाहेर येणें मला जरूर होतें आणि त्यासाठीं माझ्या मुक्ततेची मागणी करून मी उपवासाला सुरवात केली. नुसत्या मागणीला भिऊन हिंदुस्थानांत किंवा आयर्लंडांत ब्रिटिश सरकारनें तुरुंगांतून कोणाला

सोडलें नाहीं याची मला जाणीव होती. सरकारला भाग पाडण्यासाठीं टेरेन्स मॅक्स्विनी आणि जतिनदास यांनीं आपले देह ठेवले हें मला ठाऊक होतें. परंतु अशा परिस्थितीत तुरुंगांत मला मृत्यू आल्यास ती गोष्ट इतिहासांत ठेवण्याइतक्या महत्त्वाची बाब होईल याची मला खात्री झाली. मी उडी घेतली आणि सात दिवसांच्या माझ्या कडकडीत अन्नाविहीन तपःसामर्थ्यानें घाबरून जाऊन सरकारनें मला मोकळें केलें. पुन्हा एकदोन महिन्यानंतर मला तुरुंगांत टाकण्याचा सरकारचा डाव होता आणि माझ्या हालचालींवर गुप्त पोलीस सोडण्यांत आले होते. परंतु पुन्हा मला पकडण्यापूर्वींच पिंजऱ्यांतून निघून मी स्वतंत्र झालों........ मित्रांनों, आपल्याला माहित असेल कीं, १९२१ मध्यें विद्यालयांतून निघाल्यापासून स्वातंत्र्याच्या चळवळींत मी भाग घेत आलों. गेल्या वीस वर्षांत असहकाराच्या सगळ्या चळवळींत मी प्रामुख्यानें भाग घेतला. त्यांतील तुरुंगवासाशिवाय गुप्तक्रांतिकारक चळवळींशीं संबंध असल्याच्या संशयावरून मला सरकारनें बरेच वेळां तुरुंगांत टाकलें. आणि या सगळ्या अनुभवांवरून मी असा निष्कर्ष काढला कीं, हिंदुस्थानांतून चालविलेल्या चळवळींना नरमून इंग्रजी राज्यसत्ता मागें हटणार नाहीं.......

तात्पर्य असें कीं, हिंदुस्थानांतून बाहेर जाण्याचा माझा उद्देश हिंदुस्थानांतील स्वातंत्र्याच्या प्रयत्नांना बाहेरून मदत देणें हा होता. परंतु आंतील चळवळीला बाहेरून मिळावयाची मदत मिळून मिळणार किती असाही मला विचार पडला होता. ही बाहेरील मदत दोन प्रकारची पाहिजे होती. नैतिक मदत आणि युद्धसामुग्रीची मदत.

आतां वेळ आली असल्यामुळें सगळ्या जगाला आणि आमच्या शत्रूंना आमची सुटका करून घेण्याचे आमचे मार्ग मी उघड करून सांगतों. पूर्व आशियांतील लोकांच्या मदतीनें मी आतां आमचें बलवान् सैन्य उभारीत आहे. त्या सैन्याच्या उभारणीनें आमच्या देशांत आणि हिंदी लष्करांत आम्हीं क्रांति निर्माण करूं. देशांतील आणि देशाबाहेरील हिंदी क्रांतींच्या या धडाक्यांत ब्रिटिश सरकार उलथून पडेल. माझ्या विचारानें जे मार्ग मी ठरविले आहेत त्या मार्गांच्या आड दहशतवादी राष्ट्रें येणार नाहींत याची

मला खात्री आहे. संपूर्ण सैनिकीकरणाच्या माझ्या धोरणानुसार तीन लक्ष सैन्य आणि तीन कोटी डॉलर मला मिळतील अशी अपेक्षा आहे त्याशिवाय १८५७ च्या लढ्यांत स्वातंत्र्याची लढाई खेळणाऱ्या झांशीच्या लक्ष्मीबाई-सारख्या तरवार चालविणाऱ्या हिंदी महिलांचें एक दळ मला पाहिजे आहे. आमचे देशबांधव दुसरी आघाडी मागत आहेत. अशावेळीं पूर्व आशियाचें संपूर्ण सैनिकीकरण करण्याची मला आज्ञा द्या आणि मीच ही दुसरी आघाडी उघडून दाखवितों......"ह्या भाषणाचा लोकांवर अत्यंत परिणाम झाला. भाषणाचा प्रवाह चालू असतांच पावसाचाही धो धो प्रवाह सुरू झाला. पुरुष, स्त्रिया आणि मुलें नुसती चिंब भिजून गेलीं परंतु भाषण संपेपर्यंत कोणी जाग्यावरून हाललें नाहीं.



पृष्ठ ३५

नेताजी

# अझाद-हिंद-सरकारची कायदेशीर पुनर्घटना. : ४

अझाद-हिंद-सरकार किंवा " हुकमत-ए-अझाद-हिंद "ची श्री सुभाषचंद्र बोस यांच्या नेतृत्वाखालीं कायदेशीर पुनर्घटना करण्यासाठीं हिंदी-स्वातंत्र्य-संघाच्या पूर्व आशियांतील प्रतिनिधींची एक परिषद सिंगापूर येथें २१ ऑक्टोबर १९४३ रोजीं भरविण्यांत आली. त्या परिषदेंत पुनर्घटित अझाद हिंद सरकारच्या स्थापनेचा ठराव एकमतानें पास करण्यांत आला. आणि सरकारचें कार्यकारी मंडळ निवडण्यांत आल्याचें श्री राशबिहारी बोस यांनीं जाहिर केलें. सभेंतील कामाचा कार्यक्रम कर्नल चतरजी यांनीं वाचून दाखविल्यावर कार्यकारी मंडळाची घटना स्वीकृत करण्यांत आली.

कार्यकारी मंडळाचे सभासद ठरले ते येणेंप्रमाणें :—

सर्वाधिकारी, पंतप्रधान, युद्धमंत्री व परराष्ट्रमंत्री :

**श्री सुभाषचंद्र बोस.**

महिला युद्ध-शिक्षण-प्रचार-मंत्री : **डॉ. मिस् लक्ष्मी स्वामिनाथन्**,

कॅप्टन राणी लक्ष्मी फौज.

एम्. बी. बी. एस्. ( मद्रास विद्यापीठ ).

प्रसिद्धी-प्रचार-मंत्री : **श्री एस्. ए. अय्यर.**

अर्थमंत्री : मेजर जनरल **ए. सी. चतरजी.**

लष्करी मंत्री : मेजर जनरल **जगन्नाथराव भासले**

मे० जनरल **ए. डी. लोकनाथन्**

ले० कर्नल **शाहानवाझ खान**

ले० कर्नल **अझीज अहमद**

ले० कर्नल **एन्. एस्. भगत**

ले० कर्नल **गुलझारा सिंग**

ले० कर्नल **एम्. झेड कियानी**

ले० कर्नल **एहसान कादिर**

मंत्रीपद कार्यवाह : **ए. एम्. सहाय**

वरिष्ठ सल्लागार : **श्री राशबिहारी बोस**

सल्लागार मंडळ : **श्री करिम गनी**
**श्री देवनाथ दास**
**श्री डी. एम्. खान**
**श्री ए. यल्लाप्पा**
**श्री जे. थिवी**
**सरदार ईश्वरसिंग**

कायदा सल्लागार : **श्री ए. एन्. सरकार**

या ठरावानंतर श्री सुभाषबाबूंनीं राज्यसूत्रें आपल्या हातांत घेतल्याचें जाहिर केलें आणि नंतर त्यांचा व त्यांच्या मंत्रिमंडळाचा अझाद हिंद-सरकारच्या राजनिष्ठेचा शपथविधीसमारंभ उरकण्यांत आला. शपथविधीचा मसुदा अत्यंत शांत चित्तानें वाचल्यानंतर सुभाषबाबूंनीं त्यावर सही केली व नंतर इतर मंत्र्यांनीं तो वाचून त्यावर आपापल्या सह्या केल्या.

## नेताजी बोस यांची शपथ.

"सर्वसाक्षी परमेश्वराला स्मरून मी, सुभाषचंद्र बोस, अशी शपथ घेतों कीं, हिंदुस्थान देश आणि त्यांतील माझ्या ३८ कोटी देशबांधवांना स्वतंत्र करण्यासाठीं माझ्या जीविताच्या शेवटच्या श्वासापर्यंत स्वातंत्र्याचा हा पवित्र लढा मी चालू ठेवीन. मी नेहमींच भारतभूमीचा सेवक म्हणून काम करीन आणि माझ्या ३८ कोटी बंधूंचें आणि भगिनींचें रक्षण करणें हें मी माझें आद्य कर्तव्य समजेन. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर तें कायम टिकविण्यासाठीं माझ्या रक्तांतील शेवटच्या बिंदूपर्यंत मी लढत राहीन !" त्यानंतर अझाद सरकारच्या प्रत्येक मंत्र्यानें खालीलप्रमाणें शपथ घेतली :-

" परमेश्वराच्या साक्षीनें मी माझी पवित्र शपथ घेतों कीं, हिंदुस्थान देश आणि माझे ३८ कोटी देशबांधव स्वतंत्र करण्यासाठीं मी माझे मुख्याधिकारी श्री सुभाषचंद्र बोस यांना एकनिष्ठ राहीन आणि माझ्या

जीवनसर्वस्वाची या पवित्र कार्यासाठीं होळी करण्याची माझी आजन्म तयारी राहील."

शपथविधीनंतर अझाद - हिंद - सरकारच्या स्थापनेचा ऐतिहासिक जाहिरनामा श्री सुभाषबाबूंनीं वाचून दाखविला :

## अझाद् - हिंद् - सरकारचा जाहिरनामा.

"इसवी सन १७५७ मध्यें इंग्रजांनीं पराभव केल्यानंतर पुढील एक शतकाच्या कालावधींत हिंदी लोकांनीं स्वातंत्र्याचे भीषण रणसंग्राम दिले. या कालाचा इतिहास, हा हिंदी स्वातंत्र्यप्राप्तीसाठीं केलेल्या अतुल शौर्याचा आणि बलिदानाचा इतिहास होय. त्या इतिहासांत बंगालचे सिराज-उद्दौला व मोहनलाल, दक्षिण हिंदुस्थानचे हैदरअल्ली, टिपू सुलतान आणि वेलू थंपी, महाराष्ट्राचे अप्पासाहेब भोंसले आणि पेशवे बाजीराव, अयोध्येची प्रसिद्ध बेगम, पंजाबचे सरदार शामसिंग अतारीवाला, झांशीची लढवय्यी राणी लक्ष्मीबाई, शूर तात्या टोपे, डुमारावचे वीर महाराज कुंवरसिंग आणि नानासाहेब पेशवे यांचीं आणि इतर योद्धयांचीं नांवें सुवर्णाक्षरांनीं लिहिलीं गेलीं आहेत. परंतु आमच्या दुर्दैवानें आमच्या पूर्वजांना ब्रिटिशांच्या हिंदुस्थानांतील सुरवातीच्या आक्रमणाची पूर्ण कल्पना आली नाहीं आणि त्यामुळें आपल्या शत्रूशीं ते संलग्न आणि एकत्रिक सामना देऊं शकले नाहींत आणि शेवटीं खऱ्या परिस्थितीची जाणीव झाल्यावर १८५७ सालीं मोंगलराजा बहादुर शहा याच्या निशाणाखालीं आपल्या स्वातंत्र्याची शेवटची लढाई त्यांनीं दिली……

१८५७ सालानंतर हिंदी लोकांना शस्त्रविहीन करून टाकल्यानंतर ब्रिटिशांच्या धमकीनें आणि छळणुकीनें असहाय परिस्थितींत कांहीं काळ घालविल्यावर १८८५ सालांतील हिंदी राष्ट्रीय सभेच्या स्थापनेनें नव्या जागृतीस सुरवात झाली. १८८५ सालापासून तों गेल्या महायुद्धाच्या समाप्तीपर्यंत आपलें गतस्वातंत्र्य मिळवून घेण्याची त्यांनीं पराकाष्ठा केली, चळवळ केली, प्रचारकार्य केलें, परदेशी वस्तूंवर बहिष्कार घातला, दडपशाही झाली, घातपात झाले आणि शेवटीं सशस्त्र राज्यक्रांती झाली.

परंतु कांहीं काळपर्यंत या गोष्टींचा उपयोग झाला नाहीं. आणि शेवटीं १९२० मध्यें पराभवाच्या जाणिवेनें हिंदी लोक गडबडून गेले त्यावेळीं महात्मा गांधी असहकाराचें नवीन शस्त्र उपसून पुढें आले......

आणि अशा तऱ्हेनें आपल्या राजकीय हक्कांच्या जाणिवेनें हिंदीलोक पुन्हा एकदां एकत्रित झाले. त्यांनीं एकमुखानें बोलून आपल्या अंतिम ध्येयाची जगाला जाणीव करून दिली. १९३७ पासून १९३९ पर्यंत हिंदुस्थानांतील आठ प्रांतांतील राष्ट्रीय सरकारनें आपलीं प्रांतिक स्वायत्तता स्वतःच्या हिमतीवर उत्तम रीतीनें चालवून आपल्या आंगच्या लायकीचा सबळ पुरावा जगापुढें मांडला. आणि अशाप्रकारें या दुसऱ्या महायुद्धांत हिंदीस्वातंत्र्याच्या शेवटच्या संग्रामाची सिद्धता त्यांनीं केली......आपल्या आंगच्या ढोंगी वृत्तीनें हिंदी लोकांना चुचकारून आणि त्यांना सर्वस्वी लुबाडून ब्रिटिश सरकार हिंदी जनतेची सदिच्छा घालवून बसले आणि आतां अगदीं संकटाचें जिणें तें जगत आहे. हा पापी अंमल जाळून टाकण्यास फक्त एकादी जळती ज्योत पुरे आहे. ती जळती ज्योत हातीं घेणें हें या हिंदीस्वातंत्र्यसेनेचें काम आहे.......

आतां स्वातंत्र्याची प्रभा फांकली आहे आणि अशा सुप्रसंगीं आपलें स्वातंत्र्याचें राज्य उभें करणें हें हिंदीलोकांचें आद्य कर्तव्य आहे. परंतु हिंदी पुढारी तुरुंगांत खितपत असतांना आणि हिंदी बांधव शस्त्रविहीन असतांनां हिंदुस्थानांत स्वातंत्र्यराज्य स्थापन करून शस्त्रास्त्रांची लढाई देणें त्यांना अशक्य आहे. आणि म्हणून आपल्या देशांतील आणि देशाबाहेरील देशप्रेमी हिंदीबांधवांच्या मदतीनें पूर्वआशियांतील हिंदीस्वातंत्र्य-संघानें ही लढाई देऊन ती शेवटपर्यंत यशस्वीपणें चालविण्याचें कार्य हातीं घेतलें आहे.... अझाद हिंद-सरकार प्रत्येक हिंदी माणसाच्या निष्ठेची मागणी करित आहे आणि प्रत्येकाला धार्मिक स्वातंत्र्य, समान हक्क आणि समान वागणुक देण्याची हें सरकार हमी घेत आहे. हिंदी राष्ट्राला सुख, स्वास्थ्य आणि सुबत्ता प्राप्त करून देऊन राष्ट्रांतील बालकांचें सुसंगोपन करण्याचा आणि ब्रिटिश सरकारनें कावेबाजीनें निर्माण केलेले परस्पर भेदाभेद नाहींसे करून टाकण्याचा आपला निर्धार हें सरकार जाहिर करित आहे. परमेश्वराला स्मरून, राष्ट्रैक्य निर्माण करण्याऱ्या गत बांधवांना स्मरून आणि आमच्यांत शौर्याची आणि

त्यागाची परंपरा निर्माण करणाऱ्या मृत शूरवीरांना स्मरून आमच्या झेंड्या-खालीं जमा होण्यासाठीं हिंदीबांधवांना मी पाचारण करित आहें. ब्रिटिश सरकार आणि त्यांचे दोस्त यांना हिंदुस्थानांतून कायमचें घालवून देण्यासाठीं मी त्यांना बोलावीत आहे." या जाहिरनाम्यावर सुभाषचंद्र बोस आणि त्यांचें समस्त मंत्रिमंडळ यांच्या सह्या झाल्या आणि नंतर वाद्यांच्या निनादांत राष्ट्रगीताचे खालील सूर मिळवून देण्यांत आले.

## राष्ट्र--गीत :

सब सुख चैन कि वरषा बरसे भारत भाग है जागा।
पन्जाब-सिन्ध-गुजरात-मराठा-द्राविड-उत्कल-बंगा।
चन्चल सागर-विन्ध्य-हिमालय-नीला-यमुना-गंगा।
तेरे नित गुण गायें
तुझसे जीवन पाये
सब जन पाये आशा
सूरज बनकर जगपर चमके भारत नाम सुभागा।
जय हो जय हो जय हो
जऽय जऽय जऽय जऽय हो॥
सब के दिल में प्रीत बसाये तेरी मीठी वाणी।
हर सुबे के रहने वाले हर मजहब के प्राणी।
सब भेद औ फरक मिटाके।
सब गोद में तेरि आके।
गूंथे प्रेम कि माला।
सूरज बनकर जगपर चमके भारत नाम सुभागा॥
जय हो जय हो जय हो
जयऽजयऽजयऽजयऽहो॥
सुबह सबेरे पंख पखेरू तेरे ही गुण गाये।
बास भरी भरपूर हवायें जीवन में रुतलायें।

सब मिलकर जय हिंद पुकारे।
जय अझाद हिंद क नारे।
प्यारा देश हमारा।
सूरज बनकर जगपर चमके भारत नाम सुभागा॥
जय हो जय हो जय हो
जऽय जऽय जऽय जऽय हो
भारत नाम सुभागा॥

## आजाद-हिंद-सरकारचा आंतरराष्ट्रीय दर्जा.

२० ऑक्टोबर १९४३ ला अझादहिंदसरकारला जपानी सार्वभौम सरकारनें लेखी मान्यता देऊन हिंदी स्वातंत्र्य संपादनाच्या त्याच्या प्रयत्नांत सर्व प्रकारचें सहकार्य व मदत देण्याचें आणि हिंदुस्थानच्या संपूर्ण स्वातंत्र्याला संमति दिल्याचें कबूल केलें. त्यानंतर २५ ऑक्टोबरला सिंगापूरच्या पेडांग मैदानावर जाहिर सभा झाली. त्यांत पाऊण लाखाच्यावर सैनिक आणि हिंदी लोक हजर होते. लष्करी सैन्याला हुःशारच्या पावित्र्यांत बंदुका हातांत घेऊन उभें रहाण्याचा हुकूम झाला. त्या सभेंत आझाद सरकारच्या मंत्रिमंडळानें त्या दिवसापासून ब्रिटन आणि अमेरिका यांचेविरुद्ध लढाई पुकारल्याची जाहिर घोषणा करण्यांत आली. त्याबरोबर सैन्यांतून आणि सभेंतून संमतीदर्शक निनादांचा वर्षाव झाला आणि लष्करानें आपल्या संगिनी वर करून त्या घोषणेला आपली संपूर्ण अनुमति जाहिर केली.

जर्मन परराष्ट्रमंत्री हर व्हॉन रिबेन्ट्रॉप यांनीं २७ ऑक्टोबरला नेताजींना तार पाठऊन आपल्या सरकारनें अझाद हिंद सरकारला मान्यता दिल्याचें कळविलें. त्याच सुमारास स्वतंत्र ब्रम्ही सरकार आणि स्वतंत्र फिलिपाईन सरकार यांचीही मान्यता आली. नोव्हेंबरच्या सुरवातीस इटाली, क्रोशिया, चीन, मॅंचुको या सरकारांनीं आपली मान्यता कळविली. आयरिश स्वतंत्र राज्यानेंही आपली मान्यता देऊन सोबत अझाद सरकारला देणगी म्हणून ५००० पौंड पाठवून दिले.

आझाद सरकारच्या स्थापनेपासून हिंदीस्वातंत्र्यसंघानें मिळविलेल्या देणगीच्या आणि वर्गणीच्या निधीशिवाय सुभाषबाबूंना सगळीकडून पैशांची मदत मिळूं लागली. त्याशिवाय सोने-चांदी-जवाहिराच्या स्वरूपांत गरिबां-पासून श्रीमंतांपर्यंत देणग्या आल्या. परंतु तेवढ्यावर सरकारचा व फौजेचा अवाढव्य खर्च भागण्यासारखा नव्हता. यासाठीं ठिकठिकाणीं सभा भरवून देणगी आणि मदतीसाठीं सुभाषबाबूंनीं भाषणांचा दौरा काढला. मलायांतील हिंदी लोकांच्या मालकीच्या मालमत्तेचा निदान दहावा हिस्सा जरी आपणास मिळाला तरी दहाकोटी रुपये उभारून सरकारचीं निरनिराळीं खातीं आणि फौजेच्या अन्नपाण्यास आणि शिक्षणास लागणारा खर्च मला भाग-वितां येईल असें त्यांनीं सांगितलें. फक्त सिंगापूरला बसल्या ठिकाणीं ७०,००,००० रुपये जमा झाले आणि त्या नंतरच्या २४ तासांत देणगीचा आंकडा १,३०,००,००० रुपयांवर गेला. पेनांग शहरांतील एका सभेंत त्यांनीं मदतीची याचना केली. तेव्हां तेथील एका गरिब हिंदी गृहस्थानें त्यांना आपल्या मृत आईच्या हातचा चांदीचा लोटा मोठ्या प्रेमानें पुढें केला. त्या चांदीच्या लोट्याचे लिलांव पुकारण्यांत आले आणि त्याची शेवटची किंमत १ लाख ५ हजार डॉलर रोख आली. त्यानंतर ता. २६ जानेवारी १९४४ ला सुभाषबाबू रंगूनला असतांना स्वातंत्र्यदिनानिमित्त भरलेल्या एका जंगी सभेंत त्यांचा पुष्पहार घालून थाटाचा सत्कार करण्यांत आला. त्या सत्कार-प्रसंगीं केलेल्या भाषणानंतर त्यांनीं पुष्पहार आपल्या हातांत धरला आणि त्याचे लिलांव पुकारले आाण लिलावाची रक्कम आझाद फौजेच्या निधीला जमा कर-ण्याचें आश्वासन दिलें. पहिला सवाल एक लाख रुपयांचा झाला. हा सवाल देणारा एक पंजाबी धनवान् गृहस्थ होता. साडेचार लाखांचा सवाल दुसऱ्या गृहस्थानें पुकारतांच या गृहस्थानें पांच लाख केले. शेवटीं ही मागणी तिसऱ्या एका गृहस्थाकडून सात लाखांपर्यंत जातांच हा पंजाबी गृहस्थ विचारमग्न झालेला दिसला. तो आपला अंतर्आवाज घेत असावा जणूं. हा पुष्पहार आतां सात लाखांना जाणार असें पहातांच त्यानें व्यासपीठावर उडी घेतली आणि तो हार बळकाऊन तो आवेगानें बोलला "माझी सगळी मालमत्ता तुम्हांला देतों. अगदी शेवटची पईसुद्धां! परंतु हा हार मला पाहिजे."

त्यावर सुभाषबाबू म्हणाले "बस पुरे. हा हार तुमचाच आहे. तुमच्या सारखे दाते असल्यावर फौजेला यश कां मिळणार नाहीं ?"

आणि नंतर एक कोटी रुपयांचा चेक देऊन व तो पुष्पहार घेऊन तो दानशूर गृहस्थ डौलानें व्यासपीठावरून खालीं उतरला आणि जून १९४४ च्या अखेरीस खुद्द मलायांतील देणगीचा आंकडा साडेसात कोटींवर गेला.

रंगूनला असतांना तेथील एका कोट्याधीश मुसलमान व्यापाऱ्याशीं त्यांचें आझाद सरकारच्या राष्ट्रीय बँकेच्या स्थापनेबद्दल बोलणें झालें.

## आझाद बँकेची स्थापना

जून जुलै १९४४ च्या सुमारास इंफालच्या आघाडीवरून आल्यानंतर स्वतःचें नाणें काढून बँक स्थापन करण्याचा आझाद सरकारचा इरादा होता. त्याबद्दल या श्रीमंत गृहस्थाला सुभाषबाबूंनीं सूचना केली. उत्तरादाखल ते श्रीमंत गृहस्थ बोलले—"बँकेला किती भांडवल लागेल आपल्याला सुरवातीस ?"

"सध्यां पन्नास लाख तरी लागतील ?"

"येवढेंच ना ? मग हे माझे तीस लाख रुपये घ्या आणि राहिलेले वीस लाख मी आठ दिवसांत देतो आपल्याला"

आणि आठ दिवसाच्या आंत बँक स्थापन होऊन कामाला सुरवातही झाली. पन्नास लाखांच्या शेअर भांडवलावर ब्रह्मी कायद्याप्रमाणें आझादबँक नोंदण्यांत आली. आझाद सरकार व आझाद फौज याचा सर्व पैसा बँकेकडे ठेवण्यांत आला. शिवाय लोकांनीं आपल्या ठेवी ठेऊन चालू खातीं उघडलीं. एक दोन महिन्याच्या आंत बँकेच्या १०।१२ शाखा मलाया, ब्रह्मदेश, थायलंड वगैरे ठिकाणीं उघडण्यांत आल्या.

त्याशिवाय ठिकठिकाणीं हिंदी गृहस्थांच्या समित्या स्थापून सरकारी कर जमा करण्याची व्यवस्था करण्यांत आली आणि कराचा पैसा आझाद बँकेकडे जमा करण्याची व्यवस्था करण्यांत आली.

पैशाची मदत जसजशी वाढूं लागली तसतशा हिंदी लष्कराला शिक्षण देण्याच्या शाळा व केंद्रें ब्रह्मदेश व मलाया मध्यें उघडण्यांत येऊन फौजेला सर्व प्रकारचें शिक्षण देण्याची व्यवस्था करण्यांत आली. सुरवातीला एकंदर ४०,००० सैनिकांना जादा शिक्षण देण्यांत आलें.

१२ जुलै १९४३ रोजीं नेताजींच्या अध्यक्षतेखालीं हिंदी स्वातंत्र्यसंघाच्या महिला विभागातर्फे सिंगापूरला सभा भरून आझाद सरकारच्या हुकमाखालीं आझाद-महिला-लष्कर आणि आझाद-महिला-शुश्रुषापथक उभारण्याचा ठराव एकमतानें पास झाला. टाळयांच्या प्रचंड कडकडाटांत सभेच्या कामास सुरवात झाली आणि सुभाषबाबूंना पुष्पहारानें भरून काढण्यांत आलें व क्रांति-गीतांनीं त्यांचा सत्कार करण्यांत आला. नंतर सुभाषबाबूंचें स्फूर्तियुक्त भाषण झालें:—

भगिनींनो,

सन १९२१ सालापासून गेल्या बावीस वर्षांच्या काळांत हिंदी महिलांनीं स्वातंत्र्याच्या लढ्यांत जो भाग घेतला तो आपणांस माहिती आहेच. महात्मा-गांधींनीं राष्ट्रसभेचीं सूत्रें आपल्या हातांत घेतल्यापासून या संग्रामांत हिंदी स्त्रियांनीं केलेली कामगिरी मह्शूर आहे. खेड्यापाड्यांत जाऊन लोकजागृति करण्याचें, दारोदार भटकून प्रचारकार्य करण्याचें, निवडणुका लढविण्याचें, सरकारी विरोधाला न जुमानतां मिरवणुका काढण्याचें, तुरुंगांत जाऊन हाल काढण्याचें, लाठीमार सहन करण्याचें अशा प्रकारचीं सर्व कामें पुरुषांच्या बरोबरीनें हिंदी महिलांनीं केलीं आहेत. क्रांतिकारक चळवळींतही त्यांनीं भाग घेतल्याचीं उदाहरणें आहेत. जरूर पडेल त्यावेळीं पुरुषांप्रमाणें आपणही गोळया घालूं शकतों हेंही त्यांनीं सिद्ध करून दाखविलें आहे........

तुमच्या कर्तबगारीची जाणीव असल्यामुळेंच मोठ्या विश्वासानें आज आपल्याशीं मी बोलत आहें. असें कोणतेंही कार्य नाहीं अगर असा कोणताही त्याग नाहीं कीं तो आपण करूं शकणार नाहीं...

साम्राज्यें निर्माण होतात, तशीं तीं नाशही पावतात असें इतिहासच सांगत आहे. आणि जगाच्या पाठीवरून नामशेष होण्याचे ब्रिटिशसाम्राज्याचे

दिवस आतां जवळ आले आहेत. तुमच्या आजूबाजूनेंच त्यांचें साम्राज्य कसें नाहींसें झालें तें तुम्ही स्वतः पाहिलें आहे आणि तसेंच ते हिंदुस्थानांतूनही नाहींसें होणार आहे...

स्त्रियांनीं खांद्यावर बंदुका लटकावून लढाईवर जाणें अप्रशस्त आहे असें म्हणणारा कोणी आढळल्यास—इतिहासाचीं पानें चाळण्यास मी त्याला सांगेन. आमच्या शूर स्त्रियांचीं कृत्यें इतिहासच बोलत आहे. १८५७ सालच्या पहिल्या क्रांतियुद्धांत झांशीच्या शूर राणीनें काय केलें ? घोड्यावर स्वार होऊन आणि म्यानांतली तलवार पारजून आपल्या लोकांना ती रणांगणावर घेऊन गेली, शेवटपर्यंत शौर्यानें शत्रूशीं लढली आणि रणांगणावरच तिनें शेवटीं देह ठेवला. त्या शूर महिलेनें अपुरें ठेवलेलें स्वातंत्र्यकार्य तुम्हांला चालू करून पूर्णत्वास नेलें पाहिजे......यासाठीं या सरत्या स्वातंत्र्यसंग्रामांत आम्हांला एखादी राणी लक्ष्मी नको आहे. आम्हांला त्या हजारोंनीं पाहिजे आहेत. आपण कितीजणी बंदुका वापरतां अगर त्यांतून किती गोळ्या आपण शत्रूवर सोडतां, यापेक्षां आपणांपैकीं किती जणींत शौर्य गाजविण्याचें नैतिक बळ आहे आणि तें शेवटपर्यंत टिकून राहणार आहे याच गोष्टीस आज जास्त महत्त्व आहे. म्हणून कोणत्याही दृष्टीनें विचार केला तरी स्त्रियांनीं पुरुषांबरोबर, मुलींनीं मुलांबरोबर बाहेर येऊन या संग्रामांत जास्तीत जास्त स्वार्थत्याग करण्याचे आजचे दिवस आहेत. या गोष्टीची जाणीव ठेवा.', आणि त्यानंतर सभेचें काम संपण्यापूर्वीं शेकडों स्त्रियांनीं लष्करांत दाखल होण्यासाठीं आपापलीं नांवें दाखल केलीं.

ता. २२ ऑक्टोबर १९४३ रोजीं म्हणजे झांशीची राणी लक्ष्मी हिच्या वाढदिवशीं सिंगापूरच्या आझादलष्करी छावणीवर राणी लक्ष्मी-लष्कर आणि राणी लक्ष्मी शुश्रुषा पथक यांचा उद्घाटन समारंभ पार पडला. त्यानंतर सैनिक आणि स्वयसेविका यांच्या लांबलचक रांका समोरासमोर उभ्या करण्यांत येऊन आपापल्या बंदुकासह दुःधारच्या पाविन्यांत उभें राहाण्याचा कॅ० लक्ष्मी यांनीं हुकूम दिला आणि सर्वांनीं नेताजी सुभाषचंद्र बोस आणि महिला-स्वातंत्र्यसंघाच्या प्रमुख श्रीमती चतरजी यांस थाटाची लष्करी सलामी दिली.

त्यानंतर सुभाषबाबूंनीं मेजर लक्ष्मी स्वामिनाथन् यांना महिला लष्कराच्या मुख्याधिकारी नेमल्याचा आझाद-हिंद-सरकारचा हुकूम जाहिर केला. आपल्या भाषणांत ते म्हणाले:—

"आझाद महिलांनो—

तुमच्या लष्कराच्या या उभारणीनें पूर्व आशियांतील आमच्या चळवळींची एक महत्त्वाची बाब अस्तित्वांत येत आहे. हिंदुस्थानांतील स्त्रीवर्गात लढाईचें चैतन्य निर्माण करण्याचें कार्य तुमच्या या नाविन्यपूर्ण आणि धडाडीच्या जीवनांतून सुरू होत आहे. आमचा भूतकाळ हिंदी स्त्री जीवनाचा आदर्श आहे. तेजस्वी आणि चैतन्ययुक्त परंपरेशिवाय झांशीच्या राणीसारख्या शूर स्त्रिया निर्माण होत नसतात. मैत्रेयीसारख्या प्राचीन महिला, महाराष्ट्राच्या अहिल्या होळकर, बंगालची राणी भवानी, रेझिया बेगम आणि नूरजहान या राज्यकर्त्या राण्यांचीं आदर्श उदाहरणें तुमच्या नजरेसमोर आहेत. आणि अशाच प्रकारच्या शूर महिला चालू काळांतही हिंदभूमींत कांहीं कमी नाहींत. त्यांची कर्तबगारी तुम्हांला आदर्शभूत होईल अशीच आहे........

झांशीच्या राणीनें स्वातंत्र्याच्या लढ्यांत उडी टाकली तेव्हां ती वयानें अवघी वीस वर्षांची असेल नसेल. वीस वर्षांच्या अबलेनें घोड्यावर उडी टाकून समरांगणांत शत्रूवर तरवार फेकणें हें केवढें शौर्य याची तुम्ही कल्पना करा. तिचा निर्धार, तिचें चैतन्य आणि तिची चमक तुम्ही ध्यानांत घ्या. तिच्याबरोबर लढाई खेळलेल्या इंग्रज अधिकाऱ्यानेंही कबूल केलें आहे कीं, शूर लढवय्यांतही ती अत्यंत शूर होती! पहिल्यानें ती आपल्या झांशीच्या किल्ल्यांत लढली आणि तो किल्ला पडल्या नंतर आपल्या सरंजामानिशीं शत्रूच्या बंदोबस्तांतून निसटून काल्पीच्या रणांगणावर तिनें पुन्हा इंग्रजांशीं सामना दिला. इथही माघार घ्यावी लागून तात्या टोप्यांच्या मदतीनें ग्वाल्हेरच्या किल्ल्याला वेढा देऊन तिनें तो किल्ला घतला आणि तिथून पुन्हां लढाई दिली......आणि लढतां लढतां शेवटीं रणांगणावर तिनें देह ठेवला! दुर्दैवानें तिला अपयश आलें. परंतु तें अपयश तिचें नव्हतें. तें हिंदी स्वातंत्र्याचें होतें. ती मृत्यू पावली पण तिचें कार्य

आणि शौर्य अजरामर झालें. मला खात्री आहे कीं, हिंदुस्थानांत पुन्हां एकदां झांशीच्या राणीसारख्या शूर महिला निर्माण होऊन तिचें गतस्वातंत्र्य त्या मिळवून घेतील.........”

## मे. डॉ. लक्ष्मी स्वामिनाथन्

महिला लष्कराच्या प्रमुख डॉ. लक्ष्मी स्वामिनाथन् यांस आझाद सरकारच्या पुनर्घटित मंत्रिमंडळांत मंत्रीपद देण्यांत आलें होतें याबद्दलचा उल्लेख आलाच आहे. यापूर्वी पांच सहा वर्षें सिंगापुरांत आपल्या वैद्यकीय व्यवसायांत त्यांनीं बरीच कीर्ति कमावली होती. मद्रास येथील प्रसिद्ध स्वामिनाथन् घराण्यांतील डॉ. स्वामिनाथन् व श्रीमती अंबू स्वामिनाथन् (मध्यवर्ती कायदेमंडळाच्या चालू लोकनियुक्त सभासद) यांच्या मेजर लक्ष्मी स्वामिनाथन् या कन्या होत. त्यांचा जन्म १९१४ सालीं मद्रासेंत झाला आणि वयाच्या चौविसाव्या वर्षी मद्रास विश्वविद्यालयाच्या एम्. बी; बी. एस्च्या परीक्षेंत त्या पास झाल्या. लहानपणापासूनच कॉंग्रेसच्या चळवळींत त्या भाग घेत होत्या. मलायांतील हिंदी स्वातंत्र्यसंघाच्या महिला शाखेचें व संघाच्या बालसेनेचें नेतृत्व त्यांच्याकडे होतें. मलायांतलि अत्यंत आदर्शभूत हिंदी महिला म्हणून तिला मान आहे. संधी सांपडतांच आपला वैद्यकीय व्यवसाय बंद करून अत्यंत धडाडीनें तिनें स्वातंत्र्याच्या चळवळीस स्वतःला वाहून घेतलें.

नवख्याला अत्यंत आदर आणि शत्रूला दरारा वाटण्याइतकें बुद्धि-चापल्य, तजेलदार उंच बांधा, नैसर्गिक सौंदर्य, असामान्य वक्तृत्व, लष्करी शिस्तीची आणि लष्करी गणवेषाची आवड, बोलण्याची ढब, आणि संपूर्ण त्यागवृत्ति या सर्व गुणांचा समुच्चय म्हणजेच मेजर डॉ. लक्ष्मी स्वामिनाथन् असें तिचें वर्णन डॉ. ऑल्फ्रेड या इंग्लिश वार्ताहरानें केलें आहे. आपल्या पथकासह मौलमीनच्या आघाडीवर लढत असतां तिला अटक करण्यांत आली परंतु शेवटपर्यंत शरणागतीची याचना तिनें केली नाहीं. तिला व तिच्या पथकांला मियामोहून शंभर मैलपर्यंत दाट जंगलांतून चालवून पुढील चौकशीसाठीं त्यांना रंगून शहरांत स्थानबद्ध करण्यांत आलें. चोकशीच्या वेळीं आपल्या पथकांतील सैनिकांना कोणत्याही प्रकारें त्रास न

देण्याबद्दल व आंतरराष्ट्रीय दर्जानें वागविण्याबद्दल तिनें ब्रिटिश अधिकाऱ्यांना वेळोवेळीं तंबी दिली.

राणी लक्ष्मीपथकाला लष्करी शिस्तीचें, शस्त्रास्त्र वापरण्याचें आणि प्रथमोपचाराचें संपूर्ण शिक्षण देण्यांत आलें होतें. पिस्तुल, बंदूक, टॉमीगन् आणि तोफा चालविण्याचें शिक्षण देण्यासाठीं ऑक्टोबर १९४३ पासून सिंगापूरला आणि नंतर रंगूनला अशा दोन स्वतंत्र लष्करी शाळा उघडण्यांत आल्या होत्या. महिला लष्कराला गनिमी शिक्षण देण्याचें काम मे० शहानवाझ यांच्याकडे होतें.

ता. ४ जानेवारी रोजीं आझाद सरकारचे लष्करी मंत्री मेजर भोसले यांनीं रंगून येथील महिला लष्करी छावणीची तपासणी करून समाधान व्यक्त केलें. त्यावेळीं मेजर भोसले यांना महिला पथकानें थाटाची लष्करी सलामी दिली. महिला लष्करांत कामाच्यावेळी शिस्त कशी पाळावी आणि इतर वेळीं सुद्धां त्यांत स्वाभाविक ढिलेपणा नसावा याबद्दल त्यांनीं लष्कराला बोधपर माहिती दिली.

आझाद हिंद सैन्याची आघाडीची छावणी रंगून येथें नेण्यांत आली त्यावेळींच राणी लक्ष्मीपथक आणि शुश्रुषापथक हीं रंगूनला आणण्यांत आलीं होतीं. सिंगापूर ते चेंपानपर्यंत आगगाडीनें, तेथून मरगूपर्यंत आगबोटीनें, तेथून दीडशें मैल पायीं आणि नंतर मौलमीनहून आगगाडीनें असा प्रवास या पथकांना करावा लागला होता.

राणी लक्ष्मीपथकांत कांहीं महाराष्ट्रीय महिला होत्या. सिंगापुरांतील डॉ० काळे आणि डॉ० पटवर्धन यांनीं या पथकाला सुरवातीस फार मदत केली व त्यानां वैद्यकीय शिक्षण दिलें. डॉ० परांजपे यांच्या तीन कन्या महिला लष्करांत अधिकाराच्या जागेवर होत्या आणि मौलमेनच्या लढाईंत त्यांनीं शत्रूशीं सामनाही दिला होता. इंफालच्या पाडावानंतर महिला लष्करांतील सैनिकांना गिरफदार करण्यांत येऊन पुढील चौकशीसाठीं रंगूनला कांहीं दिवस ठेवल्यानंतर कांहींना सोडून देऊन कांहींना दिल्लीच्या लाल किल्ल्यांत आणून ठेवण्यांत आलें अशी माहिती मिळते.

महिला शुश्रुषा पथकाला लष्करी आणि प्रथमोपचार असें दुहेरी शिक्षण देण्यांत आलें होतें. मौलमीनच्या आघाडीवर शुश्रुषा पथकाची तुकडी पिछाडीच्या रुग्णालयावर ठेवण्यांत आली होती. त्यामुळें या पथकांत असंतोष निर्माण झाला आणि प्रत्यक्ष आघाडीवर पाठविण्यासाठीं सैनिकांनीं आपल्या स्वतःच्या रक्तानें सही करून पाठविलेला अर्ज सुभाषबाबूंच्या समोर येतांच हिंदुस्थानच्या सरहद्दीवर लढण्यासाठीं महिला लष्कराला पहिल्या आघाडीवर पाठविण्याचा हुकूम त्यांनीं दिला. त्याप्रमाणें १९४४ च्या मार्चमध्यें क० शहानवाझ यांच्या आधिपत्याखालील बहादुर पलटणांबरोबर राणी झांशी पलटणीच्या दोन तुकड्या कोहिमाच्या आघाडीवर पाठविण्यांत आल्या. या दोन्ही तुकड्यांत मिळून एकंदर एक हजार सैनिका होत्या.

## कोहिमाच्या आघाडीवर

या आघाडीवरील प्रत्यक्ष परिस्थिती अत्यंत बिकट होती. कूच करतां करतांना अन्नाचा तुटवडा पडला आणि पाणी मिळण्याची मधूनमधून अडचण पडूं लागली. थंडी कडाक्याची, आजूबाजूस डोंगर, सभोंवती जंगल, शत्रूचें ठाणें अगदीं जवळ असल्याची टेहळक्यांनीं बातमी आणून दिली. शत्रूला चाहूल लागली नसावी. रात्रीचा प्रवास. बरेंच अंतर चालल्यानंतर पहांटेच्या वेळीं एका डोंगराच्या आडोशास दबा धरून बसण्याचा हुकूम झाला. पुन्हां टेहळक्यांनीं बातमी दिली कीं, शत्रूची एक तुकडी अर्ध्या मैलावर आहे. फौजेला कूच करण्याचा हुकूम झाला आणि एकदम सरबत्तीचा हुकूम देण्यांत आला.

"गोळ्या सोडा"—गोळ्या सुटल्या.

"आणखी गोळ्या सोडा"—पुन्हां गोळ्या सुटल्या.

"गोळ्यांची सरबत्ती द्या"—फौजांनीं गोळ्यांचा पाऊस पाडला.

"सरबत्ती बंद करा. संगिनी लावा" संगिनी लावल्या.

—"आणि चाल करा"

त्या बरोबर संगिनी उपसून लष्कर शत्रूवर तुटून पडलें. चकमक झाली. आझाद सैनिक आणि सैनिका बऱ्याच जखमी झाल्या आणि अर्ध्या तासानंतर शत्रू शरण आला.

इंफालच्या आघाडीवर असतांना पलेल तळावर शत्रूचा दारुगोळा आणि अन्नसामुग्री होती. तळावर अचानक जाऊन भडिमार करण्याचा दोन्ही लष्करांना हुकूम झाला. पुढें नेहरू पथक, मध्यें लक्ष्मी पथक आणि मागें गनिमी पथक अशा रचनेंत लष्करानें कुच केलें आणि नंतर इन्किलाब झिंदाबाद, आझादहिंद झिंदाबाद आणि जयहिंदच्या गर्जनेंत फौजेच्या दोन्ही तुकड्या पलेलच्या तळावर तुटून पडल्या. शत्रू गैरसावध होता. अचानक हल्ला होतांच शत्रूची तुकडी पळून गेली आणि अन्नसामुग्री व दारुगोळा आझाद फौजेनें लुटून आणला.

मौलमीच्या आघाडीवर एकसारखी सोळा तास पर्यंत लढाई देऊन ब्रिटिश सैन्याचें आक्रमण लक्ष्मीपथकानें अडकवून टाकलें आणि झालेल्या चकमकींत फौजेंतील बऱ्याच सैनिका जखमी झाल्या व कांहीं ठार झाल्या. या लढाईंत शेवटीं आझाद लष्कराला माघार घ्यावी लागली व त्याला पकडण्यांत आलें त्यांत लक्ष्मीपथकही पकडलें गेलें. मौलमीनच्या आघाडीवरील साहसाबद्दल मे. लक्ष्मी व कांहीं सैनिका यांना नेताजींनीं प्रशस्तिपत्रकें दिलीं व लष्कराचा सरकार मार्फत गौरव करण्यांत आला.

तेरी हिम्मत बढती रहे
खुदा तेरी सुनता रहे
जो सामने तेरे चढे
तूं खाकम मिलाये जा ॥
चलो दिल्ली पुकारके
कोमी निशाँ समाल के
लाल किल्ले पै गाढ के
लहराये जा ऽ लहराये जा ऽ ऽ.

× × ×

आघाडीवर जाणाऱ्या सैन्यांत जनरल शहानवाझखान यांच्या खास आधिपत्याखालीं बोस पलटणीचें ३२०० सैन्य, कर्नल प्रेमकुमार सेहगल यांच्या हाताखालीं दुसऱ्या पायदळ पलटणीचें ३००० सैन्य, ले. कर्नल गुरुबक्षसिंग धीलन यांच्या नेहरू पलटणीचें ३००० सैन्य, कर्नल इनायत कियानी यांच्या गांधी पलटणीचें २८०० सैन्य, क० झुलमारा सिंग यांच्या हाताखालील आझाद पलटणीचें २८०० सैन्य, मेजर लक्ष्मी स्वामिनाथन् यांच्या हुकमतींतील राणी लक्ष्मी पलटणीचें २१०० सैन्य, शिवाय स्थापथ्य-सैन्य, वैद्यक विभाग, रुग्णालय विभाग इत्यादि शस्त्रसंभार घेण्यांत आला.

ता. ४ फेब्रुवारी १९४४ रोजीं शहानवाझ खान यांच्या बोस पलटणीची आणि आणि इनायत कियानी यांच्या गांधी पलटणीची दोस्त सैन्याशीं पलेल–टामू विभागांत चकमक झाली. ऐन वेळीं आणि अनपेक्षित अशी ही चकमक घडून आली. शस्त्रास्त्रांचा तुटवडा पडला, वाहतुकीस अडथळा आला, मालगाड्या आल्या नाहींत. शिपायांनींच आणीबाणीच्या वेळीं दारुगोळा व दाणा वाहून आणला. शहानवाझ आणि कियानी आपापल्या मोटारींतून अग्रभागीं आले आणि सैन्याची अभिनव रचना करून त्यांनीं चक्रव्यूह मारला. एक सारखी सोळा तास लढाई देऊन पलेल व टामू हीं दोन्ही ठाणीं "बोस–गांधी" नीं सर केलीं. नंतर पुढें कूच करून ता. १८ मार्चला टिडीमचें ठाणें त्यांनीं घेतलें. मागील फौज मदतीला येऊन

याच दिवशीं हिंदभूमीवर पदार्पण करून सैन्यानें आपलें राष्ट्र-निशाण उभारलें.

या लढाईनंतर आझाद सैन्य आणि जपानी सैन्य यांनीं इंफालच्या आघाडीवर कूच केलें. दिनापूरचा रस्ता कापून टाकून कोहिमाचें ठाणें काबीज करण्यांत आलें. आझाद सैन्यानें विष्णूपूर ठाणें घेतल्यामुळें इंफालचा टापू उघडा पडला आणि शत्रूचें सैन्य मागें परतलें. आझाद सैन्यानें त्याचा पाठलाग केला आणि इंफालच्या ठाण्याला वेढ्याचा फांस टाकला. आतां इंफाल पडणें हा केवळ आझाद सैन्याच्या हातचा खेळ होता. कांहीं तासांचाच अवधि......इंफाल पडतांच "चलो दिल्ली" ची स्वारी कांहीं अशक्य नव्हती. आघाडीवर हजर राहून श्री सुभाषचंद्र बोस आपलें स्वातंत्र्याचें स्वप्न खरें झालेलें स्वत:च्या डोळ्यांनीं पहात होते. शत्रुसैन्य सैरावैरा पळण्याच्या मार्गांत होतें. आणि...आयत्यावेळीं दुर्दैवानें दगा दिला.

डोकीवर विमानें फिरूं लागलीं. हां हां म्हणता शेंकडों विमानांनीं आकाशांतून अग्निवर्षाव सुरू केला. शत्रुसैन्याला कुमक आली. शेंकडों रणगाडे इंफालच्या तळावर विमानांनीं उतरण्यांत आले, इंफालचा वेढा उठवावा लागला. कोहिमा सोडून द्यावें लागलें. निसर्गसुद्धां जणूं कोपला. पावसाळा जोरांत सुरू झाला. मोहीम थांबवावी लागली. बिकट परिस्थिती निर्माण झाली. आघाडी शत्रूच्या हातांत जाऊन पिछाडी आझाद सैन्याच्या हातीं आली. जपानी सैन्य विश्वासघात करून वाट मिळेल तिकडे पळत सुटलें. आझाद सैन्याला एकट्यानेंच पिछाडीच्या फळ्या लढवाव्या लागल्या. संरक्षणाच्या लढाया देत देत ऐन पावसाळ्यांत सुद्धां आझाद सैन्यानें बचावाचें संरक्षण केलें. टिडीम आणि टिम्मू लढाया देऊन सोडून द्यावीं लागलीं. आणि अशा परिस्थितींत ता० ८ ऑगस्ट १९४४ रोजीं मोहिम रद्द करण्यांत येऊन लष्कर मागें घेण्याचा हुकूम सुभाषचंद्र बोस यांनीं दिला.

× × ×

## पुन्हां आघाडीवर

पावसाळा संपतांच पुन्हां आघाडीवर जाण्यासाठीं जोराची तयारी करण्यांत आली. जानेवारी १९४५ च्या सुरवातीस जनरल शहानवाझ यांच्या

आधिपत्याखालीं सुभाष पलटण आणि दुसरा लष्करी विभाग पोपा टेकड्यांच्या टापूंत मुख्य ठाणें देऊन बसला. दुसरी पायदळ पलटण कर्नल सेहगल यांच्या हुकमतीखालीं मार्च महिन्यांत आघाडीवर गेली आणि कर्नल धीलन नेहरू पलटणी, लक्ष्मी पथक, आणि इतर फौज घेऊन मंडालेच्या आसपास ठाणें देऊन बसले.

याच सुमारास ब्रिटिशांच्या चवदाव्या लष्करी विभागानें ब्रम्हदेशांत कूच करण्यास सुरवात केली. ब्रिटिश हिंदुस्थानचें पानिपत इंफाळच्या आघाडीवर लढविण्याची आणि लढाईचा शेवटचा निर्णय घेण्याची कडेकोट तयारी दोस्त सैन्यानें केली होती. इंफाळच्या डोंगरांत आणि चितगांवच्या पठारावर हिंदी स्वातंत्र्याची शेवटची आणि निर्णयाची टक्कर देण्याची तयारी आझाद सरकारनें हातीं घेतली होती.

ईंग्रजांच्या चवदाव्या पलटणीनें आक्रमणास सुरवात केली आणि पोपा डोंगरांच्या आघाडीवर ती पलटण चालून आली. भीषण रणसंग्राम झाला. शहानवाझ आणि त्यांची पलटण यांनीं वीरश्रीचा सामना दिला आणि चौदाव्या पलटणीची प्रगति खुंटवून टाकली. कर्नल झुलमारासिंगांनीं आपल्या आझाद पलटणीसह न भूतो न भविष्यति असा रणसंग्राम दिला. सैनिकांनीं शौर्याची कमाल केली. हजारों सैनिक रणांगणावर पडले. झुलमारासिंगांनीं एक सारखी तीन दिवस लढाई दिल्यानंतर सगळें सैन्य गिरफदार होण्याचा प्रसंग येऊन ठेपला. शत्रुसैन्य अफाट होतें. सैन्याला बचावाची फळी धरण्यासाठीं मागें येण्याचा हुकूम झाला. परंतु रणमदानें धुंद झालेल्या त्या मुसलमान आणि शीख योध्यांनीं बचावाची फळी धरण्याचें साफ नाकारलें. अखेरीस सुभाषचंद्र बोस यांच्या स्वदस्तुराचा आज्ञालेख सैन्याला दाखल केल्यावर मोठ्या परिश्रमानें सैन्याला मागील बचावाच्या फळीवर ओढण्यांत आलें. इतकें झालें तरी आपली नापसंती स्पष्ट करण्यासाठीं एक दिवस सैन्यानें अन्न घेतलें नाहीं.

मार्चच्या पहिल्या आठवड्यांत १५०० अमेरिकन विमानांनीं सतत नऊ तास पर्यंत जपानच्या राजधानीवर अग्निवर्षाव केला. जनरल मॅक्आथरनें जपानी भूमीवर हस्तपत्रकें टाकून प्रत्येक जपानी बेटावर प्रत्येकीं एक हजार विमानें आणून जपानी साम्राज्य जाळून टाकण्याची भीष्मप्रतिज्ञा केली.

आणि या प्रतिज्ञेचा परिणाम जपानचें आझाद सरकारला दिलेलें नैतिक बंधन ढिलें पडण्यांत झाला. जपानी सैन्य पुन्हा एकदां मागें पाय घेऊं लागलें. आझाद सैन्य आणि जपानी सैन्य यांच्यांत ऐक्य नाहींसे झालें आणि प्रत्येक हल्ल्याच्या वेळीं जपानी सैन्य मोर्चे उठवून मागें हटत पळत सुटलें. आणि शेवटीं इंफालची दुसरी लढाई आझाद सैन्यानें शीर हातांत घेऊन लढविली.

मिटका येथील ठाणें ५ मार्चला शत्रूच्या स्वाधीन झालें. ता. १९ ला एकोणिसाव्या ब्रिटिश पलटणीनें मंडाले शहर घेतलें आणि २१ तारखेला मियामो शहर घेतलें. ब्रम्ही स्वातंत्र्य (?) फौज ब्रिटिशांच्या स्वाधीन झाली.

मंडालेच्या बचावाच्या फळीवर क० धीलन यांच्या नेहरू पलटणीनें शत्रूच्या एकोणिसाव्या पलटणीशीं अत्यंत भीषण रणसंग्राम दिला. या पलटणीशीं क० इनायत कियानी यांच्या गांधी पलटणीनें ऐन मोक्याच्या वेळीं सहकार्य केलें. कर्नल सेहगल यांच्या हुकमती खालील दुसरा पायदळ विभाग आणखी कुमक देण्यासाठीं धावून आला. या पायदळ विभागानें आत्मयज्ञाची आणभाक घेतली होती. “खून, खून, और खून” (रक्त, रक्त, आणखी रक्त, आणखी रक्त) म्हणजे शत्रूचें जास्तींत जास्त रक्त पाडणें आणि आपले रक्त धारातीर्थी अर्पण करणें ही या सैन्याची बलिदानाची प्रतिज्ञा होती.

कित्येक दिवसांच्या रणसंग्रामानंतर आझाद फौज पुन्हा पोपा टेकड्यांच्या बचावाच्या फळीवर आली. इंग्रज सैन्याला अक्याबच्या मार्गानें आणखी सैन्याची कुमक येऊन पोंचली आणि शेवटचा रणसंग्राम इंफालच्या तळावर देण्यात आला. लढाईस सुरवात झाल्यानंतर इंग्रजांचें आणखी सैन्य आसामच्या मार्गानें सरहद्दीवर गोळा झालें.

अशा रीतीनें चारी दिशांकडून आक्रमण करण्यास इंग्रजी फौजेनें सुरवात केल्यावर आझाद सैन्याला आणि जपानी सैन्याला बचावाचें धोरण आंखावें लागलें. आझाद फौजेनें माघार घेतांना सुद्धां पावला पावला गणिक जागा लढवून सोडून दिली आणि शत्रूचे असंख्य बळी घेतले. हटत हटत सैन्य मंडालेच्या मार्गाला लागलें. जपानी सैन्यानें पळ काढण्यास सुरवात केली

आणि तें सर्वांच्या आधीं रंगूनला येऊन पडलें. मंडालेच्या टापूंत क. धीलन यांच्या नेहरू पलटणीनें बचावाची लढाई दिली. ह्या लढाईचा वृत्तांत खुद्द कर्नल धीलन यांनीं नेताजींस सादर केला. तो वाचल्यावर नेताजींनीं उद्गार काढले कीं, ही लढाई देणारे सैनिक म्हणजे हिंदी स्वातंत्र्याच्या लढ्यांत जरीपटक्याचा पहिला मान मिळविणारे दिव्य योध्दे आहेत. त्या लढाईचा वृत्तांतः—

## ले० ग्यानसिंग

"या चकमकीच्या जागेवर आडोसा नव्हता. फक्त एक लहानसें सुकें तळें होतें आणि चार मैलांवर असलेल्या १५०० फूट उंचीच्या डोंगरापलीकडे शत्रूचा प्रचंड तोफखाना उभारलेला होता. त्या तोफखान्याचा मोर्चा आमच्या रस्त्यावर लावण्यांत आला. ले० ग्यानसिंगाकडे ६०० लोकांची पोलादी पलटण होती. त्यांच्याकडे तोफा नव्हत्या. फक्त बंदुका आणि रणगाड्यांना विरोध करण्यासाठीं दोन कुलपी गोळे होते. शत्रूनें आक्रमण केलें. आणि ले० ग्यानसिगांनीं त्या आक्रमणावर तुटून पडण्याचा पोलादी पलटणीला हुकूम केला. सैन्यें समोरासमोर आलीं आणि १६ मार्चला शत्रूच्या विमानांनीं आमच्यावर तीन तास पर्यंत मशिनगन्चा मारा केला. विमानें परतलीं आणि शत्रूच्या तोफखान्यानें भडिमार करण्यास सुरवात केली. तोफखान्याच्या मागून शत्रूचे तेरा रणगाडे, अकरा अस्त्रगाड्या, दहा सशस्त्र मोटारी आणि पाच हजार संगीन-सैन्य आमच्यावर चालून येऊं लागलें. गोळ्यांचा आणि आगीचा आमच्यावर वर्षाव झाला. रणगाडे किंचाळत आमच्या अगदीं नजिक आले आणि आमच्या खंदकांतील सैन्याला चिरडण्यासाठीं त्यांनीं दिशा धरली. आमचे दोन्ही कुलपी गोळे आम्ही त्यांवर फेकले. ते फुटले नाहींत तरी सुद्धां आमच्या सुदैवानें त्या कुलपी गोळयांनीं रणगाड्यांची गति स्थगित झाली. ले० ग्यानसिंगांचा आमच्या इतर पलटणींशीं संबंध तुटून गेला आणि संदेशवाहन बंद झालें. त्यामुळें कुमक आली नाहीं. परिस्थिती ओळखून खंदकांतून चिरडले जाणारें सैन्य बाहेर काढण्यांत आलें आणि ग्यानसिगांनीं सैन्याला शत्रूवर तुटून पडण्याचा हुकूम दिला.

रणभेरी झडली. "इन्किलाब झिंदाबाद," "आझाद हिंद झिंदाबाद" "जय हिंद" आणि "चलो दिल्ली"च्या गगनभेदी आरोळ्या मारून आमच्या सैन्यानें शत्रूवर प्राणांतिक हल्ला केला. शत्रूचीं वाहनें थांबली. दोन तास तुंबळ युद्ध झालें. आमच्या पैकीं एकही सैनिक हटला नाहीं. आमचे ४०० आणि शत्रूचे शेंकडों सैनिक धारातीर्थीं पडले आणि शेवटीं शत्रुसैन्य पळत सुटलें. इतक्यांत ले. रामसिंगाची तिसरी तुकडी समरांगणावर आली. ले. ग्यानसिंग यांनीं गोळीबाराचा हुकूम दिला. तोंच शत्रूची गोळी ग्यानसिंगांच्या डोक्यांतून आरपार निघून गेली आणि ते जमिनीवर पडले ते पुन्हा उठले नाहींत. रामसिंगांनीं शत्रूची पाठ घेतली आणि ठाणें सर केलें.

ले. ग्यानसिंग आणि त्यांचे सैनिक यांनीं शौर्याची परिसीमा करून अत्यंत बलवान शत्रूला आपल्या मोजक्या सैन्यानिशीं जर्जर केलें. मी तुमच्या बरोबरच मरेन असें ते आपल्या लोकांनां नेहमीं सांगत असत. त्यांची घोर प्रतिज्ञा अमर झाली. शत्रूच्या रणगाड्यांना, आयुधांना आणि तोफांना नुसत्या लहानशा पायदळानें तोंड देऊन दिव्य पराक्रम केल्याचें हें उदाहरण आमच्या स्वतंत्र हिंदुस्थानाला आदर्श होवो"

**जी. एस. धीलन**
**कर्नल.**

९ एप्रिल १९४५

क्रमांक ८०१ पलटणीचे
मुख्याधिकारी.

## शत्रुसैन्यांत प्रचार आणि भेद

मिटकिनाच्या लढाईत दोन्ही सैन्यांचे तळ समोरासमोर पडले होते. आझाद सैन्यांत कांहीं काल अन्नाचा तुटवडा पडला आणि कंदमुळांवर व हिरव्या गवतपाल्यावर जगावें लागलें. या ठिकाणीं आझाद फौजेच्या प्रचार विभागानें मोठमोठ्या पताका उभारून शत्रूंतील हिंदी फौजेचें लक्ष वेधून घेण्यासाठीं "आम्हाला सामील व्हा आणि हिंदी स्वातंत्र्यासाठीं लढा" असे मोठे फलक हवेंत उभे केले.

त्यावर शत्रूनें आपले फलक उभारले– "तुम्ही जपानचे नोकर आहांत. तुमच्याकडे अन्नाचा तुटवडा आहे. आमच्याकडे या आणि पोटभर पोळ्या खा."

लगेच आझाद फौजेनें प्रत्युत्तराचे फलक उभारले:—

" आम्ही जपानचे नोकर नाहीं.
आम्ही आझाद सैनिक आहों.
सुभाष बोस आमचे एकमेव नेते आहेत.
तुम्ही गुलामगिरींतल्या तुपाच्या पोळया खा.
आम्ही स्वातंत्र्याचें गवत खाऊं. "

आणि आझाद सैनिकांनीं " इन्किलाब झिंदाबाद " च्या आरोळ्या मारून वाद्यांच्या तालावर तिरंगी झेंड्याचें लष्करी गाणें सुरू केलें: —

सर पर तिरंगा झंडा जलवा दिखा रहा है।
कौमी तिरंगे झंडे ऊंचे रहो जहां में॥
हो तेरी सर बुलंदी ज्यों चांद आसमां है।
तू मान है हमारा तू शान है हमारी।
तू जीत का निशाँ हो तू जीत है हमारी।
हरएक बसर की लाव पै जारी है ये दुआयें।
कौमी तिरंगा झंडा हम शौक से उडायें।
आकाश ओ जमींपर हो तेरा बोलबाला।
झुक जाये तेरे आगे हर ताज मख्त वाला।
हर कौम की नजर में तू अमन का निशा हो।
हो ऐसे मुअस्सर की सारा तेरा जहां हो।
मुस्ताक वो नवाबी खुश हो के गा रहा है।
सरपर तिरंगा झंडा जलवा दिखा रहा है।
कौमी तिरंगा झंडा ऊंचा रहे जहां में॥

याच्या उत्तरीं शत्रूकडील हिंदी सैनिकांकडून संमतीदर्शक आरोळ्या आल्या. प्रचारानें लढाई यशस्वी केली. लगेच शत्रूनें हिंदी पलटण मागें घेऊन गोरी पलटण त्या जागीं आणून उभी केली.

× × ×

मिटकिनाच्या पाडावानंतर जपानी सैन्यानें शत्रूच्या चौदाव्या पलटणीला प्रतिकार करण्याचें सोडून दिलें. ब्रह्मदेशाची ब्रह्मी स्वतंत्र फौज शत्रूला सामिल झाली. मित्रसैन्याचें सहकार्य संपुष्टांत आलें. जनरल स्लीमनें दऱ्या खोऱ्यांतून आझाद सैन्याचा पाठपुरावा केला. आतां टिकाव धरणें अशक्य होतें. चारी बाजूंनीं शत्रूचा घेरा पडला आणि सगळ्या तुकड्या मियामोच्या वाटेवर चिमटींत सांपडल्या. आघाडीवर अधिकाऱ्यांच्या सभा झाल्या. शरणचिठी देण्यास आझाद सैन्य नाकबूल होतें. युद्धकैदी म्हणून आम्ही तुमच्या ताब्यांत येऊं असा जबाब जनरल शहानवाझ यानीं शत्रूस पाठविला. तो मान्य होतांच ज० शहानवाझ, क० धीलन व क० सहगल सैन्यानिशीं शत्रूच्या स्वाधीन झाले.

आझाद सरकारच्या स्थापनेचा आणि घटनेचा सुरवातीचा वृत्तांत मागें येऊन गेलाच आहे. त्यानंतर दोस्त-राष्ट्रांविरुद्ध लढाईचा पुकार होऊन आझाद सरकारच्या राजकीय कामगिरीस सुरवात झाली. हिंदीस्वातंत्र्यसंघाच्या मलायामध्यें ७० शाखा उघडण्यांत आल्या व त्यांत २३०००० सभासद नोंदण्यांत आले. ब्रह्मदेशांत १०० व थायलँडमध्यें २४ शाखा उघडून त्या कार्यप्रणव करण्यांत आल्या. थायलँडमधील जनतेला वैद्यकीय आणि आर्थिक मदत देण्याचें काम सुरू झालें. मलायामध्यें दुर्भिक्ष फार वाढलें होतें आणि कामगारजनतेची स्थिति अत्यंत हलाखीची झाली होती. त्यांना अन्नपाणी, वैद्यकीय मदत आणि कपडालत्ता पुरविण्यांत आला. खुद्द कौलालम्पूरमध्यें दररोज १००० माणसें या मदतीवर पोसलीं जात होतीं. ब्रह्मदेशांत कित्येक ठिकाणीं फुकट वैद्यकीय मदत देण्यासाठीं दवाखाने उघण्यांत आले आणि थायलँडमध्यें एक मोठें रुग्णालय सुरू करण्यांत आलें. मलायामध्यें दोन हजार एकर जंगली जमीन जंगल तोडून शेतीच्या कामाला घेण्यांत आली आणि तेथें नमुनेदार वसाहती स्थापन करण्यांत आल्या. हा सर्व खर्च आझाद सरकारच्या निरनिराळया खात्यांमार्फत करण्यांत आला.

मलाया, ब्रह्मदेश आणि थायलँडमध्यें नवीन पद्धतीवर शाळा उघडून राष्ट्रीय शिक्षण देण्यांत आलें. सुरवातीपासून प्रवेश परीक्षेपर्यंत नऊ वर्षांचा कार्यक्रम ठरविण्यांत आला. त्यांत हिंदुस्थानी भाषा, हिंदी राष्ट्रीय इतिहास, हिंदी राष्ट्रीय पुढाऱ्यांचीं चरित्रें व लोकमान्य टिळक, देशबंधू दास, महात्मा गांधी आणि पितापुत्र नेहरू यांचे जीवनवृत्तांत्त, हिंदी भूगोल, गणित आणि प्राथमिक लष्करी शिक्षण हे विषय सक्तीचे व संगीत, निसर्गोपचार, हस्तव्यवसाय, शेतकी शिक्षण, नैतिक शिक्षण, व्यायाम आणि खेळ, धंदे शिक्षण इत्यादि ऐच्छिक विषय ठेवण्यांत आले. सहशिक्षण, सक्तीचें शिक्षण आणि प्रौढशिक्षण कायद्यानें प्रस्थापित करण्यांत आलें. ठिकठिकाणीं प्रौढ शिक्षणाच्या शाळा उघडण्यांत आल्या.

राष्ट्राचें एकच निशाण म्हणजे **तिरंगी झेंडा** आणि एकच अभिवादन व लष्करी सलामी म्हणजे "**जय हिंद**" असें ठरविण्यांत आलें. जातीय ऐक्य कायद्यानें जारी करण्यांत आलें. ज्यानें त्यानें आपापल्या धर्माप्रमाणें वागावें. परंतु जातिभेद नष्ट करण्यांत आले. सैन्याचे विभाग जातीप्रमाणें न पाडतां कामाप्रमाणें पाडण्यांत आले. सर्वांची संयुक्त भोजनपंगत, शाकाहारी सैन्यानें शाकाहार घ्यावा आणि मिश्र आहार घेणाऱ्यांनीं त्याच पंगतींत आपला आहार घ्यावा. जनरलपासून शेवटच्या शिपायापर्यंत सैन्यांत सारखें अन्न. भेदाभेद किंवा उच्चनीच प्रकार नाहींत. सर्वांसाठीं एका धर्तीचें स्वयंपाक-खानें. खुद्द नेताजी बोस यांचा स्वयंपाकसुद्धां निराळा नव्हता.

प्रसिद्धी आणि प्रचार खात्यावर काम फार असे. एकंदर ४ नभोवाणी केंद्रें **कौलालम्पूर, सिंगापूर, रंगून** आणि **बँकॉक** या ठिकाणीं उघडण्यांत आलीं. त्यांवरून मुख्यतः हिंदुस्थानीं आणि इंग्रजी भाषेंतून प्रचार कार्य आणि शिक्षण देण्यांत आलें. "**पूर्ण स्वराज्य**" नांवाचें दैनिक आणि "**जय हिंद**" साप्ताहिक सुरू करून त्यांत राज्यकारभाराच्या, लढाईच्या व सामाजिक सुधारणांच्या बातम्या. सरकारी कायदे, हुकूम, प्रसृत करण्यांत आले. अर्ध्या आण्यापासून दोन रुपयांपर्यंतचीं पोष्टाचीं व सरकारी कामाचीं तिकिटें तयार करण्यांत आलीं. सरकारी नाणीं पाडण्यांत आलीं, परंतु तितक्यांत लढाई संपल्यामुळें तीं उपयोगांत आणतां आलीं नाहींत.

**आझाद हिंद दळ** नांवाचें पोलिस खातें आणि बालसेनाविभाग स्थापन करण्यांत आले. यांचा लष्करांत समावेश न करतां आझाद सरकारच्या हातांतील मुलखाची व्यवस्था, कायदा आणि शांतता प्रस्थापित करण्याची कामगिरी त्यांच्यावर सोपविण्यांत आली.

३० डिसेंबर रोजीं अंदमान आणि निकोबार बेटें आझाद सरकारनें आपल्या ताब्यांत घेतलीं. त्या प्रसंगीं झालेल्या समारंभाच्या वेळीं नेताजी बोस, जनरल भोसले आणि कर्नल लोकनाथन् हे हजर होते. पोर्ट ब्लेअर या राजधानीच्या ठाण्यावर राष्ट्रीय तिरंगी झेंडा नेताजींनीं स्वतःच्या हातानें उभारला आणि तुरुंगाची तपासणी होऊन राजकीय कैद्यांना मुक्त करण्यांत आलें. अंदमान आणि निकोबार यांना अनुक्रमें **शहीद** आणि **स्वराज्य** अशीं नांवें देण्यांत आलीं. क. लोकनाथन् यांना मुख्याधिकारी नेमून दोन्हीं

बेटांची राज्यव्यवस्था त्यांच्या हातीं देण्यांत आली. या दोन्ही बेटांवर हिंदी लोकांसाठीं शिक्षणाच्या राष्ट्रीय शाळा उघडण्यांत आल्या.

पहिल्या लढाईंत १९४४ सालीं मिळविलेला हिंदुस्थान व ब्रह्मदेश यांच्या सरहद्दीवरील १५०० चौरस मैलांचा मुलूख जपानशीं केलेल्या कराराप्रमाणें आझाद हिंद सरकारनें आपल्या ताब्यांत घेतला व कर्नल चतरजी यांना त्या प्रांताचे गव्हर्नर नेमण्यांत आलें. त्यांच्या मदतीला आझाद हिंद दलांतील अधिकारी मदतनीस म्हणून देण्यांत आले. या राजव्यवस्थेमार्फत जमिनीचे खटले व भांडणें यांचा निकाल देणें, वैद्यकीय मदत देणें, कायदा आणि सुव्यवस्था प्रस्थापित करणें व शिक्षण देणें हीं कामें चालू करण्यांत आलीं. या शिवाय ब्रह्मदेशांतील झियावादी नांवाची जहागीर तेथील जहागिरदार हिंदुस्थानांत पळून गेल्यामुळें अनियंत्रित स्वरूपांत पडून होती. ती जहागीर आझाद राज्याला जोडण्यांत येऊन त्यांत तागाच्या, कापडाच्या व तांदळाच्या गिरण्या चालू करण्यांत आल्या.

आझाद हिंद बँकेच्या शाखा स्थापन करण्यांत आल्या व तिच्या कार्याचा व्याप वाढविण्यांत आला. सरकारी महसूल, देणग्या आणि वर्गण्या मिळून **वीस कोटी** रुपये बँकेच्या स्वाधीन करण्यांत आले आणि सरकारी खर्चाला लागेल तसतसा पैसा काढण्याचें काम अर्थमंत्र्यांवर आणि लष्करी खर्चाची जबाबदारी जनरल भोंसले यांच्यावर सोंपविण्यांत आली.

सैन्यांतील अधिकाऱ्यांना उच्च शिक्षण देण्यासाठीं रंगून आणि सिंगापूर येथें लष्करी विद्यालयें उघडण्यांत आलीं. त्यांतून १५०० अधिकारी संपूर्ण शिक्षण घेऊन बाहेर आले. त्याशिवाय चाळीस तरुण विद्यार्थ्यांना तंत्रयुद्धाचें शिक्षण देण्यासाठीं आणि पंचवीस अधिकाऱ्यांना पाणबुडीचें काम शिकविण्यासाठीं टोकियो येथील लष्करी महाविद्यालयांत पाठविण्यांत आलें. या चाळीस विद्यार्थ्यांना बोस-मुलगे म्हणून संबोधण्यांत येत असे व त्यांच्या भावी कामगिरीबद्दल बोस यांना फार आकांक्षा होती. शेवटीं जपानच्या पाडावानंतर ही सबंध तुकडी ब्रिटिशांच्या हातीं लागली. पाणबुडीचें शिक्षण घेणारे सैनिक पाणबुडीनें हिंदुस्थानांत आल्यावर त्यांना पकडण्यांत आलें.

जपानशीं केलेल्या कराराप्रमाणें त्यांच्याकडून मिळालेल्या हरएक वस्तूचा दाम वेळोवेळीं रोख मोजण्यांत आला.

आझाद सैन्याच्या पाडावानंतर सरकारच्या मंत्रि-मंडळाची सभा झाली. आझाद सरकारची मुख्य कचेरी रंगूनहून बँकॉकला हालविण्याचा आणि नेताजी बोस यांना रंगूनहून अज्ञात ठिकाणीं पाठविण्याचा असे दोन निर्णय घेण्यांत आले. त्याप्रमाणें कर्नल लोकनाथन यांच्या हुकमतीखालीं रंगून शहराच्या व्यवस्थेसाठीं ६००० सैन्याच्या तुकड्या मार्गे ठेऊन आपल्या सरंजामानिशीं ता० २४ एप्रिल १९४५ रोजीं नेताजी बोस आपल्या प्रधान मंडळासह बाकीचें सर्व सैन्य घेऊन बँकॉकला जाण्यासाठीं निघाले.

वाटेंत अक्याबच्या मार्गानें शत्रुसैन्य येऊन आझाद सैन्याच्या पाठीस लागलें. मौलमीनला ब्रिटिश सैन्यानें अटकाव केला आणि पुन्हा एकदां लढाईस तोंड लागलें. शेवटीं मौलमीनला राणी लक्ष्मी फौजेनें पिछाडीची फळी उभारून शत्रुसैन्याचें आक्रमण अडवून धरलें आणि बाकीच्या फौजेनें लढाई दिली. या ठिकाणीं बोस यांच्या खास हुकमतींतील दोन हजार "जानबाझ" सैन्यानें निकराची लढाई देऊन बोस, त्यांचें मंत्रिमंडळ आणि बोस यांचे तीनशें शरीररक्षक यांस वाट काढून दिली. या ठिकाणीं आझाद सैन्यास आणखी कुमक येऊन पोंचली. परंतु शत्रूच्या अफाट रणसामुग्रीपुढें त्याचा व्हावा तसा उपयोग न होऊन राणी लक्ष्मी फौज व आझाद फौजेच्या आणखी कांहीं पलटणी शत्रूच्या हातांत सांपडल्या. त्या सैन्याला नंतर रंगूनला मार्गे आणण्यांत आलें. मौलमीनपुढील बँकॉकपर्यंतचा मार्ग मोठ्या संकटांतूनच काढावा लागला. ही तुकडी दोन आठवड्यांनंतर बँकॉकला पोंचली व सुभाषचंद्र बोस बँकॉकची लष्करी व्यवस्था जनरल भोसले यांचेवर सोंपवून सिंगापूरला गेले.

आपल्या बरोबरच्या ६००० सैन्यानिशीं रंगून शहरांत कायदा आणि सुव्यवस्था ठेवण्याची कामगिरी क. लोकनाथन आणि रंगूनमधील स्वातंत्र्यसंघाचे मुख्य श्री बहादुरी यांनीं चोख बजावली. रंगूनमधील हिंदी लोकांच्या मालमत्तेचें संरक्षण या सैन्यानें चांगलें केलें. लुटालूट, चोरी, खून अगर दरोडा या गुन्हेगारीचें एकही उदाहरण घडलें नाहीं. जपानी लोक याच्या अगोदर रंगून खालीं करून गेले होते. इंग्रजांची फौज ता. ४ मे १९४५ रोजीं रंगूनच्या बंदरांत आली आणि क० लोकनाथन आपल्या

सैन्यासह युद्धकैदी म्हणून इंग्रजांच्या स्वाधीन झाले. आझाद बँकेला १९ मेला सील ठोकण्यांत आलें आणि २८ मेला श्री बहादुरी आणि हिंदी स्वातंत्र्य संघाचे कार्यकर्ते यांना अटक झाली. ४ मेला इंग्रजांच्या स्वाधीन झालेल्या सैन्याची वर्गवारी होऊन ता. १३ मेला त्यांना हिंदुस्थानांत आणण्यांत आलें आणि ठिकठिकाणीं बंदिस्त करण्यांत आलें. या पैकीं मोठे अधिकारी आणि त्यांच्या हाताखालील महत्त्वाच्या तुकड्या दिल्लीच्या लाल किल्ल्यांत अटकेंत ठेवण्यांत आल्या.

× × ×

ता. ९ ऑगष्ट १९४५ रोजीं जपानी साम्राज्य दोस्त राष्ट्रांना शरण आलें. त्या दिवशीं बोस सिंगापूरला होते.

ता. १५ ऑगष्ट रोजीं बोसनीं सिंगापूरमधून हिंदी लोकांना उद्देशून नभोवाणी संदेश दिला. या पुढील हिंदी स्वातंत्र्याच्या चळवळी निराळ्या मार्गानें आंखावयाचें आपण ठरविलें असल्याचें त्यांनीं सांगितलें. परंतु त्यांच्या या शेवटच्या जाहिर संदेशाचा गूढार्थ कोणाच्या ध्यानीं आला नसावा.

जपानच्या शरणागतीची बातमी बोस यांच्या तीनिशें शरीर रक्षकांना बँकॉकला कळली त्यावेळीं ते चवताळून ओरडले " जपान शरण आला. आम्ही नाहीं" — ता. १७ ऑगष्टला संध्याकाळीं ४ वाजतां बोस विमानानें बँकॉकला आले त्यांनीं सैन्याची पाहाणी केली. त्यावेळीं फौज मोठ्या हुरुपांत होती. आपला निर्णय ते फौजेला सांगणार होते परंतु त्याबद्दल ते कांहींच बोलूं शकले नाहींत. सैन्यात कुजबूज सुरू झाली. लोकांनीं त्याना सरळ प्रश्न विचारला "तुम्ही शरण जाणार आहां काय?" बोस बुचकळ्यांत पडले. उत्तर त्यांच्या तोंडावर होतें परंतु तें सांगण्याची ती वेळ नव्हती. ते नुसतेंच म्हणाले, "कोण मीं? नाहीं."

दुसऱ्या दिवशीं, ता. १८ ऑगस्टला कर्नल हबिबुर रहमान आणि कांहीं जपानी गृहस्थ बरोबर घेऊन नेताजी बोस 'जपानशीं महत्त्वाच्या प्रश्नावर बोलणें करण्यासाठीं,' टोकियोला जाण्यास विमानानें निघाले. आठ तासांच्या प्रवासानंतर फोर्मोसा बेटावरील टाइहोकू विमान तळावर ते उतरले.

ता. १९ ला सकाळीं टाइहोकू तळावरून विमान निघालें. तें वर जातें न जातें तोंच विमानाचा पंखा नादुरुस्त झाला आणि गळून पडला. विमान नादुरुस्त झालें. तें खालीं येत असतांना त्यानें पेट घेतला आणि जमिनीवर आपटलें. बोस यांच्या अंगावरील सुती कपड्यांनीं पेट घेतला. पंधरा मिनिटांच्या अवधींत त्यांना जळक्या कपड्यांनिशीं बाहेर काढण्यांत आलें. प्रथमोपचार करून एका तासांत त्यांना रुग्णालयांत नेण्यांत आलें. औषधोपचारांचा उपयोग झाला नाहीं. शेवटीं दुपारीं दोनच्या सुमारास मुखावाटें "**जय हिंद जय हिंद**" असे शब्द काढून त्यांनीं शांतपणें प्राण सोडला. त्यावेळीं जखमी स्थितींत कर्नल हबिबुर रहमान त्यांच्या शेजारीं होते. त्यांच्या खेरीज विमानांतील इतर मंडळी जागच्या जागीं ठार झाली. दहा दिवसां-नंतर टोकियो नभोवाणीवरून नेताजींच्या अपघाताची बातमी संदेशित करण्यांत आली. रहमान यांनीं आपल्या सोबत नेताजींचें धड्याळ घेतलें होतें. त्यांना अटक होऊन दिल्लीस ठेवण्यांत आल्यावर पं. जवाहरलाल नेहरू यांच्या हातीं त्यांनीं तें घड्याळ दिलें. नेताजींचे बंधू शरच्चंद्र बोस यांच्या मुक्ततेनंतर त्यांची व नेहरूंची पहिली भेट अलाहाबादेस झाली. दोघांच्या डोळ्यांतून अश्रूंचें पूर निघाले. दोघांनीं एकमेकांस कडकडून आलिंगन दिलें आणि नेताजींचें घड्याळ नेहरूंना शरच्चंद्रांच्या हातीं दिलें.

बहुतेक पुढाऱ्यांची अपेक्षा नेताजी जिवंत असावेत आणि योग्यवेळीं ते आपल्या मातृभूमींत परत येतील अशी आहे. ते जिवंत असोत वा नसोत. हिंदीस्वातंत्र्याच्या इतिहासांत ते अजरामर झाले आहेत. शरच्चंद्रांना विचारल्यावेळीं तें भरल्या अंतःकरणानें येवढेंच बोलतात–"नेताजींची माहिती तुमच्याहून जास्त मला नाहीं."

सुभाष--जयंतीच्या दिवशी महात्मा गांधी यांनीं असे उद्गार काढले कीं सुभाषचंद्र बोस एखाद्या अज्ञात स्थळीं जिवंत असावेत असें मला वाटतें. त्यांच्या कामगिरीबद्दल गांधीजी म्हणाले, "सुभाषबाबूंचे आणि माझे संबंध अत्यंत निर्मळ होते. त्यांच्या कर्तबगारीची आणि त्यागाची मला जाणीव होती परंतु त्यांचें शौर्य, त्यांची कार्यशक्ति, त्यांचे नेतृत्व यांची पुरी जाणीव ते हिंदुस्थानांतून बाहेर गेल्यानंतरच मला झाली हें मी कबूल करतों.

मात्र त्यांनीं अवलंबिलेले मार्ग मला पसंत नाहींत. त्यांच्या "जय हिंद" नें सशस्त्र क्रांतीची कल्पना होत असली तरी "जय हिंद" मुळें "वंदे मातरम्" ला लोकांनीं दुय्यम स्थान देऊं नये असें माझें मत आहे."

× × ×

सप्टेंबर १९४५ च्या सुरवातीस इंग्रजांनीं बँकॉकच्या आझाद लष्कराला वेढा दिला. आझाद सैन्यानें शत्रूच्या स्वाधीन व्हावें असा लेखी हुकूम बोस यानीं जनरल भोसले यांच्याकडे ठेऊन दिला होता. तो हुकूम त्यांनीं सैन्याला दाखविला. त्याबरोबर सगळ्या सैनिकांत क्षोभ निर्माण झाला. त्यांनीं शरण येण्याचें साफ नाकारलें. चौलपुरी ठाण्यावरच्या "जान बाझ" तुकडीनें कोणाचाही कसलाहीं हुकूम मानण्याचें अमान्य केले. "शरणागतीची मागणी करणारा कोणीही अधिकारी समोर आला तर त्याला आम्ही ठार करूं. आम्ही नेताजींचे खास "जानबाझ" सैनिक आहोंत. आम्ही त्यांच्यासाठीं प्राणाची आहुती देण्याची शपथ घेतली आहे." असा त्यांनीं रोकठोक सवाल दिला. शेवटीं जानबाझ सैनिकांचे अधिकारी कर्नल ठाकूरसिंग यांच्या चौलपुरी येथील निवासस्थानीं जनरल भोंसले, क० राठोरी आणि ले० रामसिंग हे गेले आणि चौलपुरी ठाण्यावरील अधिकाऱ्यांशी त्यांनी सल्लामसलत केली. जरूर नसतां आणि नेताजींनीं शत्रूच्या स्वाधीन होण्याचा लेखी हुकूम सैन्याला दिला असतां इंग्रजी सैन्याविरुद्ध लढाई देणें योग्य नाहीं असें ठरवून जानबाझ सैनिकांची मोठ्या मिनतवारीनें समजूत घालण्यांत आली. शेवटीं कोणींही इंग्रज अधिकाऱ्याने चौलपुरी ठाण्यावर जाऊं नये अशा अटीवर शत्रूच्या स्वाधीन व्हावें असें ठरलें. कर्नल शिवदाससिंग या इंग्रजांच्या हिंदी अधिकाऱ्यानें ही अट मान्य केली आणि नंतर चौलपुरी ठाण्यावरील सैनिक शत्रूच्या स्वाधीन झाले. या सैनिकांना नंतर दिल्लीस आणण्यांत आलें. बोस यांच्या शरीररक्षकांपैकीं कित्येक कडवे सैनिक बेपत्ता झाले ते शेवटपर्यंत सांपडले नाहींत.

× × ×

ब्रह्मदेशावरील जपानी आक्रमणानंतर डॉ० बा.मा हे ब्रह्मदेशांत आले. आझाद सरकारच्या चळवळींत नेताजी बोस यांना डॉ० बा. मा यांनीं बरीच मदत केली. त्यांच्या सहकार्यामुळेंच बोसना आपल्या कार्यांत प्रगति करितां आली. परंतु जपानकडून बोसना मिळालेलें स्वातंत्र्य डॉ० बा. मा यांना मिळूं शकलें नाहीं. त्यांचे आणि जपानचे परस्पर संबंध बिघडत गेले. एप्रिल १९४५ मध्यें डॉ० बा. मा रंगूनमधून बँकॉकला व तेथून सिंगापूरला गेले. सिंगापूरहून गुप्तपणें विमानांतून त्यांना होकायदो बेटावर आणून जपा-न्यांनीं ठेविलें. दोस्त सैन्यानें आक्रमण केलें तेव्हां डॉ० बा. मा मृत्यू पावले असावे असा सर्वांचा समज होता. याच वेळेस सुभाषबाबू सिंगापूरहून बँकॉकला आणि बँकॉकहून टोकियोला (?) जाण्यासाठीं निघाले होते.

ता. १७ जानेवारी १९४६ ला सकाळींच फाटके तुटके कपडे घातलेला एक गृहस्थ जनरल मॅकआर्थरच्या टोकियो येथील मुख्य ठाण्यावर आला.आपल्याला ब्रिटिशांच्या स्वाधीन व्हावयाचें आहे असें त्यानें सांगितलें. त्याच्या "अवतारा" कडे पाहून त्याच्याकडे पहिल्यानें कोणी लक्ष दिलें नाही. त्या ठाण्याकडे श्री अमर लाहिरी नावाचे एक हिंदी बातमीदार कामासाठीं गेले होते. त्यांनीं सहज कुतूहलानें त्या गृहस्थाला विचारिलें " आपल्याला कोण पाहिजे ? "

" जनरल मॅक्आर्थर. "

" आपलें नांव ! "

" डॉ० बा. मा. आझाद ब्रह्मदेशाचा नेता. "

सैन्यासह युद्धकैदी म्हणून इंग्रजांच्या स्वाधीन झाले. आझाद बँकेला १९ मेला सील ठोकण्यांत आलें आणि २८ मेला श्री बहादुरी आणि हिंदी स्वातंत्र्य संघाचे कार्यकर्ते यांना अटक झाली. ४ मेला इंग्रजांच्या स्वाधीन झालेल्या सैन्याची वर्गवारी होऊन ता. १३ मेला त्यांना हिंदुस्थानांत आणण्यांत आलें आणि ठिकठिकाणीं बंदिस्त करण्यांत आलें. या पैकीं मोठे अधिकारी आणि त्यांच्या हाताखालील महत्त्वाच्या तुकड्या दिल्लीच्या लाल किल्ल्यांत अटकेंत ठेवण्यांत आल्या.

× × ×

ता. ९ ऑगष्ट १९४५ रोजीं जपानी साम्राज्य दोस्त राष्ट्रांना शरण आलें. त्या दिवशीं बोस सिंगापूरला होते.

ता. १५ ऑगष्ट रोजीं बोसनीं सिंगापूरमधून हिंदी लोकांना उद्देशून नभोवाणी संदेश दिला. या पुढील हिंदी स्वातंत्र्याच्या चळवळी निराळ्या मार्गानें आंखावयाचें आपण ठरविलें असल्याचें त्यांनीं सांगितलें. परंतु त्यांच्या या शेवटच्या जाहीर संदेशाचा गूढार्थ कोणाच्या ध्यानीं आला नसावा.

जपानच्या शरणागतीची बातमी बोस यांच्या तीनिशें शरीर रक्षकांना बँकॉकला कळली त्यावेळीं ते चवताळून ओरडले " जपान शरण आला. आम्ही नाहीं". ता. १७ ऑगष्टला संध्याकाळीं ४ वाजतां बोस विमानानें बँकॉकला आले त्यांनीं सैन्याची पाहाणी केली. त्यावेळीं फौज मोठ्या हुरुपांत होती. आपला निर्णय ते फौजेला सांगणार होते परंतु त्याबद्दल ते कांहींच बोलूं शकले नाहींत. सैन्यात कुजबूज सुरू झाली. लोकांनीं त्याना सरळ प्रश्न विचारला "तुम्ही शरण जाणार आहां काय?" बोस बुचकळ्यांत पडले. उत्तर त्यांच्या तोंडावर होतें परंतु तें सांगण्याची ती वेळ नव्हती. ते नुसतेंच म्हणाले, "कोण मी? नाहीं."

दुसऱ्या दिवशीं, ता. १८ ऑगस्टला कर्नल हबिबुर रहमान आणि कांहीं जपानी गृहस्थ बरोबर घेऊन नेताजी बोस 'जपानशीं महत्त्वाच्या प्रश्नावर बोलणें करण्यासाठीं,' टोकियोला जाण्यास विमानानें निघाले. आठ तासांच्या प्रवासानंतर फोर्मोसा बेटावरील टाइहोकू विमान तळावर ते उतरले.

ता. १९ ला सकाळीं टाइहोकू तळावरून विमान निघालें. तें वर जातें न जातें तोंच विमानाचा पंखा नादुरुस्त झाला आणि गळून पडला. विमान नादुरुस्त झालें. तें खालीं येत असतांना त्यानें पेट घेतला आणि जमिनीवर आपटलें. बोस यांच्या अंगावरील सुती कपड्यांनीं पेट घेतला. पंधरा मिनिटांच्या अवधींत त्यांना जळक्या कपड्यांनिशीं बाहेर काढण्यांत आलें. प्रथमोपचार करून एका तासांत त्यांना रुग्णालयांत नेण्यांत आलें. औषधोपचारांचा उपयोग झाला नाहीं. शेवटीं दुपारीं दोनच्या सुमारास मुखावाटें "**जय हिंद जय हिंद**" असे शब्द काढून त्यांनीं शांतपणें प्राण सोडला. त्यावेळीं जखमी स्थितींत कर्नल हबिबुर रहमान त्यांच्या शेजारीं होते. त्यांच्या खेरीज विमानांतील इतर मंडळी जागच्या जागीं ठार झाली. दहा दिवसां-नंतर टोकियो नभोवाणीवरून नेताजींच्या अपघाताची बातमी संदेशित करण्यांत आली. रहमान यांनीं आपल्या सोबत नेताजींचें घड्याळ घेतलें होतें. त्यांना अटक होऊन दिल्लीस ठेवण्यांत आल्यावर पं. जवाहरलाल नेहरू यांच्या हातीं त्यांनीं तें घड्याळ दिलें. नेताजींचे बंधु शरच्चंद्र बोस यांच्या मुक्ततेनंतर त्यांची व नेहरूंची पहिली भेट अलाहाबादेस झाली. दोघांच्या डोळ्यांतून अश्रूंचें पूर निघाले. दोघांनीं एकमेकांस कडकडून आलिंगन दिलें आणि नेताजींचें घड्याळ नेहरूंनीं शरच्चंद्रांच्या हातीं दिलें.

बहुतेक पुढाऱ्यांची अपेक्षा नेताजी जिवंत असावेत आणि योग्यवेळीं ते आपल्या मातृभूमींत परत येतील अशी आहे. ते जिवंत असोत वा नसोत. हिंदीस्वातंत्र्याच्या इतिहासांत ते अजरामर झाले आहेत. शरच्चंद्रांना विचारल्यावेळीं तें भरल्या अंतःकरणानें येवढेंच बोलतात—"नेताजींची माहिती तुमच्याहून जास्त मला नाहीं."

सुभाष-जयंतीच्या दिवशीं महात्मा गांधी यांनीं असे उद्गार काढले कीं सुभाषचंद्र बोस एखाद्या अज्ञात स्थळीं जिवंत असावेत असें मला वाटतें. त्यांच्या कामगिरीबद्दल गांधीजी म्हणाले, "सुभाषबाबूंचे आणि माझे संबंध अत्यंत निर्मळ होते. त्यांच्या कर्तबगारीची आणि त्यागाची मला जाणिव होती परंतु त्यांचें शौर्य, त्यांची कार्यशक्ति, त्यांचें नेतृत्व यांची पुरी जाणीव ते हिंदुस्थानांतून बाहेर गेल्यानंतरच मला झाली हें मी कबूल करतों.

मात्र त्यांनीं अवलंबिलेले मार्ग मला पसंत नाहींत. त्यांच्या "जय हिंद" नें सशस्त्र क्रांतीची कल्पना होत असली तरी "जय हिंद" मुळें "वंदे मातरम्" ला लोकांनीं दुय्यम स्थान देऊं नये असें माझें मत आहे."

× × ×

सेप्टेंबर १९४५ च्या सुरवातीस इंग्रजांनीं बँकॉकच्या आझाद लष्कराला वेढा दिला. आझाद सैन्यानें शत्रूच्या स्वाधीन व्हावें असा लेखी हुकूम बोस यानीं जनरल भोसले यांच्याकडे ठेऊन दिला होता. तो हुकूम त्यांनीं सैन्याला दाखविला. त्याबरोबर सगळ्या सैनिकांत क्षोभ निर्माण झाला. त्यांनीं शरण येण्याचें साफ नाकारलें. चौलपुरी ठाण्यावरच्या "जान बाझ" तुकडीनें कोणाचाही कसलाही हुकूम मानण्याचें अमान्य केलें. "शरणागतीची मागणी करणारा कोणीही अधिकारी समोर आला तर त्याला आम्ही ठार करूं. आम्ही नेताजींचे खास "जानबाझ" सैनिक आहोंत. आम्ही त्यांच्यासाठीं प्राणाची आहुती देण्याची शपथ घेतली आहे." असा त्यांनीं रोकठोक सवाल दिला. शेवटीं जानबाझ सैनिकाचें अधिकारी कर्नल ठाकूरसिंग यांच्या चौलपुरी येथील निवासस्थानीं जनरल भोंसले, क० राठोरी आणि ले० रामसिंग हे गेले आणि चौलपुरी ठाण्यावरील अधिकाऱ्यांशी त्यांनी सल्लामसलत केली. जरूर नसतां आणि नेताजींनीं शत्रूच्या स्वाधीन होण्याचा लेखी हुकूम सैन्याला दिला असतां इंग्रजी सैन्याविरुद्ध लढाई देणें योग्य नाहीं असें ठरवून जानबाझ सैनिकांची मोठ्या मिनतवारीनें समजूत घालण्यांत आली. शेवटीं कोणीही इंग्रज अधिकाऱ्यानें चौलपुरी ठाण्यावर जाऊं नये अशा अटीवर शत्रूच्या स्वाधीन व्हावें असें ठरलें. कर्नल शिवदाससिंग या इंग्रजांच्या हिंदी अधिकाऱ्यानें ही अट मान्य केली आणि नंतर चौलपुरी ठाण्यावरील सैनिक शत्रूच्या स्वाधीन झाले. या सैनिकांना नंतर दिल्लीस आणण्यांत आलें. बोस यांच्या शरीररक्षकांपैकीं कित्येक कडवे सैनिक बेपत्ता झाले ते शेवटपर्यंत सांपडले नाहींत.

× × ×

ब्रह्मदेशावरील जपानी आक्रमणानंतर डॉ० बा.मा हे ब्रह्मदेशांत आले. आझाद सरकारच्या चळवळींत नेताजी बोस यांना डॉ० बा. मा यांनीं बरीच मदत केली. त्यांच्या सहकार्यामुळेंच बोसना आपल्या कार्यांत प्रगति करितां आली. परंतु जपानकडून बोसना मिळालेलें स्वातंत्र्य डॉ० बा. मा यांना मिळूं शकलें नाहीं. त्यांचे आणि जपानचे परस्पर संबंध बिघडत गेले. एप्रिल १९४५ मध्यें डॉ० बा. मा रंगूनमधून बँकॉकला व तेथून सिंगापूरला गेले. सिंगापूरहून गुप्तपणें विमानांतून त्यांना होकायदो बेटावर आणून जपान्यांनीं ठेविलें. दोस्त सैन्यानें आक्रमण केलें तेव्हां डॉ० बा. मा मृत्यू पावले असावे असा सर्वांचा समज होता. याच वेळेस सुभाषबाबू सिंगापूरहून बँकॉकला आणि बँकॉकहून टोकियोला (?) जाण्यासाठीं निघाले होते.

ता. १७ जानेवारी १९४६ ला सकाळींच फाटके तुटके कपडे घातलेला एक गृहस्थ जनरल मॅकआर्थरच्या टोकियो येथील मुख्य ठाण्यावर आला.आपल्याला ब्रिटिशांच्या स्वाधीन व्हावयाचें आहे असें त्यानें सांगितलें. त्याच्या "अवतारा" कडे पाहून त्याच्याकडे पहिल्यानें कोणी लक्ष दिलें नाही. त्या ठाण्याकडे श्री अमर लाहिरी नावाचे एक हिंदी बातमीदार कामासाठीं गेले होते. त्यांनीं सहज कुतूहलानें त्या गृहस्थाला विचारिलें " आपल्याला कोण पाहिजे ? "

" जनरल मॅक्आर्थर. "

" आपलें नांव ! "

" डॉ० बा. मा. आझाद ब्रह्मदेशाचा नेता. "

# आझाद फौजेंतील मराठ्यांची कामगिरी : : ८

ता. १७ डिसेंबर १९४१ रोजीं ले. क. हंट या ब्रिटिश अधिकाऱ्यानें जे चाळीस हजार हिंदी युद्धकैदी जपानच्या ताब्यांत दिले त्यांत ले. क. भोंसले यांच्या आधिपत्याखालील अधिकारी आणि शिपाई मिळून पांचव्या मराठा पलटणींतील अजमासें पांच हजार मराठे होते. त्यानंतर क. मोहनसिंग यांनीं जी पहिली आझाद फौज स्थापन केली त्यांत भोसले यांस कर्नलची बढती मिळाली आणि फौजेच्या कारभारांत त्यांना मानाचें उच्च स्थान देण्यांत आलें. ता. १७ एप्रिल १९४२ रोजीं लष्करी ग्याझेट प्रसिद्ध झालें, त्यांत रासबिहारी बोस आणि जनरल मोहनसिंग यांच्या सहीनें क. भोंसले यांना हिंदी स्वातंत्र्यसंघाच्या लष्करी खात्याचे संचालक (डायरेक्टर ऑफ मिलिटरी ब्यूरो, इंडिया इंडिपेंडन्स लीग) नेमण्यांत आल्याचें जाहिर झालें.**

आझाद सरकारच्या पुनर्घटित मंत्रिमंडळांत जनरल मोहनसिंग गेले नाहींत. क० भोसले यांना मेजर जनरलची बढती मिळून मंत्रिमंडळांत ते लष्करी मंत्री झाले. या अधिकार-पदावर असतांना आझाद सरकारच्या पुनर्घटनेंत भोंसले यांनीं अविश्रांत श्रम करून आपल्या कर्तबगारीची सुभाषबाबूंना जाणीव करून दिली. आझाद सैन्याच्या तुकड्या पाडून त्यांची रचना आणि वर्गवारी करणें, लष्करी शिक्षणाच्या शाळा आणि विद्यालयें उघडणें, लष्कराला शिस्तीचें शिक्षण देणें, लष्करी खर्चावर ताबा ठेवणें आणि लष्कराच्या हरएक बाबतींत सुभाषबाबूंना मदत आणि सल्ला देणें हीं कामें त्यांच्याकडे असत. आघाडीवर जातांना नेताजीबरोबर मे० ज० भोंसले हे नेहमीं हजर राहून त्यांना लष्कराच्या हालचाली समजावून देणें आणि लष्करी सूचना (ऑर्डर ऑफ धी डे) काढणें हीं कामें सांभाळीत असत. आझाद फौजेंत चाळीस हजार शिकलेले आणि सशस्त्र सैनिक होते याचा

**त्या ग्॑झेट मधील उतारा या प्रकरणाच्या शेवटीं देण्यांत येत आहे.



जनरल भोसले

सर सेनापति, आझाद हिंद सेना

लष्करी मंत्री, आझाद हिंद सरकार

पृष्ठ ६८

उल्लेख आलाच आहे. त्याशिवाय ठिकठिकाणीं लष्करी शाळांतून आणि उच्च विद्यालयांतून साठ हजार लोकांना लष्करी शिक्षण देण्याचें काम सुरू होतें. पैकीं ७५०० सैनिकांना लष्करी अधिकाऱ्यांचें शिक्षण देण्याचें काम भोंसले यांनीं चांगल्या प्रकारें पार पाडलें.

जनरल भोंसले यांचा जन्म १९०७ सालीं सावंतवाडीच्या एका प्रसिद्ध मराठा सरदार घराण्यांत झाला. सावंतवाडीचे राजेसाहेब कै. बापूसाहेब भोंसले यांनीं पहिल्या महायुद्धांत यूरोपच्या समरांगणावर बहादुरी मिळविली. त्याप्रीत्यर्थ बादशहांनीं त्यांच्या संस्थानचा दर्जा वाढविला आणि त्यांच्या प्रजेला उत्तेजन देण्यासाठीं म्हणून सँढर्स्ट येथील लष्करी विद्यालयांत संस्थानचे दोन विद्यार्थी घेण्याचें कबूल केलें. त्याप्रमाणें १९२१ मध्यें भोंसले वय वर्षें १४ आणि वालावलकर वय वर्षें १६ हे दोन विद्यार्थी सँढर्स्टला पाठविण्यांत आले. या ठिकाणीं सहा वर्षांचा शिक्षणक्रम सन्मानपूर्वक पुरा करून हिंदुस्थानांत परत आल्यावर त्यांना हिंदी लष्करांत हुद्याच्या जागांवर नेमण्यांत आलें. सँढर्स्टचा शिक्षणक्रम पुरा केलेले हे पहिलेच महाराष्ट्रीय होत. योगायोग असा होता कीं आपल्या निश्चयी आणि स्वतंत्र कर्तबगार वृत्तीनें हे दोघेही अधिकारी ब्रिटिश हिंदी लष्करांत राहूं शकले नाहींत. कॅ०.वालावलकर यांच्याबद्दल असें सांगतात कीं लष्करांतील एका खान्याच्या वेळीं मानपानावरून त्यांचें आणि कांहीं लष्करी अधिकाऱ्यांचें भांडण झालें आणि त्यांना अपमानकारक शब्द वापरण्यांत आले. त्याबरोबर कॅ० वालावलकर यांनीं एका अधिकाऱ्यावर पिस्तूल रोखलें. नंतर त्यांनीं नोकरी सोडली आणि उत्तर हिंदुस्थानांतील एका मोठ्या संस्थानांतील लष्करांत कमांडर-इन-चीफ म्हणून त्यांची नेमणूक झाली.

भोंसले मितभाषणी, करारी आणि पोलादी योद्धे आहेत तसे ते अत्यंत साहसी आहेत. ते मद्रासला असतांना एकदां तुफानी समुद्रांत तीन इंग्रज अधिकारी बुडत असल्याचें त्यांनीं पाहिलें. लगेच त्यांनीं समुद्रांत उडी टाकून एकेका अधिकाऱ्याला पाठीशीं घालून काळाच्या दाढेंतून बाहेर काढलें.

जनरल भोंसले हे सध्या दिल्लीच्या लालकिल्ल्यांत बंदिस्त आहेत. त्यांच्यावरील खटल्याचें धोरण अद्याप जाहिर झालें नाहीं. चालू राजकीय

परिस्थितीमुळें त्यांच्यावर सरकार कदाचित् खटला भरणार नाहीं असा लोकांचा सर्वसाधारण समज आहे. त्यांच्या बचावासाठीं मध्यवर्ती कौन्सिल ऑफ स्टेटचे सभासद नामदार व्ही. व्ही. कालीकर आणि मध्यप्रांताचे माजी दिवाण बॅ० रामराव देशमुख यांनीं सरकारकडे मुलाखतीची परवानगी मागितली परंतु ती नाकारण्यांत आली. त्यानंतर मुंबई मराठा लीग आणि मुंबई मराठा बचाव समिती यांच्यामार्फत बॅ० देशमुख यांनी मुंबईचे अॅ. कवळेकर यांना दिल्लीस पाठविलें. तिथें त्यांची व भोंसले यांची मुलाखत झाली अशी बातमी आहे.

कॅ. धारगळकर हेही एक जपानी युद्धकैदी होते. परंतु आपला खरा अगर खोटा स्वाभिमान जागृत ठेऊन आझाद फौजेंत दाखल होण्यास ते शेवटपर्यंत कबूल झाले नाहींत. त्यांची भूमिका आझाद सेनांनीवरील पहिल्या खटल्यांतील साक्षींत स्पष्ट झालेली आहे.

पुणें येथील श्री चौगळकर हे आघाडीवरील नं. २ च्या पलटणींत एक अधिकारी होते. पोपा टेकडीवरील लढाईंत शत्रूच्या मशिनगनच्या सरबत्तीनें त्यांना प्राणांतिक जखमा झाल्या. त्यांना खाटेवर घालून शेजारींच निवाऱ्याच्या जागेवर नेण्यांत आलें. रुग्णालयांत नेईपर्यंत ते जगूं शकले नसते. त्यांनीं "पाणी पाणी" म्हटलें. पाण्याचा एकच घोंट त्यांनीं घेतला-आणि "जय हिंद" हे शब्द मुखावाटे काढून त्यांनीं समाधानानें प्राण सोडला अशी माहिती अकोल्याचे गोविंदराव किरडे यांनीं दिली.

श्री गोविंदराव किरडे नं. २ च्या मुख्य छावणीवरील ४६ व्या मोटार विभागाचे एक अधिकारी होते. इरावती नदीपासून साठ मैलांवर पोपा टेकडीवर असलेल्या शहानवाझ खान यांच्या हुकमतींतील दुसऱ्या विभागांत ते आघाडीवर होते. या संबंध विभागाला ब्रिटिशांच्या लष्करानें वेढा दिला होता. पैकीं चौथा व पांचवा गनिमी विभाग शत्रूनें कचाट्यांत धरला. त्यांतील एक हजार सैनिकांपैकीं फक्त शहानवाझ खानच काय ते बाहेर पडूं शकले. या लढाईंत श्री किरडे हे पकडले जाऊन त्यांना जबलपूरच्या ठाण्यावर बंदिस्त करण्यांत आलें आणि त्यांचे जाब जबाब झाल्यावर नोव्हेंबर १९४५ च्या शेवटच्या आठवड्यांत "बेजबाबदारीचा" दाखला देऊन त्यांना बडतर्फ

करण्यांत आलें. त्यांनीं अशी माहिती सांगितली कीं ब्रह्मी आघाडीवर आझाद सैन्याच्या जानबाझ तुकडीबरोबर ( आत्मघात पथक ) बालसेना पथकानें शत्रूचे रणगाडे उध्वस्त करण्याची कामगिरी बजावली. या जानबाझ तुकडींतील कांहीं सैनिकांनीं आपल्या पाठीस सुरुंग बांधून ते शत्रूच्या रणगाड्याच्या मार्गाखालीं आडवे पडले आणि शत्रूचा मार्ग कित्येक तास पर्यंत त्यांनीं रोखून धरला.

## शंकर घोरपडे

आझाद सैन्यांतील गनिमी विभागाचे एक अधिकारी शंकर घोरपडे ( मराठ्यांचे बाजी घोरपडे ) यानीं आघाडीवर केलेली कामगिरी अत्यंत स्फूर्तिदायक अशी आहे. या वीरानें आपल्या स्वतःच्या बंदुकीनें शत्रूचे शेंकडों बळी घेऊन ठिकठिकाणीं शत्रूला नाचवून सोडलें. शत्रूचें जास्तींतजास्त नुकसान यांच्याइतकें दुसऱ्या कोणी केलें नसेल. शत्रूचे रस्ते उध्वस्त करणें, डोंगरांतील झाडांवर दडून बसून शत्रूच्या मोठ्या जमावावर अकस्मात् गोळे टाकणें, शत्रूंतील हिंदी सैनिकांत जाऊन फंदाफितुरी करणें आणि शत्रूचे कपडे घालून त्यांच्यांत मिसळल्यावर त्यांच्याच तोफा अकस्मात त्यांच्यावर सोडणें हीं कामें मोठ्या शिताफीनें त्यांनीं पार पाडलीं.

यूरोपांतील दुसऱ्या आघाडीवर जर्मनीच्या सरहद्दीवरील कॅसिनो नाल्याच्या संग्रामांत अतुल पराक्रमाबद्दल व्हिक्टोरिया क्रॉस मिळविणारे संगमनेरचे वीर नामदेवराव जाधव यांनीं शत्रुपक्षाचा विध्वंस करण्याची जी कामगिरी केली तीच कामगिरी शंकर घोरपडे यानीं आझाद सैन्यांत केली. वीर नामदेवरावांनीं रात्रींच्या वेळीं लपतछपत शत्रूच्या ठाण्यावर जाऊन शत्रूच्या काडतुसांची गाडी हस्तगत करून शत्रूचीच मशिनगन शत्रूवर सोडली आणि प्रत्येकीं सातशें काडतुसांचे सात पट्टे खलास केल्यावर शत्रुसैन्य पळत सुटलें व दोस्तांना त्या लढाईत जय मिळाला. नामदेवराव जाधव वयाच्या विसाव्या वर्षी व्हिक्टोरिया क्रॉस मिळवून सुदैवानें मान मरातब भोगीत आहेत आणि साताऱ्चे शंकर घोरपडे दिल्लीच्या लाल किल्यांत आज बंदिस्त आहेत.

शंकर घोरपडे यांस लाल किल्ल्यांत बंदिस्त केल्यानंतर तुरुंगाच्या भिंतीला भोंक पाडून ते पळून जात होते. बाहेरच्या भिंतीवर दोरी टाकून पळून जाण्याच्या ऐन मोक्यावर असतां दोरी तुटून ते खालीं पडले आणि त्यांना भयंकर जखमा झाल्या. तेथें पकडून उपचारासाठीं त्यांना रुग्णालयांत ठेविलें असतांना पहारेकऱ्यांच्या हातावर तुरी देऊन ते पुन्हां निसटले आणि नंतर चार दिवसांनीं दिल्ली शहरांतच एका मित्राच्या घरीं त्यांना अटक झाली.

इंफालच्या आघाडीवर पुण्याचे कॅ. फुले आणि इंग्रज सैन्यांतील त्यांचे वडील या अधिकाऱ्यांचे तळ समोरासमोर पडले होते. आघाडीवर त्यांच्या कित्येक चकमकी झाल्या. मेजर शंकरराव पालेकर हे आघाडीवरील क. धीलन यांच्या पलटणीबरोबर वैद्यकीय अधिकारी होते. त्यांनीं आपली कामगिरी निश्चयपूर्वक पार पाडली.

जनरल भोंसले यांच्यावरील खटल्याचें सरकारी धोरण अद्याप निश्चित झालें नाहीं. म्हणून त्यांच्या बंदिस्त अवस्थेंत त्यांच्या आझाद फौजेंतील कार्याची सविस्तर माहिती देणें आज धोक्याचें आहे.

गेल्या डिसेंबर महिन्यांत मुंबई नगरपालिकेनें एक ठराव पास करून जनरल जगन्नाथराव भोंसले, ज. शहानवाझ खान, क. सहगल आणि क. धीलन यांच्या कामगिरीप्रीत्यर्थ मुंबईंतील रस्त्यांना त्यांचीं नांवें देण्याचा ठराव पास करून घेतला.

## लष्करी गॅझेट, अनुक्रम ९ (२) ता. १७ एप्रिल १९४२

### कर्नल जे. के. भोंसले, लष्करी खात्याचे संचालक

ले. मिर्झा इनायत अली बेग, ए. डी. सी.

| मुख्य विभाग | मुख्य व्यवस्थापक | लष्करी कार्यवाह | अर्थ खातें | शिक्षण | गनिमी |
|---|---|---|---|---|---|
| (ले. क. शहानवाझ खान) | (ले. क. लोकनाथन) | (मे. पी. के. सहगल) | (कॅ. कृष्णमूर्ती) | (कॅ. हबिबुर रहमान) | (मे. अबदुल रशीद) |
| | | ले. तलवार, ले. पाठक. | | कॅ. आळवी. | |

| ए. कंपनी. | कायदा | क्यू. कंपनी | हालचाल खातें | सुधारणा खातें |
|---|---|---|---|---|
| (मे. डी. जे. स्टॅट्रसी.) | (कॅ. डी. सी. नाग) | (मे. के. पी. थिमय्या) | (कॅ. अश्रफ खान) | (मे. जहांगिर) |

# भाग दूसरा



सेनापति शहानवाझखान सेनानायक धीलन सेनाधिकारी सहगल

पृष्ठ ७७

# लाल किल्ल्यांत : १

आझाद फौजेंतील वीस हजार युद्धकैद्यांना दिल्लीच्या लाल किल्ल्यांतील तुरुंगांत आणून ठेविल्याची आणि त्यापैकीं सहा जणांना फांशीची शिक्षा दिल्याची बातमी ऑगस्ट महिन्यांत सगळ्या हिंदुस्थानभर पसरली आणि जिकडे तिकडे खळबळ सुरू झाली. आझाद सेनानींस पकडून चौकशीसाठीं हिंदुस्थानांत आणल्याची पहिली बातमी मुंबईच्या क्रॉनिकल पत्रानें ता० ४ ऑगस्ट रोजीं छापली. परंतु त्यावेळीं त्या बातमीवर टीकेचा प्रकाश पाडणारा मजकूर छापणें अत्यंत धोक्याचें असल्यामुळें त्या गोष्टीची विशेष चर्चा झाली नाहीं. पुढाऱ्यांत ठिकठिकाणीं विचारविनिमय आणि खल होऊं लागला. ता. १५ ऑगस्ट रोजीं लढाई संपल्याचें जाहिर झालें, आणि पंडित जवाहरलाल नेहरूंची पहिली मुलाखत वृत्तपत्रांत प्रसिद्ध झालीः— " आझाद हिंद सैन्यांतील बरेच अधिकारी आणि शिपाई युद्धकैदी म्हणून पकडण्यांत आले आहेत आणि त्यांपैकीं कित्येकांना ठार करण्यांत आलें आहे...हिंदुस्थानांत युद्धोत्तर सुधारणा हातीं घेण्यांत येत असतां या लोकांना कडक रीतीनें वागविण्यांत आल्यास त्याचे भयंकर परिणाम दूरवर पोंचल्याशिवाय राहाणार नाहींत. त्यांना दिलेली आणि देण्यांत येणारी शिक्षा ही सगळ्या हिंदी जनतेला दिल्यासारखी आहे आणि त्यामुळें झालेली खोल जखम कधींही भरून येणार नाहीं..." ही बातमी बाहेर सोडण्यास सेन्सॉर खात्यानें तीन दिवस घेतले आणि त्या बातमीबरोबरच सरकारी खुलासा प्रसिद्ध करण्यांत आला. 'शत्रूला मिळालेल्या सैन्याला द्यावयाच्या शिक्षेबद्दल सरकारी विचार चालू आहे. त्यांच्या गुन्ह्याबद्दल चौकशी चालू असून त्याबद्दलचें सरकारी धोरण लौकरच जाहिर होणार आहे..." लगेच आ. हिं. से. चा विषय सर्वतोमुखीं झाला. आझाद सैन्यांतील अमानुषपणाचीं कृत्यें करणाऱ्या गुन्हेगार अधिकाऱ्यांना वगळून, इतर लोकांना, त्यांची चौकशी पुरी झाल्यावर, सोडून

देण्यांत येईल अशा अर्थाचा सरकारी खुलासा २७ ऑगस्टला प्रसिद्ध झाला. परंतु केवळ कायद्याच्या बडग्यानेंच सुटणारा हा प्रश्न नाहीं असें कॉंग्रेसच्या पुढाऱ्यांचें मत पडलें. सेप्टेंबर १९४५ मध्यें कॉंग्रेस कार्य-समितीनें पुण्याच्या अधिवेशनांत आझाद सेनानींच्या बचावासाठीं एक समिति स्थापन केल्याचा ठराव पास करून बचावाची सर्व कामगिरी त्या समितीवर संपवून दिली. त्या समितीवर सर तेजबहादूर सप्रू, बॅ. भुलाभाई देसाई, डॉ. कैलासनाथ कटजू, बॅ. जवाहरलाल नेहरू, बॅ. रघुनंदन शरण आणि बॅ. असफ अली यांची नेमणूक झाली, आणि जरूर पडेल त्याप्रमाणें जादा सभासद या समितीवर घेण्याची त्यांना मुभा देण्यांत आली. या समितीच्या कामाला लगेच सुरवात झाली आणि समितीनें ता. १५ ऑक्टोबर रोजीं लॉर्ड वॅव्हेल यांना पत्र लिहून आझाद सेनानीवरील खटले काढून घ्यावे, ज्या परिस्थितींत हे खटले चालविण्याचें सरकारनें ठरविलें आहे ती चालू काळास पोषक नाहीं आणि इतकेंही करून खटले उभारण्याचा सरकारचा निश्चयच असेल तर मध्यवर्ती विधिमंडळाच्या निवडणुकीनंतर जें कार्यकारी मंडळ येईल त्याच्या सल्ल्यानें हा नाजुक प्रश्न सोडविण्यांत यावा अशी मागणी केली. परंतु त्या मागणीचा कांहीं एक उपयोग झाला नाहीं आणि न्यायदानाच्या कामांत वेळ दवडणें सरकारला संमत नाहीं असें उत्तर देण्यांत आलें. त्यानंतर पहिल्या खटल्याची तारीख, जागा आणि लष्करी कोर्टाच्या सभासदांचीं नावें सरकारनें प्रसिद्ध केल्यामुळें सरकारशीं तडजोड होणें अशक्य झालें.

## दिल्लीचा लाल किल्ला.

सुभाषबाबूंनीं दिल्ली राजधानीच्या ज्या इतिहासप्रसिद्ध लाल किल्यावर हिंदी स्वातंत्र्याचा तिरंगी झेंडा उभारण्याची घोषणा केली होती त्याच लाल किल्यांतील तुरुंगाच्या एका दालनांत हा खटला भरविण्याचें सरकारनें ठरवून टाकलें.

दिल्लीचा हा लाल किल्ला तीनशें वर्षांपूर्वी मोंगल बादशहा शहाजहान यानें बांधला. सन १७१६ सालीं फरोकशीर बादशहाचें लग्न ठरलें. त्यावेळीं तो अतिशय आजारी पडला. सर्व उपचार थकल्यानंतर कॅप्टन हॅमिल्टन

नांवाच्या एका स्कॉटिश शस्त्रवैद्यानें त्याला बरें करण्याची हमी घेऊन त्याच्यावर शस्त्रक्रिया केली. फरोकशीर बादशाहा साफ बरा झाला आणि बादशहानें हॅमिल्टनचे मालक इंग्रज यांना वापरण्यासाठीं म्हणून हा किल्ला आणि आसमंतांतील अडतीस गांवें बक्षिस देऊन टाकलीं. या अडतीस गांवावर हळूहळू इंग्रजांचें प्रभुत्व निर्माण होऊन नंतर त्यांनीं आपलें राज्य तिथें स्थापन केलें. १८५७ सालीं हिंदी लष्करानें इंग्रजाविरुद्ध बंड आणि त्यांच्या राजाविरुद्ध पहिलें क्रांतियुद्ध पुकारलें. त्या बंडांत दिल्लीचा मोंगल राजा बहादुरशहा हा सामील झाला होता. बंडवाल्यांनीं दिल्ली शहर काबीज केलें आणि लाल किल्ल्यांतील प्रसिद्ध दिवाण-ई-खासमध्ये दरबार भरवून इंग्रज सरकारचा पेन्शनर बहादुरशहा यास गादीवर बसविलें.

बंडाचा उपशम झाल्यानंतर बहादुरशहास पकडून १८५८ च्या जानेवारी महिन्यांत इंग्रजांनीं त्याच्यावर खटला भरला. बहादुरशहावर चार आरोप ठेवण्यांत आले. ( १ ) त्यानें १० मे पासून ऑक्टोबर १८५७ पर्यंत वेळोवेळीं बंडांतील एक पुढारी महमद बख्तखान याला इंग्रजांविरुद्ध बंडाची सशस्त्र उठावणी करण्यास उत्तेजन दिलें. ( २ ) त्यानें आपला मुलगा मिर्झाशहा यास व इंग्रजांच्या इतर प्रजाजनांस बंडाची चिथावणी देऊन आपण इंग्रज सरकारचा प्रजाजन असतां ११ मे १८५७ रोजीं दगाबाजीनें दिल्ली शहराचा ताबा घेऊन हिंदुस्थानचा बादशहा म्हणून वत :च्या नांवें द्वाही फिरविली. ( ३ ) त्यानें राजाविरुद्ध सशस्त्र बंड केलें. ( ४ ) त्यानें ता. १६ मे १८५७ रोजीं ४९ इंग्रज आणि यूरोपियन लोकांचा खून केला. या यूरोपियन स्त्री पुरुषांना आरोपी बहादुर शहानें लाल किल्ल्यांतील मुदपाकखान्यांत दडवून ठेविलें आणि खुनाच्या दिवशीं त्यांना चौकांत आणून उभें करण्यांत आलें. प्रथम एका बंडवाल्याला त्यांच्यावर पिस्तूल झाडण्याचा हुकूम झाला आणि नंतर सर्वांचा तरवारीनें शिरच्छेद करण्यांत आला.

लाल किल्ल्यांतील ज्या दिवाण-ई-खास मध्यें बहादुरशहाला गादीवर बसविण्यांत आलें होतें त्याच दिवाणखान्यांत पांच इंग्रजी न्यायाधीशांसमोर त्याला आरोपी म्हणून उभें करण्यांत आलें. ले. क. डॉज् हे मुख्य न्यायाधीश आणि मेजर एफ्. जे. हॅरियट हे न्यायवकील (जज्य-ॲडव्होकेट)

होते. बहादुरशहानें आपला बचाव आपणच केला आणि फिर्यादीतर्फेच्या साक्षीदारांची कौशल्यपूर्ण उलट तपासणीं केली. या कामांत गुलाम अब्बास नांवाच्या एका मित्राचें त्याला फार सहाय्य झालें. खटल्याचें काम इंग्रजींत चाललें आणि बहादुरशहा अगर त्याचा सल्लागार यांना इंग्रजी समजत नसल्यामुळें जेम्स मर्फी नांवाच्या इंग्रज गृहस्थानें दुभाष्याचें काम केलें. न्यायवकिलानें खुनाच्या आरोपाबद्दल आरोपीवर तोंडसूख घेतलें, इतकेंच नव्हे तर सर्व हिंदी लोकांचा त्यानें नुसता उद्धार केला. फिर्यादीनें दिलेल्या खुनाच्या पुराव्यांत आरोपीचा या खुनाशीं प्रत्यक्ष संबंध दाखविणारा कांहींही पुरावा पुढें येऊं शकला नाहीं. उलट बहादुरशहाचा पुरावा आणि बचाव असा होता कीं, वाटेल त्या कागदपत्रावर सक्तीनें आपलें शिक्कामोर्तब घेण्यांत आलें आणि आपल्या नांवावर झालेले प्रकार टाळण्याचें सामर्थ्य आपल्या आंगीं नव्हतें. या बचावाचा उपयोग झाला नाहीं आणि लष्करी वकिलांनीं पहिल्यापासून अकांडतांडव केल्यामुळें त्यांचेंच वजन कोर्टावर पडलें.

ह्या खटल्याचें काम तीन महिने चालून शेवटीं चारही आरोप शाबीत होऊन बहादुरशहास दोषी ठरविण्यांत आलें. त्यास फांशीची शिक्षाच मिळावयाची परंतु त्याच्या प्राणरक्षणाची हमी त्यास वेतन देण्यापूर्वींच इंग्रजांनीं घेतलेली असल्यामुळें त्याला आमरण हद्दपारीची शिक्षा देण्यांत येऊन रंगूनला पाठविण्यांत आलें.

या खटल्यांतील लष्करी वकिलास सुद्धां १८५७ सालचें बंड हें स्वातंत्र्ययुद्ध होतें अशी कबुली देणें भाग पडलें. तो म्हणतो:—

> " १८५७ सालचें हें क्रांतियुद्ध धर्म, रक्त, वर्ण, चालीरिती, परंपरा आणि भावना या सर्वच दृष्टींनीं परकी असलेल्या लोकांना या देशांतून हांकलून देऊन हिंदी लोकांची सत्ता स्थापन करण्यासाठीं होतें. हिंदू आणि मुसलमान हे दोघेही लष्करामध्यें एक पेशा, एक पोषाख, एक साध्य आणि एकाच तऱ्हेचीं साधनें यांमुळें बंधुभाव वृत्तीनें एकत्र येऊं शकले आणि एकमेकांच्या सणासमारंभांत भाग घेऊं लागले. सरकारनें या एकीकरणास उत्तेजन दिलें. परंतु त्या उत्तेजनाचा उपयोग आपल्याच सरकारला उलथून पाडण्यासाठीं होत आहे. "

चार वर्षांनंतर म्हणजे १८६२ सालच्या नोव्हेंबर महिन्यांत अत्यंत दारिद्र्यांत आणि अगतिकावस्थेंत मोंगल बादशहा बहादुरशहा रंगूनला पैगंबरवासी झाला. त्याच्या शवावर बांधलेलें थडगें शहराच्या एका कोपऱ्यांत मोडक्या तोडक्या स्थितींत धूळखात पडलेलें होतें. सुभाषबाबूंनीं ती जागा साफसूफ करुन घेतली आणि त्यांवर पुन्हा नवीन थडगें बांधलें. नंतर ता. ११ जुलै १९४४ रोजीं आझाद लष्कराची या थडग्यासमोर सलामी होऊन त्या ठिकाणीं झालेल्या समारंभांच्या स्मरणार्थ क० बऱ्हानुद्दीन यांच्या हाताखालील पलटणीस बहादुर लष्कर असें नांव देण्यांत आलें. या बहादुर लष्करास नंतर शत्रुसैन्यांत फूट पाडणें, भेद करणें, हेरगिरी करणें, लढाईच्या ठिकाणीं अचानक शत्रुसैन्यांत उपस्थित होऊन आपल्याकडे ओढून घेण्यासाठीं हिंदी सैनिकांत प्रचार करणें हीं कामें शिकवून तरबेज करण्यांत आलें.

× × ×

राष्ट्रसभेच्या बचाव समितीनें आझाद सैनिकांच्या बचावाच्या कामासाठीं (१) कुनवर सर दलीपसिंग, लाहोर हायकोर्टाचे माजी न्यायाधीश (२) बक्षी सर टेकचंद, लाहोर हायकोर्टाचे माजी मुख्यन्यायाधीश (३) राय बहादुर बद्रीदास व (४) श्री प्रकाशकांति सेन, पाटणा हायकोर्टाचे माजी न्यायाधीश यांची मदत घेऊन आपल्या कामास सुरवात केली.

सोमवार ता. ५ नोव्हेंबर १९४५ रोजीं बरोबर पावणे अकरा वाजतां दिल्लीच्या या इतिहासप्रसिद्ध लाल किल्ल्यांत आझाद हिंद फौजेंतील अधिकारी ज. शहानवाझखान, क. प्रेमकुमार सहगल आणि क. गुरुबक्षसिंग धीलन यांच्यावरील खटल्यास सुरवात झाली.

त्या दिवशीं सकाळपासून लाल किल्ल्याकडे जाणाऱ्या रस्त्यांवर पोलिसांचे पहारे बसविण्यांत आले होते आणि किल्ल्याच्या प्रवेशद्वारावर इंग्लिश लष्करी अधिकारी उभे होते. किल्ल्याच्या कोर्टाच्या दालनांत इंग्लिश लष्करी पोलिसांचा कडक पहारा ठेवण्यांत आला होता. जरुरीसाठीं हाताशीं असावी म्हणून जादा पोलिसांची एक तुकडी किल्ल्यांतील तंबूंत तयार होती. किल्ल्याकडे जाणाऱ्या वाटेवरुन कोर्टाच्या दालनांत प्रवेश मिळेपर्यंत परवानगी देण्यांत आलेल्या प्रेक्षकांची सहा वेळ तपासणी करण्यांत आली. श्रीमती सरोजिनी नायडू, मास्टर तारासिंग, सरदार मंगलसिंग, सर-फेडरिक

देण्यांत येईल अशा अर्थाचा सरकारी खुलासा २७ ऑगस्टला प्रसिद्ध झाला. परंतु केवळ कायद्याच्या बडग्यानेंच सुटणारा हा प्रश्न नाहीं असें काँग्रेसच्या पुढाऱ्यांचें मत पडलें. सेप्टेंबर १९४५ मध्यें काँग्रेस कार्य-समितीनें पुण्याच्या अधिवेशनांत आझाद सेनानींच्या बचावासाठीं एक समिती स्थापन केल्याचा ठराव पास करून बचावाची सर्व कामगिरी त्या समितीवर संपवून दिली. त्या समितीवर सर तेजबहादूर सप्रू, बॅ. भुलाभाई देसाई, डॉ. कैलासनाथ कटजू, बॅ. जवाहरलाल नेहरू, बॅ. रघुनंदन शरण आणि बॅ. असफ अल्ली यांची नेमणूक झाली, आणि जरूर पडेल त्याप्रमाणें जादा सभासद या समितीवर घेण्याची त्यांना मुभा देण्यांत आली. या समितीच्या कामाला लगेच सुरवात झाली आणि समितीनें ता. १५ ऑक्टोबर रोजीं लॉर्ड वॅव्हेल यांना पत्र लिहून आझाद सेनानीवरील खटले काढून घ्यावे, ज्या परिस्थितींत हे खटले चालविण्याचें सरकारनें ठरविलें आहे ती चालू काळास पोषक नाहीं आणि इतकेंही करून खटले उभारण्याचा सरकारचा निश्चयच असेल तर मध्यवर्ती विधिमंडळाच्या निवडणुकीनंतर जें कार्यकारी मंडळ येईल त्याच्या सल्ल्यानें हा नाजुक प्रश्न सोडविण्यांत यावा अशी मागणी केली. परंतु त्या मागणीचा कांहीं एक उपयोग झाला नाहीं आणि न्यायदानाच्या कामांत वेळ दवडणें सरकारला संमत नाहीं असें उत्तर देण्यांत आलें. त्यानंतर पहिल्या खटल्याची तारीख, जागा आणि लष्करी कोर्टाच्या सभासदांचीं नावें सरकारनें प्रसिद्ध केल्यामुळें सरकारशीं तडजोड होणें अशक्य झालें.

## दिल्लीचा लाल किल्ला.

सुभाषबाबूंनीं दिल्ली राजधानीच्या ज्या इतिहासप्रसिद्ध लाल किल्यावर हिंदी स्वातंत्र्याचा तिरंगी झेंडा उभारण्याची घोषणा केली होती त्याच लाल किल्यांतील तुरुंगाच्या एका दालनांत हा खटला भरविण्याचें सरकारनें ठरवून टाकलें.

दिल्लीचा हा लाल किल्ला तीनशें वर्षांपूर्वी मोंगल बादशहा शहाजहान यानें बांधला. सन १७१६ सालीं फरोकशीर बादशहाचें लग्न ठरलें. त्यावेळीं तो अतिशय आजारी पडला. सर्व उपचार थकल्यानंतर कॅब्राइल हॅमिल्टन

नांवाच्या एका स्कॉटिश शस्त्रवैद्यानें त्याला बरें करण्याची हमी घेऊन त्याच्यावर शस्त्रक्रिया केली. फरोकशीर बादशाहा साफ बरा झाला आणि बादशहानें हॅमिल्टनचे मालक इंग्रज यांना वापरण्यासाठीं म्हणून हा किल्ला आणि आसमंतांतील अडतीस गांवें बक्षिस देऊन टाकलीं. या अडतीस गांवावर हळूहळू इंग्रजांचें प्रभुत्व निर्माण होऊन नंतर त्यांनीं आपलें राज्य तिथें स्थापन केलें. १८५७ सालीं हिंदी लष्करानें इंग्रजाविरुद्ध बंड आणि त्यांच्या राजाविरुद्ध पहिलें क्रांतियुद्ध पुकारलें. त्या बंडांत दिल्लीचा मोंगल राजा बहादुरशहा हा सामील झाला होता. बंडवाल्यांनीं दिल्ली शहर काबीज केलें आणि लाल किल्ल्यांतील प्रसिद्ध दिवाण-ई-खासमध्यें दरबार भरवून इंग्रज सरकारचा पेन्शनर बहादुरशहा यास गादीवर बसविलें.

बंडाचा उपशम झाल्यानंतर बहादुरशहास पकडून १८५८ च्या जानेवारी महिन्यांत इंग्रजांनीं त्याच्यावर खटला भरला. बहादुरशहावर चार आरोप ठेवण्यांत आले. ( १ ) त्यानें १० मे पासून ऑक्टोबर १८५७ पर्यंत वेळोवेळीं बंडांतील एक पुढारी महमद बख्तखान याला इंग्रजांविरुद्ध बंडाची सशस्त्र उठावणी करण्यास उत्तेजन दिलें. ( २ ) त्यानें आपला मुलगा मिर्झाशहा यास व इंग्रजांच्या इतर प्रजाजनांस बंडाची चिथावणी देऊन आपण इंग्रज सरकारचा प्रजाजन असतां ११ मे १८५७ रोजीं दगाबाजीनें दिल्ली शहराचा ताबा घेऊन हिंदुस्थानचा बादशहा म्हणून स्वत :च्या नांवें द्वाही फिरविली. ( ३ ) त्यानें राजाविरुद्ध सशस्त्र बंड केलें. ( ४ ) त्यानें ता. १६ मे १८५७ रोजीं ४९ इंग्रज आणि यूरोपियन लोकांचा खून केला. या यूरोपियन स्त्री पुरुषांना आरोपी बहादुर शहानें लाल किल्ल्यांतील मुदपाकखान्यांत दडवून ठेविलें आणि खुनाच्या दिवशीं त्यांना चौकांत आणून उभें करण्यांत आलें. प्रथम एका बंडवाल्याला त्यांच्यावर पिस्तूल झाडण्याचा हुकूम झाला आणि नंतर सर्वांचा तरवारीनें शिरच्छेद करण्यांत आला.

लाल किल्ल्यांतील ज्या दिवाण-ई-खास मध्यें बहादुरशहाला गादीवर बसविण्यांत आलें होतें त्याच दिवाणखान्यांत पांच इंग्रजी न्यायाधीशांसमोर त्याला आरोपी म्हणून उभें करण्यांत आलें. ले. क. डॉज् हे मुख्य न्यायाधीश आणि मेजर एफ्. जे. हॅरियट हे न्यायवकील (जज्य-अॅडव्होकेट)

होते. बहादुरशहानें आपला बचाव आपणच केला आणि फिर्यादीतर्फेंच्या साक्षीदारांची कौशल्यपूर्ण उलट तपासणीं केली. या कामांत गुलाम अब्बास नांवाच्या एका मित्राचें त्याला फार सहाय्य झालें. खटल्याचें काम इंग्रजींत चाललें आणि बहादुरशहा अगर त्याचा सल्लागार यांना इंग्रजी समजत नसल्यामुळें जेम्स मर्फी नांवाच्या इंग्रज गृहस्थानें दुभाष्याचें काम केलें. न्यायवकिलानें खुनाच्या आरोपाबद्दल आरोपीवर तोंडसूख घेतलें, इतकेंच नव्हे तर सर्व हिंदी लोकांचा त्यानें नुसता उद्धार केला. फिर्यादीनें दिलेल्या खुनाच्या पुराव्यांत आरोपीचा या खुनाशीं प्रत्यक्ष संबंध दाखविणारा कांहींही पुरावा पुढें येऊं शकला नाहीं. उलट बहादुरशहाचा पुरावा आणि बचाव असा होता कीं, वाटेल त्या कागद-पत्रावर सक्तीनें आपलें शिक्कामोर्तब घेण्यांत आलें आणि आपल्या नांवावर झालेले प्रकार टाळण्याचें सामर्थ्य आपल्या आंगीं नव्हतें. या बचावाचा उपयोग झाला नाहीं आणि लष्करी वकिलांनीं पहिल्यापासून अकांडतांडव केल्यामुळें त्यांचेंच वजन कोर्टावर पडलें.

ह्या खटल्याचें काम तीन महिने चालून शेवटीं चारही आरोप शाबीत होऊन बहादुरशहास दोषी ठरविण्यांत आलें. त्यास फांशीची शिक्षाच मिळावयाची परंतु त्याच्या प्राणरक्षणाची हमी त्यास वेतन देण्यापूर्वीच इंग्रजांनीं घेतलेली असल्यामुळें त्याला आमरण हद्दपारीची शिक्षा देण्यांत येऊन रंगूनला पाठविण्यांत आलें.

या खटल्यांतील लष्करी वकिलास सुद्धां १८५७ सालचें बंड हें स्वातंत्र्य-युद्ध होतें अशी कबुली देणें भाग पडलें. तो म्हणतो:—

"१८५७ सालचें हें क्रांतियुद्ध धर्म, रक्त, वर्ण, चालीरिती, परंपरा आणि भावना या सर्वच दृष्टींनीं परकी असलेल्या लोकांना या देशांतून हांकलून देऊन हिंदी लोकांची सत्ता स्थापन करण्यासाठीं होतें. हिंदू आणि मुसलमान हे दोघेही लष्करामध्यें एक पेशा, एक पोषाख, एक साध्य आणि एकाच तऱ्हेचीं साधनें यांमुळें बंधुभाव वृत्तीनें एकत्र येऊं शकले आणि एकमेकांच्या सणासमारंभांत भाग घेऊं लागले. सरकारनें या एकीकरणास उत्तेजन दिलें. परंतु त्या उत्तेजनाचा उपयोग आपल्याच सरकारला उलथून पाडण्यासाठीं होत आहे."

चार वर्षांनंतर म्हणजे १८६२ सालच्या नोव्हेंबर महिन्यांत अत्यंत दारिद्र्यांत आणि अगतिकावस्थेंत मोंगल बादशहा बहादुरशहा रंगूनला पैगंबरवासी झाला. त्याच्या शवावर बांधलेलें थडगें शहराच्या एका कोपऱ्यांत मोडक्या तोडक्या स्थितींत धूळखात पडलेलें होतें. सुभाषबाबूंनीं ती जागा साफसूफ करुन घेतली आणि त्यावर पुन्हा नवीन थडगें बांधलें. नंतर ता. ११ जुलै १९४४ रोजीं आझाद लष्कराची या थडग्यासमोर सलामी होऊन त्या ठिकाणीं झालेल्या समारंभाच्या स्मरणार्थ क० बऱ्हानुद्दीन यांच्या हाताखालील पलटणीस बहादुर लष्कर असें नांव देण्यांत आलें. या बहादुर लष्करास नंतर शत्रुसैन्यांत फूट पाडणें, भेद करणें, हेरगिरी करणें, लढाईच्या ठिकाणीं अचानक शत्रुसैन्यांत उपस्थित होऊन आपल्याकडे ओढून घेण्यासाठीं हिंदी सैनिकांत प्रचार करणें हीं कामें शिकवून तरबेज करण्यांत आलें.

× × ×

राष्ट्रसभेच्या बचाव समितीनें आझाद सैनिकांच्या बचावाच्या कामासाठीं (१) कुनवर सर दलीपसिंग, लाहोर हायकोर्टाचे माजी न्यायाधीश (२) बक्षी सर टेकचंद, लाहोर हायकोर्टाचे माजी मुख्यन्यायाधीश (३) राय बहादुर बद्रीदास व (४) श्री प्रकाशकांति सेन, पाटणा हायकोर्टाचे माजी न्यायाधीश यांची मदत घेऊन आपल्या कामास सुरवात केली.

सोमवार ता. ५ नोव्हेंबर १९४५ रोजीं बरोबर पावणे अकरा वाजतां दिल्लीच्या या इतिहासप्रसिद्ध लाल किल्ल्यांत आझाद हिंद फौजेंतील अधिकारी ज. शहानवाझखान, क. प्रेमकुमार सहगल आणि क. गुरुबक्षसिंग धीलन यांच्यावरील खटल्यास सुरवात झाली.

त्या दिवशीं सकाळपासून लाल किल्ल्याकडे जाणाऱ्या रस्त्यांवर पोलिसांचे पहारे बसविण्यांत आले होते आणि किल्ल्याच्या प्रवेशद्वारावर इंग्लिश लष्करी अधिकारी उभे होते. किल्ल्याच्या कोर्टाच्या दालनांत इंग्लिश लष्करी पोलिसांचा कडक पहारा ठेवण्यांत आला होता. जरुरीसाठीं हाताशीं असावी म्हणून जादा पोलिसांची एक तुकडी किल्ल्यांतील तंबूंत तयार होती. किल्ल्याकडे जाणाऱ्या वाटेवरुन कोर्टाच्या दालनांत प्रवेश मिळेपर्यंत परवानगी देण्यांत आलेल्या प्रेक्षकांची सहा वेळ तपासणी करण्यांत आली. श्रीमती सरोजिनी नायडू, मास्टर तारासिंग, सरदार मंगलसिंग, सर-फेडरिक

जेम्स प्रभृति पुढाऱ्यांनासुद्धां कोर्टाच्या दालनांत प्रवेश मिळेपर्यंत या तपासणीच्या दिव्यांतून जावें लागलें. परवानगी मिळालेल्या प्रेक्षकांची संख्या १४० व प्रतिनिधींची ६० होती. त्या सर्वांना आपल्या हजेरीच्या सह्या द्याव्या लागल्या. या शिवाय फिर्यादी व आरोपी पक्षांचे वकील व त्यांचे सहाय्यक हे सर्व हजर होते.

"खामोष" या लष्करी ललकारींत लष्करी न्यायाधीशांनीं पावणे अकरा वाजतां कोर्टांत प्रवेश केला. लष्करी कोर्टाचे अध्यक्ष मेजर जनरल ए. बी. ब्लॅक्सलँड आणि त्यांचे सहकारी न्यायाधीश ब्रिगेडियर ए. जी. बर्क, ले. क. सी. आर्. स्कॉट, ले. क. टी. एल्. स्टिव्हेन्सन, ले. क. नाझिरअल्ली खान, मे. बी. प्रीतमसिंग आणि मे. बन्वारीलाल हे स्थानापन्न झाले आणि त्यांच्या शेजारींच असलेल्या आसनावर त्यांचे न्यायवकील कर्नल केरिन बसले. त्यांच्या डाव्या बाजूला मांडलेल्या आसनांवर आरोपींचे वकील कुनवर सर दलीपसिंग, बावीस वर्षांनंतर प्रथमच बॅरिस्टरचा पेहराव घातलेले पं. जवाहरलाल नेहरू, सर तेजबहादुर सप्रू, बॅ. भुलाभाई देसाई, बॅ. असफ अल्ली, डॉ. के. एन्. कटजू, डॉ. पी. के. सेन, व रायबहादुर बद्रीदास हे बसले. कोर्टाच्या उजव्या बाजूस फिर्यादीतर्फें हिंदुस्थानचे ॲडव्होकेट जनरल सर नोशिरवान पी. एंजीनियर व लष्करी वकील ले. कर्नल पी. वाल्श हे बसले. त्यानंतर चार मिनिटांच्या अवधींत फोटोग्राफर्सनीं फोटो घेतले. इतक्यांत आरोपींना कोर्टांत आणण्यांत आलें. ते लष्करी शिस्तींत येऊन उभे राहिले.

लष्करी न्यायवकील क. केरिन यांनीं लष्करी कायद्याखालीं ज्या हुकुमानें हें लष्करी कोर्ट निर्माण करण्यांत आलें तो हुकूम वाचून दाखविला आणि कोर्टाचे न्यायसभासद, राखीव न्यायसभासद, सरकारी वकील व सरकारी वृत्तलेखक यांच्या नांवाचा पुकार केला. नंतर आरोपींच्या बचावांत भाग घेणाऱ्या वकिलांतील मुख्यांचा पुकार करण्यांत आला. त्याबरोबर सर तेज बहादुर सप्रू हे उभे राहिले आणि आपण आरोपींच्या वकिलांचे प्रमूख असलों तरी आपली प्रकृति नादुरुस्त असल्यामुळें आपल्याऐवजीं श्री भुलाभाई देसाई हे काम चालवितील असा त्यांनीं खुलासा केला आणि

आपल्या सहकारी वकिलांची कोर्टाला ओळख करून दिली. श्री भुलाभाई देसाई यांनीं लष्करी कायद्याप्रमाणें या खटल्यांत वकीलपत्र घेण्यास आपण सर्व वकील लायक आहोंत असा मुख्य न्यायाधीशांस जबाब दिला.

नंतर अध्यक्षांनीं आपण व आपले सहकारी यांच्या नांवास आरोपींचा विरोध आहे काय असें विचारलें त्यास आरोपींनीं "नाहीं" असें उत्तर दिलें. सरकारी वृत्त-लेखकांच्या नांवासही आपला विरोध नाहीं असें त्यांनीं सांगितलें.

त्यानंतर न्यायाधीशांचा व पांच सरकारी वृत्तलेखकांचा शपथ विधी झाला. न्यायाधीशांनीं पुढील प्रमाणें शपथ घेतली:—

"परमेश्वराला स्मरून मी शपथ घेतों कीं हिंदी लष्करी कायद्याप्रमाणें मी न्यायदान करीन, आणि न्याय देतांना पक्षपात, अनुकूल ग्रह, जिव्हाळा इत्यादींचा उपसर्ग मी स्वतःला लागूं देणार नाहीं. संशय निर्माण होण्याचा प्रसंग आल्यास मी माझ्या सदसद्विवेकाला जागून, मनोदेवतेला स्मरून व युद्धनीतीला अनुसरून न्यायदान करीन. सरकारनें जाहिर करी-पर्यंत या लष्करी कोर्टानें नमूद केलेल्या शिक्षेचा मी गौप्यस्फोट करणार नाहीं. त्याचप्रमाणें कोणत्याही न्यायालयांत साक्ष देतांना कायदेशीर भाग पाडल्या खेरीज या कोर्टांतील कोणाही न्यायसभासदाचें मत अथवा त्याचा वैयक्तिक निकाल यांची माहिती मी बाहेर फोडणार नाहीं."

इतका समारंभ होईपर्यंत आरोपी लष्करी शिस्तीत उभे होते. त्यांना सोईनें उभें राहण्याचें सांगण्यांत आलें.

## आरोप पत्रिका

त्यानंतर न्यायवकील उभे राहिले आणि त्यांनीं आरोपींना त्यांच्यावरील आरोपपत्रिका वाचून दाखविली.

( १ ) सिंगापूर, रंगून, पोपा टेकडी आणि कँडपाडांग या ठिकाणीं व ब्रह्मदेशांत इतरत्र, सप्टेंबर १९४२ व २६ एप्रिल १९४५ यांच्या दर-म्यान तुम्ही, कॅ. शहानवाझ खान (हिंदी १।१४ पंजाब पलटणींतील अधिकारी), कॅ. प्रेमकुमार सहगल (हिंदी बलूच पलटणींतील अधिकारी)

आणि ले. गुरुबक्षसिंग धीलन ( हिंदी 1।14 पंजाब पलटणींतील अधिकारी ) यांनीं मिळून हिंदुस्थानच्या बादशाहाविरुद्ध लढाई केली व हिंदी फौजदारी कायद्याचीं कलमें १२१ व १०९ प्रमाणें गुन्हा केला.

( २ ) तुम्ही, ले. गुरुबक्षसिंग धीलन यांनीं ब्रह्मदेशांतील पोपा टेकडी-जवळ ६ मार्च १९४५ रोजीं किंवा त्या सुमारास ( अ ) हरिसिंग ( ब ) दलीचंद ( क ) दोराइसिंग आणि ( ड ) धरमसिंग या शिपायांचा खून केला किंवा करविला; आणि तुम्ही, कॅ. प्रेमकुमार सहगल यांनीं, त्या खुनास मदत करून हिंदी फौजदारी कायद्याचीं कलमें ३०२ आणि १०९ प्रमाणें गुन्हा केला.

( ३ ) तुम्ही, कॅ. शहानवाझ खान यांनीं, ब्रह्मदेशांतील पोपा टेकडी-जवळ ले. खजिनशहा व ले. आयासिंग यांनीं २९ मार्च १९४५ रोजीं गोलंदाज शिपाई महंमद हुसेन याचा जो खून केला त्या खुनाला मदत केली आणि हिंदी फौजदारी कायद्याचीं कलमें ३०२ आणि १०९ प्रमाणें गुन्हा केला; असे तुमच्यावर आरोप आहेत.

" हे आरोप आपणास कबूल आहेत काय "?

" आम्ही निरपराधी आहोंत." आरोपींनीं ठासून उत्तर दिलें.

त्यानंतर तिघांही आरोपी अधिकाऱ्यांना आपल्या वकिलांकडे जाऊन बसण्यास सांगण्यांत आलें. त्यांनीं आपापल्या जागांवर बसण्यापूर्वी पं. जवाहरलाल नेहरूंच्या समोर येऊन त्यांना व त्यांच्या सहकाऱ्यांना लष्करी सलामी दिली. पं. नेहरूंनीं ती सलामी घेऊन आपल्या अशिलांना आपल्या सहकाऱ्यांचा परिचय करून दिला.

हें प्राथमिक काम पुरें झाल्यावर श्री भुलाभाई यांनीं खटल्याच्या कामाला तीन आठवड्यांची तहकुबी मिळण्याचा अर्ज कोर्टाला सादर केला. ते म्हणाले कीं, आरोपींच्या बचावाला आवश्यक असलेली मदत ५ ऑक्टोबर पर्यंत मिळूं शकली नाहीं. ज्या पुराव्यावर आरोपींची भिस्त आहे तो इतका मोठा आहे कीं त्याची चांचपणी करून मूल्यमापन करणें आम्हांला शक्य झालें नाहीं व त्यामुळें आम्हांला आरोपींकडून

मिळालेल्या सूचना अपुऱ्या पडत आहेत. महत्वाच्या साक्षीदारांपैकीं मे. ज. पर्सीवल, ले. क. हंट हे इंग्लडांत, श्री गोहो व राघवन् हे मलायांत व ज. ऑंग सॉंग हे ब्रम्हदेशांत आहेत. त्यांच्या व कांहीं जपानी अधिकाऱ्यांच्या मुलाखती घ्यावयाच्या आहेत. आमचे एकंदर ११२ साक्षीदार असून पैकीं ८० साक्षीदारांच्या मुलाखती आम्हांला घेतां आल्या नाहींत. त्याशिवाय (त्यावेळचे फिल्ड मार्शल) ना. वॅव्हेल यांचा मलाया मोहिमेचा वृत्तांत व इतर कागदपत्रांची अजून आम्हांस तपासणी करावयाची आहे.

फिर्यादीचे वकील सर नोशिरवान एंजीनियर म्हणाले कीं आरोपींच्या बचावांत विघ्नें आणण्याची आपली इच्छा नाहीं. परंतु आपलें प्रास्ताविक भाषण होऊन आमच्या पहिल्या मुख्य साक्षीदाराची जबानी झाल्यावर खटल्याची तहकुबी मिळाल्यास बरें होईल. आमचे बहुतेक कागदपत्र हा साक्षीदार हजर करील.

त्यावर न्यायवकील म्हणाले कीं इतर कोर्टें व लष्करी कोर्टें यांत फरक आहे. या कोर्टांतील न्यायाधीशांना इतर कामें असतात. म्हणून काम एक-सारखें चालू रहाणें जरूर असतें. साक्षीदार तपासण्याची संधी आपल्याला मिळाली नाहीं असें आरोपी पक्षाचें म्हणणें असल्यामुळें खटला तहकूब होणें क्रमप्राप्तच आहे.

यानंतर या अर्जाचा विचार करण्यासाठीं न्यायाधीश आंत गेले व पांच मिनिटांनंतर येऊन पहिल्या साक्षीदाराच्या तपासणीनंतर खटला तहकूब ठेवण्याची त्यांनीं मंजुरी दिली. तहकुबीची मुदत मात्र आपण नंतर ठरवूं असें त्यांनीं सांगितलें.

## खटल्याची माहिती

त्यानंतर सर नोशिरवान यांनीं खटल्याची माहिती देण्यासाठीं आपलें प्रास्ताविक भाषण केलें. सुरवातीस आरोपींची ओळख करून देतांना ते म्हणाले :—

कॅ. शहानवाझ खान यांचा जन्म रावळपिंडीस ता० २४ जानेवारी १९१४ रोजीं झाला. डेहराडून येथील हिंदी लष्करी संस्थेंत शिक्षण

झाल्यावर त्यांना १९३६ साली कायमचें कमिशन देऊन फेब्रुवारी १९३७ मध्यें १४ व्या पंजाब पलटणींत त्यांची नेमणूक झाली.

कॅ. प्रेमकुमार सहगल हे जानेवारी १९१७ मध्यें होशियारपूर येथें जन्मले. त्यांनीं डेहराडूनला लष्करी शिक्षण घेतलें व १९४० सालीं १० बलूच पलटणींत त्यांची नेमणूक झाली.

ले. गुरुबक्षसिंग धीलन यांनीं डेहराडूनला लष्करी शिक्षण पुरें केलें व त्यांना एप्रिल १९४० मध्यें कमिशन मिळालें. त्यांचा जन्म लाहोर जिल्ह्यांत आलगोन येथें ४ एप्रिल १९१५ ला झाला.

ता. १५ फेब्रुवारी १९४२ रोजीं सिंगापूर जपान्यांना शरण आलें. ता. १७ फेब्रुवारीस सर्वयुद्धकैद्यांना सिंगापुरांतील फेरार पार्क मध्यें नेण्यांत आलें. त्या युद्धकैद्यांना उद्देशून जपानी अधिकारी मेजर फुजिवारा यांनीं भाषण केलें. नंतर १।१४ पंजाब रेजिमेंटचे अधिकारी कॅ. मोहनसिंग यांनीं त्यांना उद्देशून भाषण केलें. ते म्हणाले आम्ही आझाद हिंद फौज स्थापन करणार असून हिंदी स्वातंत्र्यासाठीं लढाई देणार आहोंत. तुम्ही या फौजेंत येऊन दाखल व्हा. नंतर १ सेप्टेंबर १९४२ ला आझाद फौजेची रीतसर उभारणी करण्यांत आली. मध्यंतरीच्या काळांत म्हणजे मार्च १९४२ मध्यें निसून युद्धकैद्यांच्या छावणीचे मुख्य अमलदार कॅ. शहानवाझखान यांनीं दोन-तीनशें अधिकाऱ्यांच्या एका सभेंत भाषण केलें. ते म्हणाले कीं कॅ. मोहन-सिंग यांच्या छावणीवर अधिकाऱ्यांची एक बैठक भरविण्यांत आली. तींत असा ठराव पास करण्यांत आला कीं आपण धर्मानें भिन्न असलों तरी पहिल्यानें हिंदी आहोंत आणि हिंदीस्वातंत्र्यासाठीं लढणें आमचें आज कर्तव्य आहे. कॅ. शहानवाझ यांनीं हा ठराव सर्व अधिकाऱ्यांना समजावून दिला आणि आपल्या हाताखालील लोकांस समजाऊन देण्यास त्यांना सांगितलें. नंतर १९४२ ला बँकॉकला पूर्व आशियांतील हिंदी प्रतिनिधींची व हिंदी लष्करी अधिकाऱ्यांची एक परिषद भरली. त्यांत कॅ. मोहनसिंग हजर होते व परिषदेचे अध्यक्ष श्री राशबिहारी बोस हे होते. या परिषदेंत अनेक ठराव पास झाले त्यांत कॅ. मोहनसिंग यांच्या हुकमतीखालीं आझाद हिंद फौजेची स्थापना करून हिंदी स्वातंत्र्यासाठीं लढण्याचा ठरावही होता...

सिंगापूर येथें हिंदी युद्ध कैद्यांना ज्या छावण्यांत ठेवण्यांत आलें होतें त्यांत बिदादारी छावणी, सेलेतार छावणी व क्रांजी छावणी या मुख्य होत्या. यांतील कैद्यांनीं आझाद फौजेंत सामील होण्याबद्दल प्रयत्न करण्यांत आले. त्यांना वाईट वागणूक व घाणेरडें अन्न देण्यांत येई. त्यांना जमिनीवर पाडून मारझोड करण्यांत येई व कांहींना श्रमाचीं कामें देण्यांत येत. यांमुळें कांहीं कैदी इतके निकरावर आले कीं असे हाल करण्यापेक्षां आम्हांस गोळी घालून ठार करा असें त्यांनीं सांगितलें.

यानंतर आरोपींवर ठेवण्यांत आलेल्या आरोपांच्या पुराव्याची प्रास्ताविक माहिती देऊन आणि त्या पुराव्याचें कार्यकारण सांगून सरकारी वकिलांनीं आपला साक्षीदार तपासण्याचें काम सुरू केलें.

## ले. डी. सी. नाग यांची साक्ष :

मी १९२० सालांत बंगालच्या मुलकीखात्यांत नोकरीस राहिलों व १९३४-३५ सालांत पहिल्या वर्गाचा मॅजिस्ट्रेट झालों. सन १९३८ मध्यें कमिशन देऊन मला कैरोला पाठविण्यांत आलें. पूर्वेकडील लढाईत मला पहिल्यानें पेनांगला व नंतर सिंगापूरला पाठविण्यांत आलें. सिंगापूरवर फेब्रुवारी १९४२ मध्यें झालेल्या जपानी हवाई हल्यांत मी जखमी झालों. शुश्रुषेसाठीं मला दवाखान्यांत नेल्यानंतर युद्धकैद्यांच्या छावणीवर पाठविण्यांत आलें. तेथें मला हिंदी स्वातंत्र्याच्या चळवळींसाठीं स्थापन होत असलेल्या आझाद हिंद फौजेची बातमी मिळाली. त्यावेळीं कॅ. शहानवाझ खान यांची व माझी पहिल्यानें भेट झाली. लढाईवर येण्यापूर्वी हिंदुस्थानांत मी मॅजिस्ट्रेट होतों ही बातमी आझाद हिंद फौजेच्या पुढाऱ्यांस मिळाल्यामुळें फौजेच्या न्यायखात्यावर माझी नेमणूक करण्यांत आली. या अधिकारावर असतांना मी आझाद फौजेचा कायदा तयार केला.

तिन्हीं आरोपींना बढतीच्या जागा दिल्याचे जनरल मोहनसिंग यांच्या सहीचे हुकूम व हिंदी स्वातंत्र्यासाठीं स्वेच्छेनें नांव दाखल केलेल्या अधिकाऱ्यांची व शिपायांची मिळून आझाद हिंद फौज निर्माण करण्यांत आल्याबद्दलचा मुख्य कारभारी कॅ. कियानी यांच्या सहीचा हुकूम मी दाखल करतों. माझ्या स्वतःच्या माहितीप्रमाणें सेप्टेंबर १९४२ मध्यें ह्या फौजेची संख्या दहा हजार होती व तिचे हिंदी क्षेत्ररक्षण दक्ष, पायदळ, माहितगार व मदतगार दळ असें भाग होते. त्यांच्याकडे बंदुका, भाले, पिस्तुलें वगैरे शस्त्रास्त्रें व रणगाडे आणि त्यांची वाहनें होतीं. तीं सर्व इंग्रजांचीं होतीं. जपानचीं नव्हती. आझाद फौजेचे बिल्ले लावलेले हिंदी सैन्याचे पेहराव ते वापरीत असत. त्यांतलें कांहीं बिल्ले मी दाखल करतो. हिंदी स्वातंत्र्य संघाच्या कार्यसमितीवर श्री रासबिहारी बोस अध्यक्ष, श्री मेनन, श्री

राघवन व श्री गुहा हे मुलकी सदस्य आणि कॅ. मोहनसिंग, ले. कर्नल गिलानी व ले. क. भोसले हे सेनासदस्य होते. आझाद फौजेची पहिली तुकडी ब्रह्मदेशांत पाठविण्यांत आली होती. १९४२ च्या डिसेंबर मध्यें जपान्यांनीं श्री मोहनसिंगांना पकडल्यानंतर मोहनसिंगाच्या हुकुमावरून आझाद फौज तोडण्यांत आली. त्यानंतर साधारणपणें एका आठवड्यानंतर ले. क. लोकनाथन व मेजर प्रकाशचंद्र यांची एक व्यवस्था-समिती स्थापण्यांत आली. फौजेंतील अधिकारी व शिपाई यांचे विचार समजून घेण्यासाठीं ठिकठिकाणीं सभा भरवून भाषणें करण्याची मोहिम सुरू करण्यांत आली. राशबिहारी बोस व ले. क. चतरजी यांच्या कांहीं भाषणांच्यावेळीं मी हजर होतों. युद्धकैदी म्हणून आम्हांस जपान ताब्यांत घ्यावयास तयार नव्हते. आझाद हिंद फौज पुन्हा स्थापन करून हिंदुस्थान देश स्वतंत्र करण्याचा उद्देश साध्य करून घ्यावा असें त्यांनीं आपल्या भाषणांत सांगितलें. कांहीं अधिकारी या गोष्टीस नाकबूल झाले व कांहींनीं राशबिहारींवर टीकेची झोड उठविली.

जानेवारी १९४३ मध्यें मी व माझ्या मताचे कांहीं अधिकारी यांनीं आम्हांला दिलेल्या पुनर्घटित सैन्यांत दाखल होण्याच्या प्रश्नपत्रिकांवर नकाराचें उत्तर दिलें. त्यावर राशबिहारीनी १३ फेब्रुवारी १९४३ ला काढलेल्या हुकमांत "बहुतेक सगळेच अधिकारी आझाद फौजेंत दाखल होऊन मायभूमीसाठीं लढण्यास तयार आहेत व कांहीं थोडे तयार नाहींत" असा उल्लेख केला होता. आझाद फौजेंत दाखल होण्यास तयार नसलेल्यांत कांहीं इंग्रजांविरुद्ध लढाई देण्यास भीत होते; कांहीं हिंदी राष्ट्र-सभेशीं सहमत नव्हते; कांहीं साम्राज्यान्तर्गत हिंदी स्वातंत्र्याच्या मताचे होते तर कांहीं चालू परिस्थितीमुळें दाखल होण्यास तयार नव्हते. हिंदुस्थानच्या संपूर्ण स्वातंत्र्यासाठीं हातीं घेतलेल्या या चळवळींत कितपत भाग घेणें योग्य आहे याचा या लोकांना विचार पडला होता. राशबिहारींबरोबर झालेल्या मुलाखतीनंतर मी व माझ्या बरोबरच्या लोकांना मेजर ओगावा नांवाच्या जपानी अधिकाऱ्यानें सिंगापूरांतील एका ठाण्यावर नेऊन ठेविलें. पुन्हां एकदोन ठाणीं फिरवून मला औषधोपचारासाठीं बिदादारी येथील रुग्णालयांत नेण्यांत आलें. तिथें एक महिना राहिल्यानंतर तेथील मुख्याधिकाऱ्यानें

## ले. डी. सी. नाग यांची साक्ष :

मी १९२० सालांत बंगालच्या मुलकीखात्यांत नोकरीस राहिलों व १९३४-३५ सालांत पहिल्या वर्गाचा मॅजिस्ट्रेट झालों. सन १९३८ मध्यें कमिशन देऊन मला कैरोला पाठविण्यांत आलें. पूर्वेकडील लढाईंत मला पहिल्यानें पेनांगला व नंतर सिंगापूरला पाठविण्यांत आलें. सिंगापूरवर फेब्रुवारी १९४२ मध्यें झालेल्या जपानीं हवाई हल्यांत मी जखमी झालों. शुश्रुषेसाठीं मला दवाखान्यांत नेल्यानंतर युद्धकैद्यांच्या छावणीवर पाठविण्यांत आलें. तेथें मला हिंदी स्वातंत्र्याच्या चळवळींसाठीं स्थापन होत असलेल्या आझाद हिंद फौजेची बातमी मिळाली. त्यावेळीं कॅ. शहानवाझ खान यांची व माझी पहिल्यानें भेट झाली. लढाईवर येण्यापूर्वी हिंदुस्थानांत मी मॅजिस्ट्रेट होतों ही बातमी आझाद हिंद फौजेच्या पुढाऱ्यांस मिळाल्यामुळें फौजेच्या न्यायखात्यावर माझी नेमणूक करण्यांत आली. या अधिकारावर असतांना मी आझाद फौजेचा कायदा तयार केला.

तिन्हीं आरोपींना बढतीच्या जागा दिल्याचे जनरल मोहनसिंग यांच्या सहीचे हुकूम व हिंदी स्वातंत्र्यासाठीं स्वेच्छेनें नांव दाखल केलेल्या अधिकाऱ्यांची व शिपायांची मिळून आझाद हिंद फौज निर्माण करण्यांत आल्याबद्दलचा मुख्य कारभारी कॅ. कियानी यांच्या सहीचा हुकूम मी दाखल करतों. माझ्या स्वतःच्या माहितीप्रमाणें सेप्टेंबर १९४२ मध्यें ह्या फौजेची संख्या दहा हजार होती व तिचे हिंदी क्षेत्ररक्षण दक्ष, पायदळ, माहितगार व मदतगार दळ असे भाग होते. त्यांच्याकडे बंदुका, भाले, पिस्तुलें वगैरे शस्त्रास्त्रें व रणगाडे आणि त्यांची वाहनें होतीं. तीं सर्व इंग्रजांचीं होतीं. जपानचीं नव्हती. आझाद फौजेचे बिल्ले लावलेले हिंदी सैन्याचे पेहराव ते वापरीत असत. त्यांतलें कांहीं बिल्ले मी दाखल करतो. हिंदी स्वातंत्र्य संघाच्या कार्यसमितीवर श्री राशबिहारी बोस अध्यक्ष, श्री मेनन, श्री

राघवन व श्री गुहा हे मुलकी सदस्य आणि कॅ. मोहनसिंग, ले. कर्नल गिलानी व ले. क. भोसले हे सेनासदस्य होते. आझाद फौजेची पहिली तुकडी ब्रह्मदेशांत पाठविण्यांत आली होती. १९४२ च्या डिसेंबर मध्यें जपान्यांनीं श्री मोहनसिंगांना पकडल्यानंतर मोहनसिंगाच्या हुकुमावरून आझाद फौज तोडण्यांत आली. त्यानंतर साधारणपणें एका आठवड्यानंतर ले. क. लोकनाथन व मेजर प्रकाशचंद्र यांची एक व्यवस्था-समिती स्थापण्यांत आली. फौजेंतील अधिकारी व शिपाई याचे विचार समजून घेण्यासाठीं ठिकठिकाणीं सभा भरवून भाषणें करण्याची मोहिम सुरू करण्यांत आली. राशबिहारी बोस व ले. क. चतरजी यांच्या कांहीं भाषणांच्यावेळीं मी हजर होतों. युद्धकैदी म्हणून आम्हांस जपान ताब्यांत घ्यावयास तयार नव्हतें. आझाद हिंद फौज पुन्हा स्थापन करून हिंदुस्थान देश स्वतंत्र करण्याचा उद्देश साध्य करून घ्यावा असें त्यांनीं आपल्या भाषणांत सांगितलें. कांहीं अधिकारी या गोष्टीस नाकबूल झाले व कांहींनीं राशबिहारींवर टीकेची झोड उठविली.

जानेवारी १९४३ मध्यें मी व माझ्या मताचे कांहीं अधिकारी यांनीं आम्हांला दिलेल्या पुनर्घटित सैन्यांत दाखल होण्याच्या प्रश्नपत्रिकांवर नकाराचें उत्तर दिलें. त्यावर राशबिहारीनी १३ फेब्रुवारी १९४३ ला काढलेल्या हुकमांत " बहुतेक सगळेच अधिकारी आझाद फौजेंत दाखल होऊन मायभूमीसाठीं लढण्यास तयार आहेत व कांहीं थोडे तयार नाहींत " असा उल्लेख केला होता. आझाद फौजेंत दाखल होण्यास तयार नसलेल्यांत कांहीं इंग्रजांविरुद्ध लढाई देण्यास भीत होते; कांहीं हिंदी राष्ट्र-सभेशीं सहमत नव्हते; कांहीं साम्राज्यान्तर्गत हिंदी स्वातंत्र्याच्या मताचे होते तर कांहीं चालू परिस्थितीमुळें दाखल होण्यास तयार नव्हते. हिंदुस्थानच्या संपूर्ण स्वातंत्र्यासाठीं हातीं घेतलेल्या या चळवळींत कितपत भाग घेणें योग्य आहे याचा या लोकांना विचार पडला होता. राशबिहारींबरोबर झालेल्या मुलाखतीनंतर मी व माझ्या बरोबरच्या लोकांना मेजर ओगावा नांवाच्या जपानीं अधिकाऱ्यानें सिंगापूरांतील एका ठाण्यावर नेऊन ठेविलें. पुन्हां एकदोन ठाणीं फिरवून मला औषधोपचारासाठीं बिदादारी येथील रुग्णालयांत नेण्यांत आलें. तिथें एक महिना राहिल्यानंतर तेथील मुख्याधिकाऱ्यानें

औषधोपचाराविरहित अशा एकांतांत मला ठेवण्यांत येणार असल्याचें सांगितलें. अशा परिस्थितींत राहतां येणें मला अशक्य वाटल्यामुळें एप्रिल १९४३ मध्यें न्यायवकील म्हणून मी आझाद फौजेंत पुन्हां दाखल झालों.

ही फौज निराळी होती. त्यांतील लष्करी खात्यांत कॅप्टन शहानवाझखान हे मुख्य व्यवस्थापक, कॅप्टन सहगल हे लष्करी कार्यवाह वगैरे अंमलदार होते. जुलै १९४३ मध्यें श्री सुभाषचंद्र बोस सिंगापूरला आले व त्यांनीं आझाद हिंद फौजेचे व हिंदी स्वातंत्र्यसंघाचे सर्वाधिकार आपल्या हातांत घेतले.

त्याप्रसंगीं सुभाषचंद्रांनीं एक जाहिरपत्रक काढलें होतें.

हिंदी लष्करी कायद्याच्या अनुरोधानें मी आझादलष्करी कायदा तयार केल्यावर त्यांत शिस्तभंगाबद्दल फटक्यांची शिक्षा देण्याबद्दल व इतर गुन्ह्यांस देण्यांत यावयाच्या शिक्षेबद्दल दुरुस्त्या करण्यांत आल्या व कॅप्टन हबिबुर रहमान यांच्या सांगण्यावरून या कायद्यावर मी एक लेखी वृत्तांत सादर केला.

आझाद फौजेंत शेवटीं ४०,००० सैन्य होतें. फेब्रुवारी १९४४ मध्यें फौजेचें मुख्य ठाणें रंगूनला व मागचें ठाणें सिंगापूरला होतें. मार्चमध्यें मी रंगूनला आलों त्यावेळीं पायदळाच्या एक ते चार नंबरच्या तुकड्या, बहादुर सैन्याची पहिली व दुसरी तुकडी व माहितगार सैन्यें ब्रह्मदेशांत होतीं. पायदळाच्या तीन तुकड्या मणिपूर व आराकान भागात पसरविण्यांत आल्या व चौथी मंडालेवर ठेवण्यांत आली. रंगूनहून मियामोला आल्यानंतर आझाद सैन्याच्या ताब्यातील मुलुखाचे नियोजित गव्हर्नर ले. क. चतरजी यांनीं राज्यव्यवथेचे नियम व कायदे तपासून पहाण्याचें काम मला दिलें. तें पुरें झाल्यावर पुन्हा मी रंगूनला आलों. श्री सुभाषचंद्र बोस मे महिन्यांत रंगूनला आले. खटले चालविणें, शिस्त लावणें, कामें नेमून देणें, बदल्या करणें व सुव्यवस्था ठेवणें ही कामें माझ्याकडे होतीं.

जुलै १९४४ मध्यें पायदळ पलटणी माघार देऊन मंडालेस आल्या.

ता. १ ऑगस्ट १९४४ रोजीं सुभाषचंद्र बोस यांच्या सहीनें निघालेली युद्धवार्ता मी दाखल करितों. तिचा सारांश खालीलप्रमाणें आहे:—

"मार्च १९४४ मध्यें आझाद हिंद फौजेनें जपानी सैन्याबरोबर आघाडीवर कूच करून हिंदीस्वातंत्र्याची लढाई प्रत्यक्ष हिंदुस्थानांत दिली. आपल्या लढाईला परकी लष्कराची मदत घेऊन ब्रिटिशांनीं आमच्या विरुद्ध जोरदार फळी निर्माण केली. हिंदुस्थानच्या हद्दींत चाल करून जाऊन शत्रूच्या बलवान आणि सुसज्ज सैन्याची आमच्या सैन्यानें ठिकठिकाणीं दाणादाण उडवून प्रत्येक लढाईंत त्यांचा पाडाव केला.

जादा युद्धशिक्षण, शिस्त आणि निष्ठा या गुणांच्या जोरावर आमच्या लष्करानें शत्रूवर आपलें वर्चस्व स्थापिलें आणि प्रत्येक लढाईंत शत्रुसैन्याचे धैर्य खचून जाऊं लागलें. अत्यंत आणीबाणीच्या परिस्थितींत लढाई देऊन आमच्या लष्कराचे अधिकारी व शिपाई यांनीं दाखविलेलें धैर्य आणि मिळविलेला पराक्रम यांबद्दल त्यांस धन्यवाद मिळाले आहेत. त्यांनीं आपल्या रक्तानें आणि स्वार्थत्यागानें निर्माण केलेली परंपरा अभिमानास्पद आहे.

संपूर्ण साहित्यानिशीं इंफालच्या आघाडीवर शेवटचा हल्ला करण्यासाठीं आम्ही तयारींत होतों. परंतु मुसळधार पावसानें आम्हांस रोखून धरलें आणि इंफाल काबीज करण्याचे लष्करी डावपेंच खेळणें अशक्य होऊन गेलें. निसर्गाच्या अडथळ्यामुळें आमची मोहिम थांबवावी लागली. मोहिम थांबवूनही आपल्या फळीला चिकटून बसणें आम्हांस गैरफायद्याचें वाटलें आणि अधिक बचावाची जागा रोखून धरण्यासाठीं आमच्या सैन्याला माघार देण्याचें आम्हीं ठरविलें.

आमची मोहीम पुन्हा चालू करण्यासाठीं लागणाऱ्या साधनसामुग्रीसाठीं आम्ही मध्यंतरीचा काळ खर्च करणार आहोंत. निरनिराळ्या भागांत शत्रूला एकदां मार दिल्यानंतर आमच्या अंतिम विजयाची आणि इंग्रज-अमेरिकन सैन्याच्या नाशाची आमची खात्री दसपट वाढली आहे. आमची तयारी झाल्यावर पुन्हा एकदां आमच्या शत्रुसैन्यावर आम्ही जोराची स्वारी करणार आहों. आमचें युद्धनैपुण्य, आमचें अतुल धैर्य आणि आमची अमोघ निष्ठा यांच्या जोरावर आम्ही विजय खेंचून आणूं."

## शत्रुविनाश पदक

इंग्रज किंवा अमेरिकन लष्करी अधिकाऱ्याला ठार मारून अगर जिवंत

पकडून उल्लेखनीय शौर्य आणि धीरोदात्त व्यक्तिमत्व व्यक्त करून दाखविणाऱ्या लष्करी शिपायाला बहाल करावयाचें "शत्रुविनाश" पदक जाहिर करण्यांत आल्याचा हुकूम मी दाखल करितों. हिंदी स्वातंत्र्याच्या आड येणाऱ्या कोणाही इंग्रज अगर अमेरिकन मनुष्याला पकडून किंवा ठार मारून हिंदी स्वातंत्र्याच्या लढ्यांत मदत करणाऱ्या हिंदुस्थानातील अगर हिंदुस्थानाबाहेरील कोणाही मनुष्याला हें पदक देण्यांत यावयाचें होतें.

आझाद हिंदसरकारची युद्धसमिती स्थापन करण्यांत आल्याचें जाहिरपत्रक लष्करी कार्यवाह कॅ. सहगल यांच्या हुकुमावरून ले. अझीझ अहमदखान यांनीं ३० आक्टोबर १९४४ रोजीं प्रसिद्ध केलें तें मी दाखल करितों.

ता. १३ मार्च रोजीं सुभाषचंद्र बोस यांनीं जाहिर केलेला हुकूम मी दाखल करितों. आझाद हिंद फौजेंत भ्याडवृत्ति अगर फसवेगिरी नष्ट करण्यासाठीं अमलांत यावयाचे उपाय यांत लिहिलेले आहेत. "ज्यांची इच्छा नसेल त्यांनीं आठ दिवसांच्या आंत फौज सोडून जावें. त्या मुदतीनंतर भ्याड आणि फसवे जे कोणी सांपडतील त्यांना देहांताची शिक्षा देण्यांत येईल. या साफसफाईनंतर हिंदभूमी स्वतंत्र होईपर्यंत मी धैर्यानें आणि शौर्यानें लढेन अशी शपथ प्रत्येक सैनिकाला घ्यावी लागेल. आझाद हिंद फौज आणि हिंदी राष्ट्र यांच्या अब्रूचे आणि मालमत्तेचे आपण रक्षक आहोंत याची प्रत्येक आझाद शिपायाला जाणीव असली पाहिजे."

ता. १३ मार्चला कॅ. शहानवाझखान यांनीं काढलेला हुकूम मी दाखल करितों. या हुकुमांत जादा कामाच्या तुकडीला "बहादुर तुकडी" असें संबोधण्यांत येईल व प्रत्येक शिपायाला या फरकाचें वैशिष्ट्य समजावून देण्यांत यावें असें लिहिलें आहे. या तुकडीला शत्रूंत हेरगिरी करणें, घातपात करणें आणि फूट पाडणें ही जादा कामें देण्यांत आलीं होतीं.

( आणखी कांहीं हुकूम दाखल करण्यांत आल्यावर फिर्यादीचे वकील सर एंजीनियर यांनीं कॅ. शहानवाझ खान यांच्या डायरींतील १० फेब्रुवारी १९४४ पासूनचीं पानें, कॅप्टन सहगल यांचा ता. १६ जून १९४४ चा युद्धवृत्तांत, त्यांच्या डायरींतील कांहीं उतारे, आझाद फौजेनें पकडलेल्या इंग्रज युद्धकैद्यांचे लेखीवृत्तांत आणि सुभाषचंद्र बोस यांनीं ले. धीलन यांना

ता. १२ मार्च १९४५ रोजीं रंगूनमधून लिहिलेलें पत्र व इतर कागदपत्र कोर्टात दाखल केले.) सुभाषचंद्रांच्या पत्रांतील कांहीं मजकूर खालील प्रमाणें होता :—

"आमचें कांहींही होवो परंतु जगांतील कोणतीहि शक्ति हिंदुस्थानला ह्यापुढें दास्यत्वांत ठेऊं शकणार नाहीं. आम्ही जगूं अगर लढाईत मरूं. परंतु आम्ही हातीं घेतलेलें कार्य विजयी राहील. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याच्या मार्गाकडेच परमेश्वराचें बोट आहे. आमचें कार्य फक्त त्या मार्गानें जाऊन स्वातंत्र्याची किंमत भरपाई करण्याचें आहे. आपल्या आणि आपल्या मदतनीसांच्या कार्याकडे माझें लक्ष आहे. आपल्याला, आपल्याकडील अमलदारानां आणि सैनिकांना मी अभिनंदन करित आहें. जय हिंद... सुभाषचंद्र बोस"

या पत्राला ले. धीलन यांनीं २० मार्च १९४५ ला उत्तर दिलें. त्यांतील कांहीं मजकूर कोर्टात वाचून दाखविण्यांत आला तो :—

"माझ्या शब्दांपेक्षां माझे अश्रूच माझी मनोभावना व्यक्त करूं शकतील. आपणहोऊन वचन दिलेलें कार्य मी पुरें करूं शकलों नाहीं. फक्त माझी या पुढील कामगिरीच आपण पहावी."

या पत्रापूर्वी ले. धीलन यांनीं पाठविलेल्या लढाईच्या वृत्तांतात सेकंड ले. ग्यानसिंग आणि सेकंड ले. मंगूराम यानीं लढाईत अतुल शौर्य दाखवून मृत्यूला कवटाळल्याबद्दल त्यांच्या स्मृतीला योग्य भूषणें बहाल करण्यांत यावीं या बद्दल केलेली शिफारस दाखल करून घेण्यांत आली. ही लढाई आझाद फौजची एक तुकडी व इंग्रजांची,१५ रणगाडे, ११ तोफगाड्या व १० मालगाड्या घेऊन येणारी टोळी यांमध्यें न्याउंगू येथें झाली.

( फिर्यादीपक्षातर्फे कॅप्टन सहगल यांच्या हस्ताक्षरांत असलेल्या एका चोपडीचीं सुटीं पानें दाखल करण्यांत आलीं तेव्हां दोन्ही पक्षांच्या वकिलांत खटका उडाला. )

**श्री देसाई** : याचीं बाकीचीं पानें कुठें दिसत नाहींत तीं ?

**सर इंजिनियर** : अशाच स्थितींत ही चोपडी आमच्या हातीं आली. बाकीचा भाग खटपट करूनही मिळूं शकला नाहीं.

**श्री देसाई :** पण येवढींच पानें मुद्दाम उठविण्यांत आल्यासारखीं दिसतात तीं ?

**सर इंजिनियर :** असें म्हणण्याचें कांहीं कारण नाहीं.

'( रागानें ) ही सूचना अयोग्य नाहीं का ?

**न्यायवकील :** ही बाब बचावाच्या भाषणांत घ्यावी.

## आझाद फौजेचीं शूर कृत्यें

सुभाषचंद्र बोसनीं ९ फेब्रुवारी १९४४ ला काढलेली जादा युद्धवार्ता मी दाखल करितों. (त्यांतील कांहीं मजकूर कोर्टांत वाचून दाखविण्यांत आला.) त्यांत बोसनीं आराकान आघाडीवर दाखविलेल्या अतुल पराक्रमाबद्दल फौजेचें अभिनंदन केलें आहे. "स्वातंत्र्य किंवा मरण" हें तुमचें ध्येय आहे असें लिहून शेवटीं स्वातंत्र्याचा मार्ग दिल्लीच्या रस्त्यानें जातों. यश आमचेंच आहे. "इन्किलाब झिंदाबाद ! आझाद हिंद झिंदाबाद" असें उद्गार काढून युद्धवार्ता पुरी केली आहे.

एप्रिल १९४५ पर्यंतचे आझाद हिंद सैन्याचे कागदपत्र माझ्या माहिती प्रमाणें रंगूनला इंग्रज आले त्यावेळीं नाश करून टाकण्यांत आले.

यानंतर सर तपासणी पुरी झाल्यामुळें उलट तपासणीसाठीं कोर्ट २१ नोव्हेंबर १९४५ ला उघडलें.

### उलट तपासणीः

आझाद फौजेचा न्यायवकील आणि दुय्यम कारभारी या दोन अधिकारांत आझाद फौजेंत मी काम केलें. आझाद फौजेच्या लष्करी कायद्याप्रमाणें व्यवस्था सांभाळणें, खटले भरविणें, तक्रारींची चौकशी करणें व सर्वसाधारणपणें कायद्याचा सल्ला देणें हीं कामें माझ्याकडे होती. आझाद हिंद सरकारचा कायदेसल्लागार मी नव्हतो. फक्त फौजेचा होतो. श्री सरकार या नांवाचें पूर्वी बंगालच्या मुलकी खात्यांत असलेले एक अधिकारी सरकारचे कायदेसल्लागार होते व त्या कामाला ते लायक होते.

**प्रश्न :** आपण आपली आझाद फौजेंतील नौकरी स्वेच्छेनें पत्करली होती काय ?

**उत्तरः** होय. माझें पहिलें काम लष्करी कायदा तयार करण्याचें होतें.

**प्रश्नः** सुरवातीपासून अखेरपर्यंत या कायद्याप्रमाणें लष्कराचें काम चाललें होतें काय ?

**उत्तरः** होय. सुधारलेल्या राष्ट्रांच्या कायद्याप्रमाणें आझाद सैन्याची संघटना झाली होती आणि तोच उद्देश या कायद्याच्या मुळाशीं होता.

ता. २१ ऑक्टोबर १९४३ रोजीं सिंगापूरला भरलेल्या परिषदेस मी हजर होतों. आझाद सैन्यांतील अधिकारी व शिपाई, हिंदी लोक व कांहीं जपानी हजर होते. परिषदेंत आझाद हिंदुस्थानच्या तात्पुरत्या सरकारची स्थापना घोषित करण्यात आली. या सभेस थायलंड, जावा, सुमात्रा, इंडोचायना, हाँगकाँग, मलाया वगैरे पूर्व आशियांतील देशांचे हिंदी प्रतिनिधी हजर होते. मी सेप्टेंबर १९४२ मध्यें पहिल्यानें आझाद फौजेंत दाखल झालों. त्यावेळे-पासून मला हिंदी स्वातंत्र्य-संघाबद्दल माहिती होती. परिषदेस फक्त प्रेक्षक म्हणून मी हजर होतों.

सुभाषचंद्रानीं नेमलेल्या मंत्रिमंडळानें त्यावेळीं देशनिष्ठेची शपथ घेतली हें मला ठाऊक आहे. प्रतिनिधींनीं त्यांत भाग घेतला नव्हता. त्यांनीं फक्त आझाद हिंद सरकारच्या घोषणेंत भाग घेतला. परिषदेला जवळ जवळ पांच हजार प्रतिनिधी हजर होते. आझाद हिंदुस्थानच्या तात्पुरत्या सरकारच्या स्थापनेची घोषणा स्वतः सुभाषचंद्रानीं केली होती.

**प्रश्नः** सुभाषचंद्रांच्या प्रत्यक्ष विश्वासांत आपण होतां काय ?

**उत्तरः** माझा त्यांच्याशीं प्रत्यक्ष संबंध आला नाहीं.

**प्रश्नः** तुमची त्यांची भेट अगर संभाषण कधींच झालें नाहीं असें आपण म्हणतां काय ?

**उत्तरः** शिस्तभंगाच्या एकदोन खटल्यांच्या बाबतींत त्यांचें व माझें दोन वेळ बोलणें झालें होतें.

**प्रश्नः** मियामोला एप्रिल १९४४ मध्यें सुभाषचंद्र होते त्याच घरांत आपण राहात होतेत ना ?

**उत्तर:** होय. एप्रिल व मे महिन्यांत दोन वेळ त्यांच्याशीं माझें बोलणें झालें.

**प्रश्नः** आपण त्यांच्याबरोबर रहात होतां व जेवतही होतां ?

**उत्तर :** होय.

**प्रश्न :** मग ह्या गोष्टि मुकेपणानेंच होत होत्या काय ?

**उत्तर :** नाहीं. परंतु त्यांच्याशीं संभाषण करण्याची मला संधी आली नाहीं.

## आझाद हिंद बँक

एप्रिल १९४४ मध्यें मी रंगूनला आल्यावर आझाद हिंद बँकेची मला माहिती मिळाली. आझाद हिंद सरकारला पूर्वआशियांतील हिंदी लोकांनीं फार मोठ्या रकमा व वस्तू देणगीदाखल दिल्या होत्या व त्या सर्व आझाद हिंद बँकेंत ठेवण्यांत आल्या होत्या. देणगीच्या रोख रकमा कोटींनीं मोजतां येण्यासारख्या होत्या, परंतु त्या किती कोटींच्या होत्या हें मला सांगतां येत नाहीं. देणगीच्या वस्तूंची किंमतही फार मोठी होती. फक्त एकदोन वेळां सभेच्या वेळीं देणग्या मिळत असतांना मी हजर होतों.

**न्यायवकील :** ऐकींव गोष्टी सांगूं नका.

**श्री देसाई :** ब्रह्मदेशाचा कबजा घेतांना सरकारनेंच आझाद हिंद सरकारचे कागदपत्र, फौजेचे कागदपत्र, फौजेचे अधिकारी या सर्वांचा कायदेशीर अगर बेकायदेशीर ताबा घेतला. अशा स्थितींत शिल्लक राहून मिळालेल्या छापील कागदपत्रकांचीच आम्ही दखल घेणार. म्हणून या साक्षीदाराकडून जास्तींतजास्त माहिती मला मिळवावयाची आहे.

**न्यायवकील :** उलटपक्षीं साक्षीदाराच्या ऐकींव गोष्टी आपण विचारूं शकत नाहीं.

आझाद सरकारला मिळालेल्या मदतीवर अझादफौज चालत होती. ते पैसे बँकेकडून येत होते किंवा नाहीं हें मी सांगूं शकत नाहीं. परंतु आझाद सरकारच्या अर्थखात्याकडून फौजेचा पगार व खर्च नियमितपणें चालला होता. अर्थखात्याचे हिशेब तपासनीस मेजर मूर्ती हे होते व मेजर चतर्जी अर्थमंत्री होते. नंतर त्यांची जागा श्री राघवन् यांना मिळाली.

अझाद सरकाराच्या ताब्यांतील मुलखाची व्यवस्था गव्हर्नर ले. क. चतरजी यांच्याकडे होती व त्या प्रांताच्या राज्यव्यवस्थेचे कायदे श्री सरकार ह्यांनीं तयार केले होते. ते पहाण्यांत मी पांच आठवडे खर्च केले व ते कायदे चांगले होते असें माझें मत झालें. काळ्या पाण्यावरील अंदमान व निकोबार बेटें आझाद सरकाराच्या ताब्यांत देण्यांत आलीं होतीं व त्यांची व्यवस्था ले. क. लोकनाथन यांच्याकडे सोंपविण्यांत आली होती. ते आजारी पडून परत आल्यानंतर त्यांच्या गैरहजेरींत मेजर आळवी काम पहात होते.

**प्रश्नः** तुमच्या पसंतीस आलेल्या कायद्यांप्रमाणें ह्या बेटांची व्यवस्था चालली होती काय ?

**उत्तरः** असें मला वाटत नाहीं.

**प्रश्नः** ब्रह्मदेशांतील झियावादी प्रदेश आझाद सरकाराकडे होता हें आपल्याला माहित आहे काय ?

**उत्तरः** नाहीं.

## आझाद फौजेचें सरकारी पत्रक ( ग्याझेट )

आझाद सरकारनें केलेल्या नेमणुका आझाद सरकारी पत्रकांत आणि लष्करी नेमणुका आझादफौज पत्रकांत प्रसिद्ध होत असत.

आझाद लष्कर व जपानी लष्कर यांचे परस्पर संबंध दोस्तीचे होते. त्यांच्या संयुक्त कार्यक्रमांची मला माहिती नाहीं; परंतु जपानच्या संयुक्त अधिकाऱ्यांपैकीं मेजर जनरल यामाशिटा व ले. क. ओगावा ह्यांची मला माहिती आहे. या जपानी संयुक्त सैन्याला हिकारी-किकान असें नांव होतें.

## ब्रिटन विरुद्ध लढाईचा पुकार

आझाद सरकारच्या स्थापनेनंतर ब्रिटन व अमेरिका यांच्यां विरुद्ध लढाई पुकारण्यांत आली.

जपानी सरकारनें आपले परराष्ट्रवकील म्हणून मि. हाचिया यांनां आझाद सरकारकडे पाठविलें होतें. या सरकारला जपान, जर्मनी, इटाली, थायलँड, फिलिपाईन, क्रोशिया, मांचुरिया व ब्रह्मदेश यांनीं मान्यता दिली होती. आयर्लंडमधील प्रजासत्ताकानें अशी मान्यता दिल्याचें मला माहित नाहीं.

आझाद हिंद सैन्याचा मुख्य उद्देश हिंदी स्वातंत्र्यासाठीं इंग्रजांविरुद्ध लढण्याचा होता.

**न्यायवकील :** बिदादारी येथील रुग्णालय सोडल्यानंतर स्वेच्छेनें आपण आझाद फौजेंत आलां काय ?

" नाहीं. "

**न्यायवकील :** मग फौजेंत आल्यानंतर स्वेच्छेनें आपण राहिलां काय ?

" होय. "

आझाद फौजेचें सर्व शिक्षण हिंदी अधिकाऱ्यांनीं पूर्ण केलें. त्यांत जपानी अधिकाऱ्यांचा हात नव्हता. आझाद फौजेचें निशाण हिंदी राष्ट्रसभेच्या निशाणासारखें होतें. जपानी बिल्ल्यांहून निराळे बिल्ले ते वापरीत असत. त्या बिल्ल्यांवर आडवीं निशाणें व मध्यें तपकिरी रंगाचा तारा होता. त्या बिल्ल्यांची जपानी बिल्ल्यांशीं साम्यता वाटल्यामुळें पहिल्या आझाद सैन्यानें ते वापरण्याचें नाकारलें होतें म्हणून त्यांचा उपयोग दुसऱ्या आझाद सैन्यांत करण्यांत आला नव्हता. रंगून व अंदमान यांचे दरम्यान दळणवळणाच्या सोई नव्हत्या. यावरून मला पसंत ठरलेल्या राज्यव्यवस्थेच्या नियमांप्रमाणें तेथील व्यवस्था चालत नव्हती असें मी मघाशीं म्हणालों होतों. त्या व्यवस्थेचें प्रत्यक्ष ज्ञान मला नाहीं.

**श्री देसाई :** आपल्या स्वतःच्या सरकारच्या हुकमतीखालीं अझाद सैन्य हिंदुस्थानांत गेल्यावर शत्रूशीं लढाई देईल आणि काबीज झालेला मुलूख आपोआप आमच्या हुकमतीखालीं येईल असें एका सभेंत सुभाषबाबूंनीं जाहिर केलें होतें ?

**उत्तर :** होय.

२१ ऑक्टोबर १९४३ ला भरलेल्या एका सभेंत " वन्दे मातरम् " हें राष्ट्रगीत म्हटलें गेलें होतें. परंतु त्यानंतर एक विशिष्ट राष्ट्रगीत बसविण्यांत आलें.

मला आतां येथें दाखविण्यांत आलेलीं छायाचित्रें मी ओळखतों. एकांत

आझाद हिंदुस्थानच्या स्थापनेच्या वेळचा प्रसंग आहे. दुसऱ्यांत सुभाषबाबूंच्या शपथविधीचें चित्र आहे. तिसऱ्यांत सुभाषबाबू व त्यांचे मंत्री यांचीं छायाचित्रें आहेत. ले. क. भोंसले, मे. कियानी, ले. क. लोकनाथन, कॅ. सहगल, मे. राजू हे या छायाचित्रांत आहेत व चवथ्यांत सुभाषबाबू व त्यांचे मंत्री सिंगापूरच्या क्रीडांगणावर लष्कराची सलामी घेत आहेत असा प्रसंग आहे.

"जय हिंद" अगर "आझाद हिंद" या नांवाचें आझाद हिंद सरकारचें साप्ताहिक निघत होतें. "पूर्ण स्वराज्य" म्हणून दैनिक निघत होतें किंवा नाहीं तें मला माहित नाहीं.

लेफ्टनंटला दरमहा पगार ८० रुपये, कॅप्टनला १२० रुपये, मेजरला १८० रुपये मलायामध्यें मिळत असत व ब्रम्हदेशांत मेजरला २३०—२३५ लेफ्टनंट कर्नलला ३३० व कर्नलला ४०० रुपये पगार होता.

सध्या मी दिल्लीच्या मुख्य ठाण्यावर आहें. मला अमूकच असें कांहीं काम नाहीं; परंतु साक्षीदार म्हणून मला येथें ठेऊन घेतलें आहे. तपासणीच्या कामांत अधिकारी लोक मला येऊन भेटत असतात.

**प्रश्न :** आझाद फौजेच्या ह्या व इतर खटल्यांत साक्षीदार म्हणून आपणास अटकलें आहे काय ?

**उत्तर :** नाहीं.

**प्रश्न :** इंग्रजानीं रंगूनचा पुन्हा ताबा घेतल्यानंतर कांहीं खून झाल्याचें आपण ऐकलें आहे काय ?

**उत्तर :** नाहीं.

**प्रश्न :** रंगून काबीज केल्यानंतर शहरांत शांतता राखण्यासाठीं आझाद फौजेला पाचारण करण्यांत आलें होतें त्याच्याशीं आपला संबंध होता काय ?

**उत्तर :** नाहीं.

**प्रश्न :** रंगून येथील श्रीहबीब या गृहस्थांना हिंदीस्वातंत्र्य-संघाला १ कोटी रुपयांची देणगी दिल्याबद्दल **सेवक-इ-हिंद**

पदक बहाल करण्यांत आलें होतें हें आपणास माहित आहे काय ?

**उत्तर :** पदक देतांना मी हजर होतों. देणगीच्या रकमेचा आंकडा मला माहित नाहीं. परंतु कित्येक लाखांची ती फार मोठी देणगी होती.

न्याय वकिलांच्या प्रश्नास उत्तर देतांना ले. नाग म्हणाले कीं सैन्याचा पत्रव्यवहार तपासण्याचें काम माझ्याकडे होतें. त्यांत ले. धीलनचा खासगी पत्रव्यवहार मी तपासला होता.

मार्च १९४५ मध्यें कॅ. शहानवाझ खान, नं. २ विभागाचे मुख्य, कॅ. सहगल, पायदळ पलटणींचे मुख्य व ले. धीलन, नं० ४ च्या पायदळाचे मुख्य होते. नेहरू पलटण खेरीज करून नं० १ च्या पायदळाची संख्या थोडी होती.

नं. १ च्या पलटणींची संख्या मणिपूरच्या युद्धानंतर कमी झाली. नं० २ च्या पलटणी जशाच्या तशाच भरलेल्या होत्या आणि त्या मलायाहून नुकत्याच ब्रम्हदेशांत आणलेल्या होत्या. नं० ३ च्या पलटणी मलायांतील हिंदी लोकांच्या होत्या.

ता. २२ नोव्हेंबर १९४५ रोजीं फिर्यादीतर्फे पुढील साक्षीदार तपासण्यांत आले. त्यांपैकीं मुख्य साक्षीदार कॅप्टन धारगळकर हे होते.

## कॅ. धारगळकर यांची साक्ष

माझें सँढर्स्टचें लष्करी शिक्षण पुरें झाल्यावर जानेवारी १९३१ ला पुण्याच्या तिसऱ्या घोडदळ पलटणींत मी दाखल झालों. त्याच पलटणींत मी शेवटपर्यंत होतों. मलायाच्या मोहिमेंत डिसेंबर १९४१ पासून फेब्रुवारी १९४२ पर्यंत मी लढलों. १८ फेब्रुवारी १९४२ला माझी तुकडी निसून ठाण्यावर नेण्यांत आली. तिथें जाईपर्यंत आझाद फौजेबद्दल मला कांहींच माहिती नव्हती. आझाद फौजेंत सामील न होण्याबद्दल माझ्या पलटणीला व माझ्याशीं विचारणा करणाऱ्या लोकांना मी नेहमीं परावृत्त करीत असें. निसून ठाण्यावर तीन दिवस पर्यंत मला एकान्तांत दाबून ठेवण्यांत आलें.

[stamp]

नंतर मला माझ्या तुकडीसह बिदादारी ठाण्यावर नेण्यांत आलें. बुलर ठाण्यावर मध्यंतरीचे १० दिवस मी घालविले. ते सोडल्यास बिदादारी ठाण्यावर २१ मार्च १९४२ पर्यंत मी होतों.

बुलर ठाण्यावर असलेले सात ते दहा हजार लोक ता. १ एप्रिलला थायलँड मधील एका युद्धकैद्यांच्या ठाण्यावर नेण्यांत आले. त्या ठिकाणीं मी मुख्य अधिकारी होतों व एक जपानी संलग्न अधिकारी होता. त्या ठिकाणीं आठ ब्रिटिश कमिशनें घेतलेले अधिकारी होते. ता २१ एप्रिलला इतर पांचजणांबरोबर मला केंपियाकी येथें नेण्यांत आलें. त्या ठिकाणीं जपानी गुप्त पोलीस ठाणें असावें असें मला वाटतें.

**अॅ. जनरल:** आपण काय सांगतां हें आपल्याला नक्की कळत नसल्यास जपानच्या गुप्त पोलिसांच्या गोष्टी बोलूं नका.

नंतर सफेत कपड्याचा बुरखा असलेल्या एका गाडींतून आम्हांला रातोरात हालविण्यांत आलें......

**श्री देसाई:** आरोपींशीं संबंध नसलेल्या बऱ्याचशा गोष्टी येथवर कॅ. धारगळकरांनीं सांगितल्या आहेत. अशा प्रकारचे निरुपयोगी प्रश्न त्यांना विचारण्यास माझी हरकत आहे.

**अॅ. जनरल:** मी निरुपयोगी गोष्टी विचारीत नाहीं.

केंपियाकी ठाण्यावर मी ८८ दिवस राहिलों.

**अॅ. जनरल:** तेथें आपल्याला मिळालेल्या वागणुकीबद्दल कोर्टाला माहिती द्याल काय ?

**श्री देसाई:** साक्षीदार जपानविरुद्ध कागाळ्या सांगत असतील तर त्यांना इथें जागा नाहीं. या प्रश्नाचा आरोपींशीं काय संबंध येतो ?

( हा प्रश्न सोडून दिल्याचें अॅ. जनरलनीं कबूल केलें. )

या ठाण्यावरून नंतर मला हालवून २२ जुलै १९४२ ला सिंगापूरला ठेवण्यांत आलें. नंतर मोहनसिंगांच्या बंगल्यावर व तेथून सरळ बुलर ठाण्यावर पुन्हा नेण्यांत आलें.

**ॲ. जनरल :** अझाद फौजेंत दाखल होण्यासाठीं आपल्यावर दाब आणण्यांत आला काय ?

**श्री. देसाई :** या प्रश्नास मी हरकत घेतों. माझा संयम पाहूं नका. ह्या ठाण्यावर आरोपी होते काय ?

**उत्तर :** नाहीं. या ठाण्यावर आम्हांस एकान्तांत ठेवण्यांत आलें. आमच्याशीं बोलायलासुद्धां कुणाला परवानगी नव्हती. फक्त एक हुकम्या आम्हांला मिळाला होता. ८ ऑगस्टला जवळच्याच एका कळपखान्यांत मला नेण्यांत आलें. अत्यंत वाईट अशा या ठिकाणीं मला अधिकाऱ्याच्या दर्जानें वागविण्यांत आलें नाहीं. सफेत मुंग्यांनीं बुजबुजलेल्या एका तंबूत ठेऊन येथून पुन्हा पांचशें कदमांवरच्या एका झोपडींत आम्हांला ठेवण्यांत आलें. जेवण घेण्यासाठीं आम्हांला इतर कैद्याप्रमाणें ओळ धरावी लागत होती. जेवण फक्त भात, केव्हां डाळ आणि केव्हां पातळभाजीचें असे.

**ॲ. जनरल :** तुम्हांला येथें वाईट रीतीनें वागविलें काय ?

**श्री. देसाई :** ह्या अप्रस्तुत प्रश्नाला माझी हरकत आहे. अत्यंत सूचक असा हा प्रश्न आहे.

( हा प्रश्न काढून घेण्यांत आला. )

ले. सिंगारासिंग व जमादार फत्तेखान हे अधिकारी या ठाण्यावर होते. ठाण्याच्या सभोंवतीं तारेचें कुंपण लाऊन त्यांत उघड्या पावसांत व उन्हांत शिपायांना ठेवण्यांत आलें होतें. ह्यांतील बऱ्याच लोकांना मारीत असतांना फत्तेखानास मी पाहिलें होतें. बहुतेक पहारेकरी व गस्तीदार शीख होते. त्यांना सलामी द्यावी लागत असे व आमच्या डोक्यावर टोपी नसल्यावेळीं आम्हांला त्यांच्यापुढें मान वांकवावी लागत असे. मारहाण झालेल्या शिपायांचीं नावें मला माहित नाहींत. त्यांत काहीं अमलदार सुद्धां होते.

**बॅ. असफअली :** साक्षीदारानें आरोप केलेल्या अधिकाऱ्यांचे खटले लवकरच चालणार आहेत. त्यांचा इन्साफ या कोर्टासमोर आणि दुसऱ्या

कोर्टासमोर होणार असें मी समजावें काय? या कोर्टांत ते ह्या आरोपांचीं उत्तरें देऊं शकत नाहींत. साक्षीदार तपासण्याची ही पद्धत अत्यंत चुकीची आहे. साक्षीदाराची साक्ष पडताळून पाहाण्याची ह्या कोर्टांत शक्यता नाहीं. येथें हजर नसलेल्या गृहस्थांविरुद्ध साक्षीदारानें केलेलीं विधानें खरींखोटीं असल्याचें कसें ठरवावयाचें? सिंगारासिंग व फत्तेखान यांचा खटला ह्या कोर्टापुढें असता तर ही गोष्ट मी मान्य केली असती. परंतु साक्षीदाराच्या तोंडाला येईल तें त्याला बोलावयास लावणें ही गोष्ट अक्षम्य आहे हें सरकारी वकिलांस माहित नसावें काय?

**श्री देसाई :** ज्या आरोपींविरुद्ध हीं विधानें करण्यांत येत आहेत त्यांच्याकडून मी माहिती घेतलेली नाहीं, म्हणून असे आरोप करण्यास साक्षीदाराला कोर्टानें सवलत देऊं नये असें माझें सांगणें आहे. हा पुरावा खोटा नसेल कशावरून?

(याकोर्टासमोर नसलेल्या आरोपींच्या बाबतींत अन्याय होऊं नये म्हणून त्यांचीं नांवें वगळून बाकीचा पुरावा घेण्यांत यावा असा कोर्टानें निर्णय दिला.)

युद्धकैद्यांना रोज ८ ते १० तास काम देण्यांत येई व ते दमल्यास त्यांना विश्रांतीच्या ऐवजीं काठीनें मार देण्यांत येई. मला स्वतःला कधींच काम देण्यांत आलें नव्हतें. नंतर मला बरें वाटत नव्हतें म्हणून दवाखान्यांत जाऊन मी औषध मागितलें परंतु तें मला देण्यांत आलें नाहीं.

येथून नंतर मला स्थानबद्ध केलेल्या अमलदारांच्या ठाण्यांत ठेवण्यांत आलें. येथील व्यवस्था थोडी बरी होती. आम्हांला रोज ४।५ तास काम असे. कपडे धुणें व भांडीं साफ करणें हीं कामें ज्याचीं त्यास करावीं लागत. आझाद फौजेचे अधिकारी आमच्याकडे येऊन प्रचार कार्य करित असत. कॅ. शहानवाझ व कॅ. सहगलही येत असत. परंतु ते माझ्याशीं बोलले नाहींत. फक्त माझ्या हजेरींत चर्चा होत असे. एका खोलींत आम्ही सोळाजण राहात होतों. कॅ. शहानवाझ व कॅ. सहगल प्रत्यक्ष काय बोलले हें मला सांगतां येत नाहीं. परंतु त्याचा मतितार्थ असा होता—"अशा स्थितींत दिवस घालविण्यापेक्षां तुम्ही आझाद फौजेंत कां दाखल होत नाहीं?" दुसरें कांहीं ते बोलल्याचें मला आठवत नाहीं.

हें ठाणें कॅ. मोहनसिंग यांच्या हुकमतींत होतें. २३ ऑक्टोबर १९४२ ला खालीं करून मला बुल्लर ठाण्यावर नेण्यांत आलें. या ठिकाणीं कैद्यांना वाईट रीतीनें वागविण्यांत आल्याचें व कांहींना झाडाला बांधून मार दिल्याचें मी पाहिलें आहे. आझाद फौजेवर याचवेळीं गंडातर आलें. मला व इतर युद्धकैद्यांना जपान्यानीं आपल्या ताब्यांत घेतलें व आम्हांला सेरांगून ठाण्यावर ठेवण्यांत आलें. तेथें २८ डिसेंबर १९४२ पासून ७ जानेवारी १९४३ पर्यंत मी होतों व शेवटच्या दिवशीं क्रांजी ठाण्यावरील रुग्णालयांत गेलों. तें ठाणें आझादसैन्याधिकारी चालवीत होते. कर्नल जगन्नाथराव भोसले मला भेटण्यासाठीं येथें नेहमीं येत व कॅ. शहानवाझही येत असत.

## उलट तपासणी :

**श्री. देसाई :** आरोपी व आपण यांच्या दरम्यान चर्चा झाली त्या प्रसंगाशिवाय आरोपींशीं आपला संबंध आलाच नाहीं ?

**न्यायवकील :** एकाहून अधिक वेळीं चर्चा झाली असें साक्षीदारानें सांगितलें आहे. आपला प्रश्न फक्त एका वेळच्या प्रसंगाबद्दल असल्यामुळें तो प्रश्न दिशाभूल करणारा आहे.

**श्री. देसाई :** माझा कोणताही प्रश्न दिशाभूल करणारा आहे असें आपण सुचवावें याचें मला वाईट वाटतें. माझ्या प्रश्नाचें उत्तर देण्याचें काम साक्षीदाराचें आहे.

**श्री. देसाई :** बरें. कितीवेळां आपण आरोपींना भेटलां होतां ?

**उत्तर :** बरेच वेळां. १०, १५ वेळां.

**श्री. देसाई :** पैकीं किती वेळां आपलें त्यांचें संभाषण झालें ?

**उत्तर :** मी फक्त दोन वेळ कॅ. शहानवाझ यांच्यांशीं बोललों. कॅ. सहगल अगर ले. धीलन यांच्याशीं बोलल्याचें मला आठवत नाहीं. परंतु कर्नल भोंसले यांच्या घरीं मी कॅ. सहगल यांच्याशीं बोललों होतों, आणि

ठाण्यावर असतांना चर्चा झाली त्यावेळीं कॅ. शहानवाझ व कॅ. सहगल दोन वेळां हजर असल्याचें मला आठवतें. ठाण्यावरील निराळ्या एका भागांत मी होतों. या ठाण्यावर आम्हांला कॅ. मोहनसिंगानीं नेलें होतें. तेथें सगळे लोक आझाद फौजेंतलेच होते व माझ्या खोलींत आम्ही १६ जण होतों. त्याच ठिकाणीं चर्चा झाली होती. मी त्यांत भाग घेतला नाहीं अगर आरोपींनीं मला कांहीं सांगितलें नाहीं. पेनांगहून २८ नोव्हेंबर १९४१ ला मी सिंगापूरला जाण्यास निघालों होतों.

**श्री. देसाई :** पेनांग ते सिंगापूर हा एक टप्पा आहे वाटतें ?

**उत्तर :** ( कांहीं वेळानें ) वाटल्यास म्हणा एक टप्पा.

**श्री. देसाई :** बरें, म्हणतों मी.

## फेरारपार्कचें दीनवाणी दृश्य

फेरारपार्कांतील सभेनंतर जपान्यांच्या हुकुमावरून हिंदी व इंग्रज अधिकारी सुटे करण्यांत आले. हिंदी युद्धकैद्यांना ले. कं. हंट यांनीं जपानी अधिकारी फुजिवारा यांच्या ताब्यांत दिलें. फुजिवारा यांच्या हुकमानेंच मला इंग्रज अधिकाऱ्यांपासून निराळा करण्यांत आलें व नेसून ठाण्यावर माझ्या पलटणींतील एका अधिकाऱ्याबरोबर ठेवण्यांत आलें. त्याच्या दुसऱ्या दिवशीं मला अटकेंत ठेवण्यांत आलें. मला अटक करण्याचें कारण मला सांगण्यांत आलें नाहीं. माझ्याकडून गैरवर्तन झालें नव्हतें हें मी निक्षून सांगतों.

**श्री. देसाई :** निसून ठाण्यावर इतरांहून निराळ्या प्रकारचें अन्न आपणास देण्यांत आलें होतें काय ?

**उत्तर :** दुसऱ्यांनीं काय खाल्लें ते तेच जाणोत. माझ्याशीं मी.

**श्री. देसाई :** अटकेशिवाय आणखीं अन्नपाण्याबद्दल आपली तक्रार होती काय ?

**कॅ. धारगळकर :** नव्हती. निसूनहून बिदादारी ठाण्यावर मी गेलों. तेथील व्यवस्थेबद्दल माझी तक्रार नव्हती. २१ मार्च १९४२ ला मी थायलँडला गेलों. त्याचवेळेस आझाद हिंद फौज स्थापन करण्यांत येत होती. आझाद हिंद फौज म्हणजेच हिंदी स्वयंसेवक. त्यावेळेस हिंदी-स्वयंसेवक असेंच त्यांना म्हणत.

**श्री. देसाई :** त्याच शब्दांवरून ते कोण होते हें स्पष्ट होत होतें ?

**कॅ. धारगळकर :** होय.

**श्री. देसाई :** म्हणजे आझाद फौजेंत ते स्वेच्छेनें गेले होते ?

**कॅ. धारगळकर :** त्यावेळीं त्यांना हिंदी स्वयंसेवक म्हणत असत. ते स्वेच्छूक होते किंवा नाहीं तें मी सांगूं शकत नाहीं.

**श्री. देसाई :** आपण सांगितलेत कीं स्वयंसेवक या शब्दावरून ते कोण होते हें स्पष्ट होत होतें म्हणून. त्या उत्तराच्या मागें आपल्याला जावयाचें आहे काय ?

**कॅ. धारगळकर :** ते हिंदीस्वयंसेवक म्हणून माहित होते.

**श्री देसाई :** ते स्वयंसेवक होते हीच गोष्ट त्या शब्दांनीं व्यक्त होत होती ना ?

**न्यायवकील :** साक्षीदारानें त्या प्रश्नाचें उत्तर दिलें आहे असा कोर्टाचा समज आहे.

या युद्धकैद्यांना मेजर फुजिवारानें कॅ. मोहनसिंगाच्या ताब्यांत दिलें आणि त्यांची आज्ञा पाळण्याचा आम्हांला हुकूम झाला. मोहनसिंगानीं मला थायलँडला जावयास सांगितलें. सहमत-असहमत लोकांना निरनिराळे करण्याचा हा एक प्रकार होता. इथें एक स्वतंत्र ठाणें होतें व त्याची व्यवस्था चांगली होती. १८ जुलै १९४२ ला तेथून मला सिंगापूरच्या बुल्लर ठाण्यावर पाठविण्यांत आलें. त्या ठिकाणीं पुन्हा दोन्ही प्रकारचे लोक होते. त्या ठिकाणीं मला निराळा काढण्यांत आलें. इतर सहा अधिकाऱ्यांबरोबर मी निराळा होतो. या ठाण्यावरील इतर लोकांबद्दल मला कांहीं ठाऊक नाहीं.

परंतु येथील व्यवस्थेबद्दल माझी तक्रार नव्हती. १८ ऑगस्टला मला बिदादारी ठाण्याजवळच एका बंदिखान्यांत ठेवण्यांत आलें. तो आझाद फौजेनें चालविला होता.

**श्री. देसाई :** तेथें काय चाललें होतें याच्याशीं आपला संबंध नव्हता?

**कॅ. धारगळकर :** तेथील लोकांच्या कल्याणाच्या दृष्टीनें माझा संबंध होता, कारण मी वरिष्ठ अधिकारी होतों.

**श्री. देसाई :** मग दुसऱ्या ठाण्यावरील मारहाण आपण आपल्या फाटकांतून पाहिली काय ?

**कॅ धारगळकर :** होय.

**श्री. देसाई :** येवढ्यावरूनच आपण माहिती सांगूं शकतां तर !

**कॅ. धारगळकर :** होय.

ह्या बंदीखान्यावर चर्चा झाली नाहीं. तेथून ३ सप्टेंबरला मी निघालों. तेवढ्यांत आझाद फौज स्थापन झाली होती. तेथून मला अमलदारांच्या बंदीखान्यांत नेण्यांत आलें. सुरवातीला या ठिकाणीं ४० अमलदार होते. आणखी कांहीं अमलदार आल्यावर ती संख्या १२० पर्यंत गेली. तेथें २ ऑक्टोबर पर्यंत मी होतों. या ठिकाणीं कांहीं चर्चा झाली होती. या ठिकाणीं चर्चेस मला बोलाविलें नव्हते. कांहीं संभाषण मी ऐकलें. त्यांतील नक्की शद्ब मला आठवत नाहींत. संभाषणांत इतर गोष्टींची सुद्धां चर्चा झाली होती. आरोपीपैकीं कोणीही माझ्याशीं चर्चा केली नाहीं. परंतु इतरांनीं केली. कॅ. शहानवाझ इतर अमलदारांशीं बोलत होते. "आपण आझाद फौजेस कां मिळत नाहीं ?" हाच त्या संभाषणाचा सारांश.

**श्री. देसाई :** त्या प्रसंगीं कॅ. शहानवाझ काय म्हणाले होते ?

**कॅ. धारगळकर :** तें संभाषण मोठें होतें. मला तें सगळें कसें आठवेल ?

**श्री. देसाई :** त्यांतलें कांहींही सांगाना ?

**कॅ. धारगळकर :** ते काय म्हणाले तें मला आठवत नाहीं. तीच गोष्ट कॅ. सहगल यांच्या संभाषणाची.

**कॅ. धारगळकर :** नव्हती. निसूनहून विदादारी ठाण्यावर मी गेलों. तेथील व्यवस्थेबद्दल माझी तक्रार नव्हती. २१ मार्च १९४२ ला मी थायलॅंडला गेलों. त्याचवेळेस आझाद हिंद फौज स्थापन करण्यांत येत होती. आझाद हिंद फौज म्हणजेच हिंदी स्वयंसेवक. त्यावेळेस हिंदी-स्वयंसेवक असेंच त्यांना म्हणत.

**श्री. देसाई :** त्याच शब्दांवरून ते कोण होते हें स्पष्ट होत होतें ?

**कॅ. धारगळकर :** होय.

**श्री. देसाई :** म्हणजे आझाद फौजेंत ते स्वेच्छेनें गेले होते ?

**कॅ. धारगळकर :** त्यावेळीं त्यांना हिंदी स्वयंसेवक म्हणत असत. ते स्वेच्छूक होते किंवा नाहीं तें मी सांगूं शकत नाहीं.

**श्री. देसाई :** आपण सांगितलेंत कीं स्वयंसेवक या शब्दावरून ते कोण होते हें स्पष्ट होत होतें म्हणून. त्या उत्तराच्या मागें आपल्याला जावयाचें आहे काय ?

**कॅ. धारगळकर :** ते हिंदीस्वयंसेवक म्हणून माहित होते.

**श्री देसाई :** ते स्वयंसेवक होते हीच गोष्ट त्या शब्दांनीं व्यक्त होत होती ना ?

**न्यायवकील :** साक्षीदारानें त्या प्रश्नाचें उत्तर दिलें आहे असा कोर्टाचा समज आहे.

या युद्धकैद्यांना मेजर फुजिवारानें कॅ. मोहनसिंगाच्या ताब्यांत दिलें आणि त्यांची आज्ञा पाळण्याचा आम्हांला हुकूम झाला. मोहनसिंगानीं मला थायलॅंडला जावयास सांगितलें. सहमत-असहमत लोकांना निरनिराळे करण्याचा हा एक प्रकार होता. इथें एक स्वतंत्र ठाणें होतें व त्याची व्यवस्था चांगली होती. १८ जुलै १९४२ ला तेथून मला सिंगापूरच्या बुलर ठाण्यावर पाठविण्यांत आलें. त्या ठिकाणीं पुन्हा दोन्ही प्रकारचे लोक होते. त्या ठिकाणीं मला निराळा काढण्यांत आलें. इतर सहा अधिकाऱ्यांबरोबर मी निराळा होतो. या ठाण्यावरील इतर लोकांबद्दल मला कांहीं ठाऊक नाहीं.

परंतु येथील व्यवस्थेबद्दल माझी तक्रार नव्हती. १८ ऑगस्टला मला बिदादारी ठाण्याजवळच एका बंदिखान्यांत ठेवण्यांत आलें. तो आझाद फौजेनें चालविला होता.

**श्री. देसाई :** तेथें काय चाललें होतें याच्याशीं आपला संबंध नव्हता ?

**कॅ. धारगळकर :** तेथील लोकांच्या कल्याणाच्या दृष्टीनें माझा संबंध होता, कारण मी वरिष्ठ अधिकारी होतों.

**श्री. देसाई :** मग दुसऱ्या ठाण्यावरील मारहाण आपण आपल्या फाटकांतून पाहिली काय ?

**कॅ धारगळकर :** होय.

**श्री. देसाई :** येवढ्यावरूनच आपण माहिती सांगूं शकतां तर !

**कॅ. धारगळकर :** होय.

ह्या बंदीखान्यावर चर्चा झाली नाहीं. तेथून ३ सप्टेंबरला मी निघालों. तेवढ्यांत आझाद फौज स्थापन झाली होती. तेथून मला अमलदारांच्या बंदीखान्यांत नेण्यांत आलें. सुरवातीला या ठिकाणीं ४० अमलदार होते. आणखी कांहीं अमलदार आल्यावर ती संख्या १२० पर्यंत गेली. तेथें २ ऑक्टोबर पर्यंत मी होतों. या ठिकाणीं कांहीं चर्चा झाली होती. या ठिकाणीं चर्चेस मला बोलाविलें नव्हते. कांहीं संभाषण मी ऐकलें. त्यांतील नक्की शब्द मला आठवत नाहींत. संभाषणांत इतर गोष्टींची सुद्धां चर्चा झाली होती. आरोपीपैकीं कोणीही माझ्याशीं चर्चा केली नाहीं. परंतु इतरांनीं केली. कॅ. शहानवाझ इतर अमलदारांशीं बोलत होते. "आपण आझाद फौजेस कां मिळत नाहीं ?" हाच त्या संभाषणाचा सारांश.

**श्री. देसाई :** त्या प्रसंगीं कॅ. शहानवाझ काय म्हणाले होते ?

**कॅ. धारगळकर :** तें संभाषण मोठें होतें. मला तें सगळें कसें आठवेल ?

**श्री. देसाई :** त्यांतलें कांहींही सांगाना ?

**कॅ. धारगळकर :** ते काय म्हणाले तें मला आठवत नाहीं. तीच गोष्ट कॅ. सहगल यांच्या संभाषणाची.

**श्री. देसाई** : म्हणजे आपल्या सरसाक्षींत सांगितलेल्या गोष्टी म्हणजे कोण काय बोलला हें माहित नसतां सांगितलेला आपला सर्वसाधारण समजच ?

**कॅ. धारगळकर** : होय. ( न्यायवकिलांच्या प्रश्नासः— ) शहानवाझखान माझ्या खोलींत आले त्यावेळीं त्यांचे बरेचसे मित्र त्यांच्याबरोबर होते. तेथें सर्वसाधारण गोष्टींची चर्चा झाली. आरोपीनें भाषण असें कांहीं केलें नाहीं.

**श्री. देसाई** : मग "तुम्ही फौजेंत दाखल व्हा" असें तरी आरोपीनें तुम्हांस सांगितलें का ?

**कॅ. धारगळकर** : शहानवाझनीं आम्हांला तसें सांगितलें किंवा काय तें मला नक्की आठवत नाहीं.

**श्री. देसाई** : तुमच्या बंदीखान्यावर कोणाला मारहाण झाली काय ?

**कॅ. धारगळकर** : नाहीं.

ता. २२ नोव्हेंबर १९४५ रोजीं पांचव्या पंजाब रेजिमेंटमधील सुभेदार मेजर बाबूराम यांची आणखी एक साक्ष पुरी करण्यांत आली. त्यांनीं सिंगापूरच्या फेररपार्कमधील ब्रिटिशांच्या शरणागतीची माहिती दिली. ते म्हणाले कीं फेररपार्कला ५०००० युद्धकैदी देण्यांत आले. ले. क. हंट या इंग्रज अधिकाऱ्यानें आम्हांला मेजर फुजिवाराच्या ताब्यांत देतांना इंग्रजांच्या हुकमाप्रमाणेच जपान्यांचेही हुकूम तुम्ही मानलेच पाहिजेत व तसे ते न मानल्यास तुम्ही शिक्षेस पात्र व्हाल असे बजावलें. मेजर फुजिवारा यानीं नंतर आपल्या भाषणांत सांगितले कीं आम्हांला युद्धकैदी म्हणून जपानीसरकारच्या वतीनें त्यांनीं ताब्यांत घेतलें असलें तरी युद्धकैदी म्हणून आम्हाला वागविण्याची त्यांची तयारी नव्हती. आम्ही स्वतंत्र होतों. जपानकडे अन्नधान्याचा तोटा होता व आम्हांला श्रमाचीं कामें करावीं लागणार होतीं. ते म्हणाले : मी तुम्हांला तुमचे मुख्याधिकारी कॅ. मोहनसिंग यांच्या ताब्यांत देत आहे आणि त्यांच्या हुकुमाप्रमाणें तुम्हांस वागावें लागेल. त्यानंतर कॅ. मोहनसिंग म्हणाले : " इंग्रजांनीं तुम्हांला जपानच्या ताब्यांत

दिलें व जपाननें तुम्हांला स्वातंत्र्य दिलें. आतां आपण हिंदी स्वातंत्र्यासाठीं आझाद फौज निर्माण करूं "

हे शब्द ऐकल्याबरोबर सैन्यानें आपल्या टोप्या फेकून दिल्या आणि अत्यानंदानें हात वर केले. पुढें मोहनसिंग म्हणाले : " मलायामध्यें चांगली लढाई न दिल्याबद्दलचे आरोप इंग्रजांनी हिंदी सैन्यावर केले आहेत. परंतु, कसल्या प्रकारचीं शस्त्रास्त्रें आम्हांला देण्यांत आलीं, आमच्याकडे किती रणगाडे होते, किती विमानें होतीं आणि हुकूम दिल्याशिवाय कोणत्याबाजूचें सैन्य खालीं करण्यांत आले ह्या सर्व गोष्टी आपणांस ठाऊक आहेत." निसून व इतर ठाण्यांवर कॅ. मोहनसिंग, कॅ. शहानवाझखान व ले. धीलन यांनी निरनिराळयावेळीं केलेल्या भाषणांत अगर इतर प्रसंगीं आझाद फौजेंत दाखल होण्याबद्दल कोणीही कोणावर कोणत्याच प्रकारची सक्ती करूं नये अगर दडपण आणूं नये असे सर्वांना सांगितलें. (साक्षीदार बॅंकॉकपरिषदेस हजर होते. त्यावेळची माहिती त्यांनीं दिली. आझाद फौजेंत साक्षीदाराने नांव दाखल केल्यावर त्याची नेमणूक हिंदक्षेत्ररक्षकांच्या पहिल्या पायदळावर करण्यांत आली होती.)

उलट तपासणींत साक्षीदार म्हणाले " ब्रिटीश अधिकाऱ्यांच्या आधिपत्या-खालील इतर पलटणी निघून गेल्यानंतरही आम्ही आमची लढाई थांबविली नव्हती. आमची लढण्याची तयारी होती.

नेसून ठाण्यावर पूर्वी कोणत्याच प्रकारची सोय नव्हती. परंतु, कॅ. शहानवाझ-खानानीं अधिकार घेतल्यानंतर अन्नपाणी, आरोग्य, विजेचा पुरवठा वगैरे सोई आम्हांस करून दिल्या. शिवाय त्यांनीं आमच्या रुग्णालयास आर्थिक मदतही केली आणि त्याचा उपयोग फौजेंत आलेल्या व येण्यास तयार नसलेल्या अशा दोन्ही प्रकारच्या लोकांना करण्यांत आला. "

न्यायवकिलांच्या प्रश्नास उत्तर देतांना साक्षीदार म्हणाले कीं आरोपींपैकीं कोणास आपण बॅंकॉक परिषदेस पाहिलें नाहीं. जून १९४२ मधील एकंदर परिस्थिती अजमाऊन मी स्वेच्छेनें, स्वातंत्र्याच्या चळवळीसाठीं आणि हिंदुस्थान स्वतंत्र करण्यासाठीं आझादफौजेंत दाखल झालों; परंतु त्या सैन्याच्या पुनर्घटनेनंतर जपानीलोक आमचा पूर्वीप्रमाणें दुरुपयोग करतील म्हणून पुन्हां दाखल होण्यास मी नाकबूल होतों.

ता. २३ नोव्हेंबर १९४५ रोजीं बऱ्याच किरकोळ साक्षीदारांच्या जबान्या झाल्या. त्यांतील द्विरुक्ती वगळून महत्त्वाचा भाग तेवढाच देण्यांत येत आहे :—

**जमादार इल्ताफ रझाक :—**

## तळावरील तिरंगी झेंड्याला सलामी

आम्ही पोपाला जाण्यापूर्वी जानेवारी १९४५ मध्यें सुभाषबाबूंनीं आमची तपासणी केली त्यावेळीं तळावर तिरंगी झेंडा उभारला होता. गेल्या वर्षीं आझाद सैन्यानें टक्कर मारली तसें तुम्हीं करून दाखवा असें त्यांनीं सांगितलें. गेल्या खेपेस कांहीं लोक पळून गेले तसें आतां होता कामा नये. ज्यांना आघाडीवर जावयाचें धैर्य नसेल त्यांनीं मागें रहावें.

## पळपुट्यांना ठार करा

आम्ही आघाडीवर आल्यानंतर २५ फेब्रुवारी १९४५ ला कॅ. सहगल यानीं अधिकाऱ्यांची सभा घेतली. ते म्हणाले कीं तुमच्या चार नंबरच्या पायदळाची स्थिति मला पहावत नाहीं. जो कोणी पळपुटा निघेल त्याला चौकशीसाठीं मुख्य कचेरीकडे पाठविण्यांत येईल. पुन्हा १ मार्चला दुसरी सभा कॅ. सहगल यांनीं घेतली त्यावेळीं ले. धीलन हजर होते. ते म्हणाले कीं रात्रींच्या तपासणी कामावर गेलेले पांच अधिकारी पळाले आहेत. त्यांना पकडण्यासाठीं मी तुकडी पाठविली आहे. पळतांना सांपडणाऱ्या कोणाही माणसाला बेलाशक ठार करण्याची त्यांनीं आम्हाला परवानगी दिली. २० मार्चला कॅ. सहगल यांनीं आम्हांस असा हुकूम दिला कीं आमच्यावर हल्ला होण्याचा संभव आहे, तसें झाल्यास आमची एखादी पलटण फुटतांच दुसऱ्या दोन पलटणींनीं जाग्यावरून हालता कामानये. कारण पोपाडोंगराच्या हद्दींत १५–२० मैलांवर पाणी मिळणार नाहीं. नंतर माझ्या दोन सोबत्यांसह मी तिकडून निसटलों तो ३०–३५ मैलांवर नियागोला असलेल्या इंग्रजी ठाण्यावर जाऊन मिळालों.

उलटतपासणींत साक्षीदारानें सांगितलें कीं १ मार्चच्या सभेनंतर पळून

गेलेल्या बऱ्याच लोकांना पुन्हा पकडून आणलें होतें परंतु चौकशीनंतर कॅ. बेडी खेरीज करून इतर सर्वांना माफी देऊन सोडण्यांत आलें.

हिंद क्षेत्ररक्षक दलांतील नाईक संतोकसिंगानें आपल्या साक्षींत व उलट-साक्षींत सेलेतार ठाण्यावर आपणास युद्धकैदी म्हणून ठेवल्यावेळीं योग्य प्रकारें वागवून अन्नपाणी चांगल्या प्रकारचें दिल्याचें कबूल केलें. "कॅ. सहगलनीं आम्हांपैकीं कोणावर दडपण आणलें नाहीं. कॅ. शाहनवाझनीं आपल्या एका संभाषणांत सांगितलें कीं श्री गुरुगोविंद यांनीं जेव्हां शीखपंथ स्थापन केला त्यावेळीं फक्तपांचच स्वयंसेवक पहिल्यांदा पुढें आले. त्यांना जरूर होती तशाच प्रकारचे शूर लोक आतां मला पाहिजेत. अशा लोकांनीं आपण होऊन नांवें दाखल करून हिंदीराष्ट्रझेंड्याखालीं जमा व्हावें.

उपनाईक गंगाराम यांनीं सांगितलें कीं एप्रिल-मे १९४३ च्या सुमारास कॅ. शहानवाझखान यांनीं आमच्या कैदी ठाण्यावर येऊन सांगितलें कीं आम्ही हिंदी आहोंत आणि आम्हांला आमचा देश स्वतंत्र केलाच पाहिजे. आमच्या देशांतले इंग्रज हाकलून द्यावयाचे आहेत. तुम्हांला संधी आली आहे. तुम्हांला सध्या मिळणारा पैसा म्हणजे केवळ तुमची खर्ची म्हणून मिळणार आहे, आणि हिंदुस्थानांत पोंचल्यावर तुमचा सगळा पगार देण्यांत येईल. तुम्हांला चांगलें अन्न आणि कपडे देण्यांत येतील."

## सुभेदार असलनूर खान यांची साक्ष :

मी १९१३ पासून हिंदी सैन्यांत होतों. निसून ठाण्यावर ले. धीलन यांनीं आम्हांस सांगितलें कीं जपानी लोकांचा धर्म म्हणजे बुद्धधर्म स्थापन करणारे गौतमबुद्ध हिंदुस्थानांत जन्मले होते. हा धर्म अत्यंत प्राचीन असून तो श्रेष्ठ धर्म आहे. म्हणून जपानी लोकांशीं आपण आतां सहकार्य केलें पाहिजे.

## पाणबुडीनें सफर केली :

क० जिलानी यांच्या तुकडीतील वीस लोकांबरोबर १९४४ च्या सुरवातीस आम्ही यूकेहून पेनांगला गेलों. येथें जपानी लोकांनीं आम्हांला गुप्त माहिती प्रचार, घातपात आणि बिनतारीसंदेश या गोष्टींचें शिक्षण दिलें. फेब्रुवारी २७ ला आम्हांला एका पाणबुडींतून हिंदुस्थानला पाठविण्यांत आलें. सतरा दिवस प्रवास केल्यानंतर आम्हांला

ता. २३ नोव्हेंबर १९४५ रोजीं बऱ्याच किरकोळ साक्षीदारांच्या जबान्या झाल्या. त्यांतील द्विरुक्ती वगळून महत्वाचा भाग तेवढाच देण्यांत येत आहे :—

**जमादार इल्ताफ रझाक :—**

## तळावरील तिरंगी झेंड्याला सलामी

आम्ही पोपाला जाण्यापूर्वी जानेवारी १९४५ मध्यें सुभाषबाबूंनीं आमची तपासणी केली त्यावेळीं तळावर तिरंगी झेंडा उभारला होता. गेल्या वर्षी आझाद सैन्यानें टक्कर मारली तसें तुम्हीं करून दाखवा असें त्यांनीं सांगितलें. गेल्या खेपेस कांहीं लोक पळून गेले तसें आतां होता कामा नये. ज्यांना आघाडीवर जावयाचें धैर्य नसेल त्यांनीं मागें रहावें.

## पळपुट्यांना ठार करा

आम्ही आघाडीवर आल्यानंतर २५ फेब्रुवारी १९४५ ला कॅ. सहगल यानीं अधिकाऱ्यांची सभा घेतली. ते म्हणाले कीं तुमच्या चार नंबरच्या पायदळाची स्थिति मला पहावत नाहीं. जो कोणी पळपुटा निघेल त्याला चौकशीसाठीं मुख्य कचेरीकडे पाठविण्यांत येईल. पुन्हा १ मार्चला दुसरी सभा कॅ. सहगल यांनीं घेतली त्यावेळीं ले. धीलन हजर होते. ते म्हणाले कीं रात्रींच्या तपासणी कामावर गेलेले पांच अधिकारी पळाले आहेत. त्यांना पकडण्यासाठीं मी तुकडी पाठविली आहे. पळतांना सांपडणाऱ्या कोणाही माणसाला बेलाशक ठार करण्याची त्यांनीं आम्हाला परवानगी दिली. २० मार्चला कॅ. सहगल यांनीं आम्हांस असा हुकूम दिला कीं आमच्यावर हल्ला होण्याचा संभव आहे, तसें झाल्यास आमची एखादी पलटण फुटतांच दुसऱ्या दोन पलटणींनीं जाग्यावरून हालता कामानये. कारण पोपाडोंगराच्या हद्दींत १५–२० मैलांवर पाणी मिळणार नाहीं. नंतर माझ्या दोन सोबत्यांसह मी तिकडून निसटलों तो ३०–३५ मैलांवर नियागोला असलेल्या इंग्रजी ठाण्यावर जाऊन मिळालों.

उलटतपासणींत साक्षीदारानें सांगितलें कीं १ मार्चच्या सभेनंतर पळून

गेलेल्या बऱ्याच लोकांना पुन्हा पकडून आणलें होतें परंतु चौकशीनंतर कॅ. बेडी खेरीज करून इतर सर्वांना माफी देऊन सोडण्यांत आलें.

हिंद क्षेत्ररक्षक दलांतील नाईक संतोकसिंगानें आपल्या साक्षींत व उलट-साक्षींत सेलेतार ठाण्यावर आपणास युद्धकैदी म्हणून ठेवल्यावेळीं योग्य प्रकारें वागवून अन्नपाणी चांगल्या प्रकारचें दिल्याचें कबूल केलें. "कॅ. सहगलनीं आम्हांपैकीं कोणावर दडपण आणलें नाहीं. कॅ. शाहनवाझनीं आपल्या एका संभाषणांत सांगितलें कीं श्री गुरुगोंविंद यांनीं जेव्हां शीखपंथ स्थापन केला त्यावेळीं फक्तपांचच स्वयंसेवक पहिल्यांदा पुढें आले. त्यांना जरूर होती तशाच प्रकारचे शूर लोक आतां मला पाहिजेत. अशा लोकांनीं आपण होऊन नांवें दाखल करून हिंदीराष्ट्रझेंड्याखालीं जमा व्हावें.

उपनाईक गंगाराम यांनीं सांगितलें कीं एप्रिल-मे १९४३ च्या सुमारास कॅ. शहानवाझखान यांनीं आमच्या कैदी ठाण्यावर येऊन सांगितलें कीं आम्ही हिंदी आहोंत आणि आम्हांला आमचा देश स्वतंत्र केलाच पाहिजे. आमच्या देशांतले इंग्रज हाकलून द्यावयाचे आहेत. तुम्हांला संधी आली आहे. तुम्हांला सध्या मिळणारा पैसा म्हणजे केवळ तुमची खर्ची म्हणून मिळणार आहे, आणि हिंदुस्थानांत पोंचल्यावर तुमचा सगळा पगार देण्यांत येईल. तुम्हांला चांगलें अन्न आणि कपडे देण्यांत येतील."

## सुभेदार असलनूर खान यांची साक्ष :

मी १९१३ पासून हिंदी सैन्यांत होतों. निसून ठाण्यावर ले. धीलन यांनीं आम्हांस सांगितलें कीं जपानी लोकांचा धर्म म्हणजे बुद्धधर्म स्थापन करणारे गौतमबुद्ध हिंदुस्थानांत जन्मले होते. हा धर्म अत्यंत प्राचीन असून तो श्रेष्ठ धर्म आहे. म्हणून जपानी लोकांशीं आपण आतां सहकार्य केलें पाहिजे.

## पाणबुडीनें सफर केली :

क० जिलानी यांच्या तुकडीतील वीस लोकांबरोबर १९४४ च्या सुरवातीस आम्ही यूकेहून पेनांगला गेलों. येथें जपानी लोकांनीं आम्हांला गुप्त माहिती प्रचार, घातपात आणि बिनतारीसंदेश या गोष्टींचें शिक्षण दिलें. फेब्रुवारी २७ ला आम्हांला एका पाणबुडींतून हिंदुस्थानला पाठविण्यांत आलें. सतरा दिवस प्रवास केल्यानंतर आम्हांला

किनाऱ्यावर सोडण्याची खटपट करण्यांत आली. परंतु त्या रात्रीं ती फसली म्हणून आणखी एक आठवडा आम्हांला पाणबुडींतच राहावें लागलें. शेवटीं मार्चच्या अखेरीस आम्ही हिंदुस्थानच्या जमिनीवर पाय ठेवला. तेथून चार मैलांवर असलेल्या कलात संस्थानच्या एका अधिकाऱ्याला मी बातमी दिली, आणि मी स्वत: इंग्रजांना भेटलों.

आझाद सैन्याच्या नेहरू पलटणींतील एक नंबरच्या तुकडीचे अमलदार सचदेव आपल्या साक्षींत म्हणाले कीं इरावती नदीच्या कांठावर आमची तुकडी बचावाची फळी धरून बसली होती. १४ फेब्रुवारी १९४५ ला दोस्त सैन्यानें आमच्या उजव्या बाजूवर जोराची सरबत्ती दिली त्यांत पराभव होऊन आम्ही सफेत निशाण दाखविलें व शरण गेलों.

**श्री. देसाई :** हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठीं व त्याच्या आड येणाऱ्या जपान अगर कोणत्याही राष्ट्राविरुद्ध लढण्याचा पूर्ण विचार करूनच आपण आझाद फौजेंत गेला काय?

**उत्तर :** होय

ता. २४ नोव्हेंबर १९४५ ला "हाणामारीचे" दोन साक्षीदार तपासण्यांत आले. त्यांच्या साक्षींचा सारांश :—

**जमादार महंमद नवाझ :** मी शेवटपर्यंत आझाद फौजेंत दाखल झालों नाहीं. युद्धकैदी म्हणून मला वाईट रीतीनें वागविण्यांत आलें. माझ्याबद्दल बऱ्याच तक्रारी कॅ. मोहनसिंगाकडे करण्यांत आल्या. मुसलमान लोकांना फोडून परावृत्त करण्यांत आल्याची माझ्यावर आळ होती. मला शिक्षेची भीती नव्हती. तीन शिपायांनीं मला जादा मोर्चा मारण्याची कवाईत दिली व काठ्यांनीं मार दिला. नंतर आम्हांला पोती, डवे व काठ्या देऊन शेण घेऊन तें शिस्तींत सहाशें हातांवर नेऊन टाकण्याचें काम दिलें. माझ्या बरोबरचे तीन शिपाई थकले व थांबले. पुन्हा आम्हांला मारण्यांत आले. तेथील दोन मस्तीदारांना आम्हांला सलामी द्यावी लागली. शेणांत माती व कचरा भरून घेण्यांत आला. सुभेदार मेजर हरीसिंग याला सुद्धां अशीच शिक्षा देण्यांत आली. आणखी नऊ कैद्यांना हीच शिक्षा दिली गेली. सकाळीं ८ पासून

संध्याकाळीं ६ पर्यंत आम्हांला काम देण्यात येई. मध्यंतरी १ तास रजा मिळे. खोटा आजारीपणा सांगितल्याबद्दल एका अधिकाऱ्याला एका शिपायाकडून बारा फटके देवविण्यांत आल्यावर त्या अधिकाऱ्याला हातपाय जमिनीला टेकून चालविण्यांत आलें. सहा फटके खाल्यावर तो बेशुद्ध पडला. हात दांड्याला व पाय लोखंडाच्या तुकड्याला बांधून मार देण्यांत येत असलेल्या खाकी पोषाखांतील एका शिपायाला ६० कदमांवरून मी पाहिलें. आम्हांला किडे व दगडमिश्रित थोडा भात व पातळभाजी देण्यांत येत असे.

**हवालदार महमद सरवार** : क्रांजी ठाण्यावरील कैद्यांवर गोळीबार करण्यांत आला. त्या ठिकाणीं सैन्यांत दाखल होण्याचें आम्ही नाकारल्यावर जमादार व सुभेदार यांनीं आपलीं पिस्तुले सरसावलीं व आमच्यावर तीं झाडण्यास सुरवात केली. तेथें अजमासें चौदा पहारेकरी होते. त्यांनींसुद्धां हुकुमावरून गोळया झाडल्या. आम्हांपैकीं दोघे ठार झाले. आम्हीं अल्लाहो अकबरची घोषणा केली व पहारेकऱ्यानीं पुन्हां गोळीबार केला त्यांत बरेच जखमी झाले. एका पहारेकऱ्यावर खोरें पडून तो जागच्या-जागीं ठार झाला. पंधरा मिनिटें गोळीबार चालल्यावर गोळ्या संपल्या म्हणून मारेकरी निघून गेले. नंतर आम्हांला दुसऱ्या ठाण्यावर नेण्यात आलें व दमदाटी देण्यांत आली. तरी आम्ही फौजेंत जाण्यास कबूल झालों नाहीं. तेथें बेशुद्ध होईपर्यंत मला मारहाण करण्यांत आली व मला रुग्णालयांत नेण्यांत आलें. नंतर या हालांना कंटाळून निसटून जाण्याच्या उद्देशानें मी आझाद फौजेंत दाखल झालों.

**उलट तपासणी** : जगण्यामरण्याचाच प्रश्न होता म्हणून हाल काढण्या-पेक्षां फौजेंत जाणें बरें असें मी ठरविलें. गोळीबार झाला त्या जागेवर जपानी युद्धकैद्यांचें ठाणें होतें.

**प्रश्न** : तुमच्या कंपूच्या मुख्याची मागणी त्यांनीं केली होती ना ?

**उत्तर** : मला माहित नाहीं.

**प्रश्न** : पहारेकरी व कैदी यांच्यांत तंटा झाला होता काय ?

**उत्तर** : होय. त्या भांडणानंतर गोळीबार झाला

ता. २६ नोव्हेंबर १९४५ रोजीं आणखी दोन मारहाणीचे साक्षीदार तपासण्यांत आले. पैकीं पहिला साक्षीदार जमादार महमद हयात यांनें पूर्वीच्या साक्षीदाराप्रमाणेंच मारहाणीची कथा सांगितली व उलटतपासणींत चिकटून बसला. या खटल्यांत पहिल्याच खेपेस आझाद फौजेंत न जाण्याबद्दल हिंदुमुसलमान भेदाभेदाचे कारण साक्षीदारानें पुढें केलें. तो म्हणाला, "मी सुरवातीपासूनच आझाद फौजेच्या विरुद्ध होतों व माझ्या मताचा मी बराच प्रचार केला. माझ्या तुकडींतील बहुतेक मुसलमान फौजेंत सामील झाले नाहींत कारण ती फौज हिंदूंची होती व त्यांत हिंदू व शीख यांचाच जादा भरणा होता."

उलटतपासणीत साक्षीदारानें त्याच्या लोंकांपैकीं कांहीं जणांनीं गांवांतील लोकांच्या सात गाई चोरून त्या ठार मारून खाल्या या आरोपाबद्दल आपणास अटकेंत टाकल्याचा इन्कार केला. "मेजर अझीझ अहमद यांनीं या आरोपाबद्दल आम्हांला अटकेंत ठेवण्याचा हुकूम केला होता असें फिर्यादीच्या वकिलांना दिलेल्या आगाऊ लेखी माहितींत मी सांगितलें होतें" असें साक्षीदारानें बऱ्याचशा उलट तपासणीनंतर कबूल केलें.

ता. २७ नोव्हेंबर १९४५ ला हवालदार वजित बहादुरनें अटकेंत असतां पहारेकरी व आपले लोक यांच्यांत झालेल्या झटापटीची हकिकत सांगितली. "आमच्यावर होत असलेल्या अन्यायाबद्दल आम्हांला चीड आली व आम्हीं पुढें झालों इतक्यांत आमच्यावर पहारेकऱ्यांनीं गोळीबार केला. आमच्यापैकीं एक दोघे पडले व आम्हांला निःशस्त्र करण्यांत आलें. मी आणखी पुढें झालों इतक्यांत आझादफौजेंतील एका अमलदारानें माझ्यावर गोळी सोडली व माझ्या डाव्या पायाला जखम केली. मी शेवटपर्यंत फौजेंत सामील झालों नाहीं. नंतर माझी इंग्रजांनीं सुटका केली.

उलट तपासणींत साक्षीदारानें कबूल केलें कीं आपल्याला देण्यांत येणारें काम न केल्यामुळें पहारेकऱ्यांना आपल्याकडे पाठविलें होतें. "आम्ही ५५० लोक होतों व पहारेकऱ्यांचें आम्ही ऐकलें नाहीं म्हणून त्यांचें आमचे भांडण झालें व पहारेकऱ्यांनीं आमच्यावर गोळीबार केल्यानंतर आम्ही त्यांचा पाठलाग केला."

गुरखा पलटणींतील बंदुकस्वार रबिलाल यानें साक्षींत आपणास व आपल्या बरोबरच्या लोकांस हुकूम मोडण्याबद्दल काठ्यांचा मार देण्यांत आल्याचें व आपल्यापैकीं पडलेल्या एका इसमाला लाथेनें मारल्याचें सांगितलें. "आमच्या डोळ्यांतून अश्रू आले. आम्हाला ठार करा पाहिजे तर, पण आम्हीं आझाद फौजेंत येणार नाहीं" असें आम्ही सांगितल्यावर गोळीबार झाला. दोन दिवस आम्हाला अन्न दिलें नाहीं.

बॅ. असफअल्लींच्या उलट तपासणींत साक्षीदाराला त्याच्या सिंगापूर पडण्याच्या अगोदरच्या कामाबद्दल विचारण्यांत आलें.

**उत्तर :** आम्ही मलायांत शिक्षण घेत होतों.

**प्रश्न :** कसलें ? जंगलच्या लढाईचें, माघार घेण्याचें, की दोन्हीं ?

**उत्तर :** चढाईच्या लढाईचें.

**सर पंजीनियर :** हे प्रश्न अप्रस्तूत आहेत.

**बॅ. असफ अल्ली :** आपण विचारलेल्या प्रश्नांचें प्रस्तुत्व मी विचारलें नव्हतें.

**सर पंजीनियर :** तें तुमचें दुर्दैव !

**बॅ. असफ अल्ली :** माझ्या पेक्षां तुमचेंच असेल ! मीं सगळ्या प्रकरणाचा इतिहास उकरून काढणार आहें. राजाविरुद्ध लढाई, मारहाण, वगैरे गोष्टींचें लांबलचक चर्वण चाललें आहे. परंतु खरोखर काय प्रकार चालले होते ते मला समजले पाहिजेत. तुमचा दुर्दैवाचा शेला मला नको. तो तुम्हांलाच मी बहाल करतो.

**न्याय वकील :** तुम्हीं आपलें काम चालू करा बघू.

**बॅ असफ अल्ली :** दुर्दैवाचा शेरा घेण्यासारखें मी काय बोललों ? दुर्दैव कोणाचें तें स्पष्ट दिसत आहे.

**सर पंजीनियर :** कोर्टानें सोडलेल्या प्रश्नास मी हरकत घेत नाहीं.

**प्रश्न :** मारामारींत कांहीं पहारेकरी पळाले काय ?

**उत्तर :** आम्ही हल्ला केल्यावेळीं लाठीवाले पहारेकरी पळून गेले.

**प्रश्न :** आपण कितीजणांनीं पहारेकऱ्यांवर हल्ला केला ?

**उत्तर :** ५०० ते ६०० जणांनीं. पैकीं ३५० लोकांकडे लांकडी फळकुटें होतीं.

सुभेदार रामरूप यांनीं हाणामारीची गोष्ट पुढें चालू केली. "सिंगापूर पडलें तेव्हां मी पळून गेलों. कपडे बदलले व शहरांतील लोकांत मिसळून गेलों. नंतर बऱ्याच दिवसांनीं आमच्या तुकडींतील एका कारकुनानें मला पकडून सेलेतार कैदी ठाण्यावर नेलें. फौजेंत जाण्याचें नाकारल्यावरून मला बेशुद्ध होईपर्यंत मारण्यांत आलें. एका अधिकाऱ्यांनें मला लाथाडलें." उलट तपासणींत साक्षीदारानें सांगितलें कीं आझाद फौजेंत गेल्यावर हिंदुस्थानांतील परिस्थितीची माहिती काढण्याचें आपल्याला काम देण्यात आलें. ही कामगिरी विश्वासपूर्वक माझ्यावर देण्यात आली होती. परंतु मी ती पार पाडली नाहीं.

**श्री देसाई :** तुमचा आझाद सैन्याच्या चळवळीवर विश्वास होता काय ?

**उत्तर :** मला या म्हटलें, मी गेलो.

**श्री देसाई :** असें काय ? आपलें शिक्षण किती झालें ?

**उत्तर :** मी मॅट्रिक पास आहे.

**श्री देसाई :** माझा प्रश्न साधा आहे. आझाद फौजेचा उद्देश हिंदुस्थान स्वतंत्र करण्याचा होता व तो आपल्याला मान्य होता

**उत्तर :** होय.

**श्री देसाई :** म्हणजे आपण फौजेचे सभासद होतां ?

**उत्तर :** होय.

**श्री देसाई :** आणि आपण सभासद झालांत ते या चळवळीवरच्या विश्वासानेंच ? जास्त विचार करित बसूं नका. बोला ?

**उत्तर :** होय

ता. २८ नोव्हेंबर १९४५ रोजीं आरोपींच्या बचावाला मदत होण्या-सारख्या दोन साक्षी फिर्यादीनें घेतल्या, त्यांचा सारांश:—

पंजाब रेजिमेंटमधील शिपाई दलासा खान म्हणाले कीं १९४४ सालीं बोस पायदळ पलटणींत असतांना आमचे मुख्य वरिष्ठ अधिकारी कॅ. शहानवाझ-खान यांनीं आमच्यासमोर भाषण केलें. ते म्हणाले:—

"आघाडीवर कूच करणारी पहिली पलटण आपली आहे. ह्यांत निवडक अमलदार व शिपाई आहेत. लढाईवर आम्हाला हाल काढावें लागतील किंवा मरावें सुद्धां लागेल. जर कोणाला या गोष्टींची कदर वाटत असेल तर त्यांनीं आतांच गळून जावें. आम्हाला आतां स्वातंत्र्याची लढाई द्यावयाची आहे म्हणून आम्हांला भित्रे लोक नकोत आम्हांला शूरवीर हवेत. आम्हांला जपान्यांच्या खांद्याला खांदा लाऊन लढावयाचें असल्यामुळें दुय्यमप्रतीचे लोक कुचकामी ठरतील. आम्हीं हिंदुस्थानांत पोचल्यावर आम्हांला लोक भेटण्यास येतील. त्यांतील स्त्रिया तुमच्या माता बहिणी आणि मुली समजून त्यांच्याशीं वागावें लागेल आणि या बाबतींत जो कोणी दुर्वर्तन करील त्याला कडक सजा देण्यांत येईल.

हिंदुस्थान स्वतंत्र करतांना जपान्यांनीं आमच्यावर दडपण आणल्यास आम्हीं त्यांच्याशीं लढाई देऊं. त्यांनीं एक ठोसा उगारल्यास तुम्हीं त्याला तीन परत करा. आमचें सरकार जपान्यांचें दोस्त सरकार आहे हें विसरूं नका. कदाचित् कोणी जपानी हिंदुस्थानांत गेल्यावर आमच्या हिंदी भगिनींची अमर्यादा करताना आढळला तर त्याला पहिल्यानें तसें न करण्याबद्दल जरब द्या. तेवढ्यावर भागलें नाहीं तर त्याला ठार करा."

बोसपायदळांतील हवालदार नबाबखान यांनीं सांगितलें कीं इंफाल आघाडीवर ता. १५ मे १९४४ रोजीं आमची व इंग्रजांची चकमक झाली. इंग्रजांचा दाणागोटा व इतर साहित्य उपटण्याचा आम्हांला हुकूम होता. त्या प्रमाणें कॅ. शहानवाझ यांना आघाडीच्या तुकडीवरून टेलिफोन आला. तो मी टिपून घेतला होता. त्याचा सारांश असा :

"चकमक झाली...अमलदार व शिपाई यांचा जोम फार मोठा आहे. आमच्यापैकीं कोणी जखमी नाहींत. शत्रूकडील ३।४ ठार व जखमी. बुरणूस, काड्यापेट्या, सिगारेट वगैरे माल मिळाला..."

## पढविलेला पोपट

जवाहर दळांतील शिपाई सैदुल्लाखान यानें आपल्या साक्षीत आझादफौजेंतील आपल्या कामाचा तपशील देतांना कोर्टावर तारीखवार गोष्टींचा भडिमार सुरू केला.

त्यावर त्याला उलट तपासणींत खालील प्रश्न विचारण्यांत आले.

**प्रश्न** : आपण डायरी ठेवतां काय ?

**उत्तर** : मी डायरी कसली ठेवणार ? मी अशिक्षित माणूस.

**प्रश्न** : मग आपण फेंकलेल्या तारखा आपल्या ध्यानांत कशा राहिल्या ? वीस पंचवीस तारखा सोडल्यात आपण ?

**उत्तर** : ( कसें देणार ? )

**प्रश्न** : ( रागानें ) डायरी नाहीं. मग तारखा अचूक कशा सांगितल्यात तें सांगा ?

**उत्तर** : ( घाबरला. )

**प्रश्न** : मी तुम्हांला सरळच विचारतों. कोर्टांत आणण्यापूर्वी तुम्हांला पढविलें होतें ना ? होय किंवा नाहीं ? बोला ?

**उत्तर** : होय. काय सांगावयाचें तें मला सांगून ठेवण्यांत आलें होतें.

**प्रश्न** : आणि म्हणूनच तुम्हीं तारखा सांगू शकलां, होय ना ?

**उत्तर** : होय.

**प्रश्न** : या सगळ्या तारखा तुम्हांला पाठ करायला सांगितल्या होत्या ना ?

**उत्तर** : होय.

**प्रश्न** : आपण जवाहर पलटणींत होतेत. तिला ते नांव कां दिलें होतें तें आपल्याला माहित आहे काय ?

**उत्तर** : जवाहरलाल नेहरूंचें नांव त्या पलटणीला देण्यांत आलें होतें.

**प्रश्न** : पण तें नांव तिला कां दिलें होतें? हिंदीस्वातंत्र्यासाठीं लढण्यासाठींच ना?

**उत्तर** : होय.

ता. २९ नोव्हेंबर १९४५ ला नं. २ च्या तोफखान्यावरील एक अधिकारी गुलाम महंमद यांची साक्ष झाली. ते म्हणाले: जानेवारी १९४५ मध्यें नेताजी सुभाषचंद्र बोस यांनीं आमच्या पलटणीला भेट दिली. त्यावेळीं त्यांनीं केलेल्या भाषणाचा सारांश सांगतों—

"गेल्या वर्षीं आझाद फौजेनें पहिल्यानेंच शत्रूला टक्कर दिली. आझाद फौजेच्या शौर्याची वाखाणणी करावी तेवढी थोडीच. फौजेनें जेथें जेथें लढाई दिली तेथें तेथें शत्रूला चुरडून टाकलें. आमचा कोठेंही पराभव करून न घेतां इंफालच्या आघाडीवरून आमचें सैन्य लष्करी डाव साधण्यासाठीं आम्हांला मागें घ्यावें लागलें. आमच्या अडचणी आम्हीं आतां ओलांडल्या आहेत. परंतु प्रत्येकानें एवढें ध्यानांत ठेविलें पाहिजे कीं आमची फौज क्रांतिकारकांची आहे. आमचें मनुष्यबळ शत्रूएवढें अफाट नाहीं. हिंदुस्थान राखण्यासाठीं आसामच्या लढाईचा स्टॅलिनग्राड करण्याचा शत्रूचा विचार आहे. हें वर्ष लढाईच्या निर्वाणीच्या निकालाचें आहे.

इंफालच्या डोंगरांत आणि चितगांवच्या पठारावर होणाऱ्या युद्धांत हिंदीस्वातंत्र्याचा प्रश्न सुटणार आहे.

गेल्यावर्षीं आमच्यांतील कांहीं लोक पळून जाऊन शत्रूला मिळाले. आतां आघाडीवर जाण्याच्यावेळीं असें होतां नये. कोणाला भीतीनें अगर कोणत्याही कारणास्तव मागें राहावयाचें असल्यास त्याला मागें ठेवण्याची व्यवस्था करण्यांत येईल.

मी तुम्हांला आतां गुलाबी गोष्टी सांगत नाहीं. तुम्हांला आघाडीवर भूक, तहान, हालअपेष्टा आणि मरण यांना तोंड द्यावें लागेल. शत्रू अफाट आहे. आम्हांलांही आमची शक्ति एकत्र करावयाची आहे.

"दिल्लीवर चला" हें आमचें इतके दिवस एक ध्येयवाक्य होतें. आजपासून आणखी एक ध्येयवाक्य जोडावयाचें आहे, आणि तें म्हणजे "रक्त,

रक्त आणखी रक्त." याचा अर्थ असा कीं चाळीसकोटी बांधवांसाठीं आम्हीं आमचें रक्त देऊं आणि त्याच ध्येयासाठीं शत्रूचें रक्तही आम्ही घेऊं."

बऱ्याच चकमकी आणि लढाया झाल्यानंतर २६ एप्रिल १९४५ ला आम्हीं मॅगिगन खेड्यांत आलों. आणि तेथें बचावाची फळी उघडली. कॅ. सहगल यांनीं अधिकाऱ्यांची सभा घेतली आणि आम्हांला सांगितलें कीं आमच्या पुढील आवाडीचें शहर अलामयो शत्रूनें घेतलें असून प्रोमला जाणारा बचावाचा रस्ता त्यांनीं अडविला आहे. अशा परिस्थितींत तीन मार्ग आम्हांला मोकळे आहेत. पहिला शत्रूला पूर्वीप्रमाणें टक्कर देण्याचा, दुसरा साधे कपडे घालून निसटण्याचा व तिसरा शरण जाण्याचा. एक तासभर चर्चा झाल्यानंतर युद्ध कैदी म्हणून इंग्रजांना शरण जावयाचें असा सर्वांनी एकमतानें निर्णय घेतला.

**उलट तपासणी :—** कॅ. सहगलनीं शत्रूला चिठी पाठविली त्यांत युद्धकैदी म्हणूनच आपण शरण येत आहोंत व ही अट मान्य नसल्यास शेवटपर्यंत लढाई देण्याचा आमचा संकल्प आहे असें त्यांनीं लिहिलें होते.

३ मार्च १९४५ ला नरेंद्र सिंग आणि महमद इस्माइल या दोन अधिकाऱ्याविरुद्ध पळून जाण्याचा प्रयत्न केल्याची तक्रार करण्यांत आली होती. कॅ. सहगलनीं त्यांना बोलावलें. त्यांना माझ्यासमोर प्रश्न विचारण्यांत आले. त्यांनी दयेची याचना करून पळून न जाण्याची हमी दिली म्हणून त्यांना माफी देण्यांत आली. त्याच सुमारास अहमदखान व इतर चार शिपाई पळण्याच्या आरोपावरून कॅ. सहगल समोर आणण्यांत आले होते. त्यांनीही गुन्हा कबूल करून दयेची याचना केली म्हणून त्याना सोडून देण्यांत आलें. हवालदार गंगाराम सरण याजवर शिस्तभंग व हुकूम अमान्य करणें या गुन्ह्यांबद्दल खटला चालून त्यास देहांताची शिक्षा झाली होती. नंतर त्याला माफी देऊन सोडून देण्यांत आलें.

२६ मार्च १९४५ रोजीं पोपा टेकडीवर आम्ही होतों. तेथें महमद हुसेन माझ्याकडे आला. त्याचा पळून जाण्याचा डाव होता. त्या दिवशीं संधी नव्हती, म्हणून दुसऱ्या कोणत्यातरी दिवशीं संधी साधूंया असें मी त्यास

सांगितलें. त्यादिवशी संध्याकाळीं मला मुख्याधिकाऱ्याकडे नेण्यांत आलें. त्याठिकाणीं महमद हुसेन व जागिरीराम हजर होते. ले० खजीनशहा यांनीं आमच्यावर पळून जाण्याची तोहमत ठेविली. मला पकडण्यांत आलें. दुसऱ्या दिवशीं आम्हाला शहानवाझखान यांचेसमोर उभें करण्यांत आलें. आमचे जबान घेण्यांत आले. माझा पळून जाण्याचा इरादा नव्हता परंतु महमद हुसेनचा होता असा मी जबाब दिला. महमद हुसेननें गुन्हा कबूल केला. कॅ. शहानवाझ म्हणाले " महमद हुसेन सारखे लोक ठार करण्याच्या लायकीचे आहेत. महमद हुसेन, तुला मृत्यूची सजा मी देत आहें. तूं एकटाच पळून जात नव्हतास तर इतरांना तशी फूस देत होतास. तुझ्यावर दया करतां येत नाहीं." नंतर त्यानीं महमद हुसेनला त्याच्या रेजिमेंटच्या मुख्याकडे पाठविण्याचा हुकूम केला. त्याच दिवशीं संध्याकाळीं महमद हुसेनला आमच्या कोठडींतून हलविण्यांत आलें. त्यानंतर मी त्याला आज-दिवसपर्यंत पाहिला नाहीं. नंतर मला कैदकरून रंगूनला नेण्यांत आलें. १९ एप्रिलला मागवेपर्यंत चालविल्यावर इंग्रजांनी त्या जागेवर हल्ला केला. त्यांत माझे पहारेकरी पळून गेल्यामुळें मी इंग्रजांना मिळालों.

उलट तपासणींत साक्षीदार म्हणाला : कॅ. शहानवाझ म्हणाले होते कीं तुला ठार करणेंच योग्य आहे. तुझ्यासारखे बंडखोर ठार केले पाहिजेत. मी शहानवाझनां गुन्हापत्रकावर लिहितांना पाहिलें. मी पत्रक वाचलें नाहीं कारण तें टेबलावर होतें. मला इंग्रजी येत नाहीं. माझ्याबद्दल अगर जागिरीरामबद्दल निर्णय झाला नव्हता.

शिपाई जागिरीराम : एक दिवस पोपाटेकडीवर असतांना महमद हुसेन, अलादिता व मी मिळून पळून जाण्याच्या वाटाघाटी करित असतांना ले० खजीनशहा यांनीं आम्हांस पकडलें. महमद हुसेन म्हणाला कीं आपण लुटूपुटूचा पोबारा करित होतों. आम्हाला कॅ. सहगलसमोर उभें करण्यांत आलें. आम्ही तोच जबाब दिला. ले. आयासिंग यांनीं आम्हांला मार देऊन कबुली विचारली. नंतर आम्हाला कॅ. शहानवाझ याच्यासमोर उभें करण्यांत आलें. आम्ही दया मागितली. कॅ. शहानवाझ म्हणाले तुम्ही आमचे हितशत्रू आहां. मी तुम्हांला देहान्ताची शिक्षा देतों. महमदनवाझनें पुन्हा हात पसरले. नंतर आम्हाला तेथून नेण्यात आलें.

रक्त आणखी रक्त." याचा अर्थ असा कीं चाळीसकोटी बांधवांसाठीं आम्हीं आमचें रक्त देऊं आणि त्याच ध्येयासाठीं शत्रूचें रक्तही आम्ही घेऊं."

बऱ्याच चकमकी आणि लढाया झाल्यानंतर २६ एप्रिल १९४५ ला आम्हीं मॅगिंगन खेड्यांत आलों. आणि तेथें बचावाची फळी उघडली. कॅ. सहगल यांनीं अधिकाऱ्यांची सभा घेतली आणि आम्हांला सांगितलें कीं आमच्या पुढील आघाडीचें शहर अलामयो शत्रूनें घेतलें असून प्रोमला जाणारा बचावाचा रस्ता त्यांनीं अडविला आहे. अशा परिस्थितींत तीन मार्ग आम्हांला मोकळे आहेत. पहिला शत्रूला पूर्वीप्रमाणें टक्कर देण्याचा, दुसरा साधे कपडे घालून निसटण्याचा व तिसरा शरण जाण्याचा. एक तासभर चर्चा झाल्यानंतर युद्ध कैदी म्हणून इंग्रजांना शरण जावयाचें असा सर्वांनी एकमतानें निर्णय घेतला.

**उलट तपासणी :—** कॅ. सहगलनीं शत्रूला चिठी पाठविली त्यांत युद्धकैदी म्हणूनच आपण शरण येत आहोंत व ही अट मान्य नसल्यास शेवटपर्यंत लढाई देण्याचा आमचा संकल्प आहे असें त्यांनीं लिहिलें होते.

३ मार्च १९४५ ला नरेंद्र सिंग आणि महमद इस्माइल या दोन अधिकाऱ्याविरुद्ध पळून जाण्याचा प्रयत्न केल्याची तक्रार करण्यांत आली होती. कॅ. सहगलनीं त्यांना बोलावलें. त्यांना माझ्यासमोर प्रश्न विचारण्यांत आले. त्यांनी दयेची याचना करून पळून न जाण्याची हमी दिली म्हणून त्यांना माफी देण्यांत आली. त्याच सुमारास अहमदखान व इतर चार शिपाई पळण्याच्या आरोपावरून कॅ. सहगल समोर आणण्यांत आले होते. त्यांनीही गुन्हा कबूल करून दयेची याचना केली म्हणून त्याना सोडून देण्यांत आलें. हवालदार गंगाराम सरण याजवर शिस्तभंग व हुकूम अमान्य करणें या गुन्ह्यांबद्दल खटला चालून त्यास देहांताची शिक्षा झाली होती. नंतर त्याला माफी देऊन सोडून देण्यांत आलें.

२६ मार्च १९४५ रोजीं पोपा टेकडीवर आम्ही होतों. तेथें महमद हुसेन माझ्याकडे आला. त्याचा पळून जाण्याचा डाव होता. त्या दिवशीं संधी नव्हती, म्हणून दुसऱ्या कोणत्यातरी दिवशीं संधी साधूंया असें मी त्यास

सांगितलें. त्यादिवशी संध्याकाळीं मला मुख्याधिकाऱ्याकडे नेण्यांत आलें. त्याठिकाणीं महमद हुसेन व जागिरीराम हजर होते. ले० खजीनशहा यांनीं आमच्यावर पळून जाण्याची तोहमत ठेविली. मला पकडण्यांत आलें. दुसऱ्या दिवशीं आम्हाला शहानवाझखान यांचेसमोर उभें करण्यांत आलें. आमचे जबान घेण्यांत आले. माझा पळून जाण्याचा इरादा नव्हता परंतु महमद हुसेनचा होता असा मी जबाब दिला. महमद हुसेननें गुन्हा कबूल केला. कॅ. शहानवाझ म्हणाले " महमद हुसेन सारखे लोक ठार करण्याच्या लायकीचे आहेत. महमद हुसेन, तुला मृत्यूची सजा मी देत आहें. तूं एकटाच पळून जात नव्हतास तर इतरांना तशी फूस देत होतास. तुझ्यावर दया करतां येत नाहीं." नंतर त्यांनीं महमद हुसेनला त्याच्या रेजिमेंटच्या मुख्याकडे पाठविण्याचा हुकूम केला. त्याच दिवशीं संध्याकाळीं महमद हुसेनला आमच्या कोठडींतून हलविण्यांत आलें. त्यानंतर मी त्याला आज-दिवसपर्यंत पाहिला नाहीं. नंतर मला कैदकरून रंगूनला नेण्यांत आलें. १९ एप्रिलला मागवेपर्यंत चालविल्यावर इंग्रजांनी त्या जागेवर हल्ला केला. त्यांत माझे पहारेकरी पळून गेल्यामुळें मी इंग्रजांना मिळालों.

उलट तपासणींत साक्षीदार म्हणाला : कॅ. शहानवाझ म्हणाले होते कीं तुला ठार करणेंच योग्य आहे. तुझ्यासारखे बंडखोर ठार केले पाहिजेत. मी शहानवाझनां गुन्हापत्रकावर लिहितांना पाहिलें. मी पत्रक वाचलें नाहीं कारण तें टेबलावर होतें. मला इंग्रजी येत नाहीं. माझ्याबद्दल अगर जागिरीरामबद्दल निर्णय झाला नव्हता.

शिपाई जागिरीराम : एक दिवस पोपाटेकडीवर असतांना मदमद हुसेन, अलादिता व मी मिळून पळून जाण्याच्या वाटाघाटी करित असतांना ले० खजीनशहा यांनीं आम्हांस पकडलें. महमद हुसेन म्हणाला कीं आपण लुटूपुटूचा पोबारा करित होतों. आम्हाला कॅ. सहगलसमोर उभें करण्यांत आलें. आम्ही तोच जबाब दिला. ले. आयासिंग यांनीं आम्हांला मार देऊन कबुली विचारली. नंतर आम्हाला कॅ. शहानवाझ यांच्यासमोर उभें करण्यांत आलें. आम्ही दया मागितली. कॅ. शहानवाझ म्हणाले तुम्ही आमचे हितशत्रू आहां. मी तुम्हांला देहान्ताची शिक्षा देतों. महमदनवाझनें पुन्हा हात पसरले. नंतर आम्हाला तेथून नेण्यात आलें.

**स. वकील** : नेण्यापूर्वी शहानवाझ आणखीं कांहीं बोलले काय ?

**श्री देसाई** : हा प्रश्न फार सूचक आहे. आपणाला जावयास सांगितल्याचें साक्षीदारानें सांगितलें आहे. खोलींतून हालविण्यापूर्वी आणखी कांहीं झालें असें स. वकील प्रत्यक्ष सुचवीत आहेत. हें अयोग्य आहे.

**न्याय वकील** : अस्पष्ट मुद्दा स्पष्ट करण्यासाठीं साक्षीदाराचें तिकडे लक्ष वेधतां येईल.

**श्री देसाई** : ही बाब फार गंभीर स्वरूपाची आहे. झाल्या गोष्टी साक्षीदारानें सांगितल्या आहेत. नंतर आपल्याला खोलींतून नेण्यास सांगितलें असें तो म्हणाला आहे. आणखी दुसरें कांहीं घडलें असें सुचाविणें अत्यंत अप्रशस्त आहे.

**न्याय वकील** : आणखी कांहीं घडलें होतें असें सरकारी वकिलांस वाटत असल्यास " एवढेंच घडले ना ?" असें ते विचारूं शकतात.

**श्री देसाई** : तसें विचारल्यास त्याला माझी हरकत नाहीं.

**स. वकील** : महमद हुसेननें दयेची याचना केल्यानंतर त्याला शहानवाझनीं काय उत्तर दिलें एवढेंच मला साक्षीदाराला विचारावयाचें होतें.

**साक्षीदार** : शहानवाझ आणखीं कांहीं बोलले नाहींत.

नंतर आम्हांला आमच्या तुकडीच्या मुख्याकडे नेण्यांत आलें. तिथें उभें करून मला महमद हुसेनला गोळी घालण्याबद्दल सांगण्यांत आलें. मला बंदूक वापरतां येत नाहीं, मी गोळी घालणार नाहीं असें मी सांगितलें म्हणून मलाही गोळी घालण्यांत येईल असा धाक देण्यांत आला.

मी पुन्हा नाकारलें. ले. खजीनशहानीं माझ्या खांद्यांत बंदूक लटकावली आणि माझें बोट चापावर बसवलें. तेथें आणखी दोघे हा प्रकार पहात होते. ले. आयासिंगनीं महमद हुसेनचे डोळे बांधून त्याला लाकडाच्या एका ठोकळ्या-

पुढें बसवून त्याचे हात बांधले. नंतर ले. आयार्मिंगनीं फेर झाडण्याच हुकूम केल्याबरोबर आम्ही तिघांनीही गोळ्या सोडल्या आणि महमद हुसेन मरून पडला.

**उलट तपासणी** : ( ता. ३० नोव्हेंबर १९४५ )

**श्री देसाई** : कोर्टांत येण्यापूर्वीं एकदोन दिवस तुमची आठवण ताजीतवानी करण्यांत आली होती काय ?

**उत्तर** : मी दिलेली माहिती मला ऐकविण्यांत आली व ती बरोबर असल्याचें मी सांगितलें.

**प्रश्न** : म्हणजे तुमच्या आठवणीला उजाळा देण्यांत आला.

**उत्तर** : माझी माहिती मला आठवत होती. परवांचे दिवशीं ही माहिती मला वाचून दाखविण्यांत आल्यावर ती ध्यानांत ठेवण्याबद्दल सांगण्यांत आलें. ती बरोबर आहे असें मी उत्तर दिलें.

**प्रश्न** : पण माहिती म्हणजे इंग्रजीचें भाषांतर ना ?

**उत्तर** : इंग्रजीचें हिंदुस्थानी भाषांतर करून सांगण्यांत आलें. तें मी पुन्हा हिंदुस्थानींत सांगितलें व त्याच याशीं जुळतें कीं नाहीं हें त्यांनीं पाहिलें.

मी रुग्णालयांतील शिपाई होतों. मला शस्त्रास्त्रांचें शिक्षण नव्हतें. रोग्याची व्यवस्था पाहाण्याच्या कामावर मी होतों. महमद हुसेन पूर्वी रुग्णालयांत हुकम्याच्या कामावर होता व तो माझ्याबरोबर रहात होता. पळून जाण्याचें खलबत योगायोगानें सुरू झालें. तो व मी भेटलों इतक्यांत गढवाली तिथें आला व नंतर पळून जाण्याच्या गोष्टी निघाल्या. वीस मैलावर इंग्रज आहेत असें टेहळके सांगत असत.

**प्रश्न** : कोणतें शस्त्र तुम्हाला गोळ्या मारण्यासाठीं दिलें होतें ?

**उत्तर :** रायफल. त्याशिवाय कोणतेंही इतर शस्त्र मला माहित नाहीं. महमद हुसेन ५ यार्डावर बसला होता. त्याच्यावर हत्यार रोखविण्यांत आलें. मी घोडा ओढला.

**प्रश्न :** मग तुमच्या गोळीनें महमद हुसेन मेला तर ?

**उत्तर :** मीं तीन गोळ्या झाडल्या, परंतु कोणाच्या गोळीनें तो मेला हें मला ठाऊक नाहीं. मी प्रेताजवळ गेलों नाहीं.

उपनायक सरदार महमद यांची साक्ष :— महमद हुसेन वगैरे पांच जण इंग्रजांकडे पळून जाण्याच्या प्रयत्नांत असतां पकडले गेले. ले० खजीनशाह म्हणाले, कीं महमद हुसेनला गोळी घालावयाची आहे. इतरांविषयीं ते बोलले नाहींत. ले० खजीनशाह, ले० आयासिंग, हवालदार गोविंदसिंग, कांहीं शिपाई व मी पोपा टेकडीजवळील एका नाल्यावर गेलों. तेथें झाडाला बांधलेल्या महमद हुसेनला मी, जागिरीराम, एक तामीळ व एक शीख यांनीं गोळ्या झाडल्या व तो मरून पडला. पलटण त्याच दिवशीं हालावयाची असल्यामुळें या मृत्यूची बातमी मी वरिष्ठाकडे दिली नाही. ३ एप्रिल १९४५ला पळून मी इंग्रजाकडे गेलों. जागिरीराम गोळी झाडतांना उभा किंवा गुढगे टेकलेला होता तें माहित नाहीं. ती वेळ साधारण अंधाराची होती. प्रेताच्या अंगावर रक्त दिसत नव्हतें

परिचारक शिपाई अबदूल हफीज यांची साक्ष :— आठव्या तुकडीच्या चार शिपायांना ले० धीलन यांच्या हुकुमावरून पोपाटेकडीवर गोळ्या घालून ठार करण्यांत आलें. ते पळून जाण्याच्या खटपटींत होते असा त्यांच्यावर आरोप होता. हिदायतुल्ला व काळूराम या शिपायांनीं गोळ्या झाडल्या तरी कैदी मेले नाहींत म्हणून शेरसिंगानें पिस्तूल झाडून त्यांना ठार केलें. त्यावळीं धीलन हजर होते. मृतांचीं नांवें आपणास माहित नाहींत.

**उलट तपासणी :** या चौघांना मी पूर्वीं कधीं पाहिलें नव्हतें. एका रोग्याला इस्पितळांत पोचवितांना गर्दी पाहून मी तिकडे गेलों. या प्रसंगाची तारीख मला आठवत नाहीं. ही यंदाचीच गोष्ट आहे. कैदी खालीं पडल्यानंतर त्याच्याजवळ मी गेलों नाहीं. त्या जागेपासून १२ ते १६ यार्डावर मी होतों.

# आरोपींचे जबाब : ३

ता. ७ डिसेंबर १९४५ रोजीं सरकारतर्फेचा साक्षीपुरावा संपल्यानंतर आरोपींच्या बचावास सुरवात झाली. सुरवातीस ज. शहानवाझखान आरोपी नं. १ यांनीं आपल्या बचावाचा लेखी जबाब स्वतः कोर्टास वाचून दाखविला.

## ज. शहानवाझखान यांचा जबाब :

लष्करी अगर दुसऱ्या कोणत्याही न्यायालयानें चालविण्यासारखा कोणताही गुन्हा मी केला नाहीं. लढाईमध्यें भाग घेतल्याचा मी इन्कार करीत नाहीं. परंतु सुधारलेल्या राष्ट्रांनीं मान्य केलेल्या युद्धनीतीप्रमाणें आझाद हिंद सरकारचा एक शिपाई या नात्यानें ब्रिटिशांविरुद्ध मी लढलों. आझाद हिंद सरकारनें माझी मायभूमी परकी अंमलांतून सोडवून स्वतंत्र करण्यासाठीं जी लढाई दिली ती कायदेशीर होती आणि आमच्या सैन्याशीं शत्रुत्वाच्या नात्यानें लढण्याची ब्रिटिशांनीं कबुली दिली असल्यामुळें मी गुन्हा केला असें सिद्ध होत नाहीं. खुनाला प्रोत्साहन दिल्याचा आरोप मला नाकबूल आहे कारण महमंद हुसेन याच्या मृत्यूस मी कारणीभूत झालों हें म्हणणें खोटें आहे.

**आझाद हिंद फौजेला मिळण्याचें ज्यावेळीं मी ठरविलें त्यावेळीं माझें जीवन, माझें घरदार, माझें कुटुंब आणि माझ्या कुटुंबाच्या हाडींमासीं खिळलेली राजनिष्ठेची परंपरा ह्या सर्वांचा होम करण्याचें मीं ठरविलें. माझ्या कर्तव्याच्या आड प्रत्यक्ष माझा भाऊ आला तरी त्याच्याशीं लढाई करण्याचें मी ठरविलें आणि त्याप्रमाणें १९४४ च्या लढाईत आघाडीवर माझा सख्खा भाऊ आणि मी एकमेकांशीं लढलों सुद्धां ! त्या लढाईत अखेरीस माझा भाऊ जखमी झाला. चीन टेकडीजवळ दोन महिनेपर्यंत मी व माझा चुलतभाऊ एकमेकांविरुद्ध रोज लढत होतों.**

**राजनिष्ठा कीं देशनिष्ठा हा प्रश्न माझ्या समोर उभा होता. मी**



**माझ्या देशाशीं एकनिष्ठ आहें आणि माझ्या मायभूमीच्या स्वातंत्र्यासाठीं माझ्या सर्वस्वाचा होम करीन असें मी नेताजींस वचन दिलें.**

माझ्या वडिलांनीं लष्करांत तीस वर्षे नोकरी केली. पहिल्या आणि गेल्या महायुद्धांत माझ्या कुटुंबांतील प्रत्येक मनुष्य लष्करांत सामील झाला. सध्या माझ्या कुटुंबांतील ८० पेक्षां जास्त मनुष्यें ब्रिटिश लष्करांत निरनिराळ्या हुद्यांवर वावरत आहेत. ब्रिटिश राजनिष्ठा बहुमोल समजणाऱ्या कुटुंबांतील मी एक होतों.

सुभाषचंद्र बोस यांना हिंदुस्थानांत मी कधींही पाहिलें नव्हतें व त्यांच्या कामगिरीबद्दल मला कांहींच माहिती नव्हती. परंतु मलायामध्यें ज्यावेळीं मी

त्यांच्याबरोबर राहिलों व त्यांचीं भाषणें ऐकलीं त्यावेळीं माझ्या मनावर त्यांच्या व्यक्तिमत्वाचा खोल परिणाम झाला. त्यांच्या त्यागानें आणि कर्तबगारीनें माझ्या मनाची पकड घेतली. हिंदुस्थानांतील परिस्थितीचें दीन-दृष्य त्यांनीं आमच्यासमोर उभें केलें आणि माझ्या आयुष्यांत पहिल्यानेंच हिंदी मनुष्याच्या नेत्रांनीं हिंदभूमीची मला पारख झाली. सुभाषचंद्रांची अलौकिक त्यागवृत्ति, त्यांचें जाज्वल्य देशप्रेम, त्यांचें लष्करी विज्ञान, त्यांचा स्पष्टवक्तेपणा आणि जपानच्या आकांक्षांना न जुमानण्याचा त्यांचा अट्टाहास या गोष्टींचा माझ्या मनावर पगडा बसला.

जपाननें हिंदुस्थानांत पाय पसरले तर जपानचें लष्करी आक्रमण थांबविणें ब्रिटिश लष्कराला अशक्य होतें ह्या गोष्टींची मला जाणीव होती. जपानचें मलायांतील आक्रमण मी स्वतः पाहिलें होतें आणि तें तसें हिंदुस्थानावर होऊं नये अशी माझी इच्छा होती. मलायांतील एक युद्धकैदी म्हणून जगण्यापेक्षां हातांत शस्त्र घेऊन हिंदी लोकांचे प्राण, त्यांची मालमत्ता आणि त्यांची अब्रू यांचे संरक्षण करावें असें मी मनाशीं ठरवून टाकिलें.

आझाद सैन्याची उभारणी करतांना प्रसंग पडल्यास जपानचा कुटिल कावा हाणून पाडण्यास सुद्धां तयार होतील अशाच माणसांची पारख करून मी त्यांची निवड केली आणि ही गोष्ट प्रत्यक्ष फिर्यादीच्या साक्षीदारांच्या तोंडांतून बाहेर आली आहे. आमच्या फौजेंत शामिल होण्यासाठीं युद्धकैद्यांवर कोणत्याही प्रकारचें दडपण टाकण्यांत आलें नाहीं. त्यांच्यावर कोणत्याही प्रकारची सक्ती करूं नये आणि त्याविरुद्ध वर्तन करणाऱ्यास शासन देण्यांत येईल असें माझ्या हाताखालील अंमलदारांस मी सक्त बजाविलें होतें. आझाद फौजेंत सामिल होणाऱ्या ज्या सैनिकांकडून जास्तींत जास्त स्वार्थत्याग होण्याची तयारी नसेल अशांनीं फौज सोडून जावें व जे राहतील त्यांनीं आपल्या सर्वस्वाची होळी करण्यास नेहमीं तयार असावें असा खुद्द नेताजींचा आदेश होता.

अतिपूर्वेकडील हजारों लोकांनीं आपलें जीवनसर्वस्व आझाद सेनेला अर्पण करून उघड केलेली देशनिष्ठा मी स्वतः पाहिली होती. देशासठीं त्यांनीं दारिद्र्य स्वीकारिलें.

**गांजलेल्या, दडपलेल्या, निःशस्त्र आणि निराधार अशा चाळीस कोटी हिंदी जनतेच्या स्वातंत्र्यासाठीं लढून स्वतःच्या प्राणाची होळी करण्याचा तेजस्वी संदेश सुभाषबाबूंसारख्या महान् व्यक्तीनें दिल्यावर कोणता स्वाभिमानी हिंदी मनुष्य चांचपडत मागें राहिला असता! मला मार्गदर्शक मिळाला आणि त्याचें नेतृत्व मान्यकरून माझ्या आयुष्यांतील एका अत्यंत महत्वाच्या प्रश्नाचा मी निर्णय घेतला. उपासतापासांत आणि हालअपेष्टांत आयुष्याशीं झगडणाऱ्या लक्षावधी लोकांची सरकारकडून होणारी पिळणूक, त्यांना निरक्षर आणि अडाणी स्थितींत ठेऊन आपली कार्यसिद्धी करून घेण्याची ब्रिटिशांची कारवाई या गोष्टींबद्दल जेव्हां मी विचार करूं लागलों तेव्हां ह्या ब्रिटिश राजवटीबद्दल मला आत्यंतिक तिरस्कार निर्माण झाला आणि हा अन्याय दूर करण्यासाठीं माझें जीवित, माझें घरदार, माझें घराणें आणि त्याची राजनिष्ठ परंपरा यांचा होम करून मी या संग्रामांत उडी घेतली. आझाद हिंद सैन्यानें भोगलेल्या हालअपेष्टा आणि केलेलें खडतर दिव्य एखादें भाडोत्री अगर हस्तक सैन्य कधींच करूं शकणार नाहीं ही गोष्ट मी तुमच्या नजरेस आणूं इच्छितों.**

महमद हुसेनच्या खुनाला मदत केल्याचा माझ्यावर ठेवण्यांत आलेला आरोप मला नाकबूल आहे. फिर्यादीचा या आरोपासंबंधीचा पुरावा खरा आहे असें जरी गृहित धरलें तरी त्या खुनाला मी मदत केली हें सिद्ध होत नाहीं. महमद हुसेन स्वखुषीने आझाद सैन्यांत दाखल झाला होता आणि सैन्याचे कायदे त्याच्यावर बंधनकारक होते. असें असूनही अत्यंत आणीबाणीच्या वेळीं तो पळून गेला आणि इतरांस पळून जाण्याची त्यानें फूस दिली. त्याचे आणि त्याच्या साथीदारांचे प्रयत्न सफल झाले असते तर आमचें सैन्य संकटांत आलें असतें. आझाद सरकारच्या आणि सुधारलेल्या राष्ट्रांच्या कायद्याप्रमाणें हा गुन्हा अत्यंत गंभीर स्वरूपाचा आणि मृत्यूच्या शिक्षेस पात्र असा होता. परंतु महमद हुसेनला मृत्यूची शिक्षा मी फर्माविली

अगर ती अमलांत आणली गेली हा आक्षेप खोटा आहे. पकडून आणल्या-नंतर महमद हुसेनला माझ्यासमोर उभे करण्यांत आलें त्यावेळीं झाल्या अपराधाबद्दल देहान्ताच्या शिक्षेस तूं पात्र आहेस अशी मी त्याला जरब दिली. नंतर आरोपीला त्याच्या मुख्याधिकाऱ्यासमोर हजर करण्याचा मी हुकूम दिला. परंतु आरोपीची फिर्याद नंतर माझ्यासमोर आलीच नाहीं. कारण तसें करण्याचा प्रसंग बहुधा आलाच नसावा.

माझ्या सैन्यानें लढाईत पकडलेल्या ब्रिटिश सैनिकांना आझाद सैन्याचा सेनापती या नात्यानें मी चांगल्या रीतीनें वागविलें. मी व माझे सहकारी युद्धकैदी या नात्यानें ब्रिटिशांना शरण आलों तेव्हां आम्हांलाही अशीच वागणूक मिळेल अशी आमची अपेक्षा होती. माझ्या शरणचिठींत युद्धकैदी म्हणूनच आम्ही शरण येत आहोंत अशी अट होती व ती अट मान्य करू-नच ब्रिटिश लष्करी अधिकाऱ्यांनीं आम्हांस ताब्यांत घेतलें होतें.

× × ×

आझाद सेनानींवरील खटला सुरू झाल्यापासून कधींही झाली नव्हती एवढी गर्दी या दिवशीं कोर्टांत दिसत होती. जबाबाचें वाचन चालू असतांना कोर्टांत अत्यंत शांतता आणि गंभीर वातावरण निर्माण झालें आणि त्याच वातावरणांत क. सहगल यांनीं आपला जबाब कोर्टाला स्पष्टपणें वाचून दाखविला.

## क. सहगल यांचा जबाब :

शोनान (सिंगापूर) येथील फेरार पार्कमध्यें १७ फेब्रुवारी १९४२ रोजीं ब्रिटिश व जपानी लष्करी अधिकारी यांची सभा झाली. **त्या सभेंत ले. क. हंट या ब्रिटिश अधिकाऱ्यानें आमचा प्रतिनिधी म्हणून हिंदी अमलदार व त्यांची फौज या सर्वांना एखाद्या मेंढराच्या कळपाप्रमाणें जपान्यांच्या हातीं दिलें. या कृत्यानें आम्हांला मोठा धक्का बसला. हिंदी सैन्यानें ब्रिटिशांच्या बलवान शत्रू-विरुद्ध लढाई देऊन पराक्रम गाजविला होता. त्याचा बदला म्हणून ब्रिटिश अधिकाऱ्यांनीं आम्हांला जपान्यांच्या दयेवर सोडून देण्याचें बक्षिस दिलें होतें. आमचीं बंधनें तोडून आणि**

आमची निष्ठा मातीमोल करून ब्रिटिशांनीं आम्हांला जणूं मुक्तच केलें होतें. जपान्यांनीं आमची जबाबदारी घेण्याचें नाकारून



ले. क. हंटनें एखाद्या मेंढरांच्या कळपाप्रमाणें आम्हांला जपान्यांच्या हातीं दिलें.

आम्हांला आझाद सैन्याचे मुख्याधिकारी जनरल मोहनसिंग यांच्या स्वाधीन केलें आणि आमचें नशीब आमच्या हातांत देऊन आम्हांला स्वतंत्र केलें. अशा परिस्थितींत आमच्या संरक्षणाची हमी न घेणाऱ्या ब्रिटिश राज्यसत्तेनें आमच्या राजनिष्ठेची अपेक्षा करणें चूक आहे. ८ ऑगस्ट १९४२ च्या हिंदी राष्ट्रसभेच्या "चले जाव" च्या ठरावानंतर हिंदुस्थानांत ज्या गोष्टी घडल्या त्यांवर सरकारनें पडदा उभारला असला तरी हिंदुस्थानांत गुप्त रीतीनें चालणाऱ्या नभोवाणीवरून स्वातंत्र्याची चळ-

**बळ दाबून टाकण्यासाठीं सरकारनें योजलेल्या उपायांची पुरे-पूर माहिती आम्हांला मिळत होती. त्यावरून सत्तावन सालच्या बंडानंतर सरकारनें केलेले भयंकर अत्याचार ह्यावेळीं सुद्धां सर-सहा चालू आहेत हें आम्हांस कळून चुकलें. या गोष्टींमुळें आमच्या देशाला गुलामगिरींत खितपत ठेवणाऱ्या ब्रिटिश राज-वटीविषयीं आमच्या मनांत भयंकर द्वेष व असंतोष निर्माण झाला.**

आमच्या माहितीप्रमाणें हिंदुस्थानच्या संरक्षणासाठीं ब्रिटिशांनी योजिलेले बचावाचे उपाय अपुरे आहेत असें आमच्यापैकीं अत्यंत आशावादी लोकांचें सुद्धां मत होतें. जपानी आक्रमण थांबविणें ब्रिटिशांना त्यावेळीं अशक्य होतें अशी आमची खात्री झाली. या सर्व गोष्टींचा विचारविनिमय करून जपा-नच्यां बरोबरीनें लढून हिंदुस्थानांतील परकी राज्यसत्ता उलथून पाडण्या-साठीं, जपान्यांनीं हिंदुस्थानांत आक्रमण करून आमचा देश घशांत घाल-ण्याचा डाव टाकल्यास तो उलथून पाडण्यासाठीं आणि वाटेल त्या परि-स्थितींत हिंदी लोकांना योग्य तें संरक्षण देण्यासाठीं आम्ही आमचें स्वतःचें पोलादी लष्कर उभारावयाचें असें ठाम ठरवून टाकलें.

जपान्यांच्या दराऱ्यानें, त्यांनीं दिलेल्या वागणुकीमुळें अगर त्यांचा भाडोत्री हस्तक म्हणून मी आझाद सैन्यांत शिरलें नाहीं......

युद्धकैदी या नात्यानें जे माझे न्याय्य हक्क आहेत ते मला मिळालेच पाहिजेत. १८ एप्रिल १९४५ रोजीं आघाडीवरील ब्रिटिश लष्कराच्या सेना-पतीला पोपा येथें मीं जो खलिता पाठविला त्यांतसुद्धां युद्धकैदी म्हणूनच मी शरण येत आहें असें मी स्पष्ट लिहून कळविलें होतें. या खलित्यांतील अटीं प्रमाणेंच युद्धकैदी म्हणून आम्हांस स्वीकारण्यांत आलें आणि युद्धकैदी म्हणूनच आम्हांला वागविण्यांत येत होतें.

**आम्ही घातलेल्या अटींप्रमाणें युद्धकैदी म्हणून घेण्यास ब्रिटि-शांनीं नकार दिला असता तर आमच्या रक्तांतील शेवटच्या थेंबापर्यंत आणि आमच्या प्राणांतील शेवटच्या श्वासापर्यंत ब्रिटिशांविरुद्ध लढण्यास आम्ही तयार होतों.**

हिंदुस्थान स्वतंत्र करण्याचा आझाद सरकारचा उद्देश साध्य झाला नसला तरी मलाया, ब्रह्मदेश आणि पूर्वेकडील इतर देशातील हिंदी लोकांचें जीवित, त्यांची मालमत्ता आणि त्यांची अब्रू यांचे परकी सत्तेच्या आक्रमणापासून संपूर्ण संरक्षण केल्याचें समाधान आम्हांला मिळालें आहे......

खुनाच्या आरोपाबद्दल माझा जबाब असा आहे कीं माझ्यावरील आरोपपत्रिकेंत उल्लेख असलेल्या चार शिपायांचा खटला माझ्यासमोर चालून त्यांना मी देहान्ताची शिक्षा सांगितली होती ही गोष्ट खरी आहे. परंतु झाल्या गुन्ह्याबद्दल खेद व्यक्त करून प्रामाणिकपणानें वागण्याचे वचन दिल्यानंतर त्या आरोपींना सांगितलेल्या शिक्षेची माफी देण्यांत आली. सैन्यांतील इतर कोणी सैनिक पळून जाऊं नयेत म्हणून त्यांचें नैतिक बळ वाढविण्याच्या कामीं प्रचाराच्या दृष्टीनें ह्या देहान्ताच्या शिक्षेच्या हुकुमांचा आम्हांला उपयोग झाला.

## क. धीलन यांचा जबाब :

डेहराडून येथील लष्करी विद्यालयांत शिक्षण घेत असतांना तेथील 'चेटवूड' सभागृहांत प्रामुख्यानें लावलेल्या फलकावरील खालील ध्येयवाक्य मी माझ्या स्मरणांत ठेविलें होतें.

> **'प्रत्येक प्रसंगीं, पहिल्यानें आणि प्रामुख्यानें तुमच्या देशाची अब्रू, त्याचें कल्याण आणि त्याचें संरक्षण या गोष्टींस प्राधान्य द्या. तुमच्या हाताखालील सैनिकांचें संरक्षण, सुख आणि स्वास्थ्य या गोष्टी नंतर येतात. तुमचें स्वतःचें संरक्षण आणि सुखसोई या गोष्टी अगदीं शेवटीं संभवतात.'**

आणि केवळ हा आदेश नजरेसमोर ठेवूनच आझाद हिंद फौजेचा अधिकारी या नात्यानें मी माझ्या देशाची सेवा केली आहे.

मलायांतील प्रजेच्या संरक्षणाची जबाबदारी आपल्या आंगावर घेतलेल्या ब्रिटिश सरकारनें ती जबाबदारी पार पाडण्यासाठीं केलेली कामगिरी अत्यंत असमाधानकारक होती. जपानचें आक्रमण होतांच त्या देशांतील लोकांच्या

झालेल्या हालअपेष्टा मी माझ्या डोळ्यांनीं पाहिल्या होत्या. आणि माझ्या हिंदी बांधवांची आतां यापुढें काय दशा होणार आहे या आत्यंतिक विचारांनीं माझ्या अंगावर शहारे आले! **आणि यावेळींच ब्रिटिशांच्या हिंदुस्थानावरील दीड शतकाच्या राज्यकारभारांतून निर्माण झा-**




ह्या ब्रिटिशांच्या आदेशानुसार मी वर्तन केलें आहे.

**लेल्या परिस्थितीचें भयंकर स्वरूप मला दिसून आलें. आपल्या साम्राज्याचा पाया पक्का करण्यासाठीं ब्रिटिशांनीं आमचा देश चालून टाकला आणि आमच्या देशांतील मनुष्यबळ आपल्या स्वार्थासाठीं पूर्णपणें उपयोगांत आणलें. आमच्या देशाच्या संकटाच्या वेळीं त्याचें संरक्षण करण्यासाठीं त्यांनीं आमचा कांहींच उपयोग होऊं दिला नाहीं. उलट पारतंत्र्यांत कायमचें लोटून देऊन त्यांनीं आम्हांस पूर्णपणें खच्ची करून टाकलें.......**

आझाद हिंद सरकारच्या स्थापनेंत हिंदुस्थानच्या आशेचे किरण मला दिसले. माझी मातृभूमी मला हांक मारित होती आणि त्या हांकेला मी ओ दिली. सुभाषचंद्र बोस यांच्या नेतृत्वाखालीं आझाद हिंद सेनेची पुनर्घटन झाल्यावर त्या सेनेंत सामिल होण्याचा मी निर्णय घेतला. या सेनेंत येणाऱ्या कोणाही युद्धकैद्यावर कोणत्याही प्रकारची सक्ती करण्यांत किंवा दडपण आणण्यांत आलें नाहीं ही गोष्ट मी निक्षून सांगतों. उलट अशी सक्ती करण्याचें किंवा दडपण आणण्याचें आम्हांला प्रयोजन नव्हतें. आमच्याकडे स्वेच्छेनें आलेल्या सैनिकांना पुरून उरेल इतकी साधन सामुग्री आमच्याकडे नव्हती. जरुरीपेक्षां जास्त सैनिकांचा भरणा आमच्याकडे झाला. मी माझ्या प्रचाराच्या वक्तव्यांत ज्यांना आपल्या देशाच्या सुटकेचा आत्यंतिक कळवळा आहे आणि जे त्यासाठीं वाटेल ते श्रम व हाल भोगण्यास तयार असतील त्यांनींच आमच्या सैन्यांत दाखल व्हावें असा आदेश देत होतों. प्रत्यक्ष आघाडीवर जातांना सुद्धां माझ्या हाताखालील लोकांस मी याबद्दल पुन्हा पुन्हा समज दिली होती आणि माइंगयान शहर सोडतांना आमच्या बरोबर येण्यास नाखूश असलेल्या दोनशें सैनिकांना मी रंगूनला मुख्य छावणीवर पाठवून दिलें होतें.

आमच्या सैन्यांत सामिल होण्यासाठीं युद्धकैद्यांना तुरुंगांत ठेऊन अगर स्थानबद्ध करून त्यांच्यावर सक्ती करणें किंवा दडपण आणणें अशा गोष्टी केल्याबद्दलचा फिर्यादीच्या साक्षीदारांचा झालेला पुरावा साफ खोटा आहे हें मी आपल्याला स्पष्टच सांगतों. अशा प्रकारची तुरुंगाची जागा मुळींच अस्तित्वांत नव्हती; मात्र स्थानबद्ध करण्याची जागा होती व त्या ठिकाणीं गैरवर्तनाबद्दल शिक्षा झालेल्या लोकांनाच ठेवण्यात येत असे. या स्थानबद्धतेंत असणाऱ्या सैनिकांना त्यांच्यावरील आरोप सिद्ध झाल्यास पुन्हा सैन्यांत घेतां येत नसे आणि अशा सैनिकांची नीतिमत्ता कमी दर्जाची आहे असें मानण्यांत येत असे. फिर्यादीच्या साक्षीदारांनीं आपली कातडी बचावण्यासाठीं आणि सरकारची मेहेरबानी मिळविण्यासाठीं निव्वळ खोट्या आणि तुटक स्वरूपाच्या साक्षी दिल्या आहेत.

माझ्या हाताखालील लोकांस वरील प्रकारची सवलत असल्यामुळेंच

आघाडीवरील प्रत्येक युद्धाच्या वेळीं शत्रूपासून दोन मैलांवर आम्ही तळ देऊन होतों तरी आमचे कोणीही सैनिक शत्रूला फितूर झाले नाहींत. पुष्कळदां वीस वीस तास पाण्याविना आणि दोन दोन, तीन तीन दिवस अन्नाविना आम्हांला राहावें लागे. लष्कराचा अधिकारी म्हणून मला जर एवढे हाल काढावे लागले तर माझ्या सैनिकांची काय स्थिती झाली असेल ? सक्तीचा सैनिक असे हाल सहन करूं शकला नसता.

पळपुटेपणा आणि फितुरी केल्याबद्दल चार सैनिकांना माझ्यासमोर आणिलें होतें ही गोष्ट खरी आहे. परंतु माझ्यामुळें अगर माझ्या हुकुमावरून त्यांना ठार करण्यांत आलें ही गोष्ट खोटी आहे. ज्या दिवशीं व ज्या वेळीं त्यांना ठार करण्यांत आल्याचें सांगण्यांत आलें आहे त्या दिवशीं व त्यावेळीं मी आजारानें अंथरुणाला खिळून पडलों होतों. त्यांना सांगण्यांत आलेली देहांताची शिक्षा त्यांच्या वरिष्ठ मुख्याधिकाऱ्यानें रद्द केली व म्हणून ती अमलांत आणली गेली नाहीं.

आझाद सैन्यांत असतांना ज्या ज्या गोष्टी मी केल्या त्या त्या आझाद हिंद सरकारच्या कायद्यानें निर्माण झालेल्या सैन्याचा एक अधिकारी या नात्यानें मीं केल्या आहेत; म्हणून हिंदी लष्करी कायद्याच्या बंधनांत अगर इतर कोणत्याही फौजदारी कायद्याच्या कक्षेंत मी येत नाहीं.

या आदालतींत होत असलेली माझी चौकशी बेकायदेशीर आहे असा मला आदेश आहे. शुद्र आणि सोज्वळ हतूनें मी आझाद सैन्यांत दाखल झालों. या सैन्याचा अधिकारी म्हणून कित्येक युद्धकैद्यांना पैशाची आणि सामुग्रीची मदत मी देऊं शकलों. अतिपूर्वेकडील हिंदी लोकांचें जीवित, मालमत्ता व अब्रू या गोष्टींचें आझाद सैन्यानें संरक्षण केलें. जपान्यांनीं मृत्यूची शिक्षा फर्माविलेल्या कित्येक युद्धकैद्यांना आणि हिंदीलोकांना मी जीवदान दिलें. हिंदुस्तानांतील कोणत्याही प्रदेशावर अग्निवर्षाव न करण्याबद्दल जपान्यांचा मी यशस्वी प्रतिकार केला......

## आरोपींचा पुरावा : ४

आरोपींच्या लेखी जबाबांनंतर ता. ८ डिसेंबर १९४५ रोजीं आरोपीं-तर्फेचा साक्षीपुरावा घेण्यास सुरवात झाली. हिंदुस्थानांतील लष्करी न्यायदा-नाच्या इतिहासांत जपानी साक्षीदार आणि तेही मोठे अंमलदार तपासण्याची ही पहिलीच वेळ होती. आरोपींच्या बचावाच्या दृष्टीनें या साक्षी महत्वाच्या होत्या.

### जपानच्या परराष्ट्रखात्याचे अंमलदार
### सुब्रो ओहाटा यांची साक्षः

जपानी सरकारच्या माहितीखात्यानें २३ ऑक्टोबर १९४३ रोजीं प्रसिद्ध केलेल्या जाहीरनाम्याची नक्कल मी दाखल करितों. त्यांत सुभाषचंद्र बोस यांनीं २१ ऑक्टोबर १९४३ रोजीं स्थापन केलेल्या स्वतंत्र हिंदुस्था-नच्या कामचलाऊ सरकारच्या स्थापनेचा उल्लेख असून २३ ऑक्टोबरला त्यास सार्वभौम जपानी सरकारनें मान्यता दिल्याचा उल्लेख आहे. ह्या जाहीरनाम्याचा तर्जुमा मी तयार केला होता. हिंदी लोकांच्या स्वातंत्र्याच्या आकांक्षा सफल होण्याचा योग आला असून त्यांच्या स्वातंत्र्यप्रयत्नांत जपानी सरकार त्यांस शक्यती मदत करील असा त्यांत खुलासा आहे. त्यानंतर जपानचे मुख्य प्रधान ज. टोजो यांनीं ६ नोव्हेंबर १९४३ रोजीं पूर्व आशि-यांतील राजकीय प्रतिनिधींच्या सभेंत केलेल्या भाषणाची अधिकृत नक्कल मी दाखल करितों. आपल्या भाषणांत ज. टोजो म्हणाले कीं आझाद हिंद सरकार बळकट होत चाललें असून आपलें स्वातंत्र्य हस्तगत करण्याच्या मार्गावर तें आहे. 'म्हणून मी असें जाहीर करितों कीं हिंदीस्वातंत्र्यप्रयत्नांत आझाद सरकारला मदत करण्याच्या आमच्या उद्देशानुसार, अंदमान आणि निकोबार हीं जपानी सरकारच्या ताब्यांत असलेलीं दोन बेटें आम्ही त्या

सरकारच्या ताब्यांत देत आहोत...हिंदीस्वातंत्र्याच्या लढ्यांत या सरकारशीं हरएक प्रकारचें सहकार्य करण्याचा जपानचा निर्धार आहे. आपल्या ध्येया-प्रमाणें वागण्याची हिंदी लोक पराकाष्ठा करतील अशी जपानला आशा आहे...' ज. टोजो यांच्या या भाषणाच्या वेळीं मी हजर नव्हतों. सभेचा वृत्तांत माझ्या खात्याकडे वेळच्यावेळीं येत होता. या वृत्तांताचा तर्जुमा बरोबर आहे. जपानी सरकारनें आपला राजकीय प्रतिनिधी म्हणून मि. टेरुरो हाचिया यांस आझाद हिंद सरकारकडे पाठविण्याचें ठरविलें. जपानच्या माहितीखात्यानें २६ नोव्हेंबर १९४४ रोजीं प्रसिद्ध केलेल्या ठरावाची नकल मी दाखल करितों. त्यांत 'आझाद हिंद सरकारचे श्री सुभाषचंद्र बोस व सार्वभौम जपानी सरकारचे एक अधिकारी यांच्यामध्यें सध्या टोकियो येथें पूर्व आशियांतील लढाई व हिंदी स्वातंत्र्याची लढाई या बाबी यशस्वी-पणें पार पाडण्यासाठीं योजावयाच्या उपायांबद्दल विचार चालू आहे. त्यांतील एका निर्णयाप्रमाणें जपानी सरकारचा एक प्रतिनिधी आझाद हिंद सरकारच्या दरबारीं असावा असें ठरलें आहे...' असा मजकूर आहे.

उलट तपासणी : मी १९२८ सालापासून जपानी परराष्ट्र खात्यांत आहे. टोकियो शहरांत हिंदी स्वातंत्र्य संघाची एक शाखा लढाईच्या अगोदर पासून अस्तित्वात होती किंवा नाहीं हें मला ठाऊक नाहीं. तसेंच एखादें हिंदी सदिच्छामंडळ अस्तित्वांत असल्याचें मला आठवत नाहीं. त्यावेळीं या विषयाशीं माझा संबंध येत नव्हता. राशबिहारी बोस अगर इतर हिंदी गृहस्थ आपल्या चळवळीसाठीं जपानची मदत मागत होते किंवा नाहीं हें दाखविणारे सरकारी कागदपत्र माझ्याकडे नाहींत; परंतु त्याबद्दल मी वृत्तपत्रांत वाचिलें होतें. बँकाक येथील परिषदेची मला कांहीं माहिती नाहीं. अंदमान व निकोबार बेटांच्या राज्यव्यवस्थेबद्दल जपानी सरकारनें प्रत्यक्ष काय केलें याची मला माहिती नाहीं.

## सुनिची मात्सुमोटो यांची साक्ष :

मी नोव्हेंबर १९४२ ते ऑक्टोबर १९४४ पर्यंत व पुन्हा मे १९४५ पासून युद्धसमाप्तीपर्यंत परराष्ट्र खात्यांचा दुय्यम दिवाण होतों. त्यापूर्वी

मी तहनाम्याच्या खात्याचा मुख्य चालक होतों. आझाद हिंद सरकारच्या स्थापनेची मला माहिती आहे. या सरकारला जपानी सरकारनें दिलेली मान्यता माझ्या माहितींत आहे. या मान्यतेचा अस्सल कागद मी पाहिला आहे. या स्वतंत्र सरकारला कोरिया, मांचुको, जर्मनी, इटाली, चीन, थायलंड, फिलिपाईन व ब्रह्मदेश या सरकारांनीं आपापली मान्यता दिल्याचें मला माहित आहे. पूर्वआशियांतील राष्ट्रांच्या राजप्रतिनिधींच्या ६ नोव्हेंबर १९४३ रोजीं टोकियो येथें भरलेल्या परिषदेस मी हजर होतों. त्यावेळीं जपानचे मुख्य प्रधान जनरल टोजो यांनी केलेलें भाषण मला माहित आहे. या ठिकाणीं हजर करण्यांत आलेली त्यांच्या भाषणाची नक्कल बरोबर आहे. अंदमान व निकोबार बेटें आझाद सरकारला दिल्याचा हुकूम तेथील मुख्य जपानी नाविक ठाण्यावर पाठविला गेला असला पाहिजे.

उलट तपासणी : माझ्या कारकीर्दीत हिंदी स्वातंत्र्यसंघाशीं माझा संबंध आला नाहीं. राशबिहारी बोस यांना मी कधीं भेटलों नाहीं. मी परराष्ट्र खात्याचा दुय्यम दिवाण असल्या मुदतींत माझ्या कचेरीचा ह्या संघाशीं संबंध होता, परंतु तो कोणत्या स्वरूपाचा असावा तें मला आठवत नाहीं. युद्धापूर्वी या संघाच्या कामगिरीस जपानी सरकारनें प्रोत्साहन दिलें किंवा नाहीं याची मला माहिती नाहीं. या कामाशीं माझा संबंध नव्हता. हिंदी स्वातंत्र्यसंघ ही राजकीय बाब होती व इतर राष्ट्रांच्या तहांच्या बाबींचा संबंध माझ्या खात्याशीं येत होता.

प्र. हिंदुस्थानांत असंतोष पसरविणें व असंतोषास गुप्त प्रोत्साहन देणें हें जपानी सरकारचें पुष्कळ वर्षांचें धोरण होतें ही गोष्ट खरी आहे ना ?

उ. अशा प्रकारच्या गोष्टींचा मी इन्कार करतों.

प्र. मार्च १९४२ पासून हिंदी स्वातंत्र्यसंघाचे लोक आझाद हिंद सरकारला मान्यता मिळविण्यासाठीं जपानी सरकारकडे व त्या सरकारामार्फत खटपट करित होते ना ?

उ. मला या गोष्टीची जाणीव नाहीं

सुभाषचंद्र बोस यांना त्यांच्या टोकियोमधील निवासस्थानीं १९४३

त्या एप्रिलमध्यें पहिल्यानें मी भेटलों. त्या पूर्वीच ते जर्मनीमधून टोकियोंत आले होते.

प्र. त्यांना जर्मनीमधून पाठविण्यासाठीं जपानी सरकारनें जर्मन सरकारला विनंती केली होती काय ?

उ. त्यांना जपानला पाठविण्यासाठीं जपानी सरकारनें जर्मन सरकारा-मार्फत व्यवस्था केली होती.

प्र. ही व्यवस्था करण्याची जपानला काय जरूर होती ?

उ. सुभाषबाबू हिंदी स्वातंत्र्यासाठीं जर्मनीमध्यें खटपट करित असल्याचें जपानला ठाऊक होतें. ते जपानला लढाईत मदत करतील व त्यांच्या स्वातंत्र्यप्रयत्नांत जपान त्यांना मदत करील असें जपानी सरकारला वाटलें म्हणून ही व्यवस्था करण्यांत आली. जपानी सरकारनें ही गोष्ट स्वेच्छेनें केली.

प्र. लढाई जिंकण्याचा हा एक मार्ग आहे असें जपानी सरकारला वाटलें काय ?

उ. जपानचे युद्धप्रयत्न सफल करण्यासाठीं ही गोष्ट करण्यांत आली.

प्र. आझाद सरकार व आझाद सैन्य यांचे ते मुख्याधिकारी होतील या दृष्टीनेंच त्यांना बोलाविलें काय ?

उ. आझाद हिंद सरकारचे ते मुख्य समजले जाणार होते असें मला वाटतें.

प्र. या सरकारला मान्यता देणें हें जपानचें लढाऊ धोरण होतें काय ?

उ. असें मला वाटतें.

प्र. या सरकारला आपल्या मित्रराष्ट्रांची मान्यता जपाननेंच मिळवून दिली ना ?

उ. बोसनीं आपल्या सरकारला मान्यता मिळण्याबद्दल जपानी सरकार-मार्फत आपल्या मित्रराष्ट्रांना विचारलें...या गोष्टीबद्दल माझ्याकडे लेखी पुरावा नाहीं. ही गोष्ट १९४३ च्या ऑक्टोबरमध्यें झाली. त्यावेळीं बोस जपानमध्यें असावे असें वाटतें. या गोष्टीबद्दल कागदपत्र पाहिल्याचें

मला आठवत नाहीं. मांचुकोमध्यें त्यावेळीं जपानी सैन्य असलें तरी तें स्वतंत्र राष्ट्र समजलें जात होतें. नांकिंग सरकारला जपानची मदत मिळत होती. नांकिंगसुद्धां त्यावेळीं एक स्वतंत्र राष्ट्र समजलें जात होतें.

प्र. कोणाकडून ?

उ. जपान व त्याच्या मित्रराष्ट्रांकडून. त्याचप्रमाणें स्पेनकडून.

**फेर तपासणी** : हिंदुस्थानाबद्दल जपानचें युद्धाचें धोरण काय होतें ?

प्र. हिंदी स्वातंत्र्याला मदत देण्याचें.

## रेंझो सावडा यांची साक्ष :

(ता. १० डिसेंबर १९४५)

ऑक्टोबर १९४४ ते मे १९४५ पर्यंत परराष्ट्र खात्याचा मी दुय्यम मंत्री होतों. लंडन, पॅरिस व इतर ठिकाणच्या जपानी वकिलातींत वीस वर्षें मी काम केलें. आझाद हिंद सरकारच्या दरबारांत जपानी वकिलाची नेमणूक मी केली. त्या नेमणुकीचा निर्णय नोव्हेंबर १९४४ मध्यें घेण्यांत आला. टेरूरो हाचिया हे जपानी वकील म्हणून मार्च १९४५ मध्यें रंगूनला जाऊन पोंचले.

**उलट तपासणी** : आझाद हिंद सरकारकडे जपानी वकील पाठविण्याचा हुकूम सरकारी पत्रकांत जाहीर करण्यांत आला होता. त्या पत्रकाची नक्कल आतां मजकडे नाहीं. हाचिया यांना रंगूनला पाठविण्याचें काम माझें होतें. ते रंगूनला पोंचल्यानंतर त्यांच्याकडून मला पत्रें आलीं होती. तीं पत्रें मी बरोबर आणलीं नाहींत. तीं टोकियोला आहेत. त्यांच्याकडे प्रशास्तिपत्रक दिलें नव्हतें. परंतु बोस यांच्या मागणीमुळें तें पाठाविण्याचें ठरलें. त्याप्रमाणें प्रशस्तिपत्रावर बादशहांची सही झाल्यावर मे १९४५ मध्यें तें रंगूनला पाठविण्यांत आलें. वाहतुकीच्या अडथळयामुळें तें रंगूनला मिळालें नाहीं. तरीसुद्धां हाचिया हे तिकडे जपानी वकील म्हणून काम पहात होते. आझाद सरकारचे परराष्ट्रमंत्री व जपानी वकील यांच्या परस्पर भेटी झाल्या होत्या. ही गोष्ट प्रत्यक्ष हाचिया यांनी पाठविलेल्या वृत्तांतांत नमूद

आहे......हाचिया एप्रिल १९४५ च्या अखेरीस रंगून सोडून दुसरीकडे गेले. त्यानंतर ऑगस्टच्या अखेरीपर्यंत ते बँकॉकला होते.

## टेरुरो हाचिया यांची साक्ष :

आझाद हिंद सरकारच्या दरबारांतील सरकारी वकील म्हणून जपानी सरकारनें माझी नेमणूक केल्यावरून मार्च १९४५ मध्यें मी रंगूनला गेलों. तेथें आझाद सरकारचे परराष्ट्र-मंत्री कर्नल चतरजी यांची मी भेट घेतली. तेथें त्या सरकारचे प्रसिद्धीमंत्री श्री अय्यर यांची सुद्धां मी भेट घेतली. २४ एप्रिल-पर्यंत मी रंगूनला होतों व आझाद कचेरी बँकॉकला गेल्यावेळीं मी बँकॉकला गेलों. दिल्लीस येण्यास निघण्यापूर्वी मी तिकडेंच होतों. मी माझीं प्रशस्ति-पत्रकें बरोबर घेतलीं नव्हतीं. रंगूनला जाण्यास निघण्यापूर्वी मी टोकियोस होतों. जपानचे मुख्य परराष्ट्रमंत्री शिरोमित्सू यांनीं मला रंगूनला जाण्याचा हुकूम दिला. त्यापूर्वी मी पोलंडच्या जपानी वकिलातींत होतों आणि बल्गेरियामध्यें जपानीवकील म्हणून मी काम केलें आहे. जपानच्या परराष्ट्र कचेरीच्या सुधारणाखात्यांचा मुख्य म्हणून मी काम केलें आहे. आझाद सरकार हें कामचलाऊ सरकार असल्यामुळें मी प्रशस्तिपत्रकें सोबत घेतलीं नव्हतीं व त्यांची जरुरी पडणार नाहीं असें मला सांगण्यांत आलें होतें. नंतर तीं पाठविण्यांत आल्याचें मला तार करून कळविण्यांत आलें. परंतु तीं मला मिळालीं नाहींत.

**उलट तपासणीः—** मी पोलंडहून बल्गेरियास १९३९ सालीं वकील म्हणून गेलों त्यावेळीं टोकियोहून बल्गेरियाला मला प्रशस्तिपत्रक पाठविण्यांत आलें होतें. रंगूनला जातांना मी सरकारी कागद बरोबर घेतले नव्हते. माझ्या भेटींत जपानी वकील म्हणून आल्याचें मी क० चतर्जीनां सांगितलें. त्यानंतर मी अय्यरनां भेटलों. क० चतर्जींच्या भेटीची तारीख मला नक्की आठवत नाहीं. क० चतर्जी माझ्याकडे एकदां व अय्यरही एकदां आले होते. बोस यांची व माझी रंगूनला भेट झाली नाहीं. त्यांनीं भेट देण्याचें नाकारलें. क० चतर्जीच्या सांगण्यावरून मला असें वाटलें कीं प्रशस्तिपत्रकें माझ्या-जवळ नसल्यामुळें बोस यांनीं मला भेट देण्याचें नाकारलें असावें. म्हणून

रंगूनला आल्यानंतर चार पांच दिवसांनीं मी टोकियोला तार केली व टोकियोहून कागदपत्र पाठवित असल्याबद्दलचें मला तारेनें उत्तर आलें. ती तार आतां माझ्याजवळ नाहीं. तेवढा एकच जबाब रंगूनला असतांना मला आला होता. रंगूनहून बँकॉकला जातांना माझा चिटणीस व दुभाषा असे माझ्या बरोबर होते. जपानी व्यापारी संस्थांनीं २१ एप्रिलपूर्वी रंगून खाली केलें किंवा नाहीं हें मला ठाऊक नाहीं. परंतु जपानी सैन्याचा कांहीं भाग खालीं झाला होता हें मला माहित आहे. ह्या गोष्टींशीं माझा प्रत्यक्ष संबंध पोंचत नव्हता.

**फेरतपासणी:** आझाद हिंद सरकार रंगून सोडून बँकॉकला जात होतें ही गोष्ट मला क० चतर्जी यांजकडून समजली.

## जनरल काटाकुरा यांची साक्ष:

इंफालच्या मोहिमेच्या वेळीं ब्रह्मदेशांतील जपानी सैन्याचा मी सेनापती होतों. आझाद हिंद सरकारची मला माहिती आहे परंतु त्याबद्दलच्या बारिकसारिक गोष्टी मला माहित नाहींत. जुलै १९४३ मध्यें सुभाषचंद्र बोस यांची व माझी भेट झाली. इंफालच्या मोहिमेची रचना मी आंखली.

प्र. आझाद हिंद सैन्यानें त्यांत कोणता भाग घेतला होता?

उ. जपानपासून स्वतंत्र म्हणून आझाद सैन्य आपल्या राष्ट्राच्या स्वातंत्र्यासाठीं लढत होतें. आमच्या लष्कराच्या बरोबरीनें लढण्यासाठीं आझाद लष्कराला स्वतंत्र आघाडी दिली होती. सेनापती शहानवाझ यांच्या अधिकारांत असलेली पहिली पायदळ सेना जानेवारी १९४४ मध्यें रंगूनला येऊन पोंचली. शत्रूची एक ठराविक फळी फोडण्याचें काम या सैन्याकडे होतें. शहानवाझ यांचेबरोबर एक जपानी अधिकारी मदतनीस म्हणून होता व त्याचें सैन्य निराळें होतें. आघाडीवर गेल्यानंतर प्रत्यक्ष लढाई चालू नसेल अशा वेळीं जपानी सैन्य व आझाद सैन्यें हीं स्वतंत्र असत परंतु प्रत्यक्ष लढाईचे वेळीं हीं दोन्हीं सैन्यें जपानी सेनापतीच्या हुकमतींत लढाई करित असत.

प्र. हिंदुस्थानच्या हद्दींत शिरल्यावर मिळविलेल्या मुलखाची विल्हेवाट कशी लावावयाची याबद्दल कांहीं व्यवस्था ठरली होती काय?

उ. असा मुलूख आझाद सरकारकडे जावयाचा व त्याची राज्यव्यवस्था त्या सरकारनेंच करावयाची होती. स्वारींत मिळणारी सगळी लूट त्यांनींच घ्यावयाची असें ठरलें होतें.

प्र. जपानी व आझाद हिंदी सैन्यें हिंदुस्थानांत शिरलीं त्यावेळीं एखादा जाहीरनामा निघाल्याचें आपणास प्रत्यक्ष ठाऊक आहे काय ?

उ. सुभाषचंद्र बोस यांच्या सहीचा एक व जपानी सैन्यांच्या मुख्याचा एक असे जाहीरनामे निघाले होते. बोस यांच्या जाहिरनाम्यांत आझाद हिंद सरकार हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठीं लढत असून जपानी सैन्यानें मिळविलेला सगळा मुलूख आझाद सरकारला देण्यांत येणार आहे असा मजकूर होता. जपानी सैन्य इंग्रजांशीं लढाई देईल, हिंदी लोकाशीं तें लढणार नाहीं व जी लूट त्यांना मिळेल व जो मुलूख तें पादाक्रांत करील तो आझाद हिंदुस्थानच्या कामचलाऊ सरकारला देण्यांत येईल असा जपानचा जाहीरनामा होता. इंफालच्या लढाईपूर्वी आझाद सैन्याचे अधिकारी व जपानी सैन्याचे अधिकारी यांनीं मिळून या मोहिमेच्या ऐक्याधिकाराची व्यवस्था ठरविली व नंतर एक संयुक्त समिती स्थापन केली. परस्परांना बातमी पोंचविणें व लढाईपूर्वी सैन्याची व्यवस्था ठरविणें या अशा व्यवस्थेंतील महत्वाच्या गोष्टी होत्या. दोन्हीकडील अधिकारी एकमेकांना नेहमीं मिळत असत.

**उलट तपासणी**:— मी १९४४ च्या एप्रिलपर्यंत रंगूनमध्यें होतों व नंतर मी मियामोला गेलों. रंगून व मियामो या दोन्हीं ठिकाणीं मी हालचाली ठरवित होतों. जुलई १९४४ नंतर ब्रह्मदेशांतील जपानी सैन्याशीं माझा संबंध नव्हता. आझाद हिंद सैन्याच्या घटनेबद्दल जानेवारी १९४४ च्या पूर्वी जरी मला प्रत्यक्ष माहिती नव्हती तरी त्याबद्दल मी बरेंचसें ऐकलें होतें. इंफालची मोहिम त्याचवेळीं आंखण्यांत आली. ही मोहिम केव्हां संपली हें मला समजलें नाहीं कारण तिथें मी शेवटपर्यंत नव्हतों. इंफालच्या आघाडीवर दहाहजारांवर आझाद सैन्य असावें असें मला वाटतें. त्यांना सिंगापूरमधून येऊन आणखी सैन्य मिळालें. कांहीं सैन्य ब्रह्मदेशांतून व कांहीं हिंदुस्थानांतून आलें असावें कारण तसें मीं ऐकलें होतें. या आघा-

डीवर लढलेल्या फौजांची नांवें मला आठवत नाहींत. परंतु त्यांचीं नांवें बहुधा नं. १ पायदळ, नं. २ पायदळ, नं. ३ पायदळ अशीं असावींत. शिवाय इतर लहान पलटणी असाव्यात. एस्. एस्. पलटण असल्याचें मला आठवत नाहीं परंतु माहितगार पलटण व कुमक पलटण असल्याचें मला आठवतें. बहादुर पलटणीचें नांव मला आठवत नाहीं. माहितगार पलटणीचे कांहीं लोक आमच्यांत आल्याचें मी पाहिलें आहे. आझाद सैन्याच्या लोकांना जपानी सैन्यानें मजुरांसारखें वागविलें हे म्हणणें मला मान्य नाहीं. माझ्या स्वतःच्या माहितीप्रमाणें आझाद सैन्याला रस्ते करणें, ते दुरुस्त करणें, पूल बांधणें, जंगलांतील आगी विझविणें, खटारे हांकणें आणि आमच्या सैन्याचा दाणागोटा वहाणें अशा प्रकारचीं कामें कधींही देण्यांत आलीं नव्हतीं. (कॅप्टन शहानवाझखान यांच्या डायरींतील ३० मार्च १९४४ ची नोंद साक्षीदारास दाखविण्यांत आली.) 'केनेडी टेकडीवरील लूट परत पाठविली. जपानी आमच्या पोलादी तुकडीस मजुरीचीं कामें देतात. या बद्दल मी आज किमावारी यांस भेटण्यासाठीं हाकाला जात आहें. ह्या एकतर्फी वागण्यानें कसें होणार हेंच मला समजत नाहीं' ह्या त्यांत लिहिलेल्या गोष्टींची मला मुळींच माहिती नाहीं.

रंगूनहून आझाद हिंद सैन्याचे अधिकारी नभोवाणीवरून बोलत. जपान्यांनीं तसें करण्यास अगर आपल्या मतानें बोलण्यास त्यांस कधींही सांगितलें नव्हतें. जपानी व आझाद सैन्यांचे अधिकारी एकमेकांस सलामी देत असत. फिल्डमार्शल टेराउची यांनीं जनरल कावाबे यांना लुटीच्या व्यवस्थेबद्दल दिलेला हुकूम मी पाहिला होता. तो हुकूम १९४३ सालचा असावा. तो आतां मजकडे नाहीं. जपानचा जाहिरनामा व बोस यांच्या जाहिरनाम्यांची नकल मी स्वतः वाचली होती.

**फेरतपासणी :** मार्च १९४४ च्या अखेरीस कॅ० शहानवाझखान हाकाफालन येथें आले. हा भाग इंफाल मोहिमेचा होता. एप्रिल १९४४ मध्यें आझाद सैन्याची दोन नंबरची पलटण पालेल येथें होती. तेथें लढाई देऊन तिनें हिंदुस्थानच्या हद्दीत प्रवेश केला. कॅ० शहानवाझखान यांच्या पलटणींना दिलेलें काम अत्यंत महत्वाचें होतें. जपानी सरकार व सुभाषचंद्र बोस यांनीं शहानवाझनां या बहादुरीबद्दल अभिनंदनाचे संदेश पाठविले होते.

## प्रसिद्धी व प्रचार खात्यांचे मंत्री श्रीनिवास अय्यर यांची साक्ष :

डिसेंबर १९४१ मध्यें जपाननें लढाई पुकारली त्यावेळीं मी बँकॉक येथें होतों. पूर्वआशिया, थायलँड, ब्रह्मदेश, मलाया, सिंगापूर, इंडोचायना, जावा, सुमात्रा, फिलीपाईन, शांघाय व जपान या देशांतील हिंदी लोकांची एक परिषद जून १९४२ मध्यें बँकॉकला भरली होती. त्या परिषदेस मी हजर होतों. त्या देशांतील हिंदी लोकांची वस्ती अजमासें पंचवीस ते तीस लाख असावी. बँकॉक येथें स्थापन झालेल्या हिंदी स्वातंत्र्यसंघाच्या कार्यकारणींत मी जुलै १९४२ मध्यें दाखल झालों. या संघाचा मूळ उद्देश हिंदी स्वातंत्र्य मिळविण्याचा होता. कार्यकारिणीचें प्रसिद्धीखातें माझ्याकडे देण्यांत आलें. फेब्रुवारी १९४३मध्यें मी सिंगापुरला गेलों. तेथें स्वातंत्र्य संघाचे अध्यक्ष श्री. राश बिहारी बोस यांना मी भेटलों. संघाची मुख्य कचेरी सिंगापूरला नेण्यांचें ठरल्यावरून त्याबद्दलची व्यवस्था करण्यासाठीं मी बँकॉकला लिहिलें. स्वातंत्र्यसंघाच्या शाखा वरील सर्व देशांत स्थापन झाल्या होत्या. संघाचे कायम सदस्य तीन देशांत होते व त्यांची संख्या सतरा लक्ष पन्नास हजार होती. श्री. सुभाषचंद्र बोस १९४३ च्या जुलैंत सिंगापूरला आले. ४ जुलै रोजीं हिंदी स्वातंत्र्यसंघाच्या निरनिराळया देशांतील शाखांच्या सर्व प्रतिनिधींची एक परिषद सिंगापूरला भरविण्यांत आली. त्या परिषदेच्या वेळीं श्री. राशबिहारी यांनीं आपलें अध्यक्षपद श्री. सुभाषचंद्र बोस यांना अर्पण केलें. त्या सभेस मी हजर होतों. संघाचें अध्यक्षपद आपण नेताजी सुभाषचंद्र बोस यांना अर्पण करित आहोंत असें राशबिहारी यांनीं सांगितलें त्यावेळीं टाळयांचा प्रचंड कडकडाट झाला. आपल्या भाषणांत नेताजींनीं आझाद हिंद सरकारच्या स्थापनेचा ठराव आणला तेव्हां परिषदेंत अतीव आनंदाचें आणि उत्साहाचें वातावरण निर्माण झालें. नेताजींच्या ठरावावर अत्यंत मोकळेपणानें विवेचन झालें.

आणखी एक परिषद २१ ऑक्टोबर १९४३ रोजीं बोलाविण्यांत आली. तीस मी हजर होतों. या परिषदेंत नेताजींनीं आझाद हिंद सरकार स्थापन केल्याची घोषणा केली त्यावेळीं सुद्धां सभासदांकडून टाळयांचा कडकडाट व आनंदोद्गारांचा वर्षाव झाला.

या घोषणेनंतर आझाद हिंद सरकारच्या मंत्रिमंडळांतील मंत्र्यांचीं नावें

जाहीर करण्यांत आली. त्या नंतर सुभाषबाबूंचा व त्यांच्या मंत्र्यांचा शपथविधी झाला.

आझाद हिंद सरकारनें ब्रिटन व अमेरिका या राष्ट्रांविरुद्ध लढाई पुकारल्याचें आपल्या सरकारी पत्रकांत जाहीर केलें.

हिंदी लोकांना जरूर असेल तेव्हां, जरूर असेल त्या ठिकाणीं व विशेषतः त्यांच्यावरील जुलमाविरुद्ध संरक्षण देण्याचे आझाद सरकारनें आपल्या लष्कराला हुकूम सोडले.

हिंदी स्वातंत्र्यसंघाच्या मासिक पत्रकाची डिसेंबर १९४३ ची प्रत मी दाखल करितों. त्यांतील एक उतारा असा आहे : 'पूर्वआशियांतील हिंदी लोक आतां परकी सरकारच्या ताब्यांत राहिले नाहींत. ते आझाद हिंद सरकारचे प्रजाजन झाले आहेत. ही गोष्ट मलायांतलि प्रत्येक हिंदी गृहस्थाच्या मनावर बिंबवण्यासाठीं आणि त्यांच्या नवीन जबाबदारीची त्यांना पूर्ण ओळख करून देण्यासाठीं हिंदी स्वातंत्र्यसंघाच्या प्रत्येक सभासदानें आझाद हिंद सरकारच्या राजनिष्ठेची शपथ घेतली पाहिजे असें ठरविण्यांत येत आहे.' १९४४ च्या ऑगष्ट महिन्यांतील मासिकपत्रिका मी दाखल करतों. त्यांत अशा प्रकारची राजनिष्ठेची शपथ घेतलेल्या लोकांची संख्या जून १९४४ पर्यंत २,३२,५६२ पर्यंत गेल्याचें नमूद आहे. पूर्व आशियांतील हिंदी लोकांच्या मदतीवर आझाद हिंद सरकारचें कार्य चाललें होतें आणि त्यांच्याकडून मिळालेल्या देणग्या आमच्या रंगून येथील राष्ट्रीय बँकेंत जमा होत असत.

३१ जुलै १९४४ पर्यंत आझाद सरकारच्या बँकेंत खातेदारांनीं ठेविलेली रक्कम १,५३,५३,१४४ डॉलर होती. त्याबद्दल बँकेचे चालक श्री दीनानाथ यांनीं प्रसिद्ध केलेलें पत्रक मी दाखल करतों. त्याच्या अगोदर सरकारला मिळालेली देणगी ५३,५०,००० डॉलर व सोनें, चांदी, जवाहीर वगैरेच्या स्वरूपांत मिळालेली देणगी ६८,३१० डॉलर होती याबद्दलचें एक पत्रक मी दाखल करितों.

हिंदी स्वातंत्र्यसंघाचें नेतृत्व स्वीकारल्यानंतर नेताजींनीं आझाद हिंद सैन्याचें प्रमुखत्व स्वीकारिलें व त्यानंतर आझाद सेनेचे ते मुख्याधिपती झाले.

माहिती खात्यांचा प्रमूख म्हणून सैन्य भरतीचे आंकडे मला पुरविले जात असत. माझ्या माहितीप्रमाणें ही भरती अगदीं पूर्णपणें स्वयंस्फूर्तीनें झाली. ज्यादा स्वयंसेवकांना शिक्षण व शस्त्रास्त्रें अपुरीं पडलीं.

सुभाषचंद्र बोस सिंगापूरला आल्यानंतर तीन महिन्यांनीं राज्यव्यवस्थेचें शिक्षण देण्यासाठीं शाळा स्थापन करण्यांत आल्या.

जपानी सरकार व आझाद सरकार यांचे संबंध मित्रत्वाचे व समतेचे होते.

१ फेब्रुवारी १९४४ ला मी रंगूनला आलों व त्यापूर्वी आझाद सरकार रंगूनला आलें होतें. एप्रिल १९४४ पासून एप्रिल १९४५ पर्यंत रंगूनला मी सुभाषचंद्रांच्या बंगल्यांत राहात होतों. आझाद सरकार व जापानी सरकार यांचे संबंध परस्पर समतेचे होते याबद्दल मी दोनतीन उदाहरणें देऊं शकेन.

मार्च १९४४ मध्यें जपानी अधिकारी व श्री सुभाषचंद्र ह्यांच्यामध्यें एक बैठक झाली. त्या बैठकीस मी हजर होतों. हिंदुस्थानच्या भूमीवर लढाईच्या हालचाली आंखण्यासाठीं जी समिती नेमावयाची होती त्या समितीवर आपला अध्यक्ष असावा असें जपान्यांनीं सुचविलें. त्यांचें म्हणणें असें होतें कीं आपला अध्यक्ष असल्यास तें कामाच्या सोईच्या दृष्टीनें अधिक चांगलें होईल. तत्वाच्या दृष्टीनें ह्या सूचनेला नेताजींनीं विरोध केला. ही व्यवस्था आम्हां हिंदी लोकांना पसंत पडणें शक्य नाहीं असें त्यांचें मत होतें. त्यांनीं असें सुचविलें कीं जर हिंदी अध्यक्ष जपान्यांना मान्य नसेल तर दोन्हीं पक्षांनीं अध्यक्षाशिवाय समतेच्या तत्वाप्रमाणें समिती भरवावी. त्यानंतर माझ्या माहितीप्रमाणें या समितीवर जपानी अध्यक्ष नेमला गेला नाहीं.

दुसऱ्या एका परिषदेच्या वेळचीं गोष्ट. त्या परिषदेसही मी हजर होतों. आझाद सरकारच्या सैन्य व सामुग्री खात्यांच्या मंत्र्याची नेमणूक करण्यापूर्वी आपल्याला आगाऊ कळविण्यांत आल्यास चांगलें असें जपानचें म्हणणें होतें. त्यावर नेताजींनीं स्पष्ट सांगितलें कीं अशा नेमणुका करणें हा आझाद सरकारचा अंतस्थ व्यवहार आहे. त्या नेमणुका झाल्यानंतर केवळ सौजन्य म्हणून आम्हीं फारतर तुम्हांस कळवूं. हें आपलें म्हणणें बोसनीं शेवटपर्यंत कायम ठेविलें.

तिसरें एक उदाहरण देतों. तें माझ्या प्रत्यक्ष माहितीचें आहे. मिळविलेल्या मुलखांतील राज्यव्यवस्थेची आंखणी करतांना नेताजींनीं कोणत्याहि जपानी व्यापारी संस्थेला आंत थारा द्यावयाचा नाहीं असें ठरविलें होतें. आझाद बँकेशिवाय दुसरी कोणतीही बँक अशा मुलखांत नांदूं द्यावयाची नाहीं असेंही त्यांनीं ठरविलें होतें.

आझाद सरकारचीं एकंदर चार नभोवाणी केंद्रें होतीं. तीं चालविण्याची जबाबदारी माझेवर होती. दुसऱ्या कोणाचाहि बाहेरील अंमल त्या केंद्रांवर नव्हता.

युद्धबंद्यांशिवाय, मलायामधून हिंदी लोकांचा भरणा आझाद सैन्यांत करण्यांत आला होता. ब्रह्मदेश व आशियांतील इतर भागांतूनही थोडथोड्या लोकांचा भरणा होता.

सरकारला मिळालेल्या देणगींत व्यापारी लोकांनीं धान्यसुद्धां दिलें होतें.

## बंगालला देऊं केलेले तांदूळ नाकारण्यांत आले.

बंगाल्यांतील दुष्काळाच्यावेळीं दुष्काळग्रस्तांना मदत करण्यासाठीं म्हणून एक लक्ष टन तांदूळ आझाद सरकारच्या वतीनें नेताजींनीं देऊं केले होते पण ती देणगी स्वीकारण्यांत आली नाहीं.

**उलट तपासणी :** डिसेंबर १९४० मध्यें बँकॉकला मी वार्ताहराचें काम करित होतों. जपानी सार्वभौम सरकारचे पूर्व आशियांतील हिंदी लोकाशीं संबंध स्पष्टकरून घेण्यासाठीं बँकॉक परिषदेंत एक ठराव पास करून घेण्यांत आला व त्याप्रमाणें एक कार्यसमिती नेमण्यांत आली. डिसेंबर १९४२ मध्यें या समितीच्या सदस्यांनीं राजिनामा दिल्याची बातमी पसरली होती. त्यांनीं राजिनामे देण्याचें कारण मला माहित नाहीं. त्यावेळीं मी बँकॉकला असलों तरी स्वातंत्र्यसंघाचे अध्यक्ष श्री. राशबिहारी बोस सिंगापूरला गेले होते व तेथेंच सगळ्या गोष्टी घडत असत. समितीचे सदस्य सिंगापूरला होते. संघाचे अध्यक्ष तेथूनच संघाच्या मूळ कचेरीकडे संबंध ठेवित होते व त्याप्रमाणें संघाची कामें चालत होतीं.

आपली मालमत्ता मागें टाकून जे हिंदी गृहस्थ पूर्व आशियांतून निघून गेले होते त्यांच्या मालमत्तेचें संरक्षण करण्याची जबाबदारी आपल्यावर सोंपविण्यांत यावी अशा अर्थाचा जो दुसरा ठराव वरील परिषदेंत पास झाल्याचें मला आतां फिर्यादीच्या वकिलांनीं विचारिलें त्या ठरावाबद्दल मला विशेष माहिती नाहीं. परंतु अशा अर्थाचा एक ठराव पास झाला होता. जपाननें हा ठराव मानला किंवा नाहीं तें मला ठाऊक नाहीं. ब्रह्मदेशांतील निर्वासितांची मालमत्ता त्या कामासाठीं नेमलेल्या हिंदी संस्थेच्या ताब्यांत देण्यांत आली होती हें मला माहित आहे.

सुभाषचंद्र बोसनां पूर्व आशियांत येण्यासाठीं विनंती करण्याचा व जर्मन सरकारनें बोसनां तिकडे पाठविण्याची व्यवस्था करण्यासाठीं जपानला विनंति करण्याचा असे ठराव पास झाले होते.

आझाद सरकारचा मंत्री या नात्यानें सरकारच्या व सैन्याच्या कामकाजाची प्रसिद्धी करणें, हिंदुस्थानांतील लोकांसाठीं प्रचारकार्य करणें, हिंदी स्वातंत्र्यसंघामार्फत सभा भरविणें आणि सर्वसाधारणपणें आझाद सरकारचें प्रचार कार्य करणें हीं कामें माझ्या खात्याकडे असत.

हिंदी लोकांनीं आपल्या इच्छेनें ठरविलेल्या शेंकडेवारीनें आझाद सरकारला मदत मिळत असे व ही शेंकडेवारी कमजास्त होत असे. वर्गणी गोळा करणारे गृहस्थ हिंदी व्यापाऱ्यांस व श्रीमंत गृहस्थांस बोलाऊन चर्चा करीत असत. पैसा गोळा करण्याचे मार्ग विचारांत घेऊन त्यांच्या सूचनेप्रमाणें शेंकडेवारी ठरविण्यांत येत असे व ठिकठिकाणीं ती बदलत असे. मलायापेक्षां ब्रह्मदेशांत ती अधिक होती. मलायामध्यें ही व्यवस्था संघाच्या कार्यकारी मंडळाकडे व ब्रह्मदेशांत ती नेताजी निधीमंडळाकडे सोंपविलेली होती. जानेवारी ते एप्रिल १९४५ मध्यें दाद करीम हे या मंडळाचें एक सदस्य होते व त्यांना नेताजींच्या वाढदिवसानिमित्त जमविलेल्या पैशाच्या अफरातफरीबद्दल कांहीं दिवस अटकेंत ठेवण्यांत आलें होतें.

आझाद सरकारला प्रत्येक हिंदीगृहस्थानें रोख ५० रुपये व एक वार कापड द्यावें अशाबद्दल आपण सुचवितां त्या प्रकारचा हुकूम देण्यांत आला नव्हता. परंतु सैन्याला कापड पुरावण्याबद्दल विनंति करण्यांत आली

होती. वर्गणीबद्दल कोणत्याच प्रकारची सक्ती करण्यांत आली नव्हती. त्याचप्रमाणें सैन्यांत दाखल होण्याबद्दलसुद्धां सक्ती नव्हती. सैन्य भरतीच्या कामांत जपानचा कांहींच संबंध नव्हता. सैन्याच्या संख्येवर जपानकडून कोणतेंच नियंत्रण घालण्यांत आलें नव्हतें अगर त्यांनीं सैन्याला पगार अगर पैसा दिला नव्हता. हिंदी स्वातंत्र्य संघाचीं बरींच खातीं उघडण्यांत आलीं होतीं व त्या खात्यांच्या मदतीनें आझाद हिंद सैन्याचें धोरण अमलांत आणण्यांत येत असे.

प्र. बंगालच्या दुष्काळांत हिंदुस्थानला तांदळांची मदत देऊं केल्याचें आपण सांगितलें. ही देणगी आपण कशी कळविली ?

उ. ही देणगी हिंदुस्थानांतील लोकांच्या माहितीसाठीं व हिंदुस्थान सरकारच्या विचारासाठीं सिंगापूरच्या नभोवाणीवरून ऑगस्ट १९४३ च्या सुमारास जाहीर करण्यांत आली. हिंदुस्थान सरकारकडून या देणगीचा सदुपयोग होण्याची खात्री होतांच ब्रह्मदेशांतील कोणत्याही बंदरांतून हा तांदूळ रवाना करण्याची आम्ही तयारी केली असती. ब्रह्मदेशांतील लोकांची तांदळांच्या तुटवड्यामुळ उपासमार होत नव्हती.

श्री राशबिहारी बोस यांनीं फेब्रुवारी १९४२ मध्यें "आमचा लढा" या नांवानें छापलेलें पत्रक मला माहित आहे.

"निवडणुकीपूर्वी मोहनसिंगांनीं आपल्या भाषणांत जीं विधानें केलीं होतीं तीं आतां खोटीं ठरत आहेत. कारण त्यांनीं आम्हांस शपथपूर्वक असें सांगितलें होतें कीं कोणत्याही प्रकारच्या सक्तीशिवाय हिंदी अधिकारी आमच्या चळवळींत सामील होण्यास तयार आहेत व त्यांनीं आपल्याला आपला पुढारी म्हणून निवडलें आहे. त्यानंतर मोहनसिंगांनीं कांहीं हिंदी अधिकाऱ्यांचे व शिपायांचे जे हाल केले ते ऐकून मला अत्यंत दुःख झालें. त्याची जबाबदारी नैसर्गिकच मोहनसिंगावर येते. आमचे बरेच गरीब देशबांधव ठार केले गेले व बऱ्याच लोकांवर अत्याचार करण्यांत आले, व अशा रीतीनें बळजबरी केल्यामुळें त्यांनीं भरती करून घेतलेल्या लोकांचें नीतिधैर्य खची झालें. आमच्या तत्वनिष्ठेच्या विरुद्ध अशी ही गोष्ट झाली. माझे देश-

बांधव अशारीतीनें ठार मारले गेल्याचें मी कधींही सहन करणार नाहीं. उलट आम्ही याच कारणासाठीं इंग्रजाशीं लढत आहोंत आणि हिंदी लोकांचा कोणीही असा छळ केल्यास तें सहन होणार नाहीं." हा उतारा साक्षीदारास वाचून दाखविण्यांत आला. परंतु हें पत्रक आपण सविस्तर वाचून पाहिलें नव्हतें असें साक्षीदारानें सांगितलें.

ह्या पत्रकाला फार प्रसिद्धी देण्यांत आली होती अगर तें रोमन उर्दूमध्यें छापण्यांत आलें होतें किंवा नाहीं हें मला ठाऊक नाहीं कारण मी त्या वेळेला बँकॉकला होतों. परंतु हें पत्रक सिंगापूर येथें हिंदी स्वातन्त्र्यसंघाच्या मुख्य कचेरीमार्फत प्रसिद्ध झाल्याचें मला माहित आहे.

आझाद हिंदसरकारचे मंत्री व अंदमान व निकोबार बेटांचें मुख्य अंमलदार

## क. लोकनाथन् यांची साक्ष :

सिंगापूर पडलें त्यावेळीं हिंदी सैन्याच्या १९ व्या जनरल हॉस्पिटलचा माझ्याकडे ताबा होता. सेप्टेंबर १९४२ मध्यें मी आझाद हिंद सैन्यांत दाखल झालों. या दरम्यानच्या काळांत नीसून छावणीवर असलेल्या माझ्या हॉस्पिटलवर मी मुख्य होतों. नीसून ठाणें २००० माणसांपुरतें होते तरी त्या ठीकाणी १२००० लोक ठेवलेले होते. ह्या ठाण्यावर पूर्वी चार रुग्णालयें होतीं व त्या ठाण्यावरील बंदिस्तांना त्यांचा उपयोग होत होता. नंतर हीं रुग्णालयें बिदादारी व सेलेतार छावण्यांवर नेण्यांत आलीं.

बँकॉकच्या परिषदेला मी हजर होतों. त्या परिषदेस पूर्व आशियांतील सर्व देशांचे ११० हिंदी प्रतिनिधी हजर होते. त्या परिषदेंत बरेच ठराव पास झाले. त्यांपैकीं एक ठराव ह्या देशांतील सर्व हिंदी लोकांनीं आपलें व आपल्या मालमत्तेचें संरक्षण करण्यासाठीं हिंदी स्वातंत्र्यसंघाच्या नेतृत्वाखालीं एकत्र यावें व या संघाच्या शाखाना प्रादेशिक शाखा असें संबोधण्यांत यावें अशा अर्थाचा होता. दुसरा एक ठराव सैन्य उभारण्याचा होता. हिंदी स्वातंत्र्यसंघाच्या चळवळीचें कार्य हिंदी राष्ट्रसभेच्या कार्याशीं जुळेल असें असावें व आझाद हिंद सैन्याला राष्ट्रसभा हुकूम करील त्यावेळीं हिंदुस्थानांत जाण्यासाठीं त्या सैन्यानें तयारीस लागावें असाही एक ठराव होता.

## आझाद सैन्यावर आलेलें संकट

डिसेंबर १९४२ च्या सुमारास त्यावेळचे आझाद सैन्याचे प्रमुख जनरल मोहनसिंग आणि हिंदी स्वातंत्र्य-संघाचे मुख्य व त्याच्या कार्यसमितीचे अध्यक्ष श्री राशबिहारी बोस यांचे संबंध फार चांगले नव्हते. माझ्या स्वतःच्या माहिती-प्रमाणें राशबिहारी बोस जपानमध्यें फार काळ राहिल्यामुळें जपान्यांच्या सांगण्याप्रमाणें ते वागतील असा संभव होता. उलट राशबिहारींना ठेवतां येईल त्यापेक्षां जास्त वचक जपानवर ठेवण्याचा मोहनसिंगाचा निर्धार होता. आझाद फौज ही हिंदी स्वातंत्र्यसंघाची एक शाखा होती. राशबिहारींशीं जुळत नसल्यामुळें जपानी लोकांबरोबर वागण्याची मोहनसिंग यांनी फार मोठी जबाबदारी उचलली होती. कांहीं अधिकाऱ्यांना मोहनसिंग आपल्या बंगल्या-वर बोलावीत असत व त्यांत मीही होतो. बँकॉक परिषदेतील ठराव अजून जपाननें मान्य केले नाहींत असें मोहनसिंग आम्हांला सांगत असत. आझाद सैन्याला मित्रत्वाच्या नात्यानें वागणूक देण्याबद्दल त्यांची मागणी होती ती पुरी झाली नव्हती. आपल्या बचावाच्या कामासाठीं कांहीं हिंदी विमानविध्वंसक पलटणींचा जपान्यांनीं उपयोग केल्याबद्दल मोहनसिंगानी जोराची हरकत मांडली आणि त्या पलटणीची मागणी केली. सुभाषचंद्र बोस सिंगापूरला येईपर्यंत जपाननें ही मागणी पुरी केली नव्हती. आझाद हिंद सैन्याचे कांहीं लोक ब्रह्मदेशांत पाठविण्यासाठीं जपाननें जहाज तयार केलें होते आणि आपल्या संमतीशिवाय असें करण्याबद्दल कार्यसमितीनें हरकत घेतली होती. अशा परिस्थितींत कार्य करणें अशक्य होते. म्हणून आझाद हिंद फौजेचें विसर्जन करण्याचें आपण ठरविलें आहे असें मोहनसिगांनीं कांहीं वरिष्ठ अधिकाऱ्यांनां सांगितलें होतें. त्यांच्या सांगण्यावरून नंतर आझाद हिंद फौजेचें विसर्जन करण्यांत आलें. त्यावेळेस कार्यसमितीचे अध्यक्ष राशबिहारी व जनरल मोहनसिंग, कर्नल गिलानी, श्री राघवन् व श्री के. पी.के. मेनन हे सदस्य होते.

## आझाद हिंद फौजेची पुनर्घटना

डिसेंबर १९४२ मध्यें आझाद फौजेच्या मुख्य छावणीवर मी बिदादारी येथें वैद्यकीय खात्याचा मुख्य होतों व ता. २ जुलै १९४३ रोजीं सुभाषचंद्र

सिंगापूरला आल्यावेळीं मी त्यांना भेटलों. आझाद सैन्याच्या पुनर्घटनेच्यावेळीं मी हजर होतों. मला मंत्रिमंडळांत घेण्यांत आलें व आझाद फौजेच्या वैद्यकीय खात्याचे मुख्य चालक नेमण्यांत आलें. १७ फेब्रुवारी १९४४ च्या परिषदेंत अंदमान व निकोबार बेटें आझाद सरकारच्या हुकमतींत देण्यांत आलीं. पोर्ट ब्लेअर येथें हिंदी स्वातंत्र्यसंघाच्या कचेरींत एक समारंभ भरवून अंदमान व निकोबार बेटें आमच्या ताब्यांत देण्यांत आलीं. त्या समारंभास जपानी सैन्याचे दोन मुख्याधिकारी हजर होते. मला नेताजींनी त्या बेटाचे मुख्य कमिशनर नेमलें. सिंगापूरहून अंदमानला जातांना मी बरोबर मेजर आळवी, ले० सुभासिंग, ले० महमद इकबाल व दप्तरदार म्हणून श्रीनिवासन यांस बरोबर घेतलें होतें. समारंभानंतर बेटांतील व्यवस्थेचे अधिकार मी चालू केले. अंदमानचें शिक्षणखातें मेजर आळवी यांस, जमाबंदीचें ले० सुभासिंग यांस व पोलीसखातें ले० इकबाल यांस देण्यांत आलें. सप्टेंबर १९४४ पर्यंत या बेटांची व्यवस्था मी पाहिली व त्या व्यवस्थेचा वृत्तांत नोव्हेंबरमध्यें नेताजींस मी दाखल केला. नेताजी रंगूनहून टोकियोला जाणार होते त्यावेळीं मी त्यांच्याबरोबर गेल्यास तेथील परराष्ट्रखात्याच्या कांहीं अडचणी निघाल्यास त्या प्रत्यक्ष सोडवितां येतील म्हणून त्यांच्याबरोबर जाण्यासाठीं रंगूनला येण्यास त्यांनीं मला कळविलें. परंतु मी अत्यंत आजारी असल्यानें रंगूनला जाऊं शकलों नाहीं. म्हणून नेताजी टोकियोला जाऊन सिंगापूरला परतल्यानंतर माझा कार्यवृत्तांत मी त्यांस प्रत्यक्ष सादर केला. तो वृत्तांत मी कोर्टांत दाखल करतों।

आझाद हिंद फौजेमुळें लोकांना फार मोठा धीर आला. मी इंग्रजांना शरण आलों त्यावेळीं जवळ जवळ पंधरा दिवसपर्यंत सगळ्या रंगूनचा ताबा आझाद फौजेनें घेतला व नेताजींनीं केलेल्या हुकुमाप्रमाणें तेथील कायदा व शांतता यांचें पालन केलें. जपानच्या आक्रमणानंतर अजमासें दहा हजार हिंदी लोक रंगूनला ठार करण्यांत आले होते आणि अशा प्रकारचें संकट टाळण्यासाठीं तेथील हिंदी, चिनी व ब्रह्मी जनतेचें जीवन व मालमत्ता यांना संरक्षण देण्याची जबाबदारी आझाद फौजेनें पुरी पाडली.

**उलट तपासणी :—** अंदमान-निकोबार बेटें आझाद सरकारच्या

ताब्यांत दिल्याची घोषणा टोकियोहून नभोवाणीवरून करण्यांत आली. त्याची नक्की तारिख मला आतां आठवत नाहीं.

**प्रश्न** : हीं बेटें कधींच तुमच्या ताब्यांत देण्यांत आलीं नव्हतीं असें मी म्हणतों.

**उत्तर** : तसें असल्यास मी तिकडे गेलोंच नसतों मुळीं !

**प्रश्न** : लढाईनंतर तीं देऊं असें जपाननें फक्त वचन दिलें होतें.

**उत्तर** : नाहीं. त्या बेटांचा लष्करी बचाव खेरीजकरून सर्व खातीं आमच्याकडे होतीं. शिक्षणखातें आम्ही आमच्याकडे घेतलें होतें. पोलिस-खातें मिळत नसल्यास इतर खातीं घेण्याची माझी तयारी नव्हती. आणि पोलिसखातें घेण्याची माझी खटपट चालू होती. परंतु तिथून निघेपर्यंत तें खातें मजकडे आलें नाहीं. म्हणून इतर खातीं घेण्याचें मी स्वतः होऊन नाकारलें. ( सरकारी वकिलांस उद्देशून ) तुमच्या व माझ्या म्हणण्यांत कितीतरी फरक आहे ! शिक्षण खात्याबद्दल बोलावयाचें झाल्यास जपानी शाळेंत मोठीं मुलें घेतलीं गेली होतीं हे तुमचें म्हणणें खरें नाहीं. त्यांची एक शाळा होती व त्यांत थोडेसे विद्यार्थीही होते. त्या शाळेचा आमच्या खात्यांत संबंध नव्हता.

माझ्या कामाचे मासिक वृत्तांत मी माझ्या सरकारला पाठवित होतो. वाहतुकीच्या स्वतंत्र व्यवस्थेच्या अभावीं असे वृत्तांत मला जपानी वाहतुकी मार्फत पाठवावे लागत असत. हे वृत्तांत मी मोहोरबंद करून आमच्या सर-कारकडे पाठविण्यासाठीं त्यांच्याकडे देत असें. असा एक वृत्तांत त्यांतील माहिती शत्रूच्या हातांत पडण्याची शक्यता टाळण्यासाठीं एक दोन ठिकाणीं त्यांत फरक करून पुन्हां पाठविण्यासाठीं माझ्याकडे जपान्यांनीं परत दिला होता. मी एका नभोवाणी यंत्राची मागणी केली होती व जपान्यांनीं ते देण्याचें कबूल केलें होतें. टंचाईमुळें मला तें लवकर मिळूं शकलें नाहीं.

**प्रश्न** : बचावाचीं कामें पहाण्याची आपल्याला परवानगी नव्हती !

**उत्तर** : मी तीं पहाण्याची खटपट केली असें आपल्या प्रश्नांत गृहित धरण्यांत आलें आहे. परंतु तें तसें नाहीं. मला तीं पहाण्याची जरुरीच नव्हती मुळीं.

जपाननें सुभाषचंद्र बोसनां पाठविलेल्या पत्रांत माझ्या अधिकाराबद्दल कांहींही मजकूर असला तरी त्यांतील मजकुराला नेताजींनी मला दिलेल्या अधिकार-पत्राचें बंधनें होतें व त्यांत मला जादा अधिकार देण्यांत आले होतें. त्याशिवाय नेताजींनी मला प्रत्यक्ष थोडी माहिती दिली होती. त्या माहितीप्रमाणें स्थानिक अडचणींचा विचार करून शक्यतेप्रमाणें ती बेटें संपूर्णपणें मी ताब्यांत घ्यावयाचीं होती.

फंदफितुरीच्या सबबीवर जपानी लोकांनीं फांशी दिलेल्या, ठार केलेल्या आणि तुरुंगांत टाकलेल्या लोकांबद्दल मी एक वृत्तांत पाठविला होता. तुरुंगांत टाकलेल्या लोकांना झालेल्या आजारामुळें कांहीं लोक मरण पावल्याचा दुसरा एक वृतांत मी पाठविला होता. असें लिहिण्यांत हे लोक तुरुंगांतील मारहाणीनें मरण पावले असें कळविण्याचा माझा उद्देश होता. तिसऱ्या एका वृतांतांत 'जपानी पद्धतींचा' मी उल्लेख केला आहे. त्याचा गर्भितार्थ जपाननें अशा लोकांचे केलेले हाल असा होता. ह्या गोष्टी मला माझ्या वृत्तांतात स्पष्टपणें लिहितां येण्यासारख्या नव्हत्या, याचें कारण जपानमार्फत हे वृत्तांत तपासण्यांत येतील असें मला वाटलें होतें. जपानी-लोकांच्या या क्रूरपणावर मला इलाज करितां येईना. जपाननें आमच्या-विरुद्ध योजिलेल्या फंदफितुरीबद्दल मिळवितां येईल तेवढी बातमी मी जमा केली व त्याविरुद्ध जपानीसरकारडे दाद मागण्यांत आली. दिवाणी कामाचे मुख्य न्यायाधीश महमद इकबाल यांजकडून मला मिळालेल्या माहितीचा मी त्यांत उपयोग केला.

महमद इकबाल हे सर्वसाधारणपणें दिवाणी स्वरूपाच्या दाव्यांचा न्याय देत असत. त्यांनीं आमच्याविरुद्ध झालेल्या एका फंदफितुरीची चौकशी सुरू केली होती व त्याबद्दल आमच्या सरकारवर जपान्यांचा घुस्सा झाला होता. या प्रकरणाचा वृत्तांत मी पाठविला त्यांत जपानचा आमच्यावरील विश्वास वाढत जावा अशी इच्छा मी प्रकट केली होती.

सप्टेंबर १९४४ मध्यें अंदमानच्या माझ्या कारकीर्दीची प्रत्यक्ष माहिती करून घेण्यासाठीं मला नेताजींनी परत बोलाविलें. त्याप्रमाणें मी गेलों व माझ्या जागीं मेजर आळवी यांची तात्पुरती नेमणूक झाली.

मेजर आळवींनीं पाठविलेल्या एका पत्रांत आपल्या कारभारांत आलेल्या अडचणींबद्दल व अंदमानांत अशा परिस्थितींत दिवस काढण्यापेक्षां आपल्याला आघाडीवर पाठविण्यांत यावें असें सुचविलें होतें. पूर्वीचा अनुभव नसल्यामुळें अंदमानांत माझ्यावर पडणाऱ्या कामाची नक्की जाणीव मला नव्हती. म्हणून माझ्याबरोबर मी सुशिक्षित व वाटेल त्या कामांत लक्ष घालूं शकतील असे मदतनीस बरोबर घेतले होते व त्यांपैकीं मेजर आळवी हे एक होते. जपान्यांच्या भीतीनें अंदमान-निकोबार बेटांतील लोक सहजासहजीं आमच्याकडे येण्यास घाबरत असत. आमच्या अडचणींच्या दृष्टीनें ह्या बेटांतील कारभार सोडून देण्याबद्दल मी माझ्या सहकाऱ्यांशीं चर्चा केली असेल.

१९४४ मधील माझ्या दैनंदिनींत एका ठिकाणीं कर्नल जगन्नाथराव भोसले यांनीं नेताजींना पाठविलेल्या तारेचा उल्लेख आहे. कर्नल भोसले यांचेशीं आमचा बेटांतील कारभार उठविण्याबद्दल मी चर्चा केली होती. त्या तारेंत "आझाद सरकारचें अंदमानमधील खातें उठवावें, कारण महत्त्वाचें काम तिकडे नाहीं असें कर्नल लोकनाथन यांचें मत आहे" असा मजकूर होता. ही तार मी त्यांना पाठविण्यास सांगितली नव्हती व त्या तारेंतील मजकूर मला विशेष पसंत पडला नाहीं. 'महत्त्वाचें काम तिकडे कांहीं नाहीं' हे शब्द मला पसंत पडले नाहींत. मला ह्या तारेची नक्कल मिळण्यापूर्वीच ती रवाना झाली होती. ती तार माझ्या सांगण्यावरून पाठविली नव्हती, परंतु तिची केवळ नोंद रहावी म्हणून मी ती माझ्या रोजनिशींत लिहून ठेविली.

सैन्य भरतीच्या कामांत लांच लुचपत, शिक्षा किंवा इतर कोणत्याही प्रकारचे वाईट मार्ग उपयोगिले जात नव्हते. आपण म्हणतां त्याप्रमाणें गुडघ्याला बांधल्यामुळें जखम झालेल्या एका माणसाचा वैद्यकीय वृत्तांत मी पाहिला होता. ती केस चौकशीसाठीं मी त्या रोग्याच्या अधिकाऱ्याकडे पाठविली होती. मारहाण झाल्यामुळें दवाखान्यांत आणल्याचे एकही उदाहरण मला आढळलें नाहीं.

ब्रह्मदेशांतील सैन्याचा मुख्याधिकारी म्हणून माझी नेमणूक झाली होती व नेताजी ब्रह्मदेशांतून निघाल्यानंतर त्या नेमणुकीचा अंमल व्हावयाचा होता. शरण येईपर्यंत मी या जागेवर होतों.

## आझाद हिंद बँकेचे चालक श्री दीनानाथ यांची साक्ष :

ब्रह्मदेशांत माझा एंजिनियरिंगची कामें घेण्याचा धंदा होता. नंतर मी आझाद बँकेचा चालक झालों. ब्रह्मीकायद्याप्रमाणें बँक नोंदण्यात येऊन ९४ पार्करोड, रंगून येथें ती स्थापन करण्यांत आली. रंगूनमध्यें नेताजी निधी समिती होती तिचें काम आझाद सरकारच्या खर्चासाटीं पैसा गोळा करण्याचें होतें. हा पैसा व मलायामधून मिळणाऱ्या देणग्या आझाद बँकेंत जमा होत असत व कांहीं रकमा आझाद सरकारच्या अर्थखात्यांत जमा होत असत. जरूर लागेल त्याप्रमाणें ही रक्कम बँकेंतून उचलण्यांत येत असे. ब्रह्मदेशांतून १५ कोटी व मलायांतून ५ कोटी रुपये जमा झाले होते. आझाद हिंद बँकेंत लोकांचीं खातीं होती व ठेवी होत्या. ती रक्कम ३० ते ४० लक्ष रुपये होती. आझाद फौजेच्या खात्यावर शेवटीं ३५ लाख रुपये जमा होते. बँकेचें काम मे १९४५ पर्यंत चालू होतें. रंगून काबीज केल्यानंतर इंग्रज सैन्याधिकाऱ्यांनीं त्या बँकेला सील ठाकलें.

## झियावादी जमीनदारी

रंगूनजवळ असलेल्या झियावादी जमीनदारीबद्दल मला माहिती आहे. तिचें क्षेत्र अजमासे ५० चौरस मैल आहे. बँकेच्या झियावादी शाखेच्या अधिकाऱ्याकडे त्या जमीनदारीची व्यवस्था होती. नंतर ती आझाद सरकारकडे देण्यांत आल्यावर आझाद सरकारचा अंमलदार तिची वहिवाट पाहूं लागला. जमीनदारींत साखरेचा एक मोठा कारखाना, सुताचे, बुरणुसाचे व पोती तयार करण्याचे कारखाने सुरू होते, इस्पितळें होतीं व शेतीही होती. लोकसंख्या १५००० असून तींत बहुतेक हिंदी लोकच होते. आझाद फौजेचा तिथें एक तळ होता व त्या फौजेमार्फत रुग्णालयें, कारखाने चालविले जात होते. फौजेच्या शिक्षणाची व्यवस्थाही तिथें होती.

रंगूनमध्यें जपानी पोलीस खात्यानें पकडलेल्या पुष्कळ लोकांस आझाद फौजेनें जीवदान दिलें. एकदां जवळ जवळ ५० प्रमूख हिंदी लोक इंग्रजांचें भेदी म्हणून जपान्यांनीं पकडून तुरुगांत टाकले व त्यांच्यावर अत्याचार करण्यांत आले. त्या सर्व लोकांना आझाद फौजेच्या लोकांनीं सोडविलें. एकदां

डॉ. जॉन नांवाचा प्रसिद्ध आंग्लशस्त्रवैद्य व त्याची बायको यांना जपान्यांनीं पकडलें होतें. त्यांना फौजेच्या लोकांनीं जीवदान दिलें. जपानी आक्रमणानंतर ब्रह्मी लोकांच्यां गुन्हेगारीला ऊत आला. त्यांनीं हिंदी लोकांची कत्तल करून त्यांची मालमत्ता लुबाडून नेली व आझाद फौजेच्या आगमना नंतर अशा अत्याचारांना कायमचा पायबंद बसला.

**उलट तपासणी :** आझाद बँक ५० लाख रुपये भांडवलावर स्थापन करण्यात आली होती. आझाद सरकारचें खातें त्या सरकारचे अर्थमंत्री ठेवित होते. दहा ते तीस लक्ष रुपये रक्कम आझाद फौजेला मासिक देण्यांत येत असे. बँकेला सील लागण्यापूर्वी हिशेब तपासण्यांत आले होते व त्यावेळीं ३५ लाख रुपये आझाद फौजेच्या खात्यावर जमा होते.

झियावादी जमीनदारीची मूळ मालकी कोणाची हें मला माहित नाहीं. जमीनदारीचे त्यावेळचे चालक श्री परमानंद यांनीं एका जाहीर सभेंत ती जमीनदारी सुभाषचंद्रांच्या हवालीं केल्याचें जाहीर केलें. ही जमीनदारी ब्रह्मी मुलुखांत होती.

## ले० शिवसिंग यांची साक्ष :

आझाद फौजेत मी लेफ्टनंट होतों व आजही त्या फौजेचा मी सभासद आहें. झियावादींत मी फौजेच्या शाळेचा मुख्य होतों. तिथें आझाद हिंद दळाची एक कचेरी होती व आम्हीं काबीज केलेल्या व आमच्या ताब्यांत आलेल्या प्रदेशाची व्यवस्था त्या कचेरीमार्फत होत होती. खेड्याखेड्यांचे गट पाडून ते तहसिलदारांच्या ताब्यांत देण्यांत आले होते. लहान दाव्यांचा निकाल तहासिलदार देत असे. मोठे दावे वर हिंददलाकडे पाठविण्यांत येत असत. आझाद सरकारचे अधिकारी श्रीरामचंद्र प्रकाश यांच्या ताब्यांत हा मुलूख होता. श्रीशामचरण मिश्र पोलीस खात्याचे व श्री घोष हे शेती, आरोग्य व सार्वजनिक कामें या खात्यांचे मुख्य होते. हा मुलूख आझाद फौजेच्या बचावाखालीं होता व त्याच्याशीं ब्रह्मी किंवा जपानी लोकांचा कांहींच संबंध नव्हता. आझाद सरकारनें मिळविलेल्या मुलखाचे नियोजित गव्हर्नर कर्नल चतरजी यांचें मुख्य ठाणें झियावादी येथें होतें.

**उलट तपासणी :** फेब्रुवारी १९४२ मध्यें सिंगापूरहून सैगांवला जाण्याचें जपान्यांकडून मला सांगण्यांत आलें. जपान्यांकडून मला मिळालेल्या वाईट वागणुकीबद्दल मी माझ्या स्वेच्छेनें नभोवाणीवरून बोललों. तेथून सिंगापूरला आल्यानंतर हिंदुस्थानींतून नभोवाणीवरून बोलण्यासाठीं कॅ. मोहनसिंगांनीं मला जून १९४२ मध्यें बँकॉक परिषदेस पाठविलें.

१९४३ च्या सुरवातीस बिदादारी ठाण्यावर जपान्यांनी मला महिनाभर पकडून ठेविलें होतें सप्टेंबर १९४३ पासून मी आझाद फौजेंत दाखल झालों. १९४४ च्या अखेरीस अगर १९४५ च्या सुरवातीस मी इंग्रजांना माहिती पुरवली हें म्हणणें खोटें आहे. आझाद तुकडीनें पकडलेल्या कॅ. ब्राऊनला मी माहिती देऊं केली हें म्हणणें खरें नाहीं.

झियावादी जमीनदारी, संस्थान म्हणून ओळखली जात होती व तेथील राजा हिंदुस्थानांत पळून गेला होता. तो अद्याप जिवंत आहे. आमचें सरकार व जपान यांच्या कराराप्रमाणें हें संस्थान आमच्या राज्याकडे आलें होतें.

ता. १३ डिसेंबर १९४५ रोजीं आझाद सरकारच्या आंतरराष्ट्रीय खात्याचे श्री बी. एन्. नंदा त्यांनीं आपल्या साक्षींत पूर्व आशियांतील निरनिराळ्या देशांतील हिंदी लोकसंख्येची आंकडेवारी आपल्या कागदपत्रांवरून कोर्टास वाचून दाखविली.

त्यानंतर आरोपीपक्षानें मागितलेले कागदपत्र दाखल करण्यासाठीं बोलाविलेले जमना भागाच्या हद्दींतील अधिकारी ले. कर्नल ई. के. स्क्वायर यानीं जरूर ते कागद दाखल केले. त्यांतील बी. बी. च्या जुलै १९४४ च्या संदेशावरून घेतलेली माहिती श्री भुलाभाई देसाई यांनीं वाचून दाखविली. त्या संदेशांत जनरल आयसेनहॉवर यांनीं असें जाहीर केलें होतें कीं फ्रान्सच्या रक्षणासाठीं लढणाऱ्या फ्रेंच सैन्याचा दोस्तराष्ट्रांच्या लढाऊ सैन्यांत समावेश करण्यांत आला असून त्या सैन्यावर जर्मनांना कोणत्याही प्रकारचा जुलूम अगर जबरदस्ती करतां येणार नाहीं. त्यावर जर्मन नभोवाणीवरून देण्यांत आलेला जबाब असा होता कीं फ्रान्समधील कोणत्याही राजकीय पक्षाचे लोक लष्करी सैनिक म्हणून मानतां येत नाहींत. कारण त्यांनीं फ्रान्समध्यें

कायद्यानें निर्माण झालेल्या सरकारविरुद्ध बंड पुकारलें आहे व फ्रान्सचे कायदे धाब्यावर बसविले आहेत.

त्यानंतर आरोपींतर्फेचा शेवटचा म्हणजे बारावा साक्षीदार कॅप्टन अर्शद यांची साक्ष झाली. आरोपी पक्षानें एकंदर ११२ साक्षीदारांची यादी दाखल करून त्यांतील बऱ्याच साक्षीदारांची भेटही घेतली होती. परंतु फिर्यादीच्या २८ साक्षीदारांनीं दिलेला पुरावाच आपलें काम भागवील अशी खात्री-झाल्यामुळें कॅ. अर्शदच्या साक्षीनें आपलें पुराव्याचें काम संपलें आहे असें आरोपींचे वकील श्री भुलाभाई देसाई यांनीं सांगितलें.

## कॅ. अर्शद यांची साक्ष :

मी पहिल्या आणि पुनर्घटित झालेल्या अशा दोन्ही आझाद सैन्यांत अधिकारी होतों. १६ फेब्रुवारी १९४२ रोजीं संध्याकाळीं सिंगापूरच्या छावण्यांवर ब्रिटिश अंमलदारांना हिंदी अंमलदार व शिपाई यांच्यापासून निराळे करण्यांत आलें. दुसऱ्या दिवशीं सकाळीं हिंदी युद्धकैद्यांना सिंगापूरच्या फेरार पार्कमध्यें जमा करण्याचा आमच्या मुख्यास हुकूम झाला. ले. क. हंट यांनीं युद्धकैदी म्हणून आम्हांला जपानी अंमलदारांच्या ताब्यांत दिलें. त्या ठिकाणीं मेजर फुजिवारा यांनीं पूर्व आशियांतील सर्व देश स्वतंत्र करण्याचा जपानचा उद्देश हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळाल्याशिवाय सफल होत नाहीं अशा आशयाचें वक्तव्य केलें. त्यांनीं आम्हां युद्धकैद्यांना कॅ. मोहनसिंग यांच्या ताब्यांत दिलें. मोहनसिंग म्हणाले कीं मलायाच्या मोहिमेंत हिंदी सैन्याला लढण्याची खरी संधी देण्यांत आली नाहीं. कारण ती मोहिम फार काळ टिकली नाहीं. हिंदी पायदळाला शस्त्रसामुग्री आणि विमानें यांची पुरी मदत देण्यांत आली नाहीं. खरें सांगावयाचें म्हणजे हिंदी सैनिकांची मुस्कटदाबी करण्यांत आली. आणि म्हणून आमच्या स्वातंत्र्यासाठीं लढण्याची हीच वेळ आहे. हिंदी लोकांना आजपर्यंत शस्त्रास्त्रांची उणीव होती. स्वातंत्र्याच्या लढ्याला लागणारी सशस्त्र फौज निर्माण करण्याची आतां आपल्याला संधी आली आहे. त्या वेळीं सैन्याचा एकंदर जमाव चाळीस ते पन्नास हजार असावा.

जुलै १९४२ ला कॅ. सहगल यांच्याशीं विचार विनियम करून आझाद फौजेस मिळण्याचा मी निश्चय केला. ह्या वेळ पावेतों राजकारणाची चव मी चाखली नव्हती. दुसऱ्या कोणत्याही बंधनापेक्षां आमच्या राष्ट्राचेंच आमच्यावर जास्त बंधन आहे असें आमचें ठाम मत झालें. आमचें ऐक्य आणि बळ जपानच्या नजरेस आणून देऊन आमचा देश त्यांच्यापासून अलिप्त ठेवावयाचा असे आमचे बेत होते. हिंदी राष्ट्रसभेनें जपानच्या हिंदुस्थानावरील आक्रमणाविरुद्ध ठराव पास केला होता, म्हणून आमचें कार्यकारण ती कितपत मान्य करील याबद्दल कांहीं ठिकाणीं संशय व्यक्त केला जात होता. परंतु आम्ही हिंदी स्वातंत्र्याचे शिलेदार असून परक्यांच्या कृपेवर जगत नव्हतों हें आमच्या हिंदी बांधवांना पटवून दिल्यावर तरी आमच्या कर्तबगारीची त्यांना खात्री पटेल असा आम्हांला आत्मविश्वास होता.

ज. मोहनसिंगांना राशबिहारींच्या समोर पकडण्यांत आलें. त्यानंतर दोन आठवडे आम्ही स्वतंत्र होतों. आझाद सैन्याची नव्या दमानें पुनर्घटना झाली. तेव्हां फौजेंत सामिल होण्यासाठीं सैन्यावर सक्ती करण्यांत आली हें फिर्यादींचें म्हणणें साफ खोटें आहे.

ब्रिटिशांच्या हिंदी सैन्यांत कमिशन मिळालेले हिंदी अधिकारी आणि ब्रिटिश अधिकारी यांना वागवून घेण्याच्या पद्धतींत फरक करण्यांत येत होता व त्यांना मिळत असलेली वागणूक आम्हांला मिळत नव्हती. हें मला प्रत्यक्ष माहित आहे म्हणून आमच्या आझाद फौजेंत सामिल होण्याच्या मुळाशीं हें एक मुख्य कारण होतें.

आमच्या फौजा हिंदुस्थानच्या हद्दींत शिरण्यापूर्वीं नेताजी व जपानी अधिकारी यांनीं काढलेले फतवे मी पाहिले होते. जपानच्या फतव्यांत हिंदुस्थानांतील काबीज केलेला प्रांत आमच्या सरकारकडे यावयाचा अशी खबर होती. मणिपूर हद्दींत लढाई चालू असतांना तेथील पादाक्रांत केलेल्या मुलखाची व्यवस्था एक नंबरच्या लष्कराचे सेनापती मे. ज. कियानी यांचेकडे देण्यांत आली होती. मोरी हद्दींत कियानीच्या हाताखालीं आझाद हिंद दल ठेवण्यांत आलें होतें. कोहिमा विभागांत मोरी पासून पलेल पर्यंतचा

१५०० चौरस मैल टापू आझाद सरकारच्या ताब्यांत होता. कॅ. मलीक यांच्या हाताखालीं असलेल्या विष्णुपूर भागाच्या व्यवस्थेचे जे वृत्तांत मी पाहिले त्यावरून मी हें विधान करित आहें. ज. शहानवाझ सैन्यानिशीं कोहिमा भागांत शिरले होते ही गोष्ट त्यांचा कार्यचालक या नात्यानें माझ्या स्वतःच्या माहितीची आहे. २३ एप्रिल १९४५ ला ब्रह्मदेश सोडण्यापूर्वी नेताजींनी क. लोकनाथन यांना ब्रह्मी लष्कराचे जनरल व मला त्यांचे कार्य-चालक नेमलें होतें.

नेताजींनीं दिलेल्या हुकुमाप्रमाणें मी कामास लागलों. त्यावेळीं जपानी रंगून सोडून जात होते. ब्रह्मी सैन्य मुळींच आस्तित्वांत नव्हतें. थोडें ब्रह्मी संरक्षक सैन्य होतें. तें कोठें तरी लपून बसलें होतें, अगर रंगून सोडून गेलें होतें. आमच्या फौजेचे अजमासें सहा हजार सैन्य रंगूनध्यें होतें. या सैन्याला व्यवस्था ठेवणें, गस्त घालणें, गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवणें वगैरे कामें देण्यांत आली. रंगून सोडून जातांना जपान्यांनीं तांदूळ व इतर दाणागोटा भरलेलीं कोठारें लोकांसाठीं उघडून टाकलीं आणि त्यामुळें लुटालूट होऊन दंगेधोपे होण्याची शक्यता निर्माण झाली. त्या कोठारांवर आम्ही आमचे रक्षक ठेविले व व्यवस्था राखली. एप्रिल २५ च्या सुमारास ब्रिटिश युद्धकैदी असलेला मध्यवर्ति तुरुंग जपान्यांनीं उघडून टाकल्याची बातमी आम्हांस कळली. तेथें जाऊन तेथील तुरुंगांत असलेला ब्रिटिश मुख्य अधिकारी विंग कमांडर एल्. हडसन याला मी भेटलों व आमच्या कामाची त्यास माहिती करून दिली. मी त्याला युद्धकैदी म्हणून शरण जाण्याची इच्छा व्यक्त केली परंतु माझें काम पूर्ववत चालू ठेवण्याबद्दल व रोजच्या कामाची माहिती देण्याबद्दल त्यानें मला सांगितलें. मध्यंतरी ब्रह्मी संरक्षक–सैन्याचा एक अधिकारी आमच्याकडे सहकार्यासाठीं आला परंतु विंग कमांडर हडसननें त्याची मदत नाकारून त्याला मान्यता देण्याचें नाकारलें.

रंगून सोडून जपानी लोक पळून गेल्यास जवळ जवळ पांच सहा दिवस झाले होते व दोस्त राष्ट्रांची फौज केव्हां रंगूनवर येईल याचा नेम नव्हता. रंगून हें जवळजवळ उघडें शहर होतें. असें असूनहि दोस्तांचीं विमानें

आमच्यावर अग्निवर्षाव करूं लागली. मी विंग कमांडरला लोकांच्या हाल अपेष्टांची माहिती करून दिली व तेथील परिस्थितीची माहिती पाठविण्यासाठीं ध्वनीवाहक दिला. परंतु संदेश पाठविण्यासाठीं जरूर असलेल्या मापनाची माहिती त्यांस नव्हती. नंतर मिंगालाडन ठाण्यावरील आमच्या एका अधिकाऱ्यानें एका ब्रिटिश विमानाला खालीं येण्याची खूण केली असल्याची मला माहिती मिळाली. त्या विमानांतील अधिकाऱ्याला विंग कमांडरकडे घेऊन येण्यास मी एका अधिकाऱ्याला सांगितलें. त्याप्रमाणें त्याची भेट झाल्यानंतर हडसननें मला असें सांगितलें कीं दुसऱ्या दिवशीं म्हणजे ४ मे १९४५ रोजीं रंगूनवर दोस्त सैन्यानें हल्ला करावयाचें ठरविलें असून शहरावर हवाई अग्निवर्षाव व समुद्रांतून मारा करण्यांत यावयाचा आहे. परंतु रंगून हें उघडें शहर असल्याचें मीं त्या विमान अधिकाऱ्यामार्फत समुद्रांत तयारींत असलेल्या आरमारी मुख्याधिकाऱ्यांस कळवित आहें असें हडसननें मला सांगितलें. रंगून बंदरावर १००० हवाई सैनिक उतरून ते शहरावर मोर्चा देत होते. जपानी लोक दडून राहिल्याच्या संशयावरून जोराचा अग्निवर्षाव करण्यांत यावयाचा होता. त्याचक्षणीं आमच्या ठाण्यावर एक मोठें पांढरें निशाण आम्ही उभें केलें व ब्रिटिश फौज रंगूनच्या नदीवर उतरतांच तिचा मुख्य, ब्रिगेडीयर लाउडर, याला आम्ही शरण आलों. आमच्या सैन्याचीं शस्त्रास्त्रें व बिल्ले खालीं केल्यानंतर दुसऱ्या दिवशीं कर्नल लोकनाथन व मी लाउडरला भेटलों. परंतु युद्धकैदी म्हणून तो आम्हांला ताब्यांत घेईना. हिंदुस्थानांत नेईपर्यंत आम्हांला त्यानें स्वतंत्र सैन्य म्हणून मुख्य तुरुंगाच्या ठाण्यावर राहावयास सांगितलें. त्यानंतर आमची पहिली तुकडी १३ मे ला हिंदुस्थानांत पाठविण्यांत आली.

**उलट तपासणी** : सुमारें दीड महिन्यापूर्वी आरोपींच्या वकिलांची व माझी मुलाखत झाली मी माझा जबाब त्यांना लिहून दिला. सुरवातीचा आमचा पगार जपान्यांनीं आम्हांला दिला हें म्हणणें खरें नाहीं. पहिला पगार सेप्टेंबर १९४२ मध्यें आम्हांस मिळाला. पहिली आझाद फौज तोडण्यांत आल्यानंतर आम्ही पगार घेण्याचें नाकारलें होतें. पगाराचा पैसा आपला स्वतःचा असल्यामुळें तो घेण्यांत आम्ही कोणाचे उपकृत होत नव्हतों असें

राशबिहारी यांनीं आम्हांस सांगितलें व त्याप्रमाणें वरच्या अधिकाऱ्यांस लिहूनही दिलें. आझाद सैन्यांत जाणें अगर जपानचे कैदी म्हणून राहाणें यां पकीं कोणती तरी एक गोष्ट आम्हांस नक्की करावयाची होती. जपानची आम-च्याशीं असलेली वागणूक त्यावेळीं समाधानकारक नसली तरी त्यांनीं कोणाही हिंदी युद्धकैद्याला छळल्याचें उदाहरण माझ्या माहितींत नाहीं. आंतरराष्ट्रीय कायद्याप्रमाणें ते आम्हास वागवीत नव्हते ही गोष्ट मात्र स्पष्ट होती.

प्र. आझाद सैन्याची मूळ कल्पना जपानची होती काय?

उ. असें मी म्हणूं शकत नाहीं.

फक्त कांहीं थोड्या लोकांच्या बाबतींत, अमलदार आझाद लष्करांत सामिल झाले म्हणून शिपाई सुद्धां त्यांच्या मागून गेले, असें असूं शकेल. रंगूनमध्यें असतांना हिंदी लोकांचें संरक्षण करण्याचें जें कार्य मी केलें तें क. लोकनाथन यांच्या सांगण्यावरून केलें........

## गुलामांचें गाऱ्हाणें : ५

आरोपींचा पुरावा संपल्यानंतर ता. १७ डिसेंबर १९४५ रोजीं श्री भुलाभाई देसाई यांनीं आरोपींच्या बचावाचें आपलें मुद्देसूद, विद्वत्ताप्रचूर, सडेतोड आणि भेदक असें भाषण केलें. तें दुसऱ्या दिवशीं पुरें झालें. त्याचा सारांश पुढील प्रमाणें होताः

आरोपींवर प्रत्येकीं दोन आरोप आहेत. पहिला बादशहाविरुद्ध लढाई केल्याचा व दुसरा खुनाचा. पैकीं खुनाचा आरोप हा पहिल्या आरोपाचा एक भागच आहे. कारण लढाईमध्यें केलेल्या प्रत्येक गोळीबाराबद्दल किंवा आघाताबद्दल निरनिराळे आरोप उभे करणें हें हास्यास्पद आहे. म्हणजे थोडक्यांत सांगावयाचें असल्यास बादशहांविरुद्ध लढाई करणें हा एकच मुख्य आरोप या खटल्यांत आहे.

पुराव्यानें सिद्ध झालेंच आहे कीं केवळ तीनच आरोपींवरील गुन्ह्याची ही चौकशी नाहीं. हे तिन्ही आरोपी बादशहाविरुद्ध लढत असलेल्या एका शिस्तबद्ध सैन्याचे एक घटक आहेत. म्हणून या अदालतीसमोर असलेला खटला हा व्यक्तिगत स्वरूपाचा अगर महत्त्वाचा नाहीं. हिंदी स्वातंत्र्य-सैन्याचा सन्मान आणि कायदा यांच्या चौकशीचा हा खटला आहे. **एका गुलाम राष्ट्रानें आपल्या सुटकेसाठीं केलेल्या लढाईच्या हक्का-विरुद्ध उभारण्यांत आलेला हा खटला आहे.** परकी अमलाखालीं असलेलें राष्ट्र किंवा त्या राष्ट्राचा एक घटक अशा परिस्थितीला येऊन पोंचतो कीं त्या परिस्थितींत आपल्या स्वातंत्र्यासाठीं लढाई करण्याचा त्याला हक्क असतो या प्रमेयाच्या समर्थनार्थ आंतरराष्ट्रीय कायद्यांतील उदाहरणें मी आपल्या समोर मांडणार आहें.

या खटल्यांतील साक्षीपुराव्यानें खालील गोष्टी सिद्ध झाल्या आहेत :
(१) स्वतंत्र हिंदुस्थानचें कामचलाऊ सरकार स्थापन करण्यांत आलें होतें.



एका गुलाम राष्ट्रानें आपल्या सुटकेसाठीं केलेल्या लढाईच्या हक्काविरुद्ध उभारण्यांत आलेला हा खटला आहे. (पृष्ठ १६५)

(२) या सरकारला गट्टी राष्ट्रांनीं मान्यता दिली होती. (३) या सरकारचें स्वतंत्र लढाऊ सैन्य होतें. (४) या सरकारच्या स्थापनेचा मुख्य उद्देश हिंदी राष्ट्र स्वतंत्र करण्याचा होता. (५) या सरकारच्या लढाऊ सैन्याचे दोन मुख्य उद्देश होते; पहिला, हिंदी स्वातंत्र्यासाठीं प्रत्यक्ष लढाई देणें व दुसरा, ब्रह्मदेश व मलाया या देशांतील हिंदी प्रजेचें व तिच्या मालमत्तेचें संरक्षण करणें. (६) या सरकारच्या ताब्यांत आलेल्या प्रदेशाची म्हणजे अंदमान व निकोबार बेटें, झियावादी जहागीर, मणिपूर विभाग आणि विष्णुपूर विभाग यांची राज्यव्यवस्था चालविण्यासाठीं त्यानें आपलें स्वतंत्र असें राज्य निर्माण केलें होतें. (७) या सरकारला स्वतःचें उत्पन्न होतें आणि सुरवातीस त्याला वीस कोटी रुपयांपेक्षांही जास्त अशा ज्या देणग्या मिळाल्या त्यांचा खर्च राज्यकारभारासाठीं करण्यांत आला होता. (८) या सरकारचीं मुलकी आणि लष्करी अशीं दोन प्रसिद्धिपत्रकें ( ग्याझेटस् ) होतीं आणि त्यांचीं स्वतःचीं पोष्टाचीं तिकिटें होतीं.

पुराव्यानें सिद्ध झालेल्या या गोष्टींवरून जो कायद्याचा मुद्दा निर्माण होतो तो असा—ज्या परिस्थितींत हें हिंदी स्वातंत्र्य-राष्ट्र निर्माण झालें त्या परिस्थितींत आपल्या देशाच्या स्वातंत्र्यासाठीं लढाई करण्याचा या राष्ट्राला हक्क पोंचतो किंवा नाहीं आणि त्या हक्काच्या जाणिवेनें या राष्ट्रानें प्रत्यक्ष जी लढाई दिली ती समर्थनीय होती किंवा नाहीं. आणि या मुद्यावर माझें उत्तर या राष्ट्राला लढाई करण्याचा हक्क होता व त्यानें केलेली लढाई समर्थनीय होती असें आहे. तो कसा हें मीं आपल्याला स्पष्ट करून सांगणार आहें.

समजा कीं एका लढाऊ जर्मन सैनिकानें लढाईत दोन, तीन किंवा दहा इंग्रज खुद्द इंग्लंडमध्यें ठार केले आणि तो खुद्द इंग्लंडांतच पकडला गेला. आतां प्रश्न असा उद्भवतो कीं त्या जर्मनावर खुनाचा आरोप ठेवतां येईल काय ? नाहीं; कारण आंतरराष्ट्रीय कायद्यानेंच त्याला तशी मुभा दिली आहे आणि लढाई ही शत्रूला ठार मारण्यासाठींच असते. दोन स्वतंत्र देश किंवा राष्ट्रें एकमेकांविरुद्ध लढाई करतात आणि ती करणारे लढवय्ये ज्या गोष्टी करतात त्यांची चौकशी स्थानिक कायद्यांच्या कक्षेंत येत नाहीं. त्याचप्रमाणें

हिंदी फौजदारी कायद्याच्या ७९ व्या कलमान्वयें लढाईत केलेल्या गोष्टी गुन्ह्याच्या सदरांत येत नाहींत—'कायद्याची मुभा असलेल्या कोणत्याही मनुष्यानें केलेली गोष्ट हा गुन्हा नव्हे.' म्हणून मयांच्या उदाहरणांत सांगितलेला जर्मन युद्धकैदी आपला असा बचाव देतो कीं 'माझा देश, माझें राज्य तुमच्या राष्ट्राशीं लढाई करित आहे. माझ्या सरकारच्या हुकुमानें लढाईत मी दहा इंग्रज मारले आहेत. इतर परिस्थितींत हा गुन्हा झाला असला तरी तुमच्या आमच्यांतील चालू लढाईमुळें मी गुन्हा न करतां उलट बहादुरी केली आहे. कायद्यानें संमत असलेल्या युद्धांतील एखाद्या सैनिकानें हरघडी ठार मारलेले शत्रू आणि नाश केलेली त्यांची मालमता हे गुन्हे नव्हत.'

## आंतरराष्ट्रीय कायदा

पिट्ट–कोबेटच्या आंतरराष्ट्रीय कायद्याच्या दुसऱ्या भागांत आंतरराष्ट्रीय लढाईची खालील व्याख्या देण्यांत आली आहे.

> "आंतरराष्ट्रीय लढाई ही दोन राष्ट्रं किंवा एक राष्ट्र आणि राष्ट्र म्हणून समजली जाणारी जनता यांमध्यें सुरू असलेली सशस्त्र भंडाळी होय. आंतरराष्ट्रीय लढाई आणि इतर प्रकारच्या लढाया यांत हा फरक असतो कीं एका बाजूनें लढणारीं मित्र अगर दोस्त राष्ट्रं यांचे परस्पर संबंध आणि अशा राष्ट्रांचे शत्रुराष्ट्राशीं असलेले संबंध कायद्यानें ठरविले जातात. शत्रुराष्ट्रांतील लढाईचें स्वरूप नियमबद्ध असतें आणि अशा लढाईचे नियम चालीरीतीनें आणि वहिवाटीनें ठरवून टाकलेले असतात."

व्हीटनच्या आंतरराष्ट्रीय कायद्याप्रमाणें आंतरराष्ट्रीय भांडणें सोडवून घेण्याचा कायदेशीर मार्ग शिल्लक नसेल अशा वेळीं लढाई करणें हें आंतरराष्ट्रीय कायद्यानें मान्य केलें आहे. जागतिक राष्ट्रसंघानें दडपशाहीच्या लढाईचा धिक्कार केला असला तरी कांहीं बाबतींत लढाईचें अस्तित्व आणि शक्यता त्यानें मान्य केली आहे. लढाईची कल्पना राष्ट्रांराष्ट्रांतील लष्करांच्या सशस्त्र संघर्षानें व्यक्त केली जाते. चवदाव्या लुइनें स्ट्रासबर्गवर केलेल्या नुसत्या लष्करी आक्रमणानें अगर इटालीनें १९२३ सालीं केलेल्या करफ्यूवरील आक्रमणानें लढाईची कल्पना व्यक्त होत नाहीं. त्याचप्रमाणें लढाई

करणारीं राष्ट्रें सार्वभौमच असलीं पाहिजेत असेंही नाहीं. उदाहरणार्थ, सरबिया आणि मांटेनिग्रो या पोट राष्ट्रांनीं तुर्कस्तानवर १८७६ सालीं स्वारी केली आणि त्यांचें जोडीदार राष्ट्र रुमानिया त्यांत त्यांना सामील झालें; १८८५ सालीं सरबिया सार्वभौम झाल्यावर पुन्हा बल्गेरियानें त्या राष्ट्राविरुद्ध लढाई दिली आणि १८८६च्या तहांत तुर्कस्ताननें सरबियाशीं केलेल्या तहांत बल्गेरियानें स्वतंत्र राष्ट्र या नात्यानें तहनाम्यावर सही केली. दक्षिण अफ्रिकेनें १८९९ मध्यें आपल्या स्वातंत्र्यासाठीं ब्रिटिशांविरुद्ध केलेली लढाई प्रसिद्धच आहे.

तात्पर्य, लढाई करणारें राष्ट्र अगर एखादा लोकसमूह ती करण्यास पात्र असेल तर त्या लढाईची योग्ययोग्यता ठरविण्याचा प्रश्न स्थानिक कायद्याच्या कक्षेंत येत नाहीं. आपल्यासमोर असलेल्या उदाहरणांत ही पात्रापात्रता बाजूस ठेऊनहि मी असें म्हणतों कीं आझाद सरकारनें पुकारलेली ही लढाई सर्वस्वी कायदेशीर होती. लढाईचा आंतरराष्ट्रीय कायदा हा कलमी कायदा नसून तो पूर्वापार बनत आलेला आनुभविक व प्राचारिक कायदा आहे व तो समाजाच्या प्रगतीनें वाढत आलेला आहे. बोअर युद्धाप्रमाणें एक राष्ट्र आणि त्याचा राजा, सार्वभौम अगर चालक, यांमध्यें लढाई होते आणि ती कायदेशीर समजली जाते. पहिला चार्लस राजा आणि त्याचा मृत्यू, मोठी सनद ( म्याग्ना कार्टा ), दुसरा जेम्स राजा यांच्या बाबतींत झालेल्या इंग्रजी इतिहासांतील घटना आपल्याला ठाऊक आहेत. राजाच्या किंवा राष्ट्राच्या जुलमाविरुद्ध सशस्त्र बंडाळी करून त्या जुलमांतून आपली सुटका करून घेण्यासाठीं संघटीत होऊन ज्यावेळीं लोक लढाई पुकारतात त्यावेळा, ती लढाई नियमबद्ध असेल, तर ती क्षम्य आहे.

दक्षिण आणि उत्तर अमेरिकन संस्थानें यांमध्यें झालेल्या लढाईचें उदाहरण महशूर असून ॲब्राहाम लिंकन यानें जाहीर केलेलें युद्धनीतीचें तत्त्व असें आहे कीं अशी लढाई कायदेशीर असून त्या लढाईबरोबरच त्यांत घडलेल्या गोष्टीही संपुष्टांत येतात.

लॉरेन्स आपल्या आंतरराष्ट्रीय कायद्यांत म्हणतो कीं जनतेनें आपल्या सरकारविरुद्ध अगर एकाच किंवा निरनिराळ्या देशांतील लोकांनीं एकत्रितपणें एकमेकांविरुद्ध शिस्तबद्ध रीतीनें केलेली उठावणी ही कायदेशीर

हिंदी फौजदारी कायद्याच्या ७९ व्या कलमान्वयें लढाईंत केलेल्या गोष्टी गुन्ह्याच्या सदरांत येत नाहींत—'कायद्याची मुभा असलेल्या कोणत्याही मनुष्यानें केलेली गोष्ट हा गुन्हा नव्हे.' म्हणून मघांच्या उदाहरणांत सांगितलेला जर्मन युद्धकैदी आपला असा बचाव देतो कीं 'माझा देश, माझें राज्य तुमच्या राष्ट्रांशीं लढाई करित आहे. माझ्या सरकारच्या हुकुमानें लढाईंत मी दहा इंग्रज मारले आहेत. इतर परिस्थितींत हा गुन्हा झाला असला तरी तुमच्या आमच्यांतील चालू लढाईमुळें मी गुन्हा न करतां उलट बहादुरी केली आहे. कायद्यानें संमत असलेल्या युद्धांतील एखाद्या सैनिकानें हरघडी ठार मारलेले शत्रू आणि नाश केलेली त्यांची मालमता हे गुन्हे नव्हत.'

## आंतरराष्ट्रीय कायदा

पिट्ट–कोबेटच्या आंतरराष्ट्रीय कायद्याच्या दुसऱ्या भागांत आंतरराष्ट्रीय लढाईची खालील व्याख्या देण्यांत आली आहे.

> "आंतरराष्ट्रीय लढाई ही दोन राष्ट्रें किंवा एक राष्ट्र आणि राष्ट्र म्हणून समजली जाणारी जनता यांमध्यें सुरू असलेली सशस्त्र बंडाळी होय. आंतरराष्ट्रीय लढाई आणि इतर प्रकारच्या लढाया यांत हा फरक असतो कीं एका बाजूनें लढणारीं मित्र अगर दोस्त राष्ट्रें यांचे परस्पर संबंध आणि अशा राष्ट्रांचे शत्रुराष्ट्रांशीं असलेले संबंध कायद्यानें ठरविले जातात. शत्रुराष्ट्रांतील लढाईचें स्वरूप नियमबद्ध असतें आणि अशा लढाईचे नियम खालीरीतीनें आणि वहिवाटीनें ठरवून टाकलेले असतात."

व्हीटनच्या आंतरराष्ट्रीय कायद्याप्रमाणें आंतरराष्ट्रीय भांडणें सोडवून घेण्याचा कायदेशीर मार्ग शिल्लक नसेल अशा वेळीं लढाई करणें हें आंतरराष्ट्रीय कायद्यानें मान्य केलें आहे. जागतिक राष्ट्रसंघानें दडपशाहीच्या लढाईचा धिक्कार केला असला तरी कांहीं बाबतींत लढाईचें अस्तित्व आणि शक्यता त्यानें मान्य केली आहे. लढाईची कल्पना राष्ट्रांराष्ट्रांतील लष्करांच्या सशस्त्र संघर्षानें व्यक्त केली जाते. चवदाव्या लुइनें स्ट्रासबर्गवर केलेल्या नुसत्या लष्करी आक्रमणानें अगर इटालीनें १९२३ सालीं केलेल्या करफ्यूवरील आक्रमणानें लढाईची कल्पना व्यक्त होत नाहीं. त्याचप्रमाणें लढाई

करणारीं राष्ट्रें सार्वभौमच असलीं पाहिजेत असेंही नाहीं. उदाहरणार्थ, सरबिया आणि मांटेनिग्रो या पोट राष्ट्रांनीं तुर्कस्तानवर १८७६ सालीं स्वारी केली आणि त्यांचें जोडीदार राष्ट्र रुमानिया त्यांत त्यांना सामील झालें; १८८५ सालीं सरबिया सार्वभौम झाल्यावर पुन्हा बल्गेरियानें त्या राष्ट्राविरुद्ध लढाई दिली आणि १८८६च्या तहांत तुर्कस्ताननें सरबियाशीं केलेल्या तहांत बल्गेरियानें स्वतंत्र राष्ट्र या नात्यानें तहनाम्यावर सही केली. दक्षिण अफ्रिकेनें १८९९ मध्यें आपल्या स्वातंत्र्यासाठीं ब्रिटिशांविरुद्ध केलेली लढाई प्रसिद्धच आहे.

तात्पर्य, लढाई करणारें राष्ट्र अगर एखादा लोकसमूह ती करण्यास पात्र असेल तर त्या लढाईची योग्यायोग्यता ठरविण्याचा प्रश्न स्थानिक कायद्याच्या कक्षेंत येत नाहीं. आपल्यासमोर असलेल्या उदाहरणांत ही पात्रापात्रता बाजूस ठेऊनहि मी असें म्हणतों कीं आझाद सरकारनें पुकारलेली ही लढाई सर्वस्वी कायदेशीर होती. लढाईचा आंतरराष्ट्रीय कायदा हा कलमी कायदा नसून तो पूर्वापार बनत आलेला आनुभविक व प्राचारिक कायदा आहे व तो समाजाच्या प्रगतीनें वाढत आलेला आहे. बोअर युद्धाप्रमाणें एक राष्ट्र आणि त्याचा राजा, सार्वभौम अगर चालक, यांमध्यें लढाई होते आणि ती कायदेशीर समजली जाते. पहिला चार्लस राजा आणि त्याचा मृत्यू, मोठी सनद ( म्याग्ना कार्टा ), दुसरा जेम्स राजा यांच्या बाबतींत झालेल्या इंग्रजी इतिहासांतील घटना आपल्याला ठाऊक आहेत. राजाच्या किंवा राष्ट्राच्या जुलमाविरुद्ध सशस्त्र बंडाळी करून त्या जुलमांतून आपली सुटका करून घेण्यासाठीं संघटीत होऊन ज्यावेळीं लोक लढाई पुकारतात त्यावेळा, ती लढाई नियमबद्ध असेल, तर ती क्षम्य आहे.

दक्षिण आणि उत्तर अमेरिकन संस्थानें यांमध्यें झालेल्या लढाईचें उदाहरण महशूर असून ॲब्राहाम लिंकन यानें जाहीर केलेलें युद्धनीतीचें तत्त्व असें आहे कीं अशी लढाई कायदेशीर असून त्या लढाईबरोबरच त्यांत घडलेल्या गोष्टीही संपुष्टांत येतात.

लॉरेन्स आपल्या आंतरराष्ट्रीय कायद्यांत म्हणतो कीं जनतेनें आपल्या सरकारविरुद्ध अगर एकाच किंवा निरनिराळ्या देशांतील लोकांनीं एकत्रितपणें एकमेकांविरुद्ध शिस्तबद्ध रीतीनें केलेली उठावणी ही कायदेशीर

लढाई–होय ऑपेनहेमच्या आंतरराष्ट्रीय कायद्यांत सार्वभौम सत्ता आणि त्या सत्तेच्या अंकित असलेल्या राष्ट्रांतील प्रजा यांच्यामध्यें झालेली लढाई कायदेशीर असल्याचा स्पष्ट उल्लेख आहे. "राष्ट्रा-राष्ट्रांतील लढाई प्रमाणेंच ज्या लोकसमूहाला लढाई करण्याचा हक्क आहे. त्याला राष्ट्र अशी संज्ञा देतां येते." हाईडच्या आंतरराष्ट्रीय कायद्यान्वयें लष्करांतील शिपायानें राजनिष्ठेची किंवा देशनिष्ठेची शपथ घेऊन बंदूक हातांत घेतल्या क्षणापासून तो लष्करी योद्धा आणि शत्रू समजला जातो आणि त्यानें केलेले खून, हाणामारी, जखमा आणि जाळपोळ हे व्यक्तिगत गुन्हे समजले जात नाहींत 'संघटीत सैनिक हा सार्वजनिक शत्रू आहे. असा निर्णय घेण्याचा त्याच्या शत्रूला केव्हांही अधिकार पोचत नाहीं.' अंडरहिल विरुद्ध हरनांदेझ ( अमेरिकन रिपोर्ट १६८ पान २५० ) या खटल्यांत सरन्यायाधीश फुलर यांनीं असा सिद्धांत मांडला आहे कीं सशस्त्र लढ्यांतील कोणाही सैनिकानें केलेला गुन्हा इतरवेळीं स्थानिक कायद्याच्या कक्षेंत येत असला तरी युद्धाच्या वेळीं त्याला गुन्ह्याची मुभा असते. हा सशस्त्र लढा यशस्वी होवो अगर न होवो, युद्धांतील गोष्टी व्यक्तीवर लादतां येत नाहींत.

## चांग ची चू

सन १९३९ च्या प्रीव्हीकाउन्सिलच्या अपिलांच्या खटल्यांतील एका निवाड्याकडे मीं आपलें लक्ष वेधूं इच्छितों. त्या खटल्यांत आंतरराष्ट्रीय कायद्याचा महत्त्वाचा प्रश्न उपस्थित झाला होता. त्या खटल्यांतील आरोपीचें नांव चांग ची चू असें होतें आणि चिनी जहाजावर त्यानें केलेल्या खुनाच्या आरोपावरून त्याच्यावर खटला भरण्यांत आला होता. ब्रिटिशांच्या हद्दींतील चिनी जहाजावर झालेला हा गुन्हा चिनी न्यायालयांतच चालावा व ब्रिटिश न्यायालयाला तो चालवितां येणार नाहीं अशी आरोपीची बचावाची हरकत होती आणि खालील कोर्टाच्या निकालाविरुद्ध त्यानें प्रीव्हीकाउन्सिलकडे शेवटचें अपील लावलें. आपली हरकत आंतरराष्ट्रीय स्वरूपाची आहे असें त्याचें म्हणणें होतें. त्यावर प्रीव्हीकाउन्सिलच्या न्यायाधीशांचें असें म्हणणें पडलें कीं राष्ट्राराष्ट्रांच्या परस्पर सन्मान्यतेच्या दृष्टीनें विचार केल्यास परकी राष्ट्राच्या मालकीच्या जहाजावर झालेला गुन्हा हा स्थानिक न्यायालयाच्या कक्षेंत अगर अधिकारांत येत नाहीं. ब्रिटिशांच्या हद्दींत वावरणाऱ्या त्या

महाजाच्या मालकानीं ब्रिटिशांचें संरक्षण मान्य केलें होतें ही गोष्ट जरी खरी असली तरी आरोपीच्या बाबतींत ती त्याचेवर बंधनकारक होऊं शकत नाहीं. या खटल्यांत लॉर्ड ॲटकिन यांनी दिलेला निकाल फार महत्वाचा असून त्यांतील विधानें चालू खटल्यांत उपयोगी पडण्यासारखीं आहेत. लॉर्ड ॲटकिन असें म्हणतात कीं सदरहू चिनी जहाजावर घडलेल्या कोणत्याही गुन्ह्यांच्या बाबतींत चौकशी करण्याचा ब्रिटिश न्यायालयाला अधिकार पोंचत नाहीं असें आपलें मत असून आंतरराष्ट्रीय न्यायाचें तत्व मान्य केल्यास या आरोपीचा खटला चिनी न्यायासनासमोरच चालला पाहिजे आणि आरोपीच्या इच्छेविरुद्ध तो खटला ब्रिटिश न्यायालयांत चालवितां येणार नाहीं.

ऑपेन्हिमच्या आंतरराष्ट्रीय कायद्यांतील सिद्धांत ऐतिहासिक उदाहरणांवर आधारलेले आहेत. पहिल्या महायुद्धांत ग्रेट ब्रिटन, फ्रान्स, इटाली आणि अमेरिका या राष्ट्रांनीं झेकोस्लावाकियाला शत्रुराष्ट्र म्हणून मान्यता दिली होती. अशाच प्रकारची मान्यता १९१७ सालीं पोलिश राष्ट्र-सैन्यालासुद्धां देण्यांत आली होती. या सैन्यांतील पुष्कळसे योद्धे शत्रुराष्ट्रांतील शिपाई होते. आपल्या राष्ट्राच्या स्वातंत्र्यासाठीं परकी राष्ट्रांत अगर परराष्ट्राच्या सैन्यांत जाऊन आपल्या शत्रूविरुद्ध लढाई देणारे व ती परिणामकारकरीतीनें टिकवून धरणारे योद्धे स्थानिक कायद्याच्या कक्षेत येऊं शकत नाहींत असें ऑपेन्हिमचें स्पष्ट मत आहे. पोर्तुगालची कायदेशीर वारसदार म्हणून ब्रिटिशांनीं मान्यता दिलेली राणी डोना मरिया हिच्याविरुद्ध एकवेळ तिच्या पाणीग्रहणाची इच्छा धरणारा तोतया राजपुत्र डॉन मीगल ह्यानें १८२८ सालीं लढाई पुकारली. डॉन मीगलच्या हक्काला ब्रिटिशांनीं कायदेशीर अगर प्रत्यक्ष अशी कसलीच संमती कधींही दिली नव्हती. या लढाईंत पोर्तुगालचीं ओपोर्टो आणि अझोर्स हीं दोन बंदरें परदेशच्या व्यापाराला त्या तोतया राजपुत्रानें बंद करून टाकलीं आणि त्याप्रमाणें ब्रिटिशांवर आपला बंदीचा हुकूम त्यानें बजावला. अशा पेंचप्रसंगीं ब्रिटिशांचे सरकारी वकील सर हरबर्ट जेनर यांनीं या बंदीला मान्यता देण्याचा राजसभेला सल्ला दिला. या उदाहरणांवरून सिद्धांत निघतो तो असा कीं आझाद सैन्याला ब्रिटिशांची मान्यता मिळालेली नसली तरी आझाद सरकारचा ब्रिटिशांविरुद्ध लढाई पुकारण्याचा जाहीर-

नामा ब्रिटिशांवर बंधनकारक ठरतो. आणि म्हणूनच त्या सरकारचे अगर सेनेचे अधिकारी ब्रिटिशांच्या न्यायालयांत खेंचतां येत नाहींत.

तिसरें उदाहरण ग्यारिबॉल्डीचें. १८६० सालच्या ग्यारिबॉल्डीच्या इटालींतील स्वातंत्र्ययुद्धांत ब्रिटिशांचे त्यावेळचे सरकारी वकील सर जॉन हार्डिंज यांनीं असा सल्ला दिला कीं इटालीचा नामधारी राजा आणि ग्यारिबॉल्डी यांच्यामधील अंतर्गत युद्धास मान्यता देणें हें आंतरराष्ट्रीय कायद्याला धरून असल्यामुळें ब्रिटिशांनीं कोणाची बाजू उचलून न धरतां दोघांही लढाऊ बाजूंना मान्यता देऊन आपण तटस्थ राहिलें पाहिजे. सर जॉन हार्डिंज यांनीं असाही सल्ला दिला कीं ग्यारिबॉल्डी व त्याचे साथीदार हे राष्ट्रांराष्ट्रांनीं मान्य केलेल्या पद्धतीनें समुद्रावर लढाई करित असल्यामुळें त्यांना चांचे म्हणतां येत नाहीं.

स्पेनमधील बंडाळीबद्दल कॉमन्स सभेच्या १४ एप्रिल १९३७ च्या वादविवादांतील एका अधिकृत उताऱ्याकडे मी आपलें लक्ष वेधितों:—

"मि. ईडन: स्पेनमधील बंडाळींतील पक्षोपपक्षानां इतक्या लवकर शत्रुराष्ट्रें म्हणून मान्यता दिल्याचें जें सांगण्यांत येतें त्याला इतिहासांत दुसरी तोड नाहीं असा विरुद्धपक्षाचा सरकारवर आरोप आहे. त्यावर माझें उत्तर असें आहे, कीं अमेरिकेंतील अंतस्थ बंडाळीच्या वेळीं उत्तर व दक्षिण संस्थानांना लढाऊ राष्ट्रांची मान्यता एका आठवड्याच्या आंत दिली गेली होती.

मि. नोएल बेकर: त्यावेळीं खुद्द सरकारनेंच व्यापारबंदीचा हुकूम काढला असल्यामुळें दोन्ही बाजूंच्या राष्ट्रांना लवकर मान्यता देणें सरकारला भाग पडलें होतें. त्यांत सरकारचाच फायदा होता.

मि. ईडन: त्यावेळीं आम्ही आपणहूनच तटस्थतेचा पुकार केला होता. अमेरिकन स्वातंत्र्ययुद्ध आणि १८२१ मध्यें ग्रीक लोकांनीं तुर्कस्तानविरुद्ध केलेली बंडाळी या दोन्ही घडामोडींत त्या त्या देशांतील लोकांनीं आपल्या गुलामगिरींतून सुटका करून घेण्यासाठीं आपल्या पालक राष्ट्राविरुद्ध लढाई दिली होती; आणि स्पेनचें उदाहरणही अगदीं

तसेंच आहे. या तिन्ही लढ्यांत ब्रिटिश राजसभेचें धोरण एकच आहे, तें म्हणजे अशा लढाऊ प्रजेला आणि तिच्या पालक राष्ट्रांना परस्पर शत्रुत्वाची कायदेशीर मान्यता देणें आणि दोन्ही पक्षांपासून तटस्थ राहणें.

मि. चर्चिल : स्पेनमधील जनरल फ्रँकोच्या बंडखोर पक्षाला मान्यता दिल्याबद्दल सरकारवर टीका करणारे विरोधी पक्षाचे नेते आपल्या पक्षाचा पूर्व इतिहास विसरले काय ? त्या पक्षाचा इतिहास हा ब्रिटिश राजवटीविरुद्ध लढाई देणाऱ्या बंडखोरांचाच इतिहास होय. विरोधी-पक्षाचे मूळ प्रणेते ग्लॅडस्टन हे तर बडखोरांचे चहाते होते आणि अमेरिकेच्या स्वातंत्र्ययुद्धांत त्यांनीं बंडखोरानांच उचलून धरलें होतें. दक्षिण अमेरिकेच्या दाव्यानें झगडण्यांत त्यानीं आपलें वक्तृत्व खर्चीं घातलें. म्हणून आपल्या हक्काच्या जाणिवेनें स्वातंत्र्यासाठीं लढणारे योद्धे, समाज आणि राष्ट्रें हीं पिसाळलेलीं कुत्रीं समजून त्यांना गोळी घालण्यापूर्वी आपण स्वतःचा इतिहास कधींतरी वाचून पाहिला आहे काय ? ”

सदर खटल्यांत लागू पडणारा हा उतारा म्हणजे फिर्यादीपक्षाला मिळालेला घरचाच अहेर नव्हे काय ?

या वादविवादाचा सारांश थोडक्यांत असा मांडतां येईल कीं ब्रिटन-विरुद्ध आझाद हिंद सरकार या लढाईला प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष कारणीभूत झालेले मि. चर्चिल आणि मि. ईडन यांच्या मताप्रमाणेंच अंतर्गत राज्य-क्रांति यशस्वी होवो अगर न होवो, ज्यावेळीं त्या क्रांतीला प्रत्यक्ष लढाईचें स्वरूप प्राप्त होतें त्यावेळीं परस्परांविरुद्ध लढणारे योद्धे स्थानिक कायद्याच्या बंधनांतून मुक्त होतात. आणि तसे ते मुक्त होत नाहींत असा कोणी दुराग्रह धरल्यास क्रांतीची आणि लढाईची कल्पनाचमुळीं संभवत नाहीं असें म्हणावें लागेल ! आझाद फौजेनें जसें शत्रूवर गोळे सोडले तसें ब्रिटिश फौजेनेंसुद्धां तिच्यावर सोडले आहेत. दोन्हीं बाजूंची गोळाबेरीज समसमान झाली आहे. मग ह्या खटल्याचें अस्तित्वच कुठें राहतें ?

चर्चिल पुढें म्हणतात : बंडखोर सैनिकांना आणि समाजाला ध्येय असते. त्या ध्येयाच्या पुर्तीसाठीं ते लढतात आणि तो लढा अमान्य आहे म्हणून सरकार त्या लढ्याचा प्रतिकार करतें. म्हणून स्पेनच्या सरकाराला

शंभर टक्के गुण आणि त्याच्या विरुद्ध बंड करणाऱ्या पक्षाला शून्य गुण आपल्याला देतां येत नाहींत.

चर्चिल यांचें हे उद्गार म्हणजे या खटल्यांतील फिर्यादीच्या विधानांना कमजोर करणारें एक उत्तरच होय. आझाद सरकारला आमच्या दुर्दैवानें आलेल्या अपयशाला संमति देणें अगर न देणें हा प्रश्न इथें उभा नाहीं. कारण तो मुद्दाच इथें नाहीं. मुद्दा याहूनही आकुंचित आहे. आणि तो असा कीं आझाद सरकारच्या या स्वातंत्र्ययुद्धांत शत्रुराष्ट्राचे अधिकार त्याला प्राप्त होतात किंवा नाहींत? आणि त्याला उत्तर स्वतः चर्चिल यांनींच दिलें आहे.

सन १७७६ सालचा अमेरिकन संस्थानांचा स्वातंत्र्याचा जाहिरनामा आणि आझाद हिंद सरकारचा या न्यायासनासमोर सिद्ध झालेला जाहीरनामा यांत साम्य आहे. हे दोन्ही जाहीरनामे ज्या परिस्थितींत पुकारण्यांत आले ती परिस्थिती एकच होती आणि या दोन्ही वेळीं राजनिष्ठा अगर देशनिष्ठा या गोष्टींतून प्रसंगोपात कोणत्या गोष्टीची निवड करावी हा प्रश्न उपस्थित झाला होता. आणि त्या प्रश्नाचें उत्तर अमेरिकन राष्ट्रानें आणि आझाद हिंद राष्ट्रानें एकच दिलें आहे. तें असें कीं स्वतःच्या स्वातंत्र्याचा प्रश्न उभा असेल त्यावेळीं राजनिष्ठेची शपथ सैनिकावर बंधन घालूं शकत नाहीं. गेल्या जागतिक महायुद्धामध्यें दडपशाहीविरुद्ध लढाई देऊन ज्या थोर अमेरिकन राष्ट्रानें जगाला सोडविलें त्या राष्ट्राच्या स्वातंत्र्याच्या स्वयं निर्णयाला आपण अव्हेरित असाल तर तशाच परिस्थितींतून निर्माण झालेल्या या खटल्यांत आपण न्याय दिला असें म्हणतां येणार नाहीं. फेरारपार्कमधील घटनेनंतर आणि प्रत्यक्ष हिंदुस्थानांत त्यावेळीं निर्माण झालेल्या परिस्थितीनुसार आझाद फौजेंतील या आरोपी अधिकाऱ्यांनीं ज्या गोष्टी केल्या त्या कायदेशीर होत्या व त्यांना १७७६ मधील अमेरिकेंतील घटनांच्या इतिहासाचा परिपूर्ण पाठिंबा आहे असें माझें सांगणें आहे.

या नंतर फिर्यादीतर्फे देण्यांत आलेल्या खुनाच्या आरोपांवरील पुराव्याचा कायदेशीर फोलपणा दाखवून श्री भुलाभाई यांनीं आपलें भाषण संपविलें.

त्यानंतर सर नोशिरवान एंजीनियर यांनीं फिर्यादीतर्फेचें आपलें लेखी उत्तर वाचून दाखविलें. त्यांच्या उत्तरांतील मुख्य मुद्दे खालीलप्रमाणें होतेः—

(१) आझाद हिंद फौज ही शाही हिंदी लष्करांतील युद्धकैद्यांतून निर्माण झालेली लोकांची फौज असल्यामुळें शाही लष्कराचे कायदे आरोपींवर बंधनकारक आहेत.

(२) याच कारणास्तव आरोपींनीं केलेल्या गोष्टी हिंदी लष्करी कायद्याच्या कक्षेंत येतात.

(३) आरोपींचे गुन्हे आंतराष्ट्रीय कायद्याच्या कक्षेंत येण्यासारखा पुरावा देण्यांत आलेला नाहीं.

(४) आंतरराष्ट्रीय कायद्याचा विचार करण्याचा या लष्करी न्यायालयाला अधिकार देण्यांत आलेला नाहीं. न्यायासनासमोर असलेल्या आरोपींच्या व्यक्तिगत गुन्ह्यांबद्दलचा आपला निकाल त्यांनीं हिंदी सरसेनापतींस दाखल करावयाचा आहे. इतर बाबींकडे लक्ष देण्याचें काम या न्यायासनाचें नाहीं.

(५) शाही लष्करी कायदा आंतरराष्ट्रीय कायद्यावर उभारण्यांत आला नसून लष्करी कायद्याचें क्षेत्र मर्यादित स्वरूपाचें आहे.

त्यानंतर लष्करी न्यायवकील क. केरिन यांनीं दोन्ही पक्षांच्या विधानांचा समारोप केला आपल्या स्वतःच्या मतें सदरहू खटल्यास आंतरराष्ट्रीय कायदा लागू होत नाहीं असें त्यांनीं सांगितलें. परंतु आपलें मत न्यायाधीशांवर कोणत्याही रीतीनें बंधनकारक नाहीं असें ते म्हणाले.

× × ×

या खटल्यांतील लष्करी न्यायाधीशांनीं आपलें निकालपत्रक योग्यवेळीं हिंदुस्थानचे सरसेनापती सर ऑकिनलेक यांना सादर केलें. त्या निकालपत्रकाचा योग्य तो विचारविनिमय होऊन ता. ३ जानेवारी १९४६ रोजी शेवटचें सरकारी जाहीरपत्रक काढण्यांत आले त्याचा सारांशः—

कॅप्टन शहानवाझखान, कॅप्टन सहगल आणि लेफ्टनंट धीलन यांच्यावर बादशहाविरुद्ध बंड करणें, खूनकरणें आणि करविणें या गुन्ह्यांबद्दल लष्करी न्यायाधीशांसमोर खटला चालून त्यांत त्यांनी तिन्ही आरोपींना बादशहाविरुद्ध बंड केल्याच्या आरोपावरून दोषी ठरविलें आहे. त्याचप्रमाणें कॅ. शहानवाझखान यांना खुनाला मदत केल्याच्या आरोपावरून

दोषी ठरविण्यांत आलें आहे. कॅ. सहगल यांना खुनाला मदत केल्याच्या आरोपांतून आणि ले. धीलन यांना खुनाच्या आरोपांतून मुक्त करण्यांत आलें आहे.

बादशाहाविरुद्ध बंड केल्याच्या आरोपांत दोषी ठरल्यामुळें आरोपींना देहांताची अगर आमरण हद्दपारीची शिक्षा देणें हें न्यायाधीशांवर बंधनकारक आहे. कारण या गुन्ह्यांना कायद्यांत याहून निराळी शिक्षाच नाहीं. म्हणून या खटल्यांतील आरोपींना न्यायाधीशांनीं जन्मठेप, नोकरींतून बडतर्फी आणि पगारजप्ती या शिक्षा दिल्या असून त्यांनीं आपलें निकालपत्रक मंजुरीसाठीं सरसेनापतींकडे सुपूर्द केलें.

लष्करी न्यायाधीशांनीं दिलेल्या निकालपत्रकाला मंजुरी मिळाल्याशिवाय तें कायम होत नसतें. हिंदुस्थानचे सर सेनापती यांनीं या न्यायाधीशांनीं दिलेला निकाल सर्वस्वी योग्य आहे अशी आपली खात्री करून तो कायम केला आहे. परंतु लष्करी कायद्यानें आरोपींना देण्यांत आलेली कोणतीही शिक्षा सौम्य करण्याचा, ती बदलण्याचा अगर ती रद्द करण्याचा अधिकार सरसेनापतींस देण्यांत आलेला आहे. बादशाहाविरुद्ध बंड करण्याच्या आरोपाशिवाय अमानुषपणाचें वर्तन केल्याचे आरोप ज्यांच्यावर आहेत अशा आरोपींवरच खटले उभारण्यांत यावयाचे आहेत अशा अर्थाचें सरकारी धोरण यापूर्वीच ठरून गेलेलें आहे. आरोपींना झालेल्या शिक्षेचा फेरविचार करणें झाल्यास त्यांच्याकडून माणुसकीला सोडून झालेल्या गुन्ह्याची मर्यादा लक्षांत घेऊनच तसा विचार होईल असेंही सरकारी धोरण ठरलेलें आहे.

कॅ. सहगल आणि ले. धीलन हे खुनाच्या आरोपांतून मुक्त झाले असून अमानुष वर्तनाचा आरोप त्यांच्यावर ठेवण्यांत आलेला नाहीं. उलटपक्षीं कॅ. शहानवाझखान यांच्यावर खुनाला मदत केल्याचा आरोप सिद्ध झाला असून त्यांनीं केलेलीं कृत्यें भयंकर स्वरूपाचीं असलीं तरी ज्या परिस्थितात त्यांनीं तीं केलीं आहेत ती परिस्थिती सरसेनापतींनें विचारांत घेतली आहे.



या कारणांसाठीं या तिन्ही आरोपींचे गुन्हे एकाच पारड्यांत टाकण्याचें सरसेनापतींनीं ठरविलें असून त्यांना देण्यांत आलेली जन्मठेपेची शिक्षा रद्द करण्याचा त्यांनीं निर्णय घेतला आहे. परंतु **आरोपींना बडतर्फ करणें व त्यांचा पगारभत्ता जप्त करणें या शिक्षा सरसेनापतींनीं कायम केल्या आहेत.** कारण कोणत्याही परिस्थितींत आपली राजनिष्ठा धाब्यावर बसवून राजाविरुद्ध बंड करणें या गोष्टी फार भयंकर स्वरूपाच्या आहेत. कायद्यानें प्रस्थापित झालेल्या चालू अगर प्रस्थापित होणाऱ्या भावी सरकारला ही गोष्ट केव्हांही नजरेआड करतां यावयाची नाहीं.

× × ×

या पत्रकाच्या प्रसिद्धीबरोबरच या तिन्ही क्रांतिवीरांना बंधमुक्त करण्यांत आलें. लालकिल्ल्याच्या बंदिखान्यांतून संध्याकाळच्या वेळीं त्यांना बाहेर काढण्यांत आलें. त्यानंतर ते सरळ बॅ. असफअल्लींच्या समोर येऊन उभे राहिले आणि त्यांनीं असफअल्लींना आपल्या स्वातंत्र्याची सलामी दिली—

"जय हिंद"

REFBK-0006770